



# जनमाध्यम

e paper www.janmadhyam.com

एक प्रतिष्ठित सवय


✦ अमरावती, गुरुवार २० ऑगस्ट २०२६ ✦ मूल्य ४.०० ✦ पृष्ठ १०





# विधानसभा अध्यक्षांनी केली घटनेची पायमल्ली

**नवी दिल्ली/मुंबई / प्रतिनिधी-** शिवसेना आमदार अपात्रता प्रकरणावर आज सुप्रीम कोर्टात महत्त्वाची सुनावणी पार पडली. शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे वकील कपिल सिब्बल यांचा आज युक्तिवाद संपला. युक्तिवाद संपवत असताना कपिल सिब्बल यांनी विधानसभा अध्यक्ष राहुल नार्वेकर यांनी थेट घटनेची पायमल्ली केली आहे. मुळात खरी शिवसेना ठाकरेंचीच असून, धनुष्यबाण चिन्ह ठाकरेंना मिळत नसेल तर ते गोठवून टाकले पाहिजे, अशी मागणी केली.



दरम्यान, विधानसभा अध्यक्षांचा दृष्टिकोन कायद्याच्या विरोधात असेल, तर त्यांचा निर्णय रद्द करण्याचा अधिकार आम्हाला आहे, याबाबत आम्हाला कोणतीही शंका नाही. मात्र, त्यानंतरच्या परिणामी कारवाईत आम्ही स्वतः एकनाथ शिंदे यांना अपात्र ठरवू शकतो का, असा सवाल न्यायालयाने व्यक्त केला.

माझा विचारपूर्वक मांडलेला युक्तिवाद असा आहे आणि मी माननीय न्यायालयाला विनंती करतो की, शिवसेना हे नाव ठाकरे यांचेच आहे आणि शिंदे गटाला ते चिन्ह मिळू शकत नाही, असा निर्णय द्यावा. त्यांनी त्या चिन्हाचा लाभ घेतला आहे, याचा अर्थ त्यांच्या बाजूने कोणताही न्याय्य हक्क निर्माण होत नाही. हा चिन्हाचा अनधिकृत वापर करण्याचा प्रकार आहे. जर ते चिन्ह त्यांना मिळू शकत नसेल आणि आम्हालाही मिळू शकत नसेल तर ते चिन्ह गोठवले गेले पाहिजे. कारण ते नाव माझा हक्क आहे, अशा शब्दात कपिल सिब्बल यांनी शिवसेना पक्ष आणि चिन्हाबाबत पहिल्यांदाच मोठी मागणी केली.

कपिल सिब्बल यांचा युक्तिवाद संपल्यानंतर ठाकरे गटाचेच वकील देवदत्त कामत यांनी युक्तिवाद सुरु केला. यावेळी त्यांना न्यायमूर्ती बागची यांनी महत्त्वाचा प्रश्न विचारला. त्यावर त्यांनी उत्तर दिले. विधानसभा अध्यक्ष चुकले असतील तर कोर्ट आम्हाला दिलासा देउ शकते. विधिमंडळ पक्ष कोणत्याही निवडणुकीला उमेदवार उभा करत नाही. विधिमंडळ पक्ष निवडणुकीचा उमेदवार ठरवत नाही तर राजकीय पक्ष ठरवतात. विधिमंडळ पक्षावर सर्व अवलंबून राहण्यासाखे असेल तर इतर पर्यायांचा विचार केला पाहिजे, जो केला गेला नाही, असा युक्तिवाद ठाकरेंचे वकील देवदत्त कामत यांनी केला.

आमदारांची टर्म संपली असली तरी आमदार अपात्रता प्रकरण महत्त्वाचे आहे. एकनाथ शिंदे पक्षात राहिले नाहीत तर त्यांच्याकडून होणारे दावे कसे राहतील, बंडखोरी झाली तेव्हा पक्ष कोण होता, हे खूप महत्त्वाचे आहे. पक्षाचे प्रमुख, सचिव या रचनेची शिंदेंनी पायमल्ली केली. विधिमंडळ पक्ष हा राजकीय पक्ष असल्याचा बचाव करू शकत नाही. अपात्रतेची कारवाई होत असताना विधिमंडळ पक्ष राजकीय पक्ष असल्याचे सांगून कारवाईपासून वाचू शकत नाही, असा महत्त्वाचा युक्तिवाद निकम यांनी केला.

**न्यायमूर्ती बागचे यांचे कामत यांना अनेक प्रश्न-** आम्ही आज शिंदेंना अपात्र घोषित करू शकतो का, आम्ही विधानसभा अध्यक्षांची भूमिका घेउन शिंदेंना अपात्र ठरवू शकतो का, असा प्रश्न न्यायमूर्ती बागची यांनी विचारला. आम्ही शिस्तभंगाच्या कारवाईची शिक्षा रद्द करु शकतो. पण शिक्षा देउ शकतो का, असा प्रश्नही न्या. बागची यांनी विचारला. अध्यक्षांची भूमिका ही कायद्याच्या विरोधात असेल तर आम्ही ती रद्द करु शकतो. यात आम्हाला शंका नाही. पण परिणामी आम्ही त्यांना अपात्र करू शकतो का, असे न्यायमूर्ती बागची यांनी कामत यांना विचारले.

## मोदी कॅबिनेटचे ५ मोठे निर्णय

# हायवे, 4 रेल्वे मार्गांना मंजुरी, 13 हजार कोटींच्या प्रकल्पांवर मोहर!

**नवी दिल्ली/वृत्तसंस्था :** पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या अध्यक्षतेखाली आज केंद्रीय मंत्रिमंडळाची बैठक पार पडली. या बैठकीत पायाभूत सुविधांच्या विकासासाठी १३०४१ कोटी रुपयांच्या प्रकल्पांना मंजुरी देण्यात आली. यात, बिहारमधील चार पदरी महामार्ग आणि पश्चिम बंगाल, ओडिशा, आंध्र प्रदेश व तामिळनाडू राज्यांमधील ४ महत्त्वाच्या रेल्वे मार्गांचा समावेश आहे. यासंदर्भात, केंद्रीय रेल्व,माहिती तंत्रज्ञान मंत्री अश्विनी वैष्णव यांनी माहिती दिली.



पत्रकार परिषदेत बोलताना वैष्णव म्हणाले, सरकारने एकूण १३,०४१ कोटी रुपयांचे चार रेल्वे मार्ग आणि एका चार पदरी महामार्गाच्या प्रकल्पाला मंजुरी दिली आहे. मोदी मंत्रिमंडळाने ३,५९१ कोटी रुपये खर्चाच्या मुझफ्फरपूर-सीतामढी-सोनवर्षा या चार पदरी महामार्गाच्या बांधकामाला मंजुरी दिली आहे. देशातील रेल्वे नेटवर्कमध्ये एकूण ७ मुख्य ट्रंक रूट्स आहेत. यात दिल्ली-हावडा, हावडा-चेन्नई, चेन्नई-मुंबई, मुंबई-दिल्ली, दिल्ली ते चेन्नई आणि मुंबई ते हावडा या रेल्वेमार्गांचा, तसेच गुवाहाटीकडे जाणा-या ईशान्य मार्गाचा समावेश आहे. यांपैकी हावडा-चेन्नई मार्ग अत्यंत महत्त्वाचा आहे. त्याला पूर्णपणे चार पदरी करण्याची योजना आहे.

**बिहारमध्ये ४ पदरी महामार्ग -** मुझफ्फरपूर - सीतामढी - सोनवर्षा या ८२.६ किमी लांबीच्या राष्ट्रीय महामार्गाचे ४ पदरीकरणात रूपांतर केले जाणार आहे. यामुळे भारत-नेपाळ सीमेवरील व्यापार आणि वाहतूक अदिक भक्कम होईल. या प्रकल्पासाठी ३,५९१ कोटी रुपये मंजूर करण्यात आले आहेत.

**हावडा - चेन्नई रेल्वे मार्गाचे ४ पदरीकरण-** पश्चिम बंगाल आणि ओडिशादरम्यानच्या खरगपूर-भद्रक या १७३ किमी च्या प्रकल्पाला ३,३५२ कोटी रुपये खर्च केले जातील. या मार्गावर ४१ मोठे आणि १६९ छोटे पूल बांधले जाणार आहेत. भद्रक ते हरिदासपूर या ७५ किमी च्या चौथ्या लाईन प्रकल्पासाठी १,५३३ कोटी रुपये खर्च अपेक्षित आहे. गुम्मिडीपुंडी ते गुदूर या ९० किमी आंध्र प्रदेश आणि तामिळनाडूच्या सीमेवरील या डबल लाईन मार्गाचे तिस-या आणि चौथ्या लाईनच्या विस्तारासाठी २२२९ कोटी रुपये खर्च केले जाणार आहेत.

# गुजरातमध्ये बनावट दारू प्यायल्यानं 5 जणांचा मृत्यू

**भावनगर/वृत्तसंस्था :** गुजरातच्या भावनगर जिल्ह्यातील घोघा तालुक्यातील खारकाडी गावात बनावट दारू प्यायल्याने पाच जणांचा मृत्यू झाला आहे. तर, २० जणांची प्रकृती बिघडल्याने त्यांना रुग्णालयात दाखल करण्यात आले असून यातील तिघांची प्रकृती चिंताजनक आहे. गुजरातमध्ये कायद्यानुसार दारूबंदी लागू असतानाही, अशा प्रकारे खुलेआम अवैध आणि बनावट दारूची विक्री होत असल्याने मृतांच्या नातेवाईकांकडून संताप व्यक्त केला जात आहे.मिळालेल्या माहितीनुसार, या प्रकरणातील मुख्य आरोपी गौतम सोलंकीने त्याचे साथीदार रईस आणि मुकेश यांच्या मदतीने मध्य प्रदेशातील उज्जैनहून सुमारे २३० दारूच्या बाटल्या आणल्या. वर्तेजमधील आंबलीवाडी येथील त्याच्या घरी या बाटल्यांमध्ये स्थानिक बनावटीची दारू मिसळून त्याची विक्री केली. ही बनावट दारू प्यायल्यानंतर अनेकांची प्रकृती बिघडली आणि त्यांना तातडीने रुग्णालयात दाखल करण्यात आले. उपचारदरम्यान, पाच जणांचा मृत्यू झाला आणि २० जणांवर सध्या रुग्णालयात उपचार सुरू आहेत. यातील १० रुग्णांना भावनगरच्या सर टी. हास्पिटलमध्ये दाखल करण्यात आले आहे, तर १० जणांवर विविध जिल्ह्यांतील रुग्णालयांमध्ये उपचार सुरू आहेत. यातील तिघांची प्रकृती चिंताजनक आहे. घटनेचे गांभीर्य ओळखून उपमुख्यमंत्र्यांच्या आदेशानंतर स्टेट मानिटरिंग सेलचे पथक तपासासाठी भावनगरमध्ये दाखल झाले. तसेच, फोरेन्सिक सायन्स लॅबोरेटरीच्या पथकाने घटनास्थळावरून महत्त्वाचे पुरावे गोळा केले आहेत. जिल्हाधिकारी, एसडीएम अक्षर व्यास आणि पोलीस अधीक्षक नितेश पांडे यांनी 'सर टी. हास्पिटल'च्या आयसीयूला भेट देउन रुग्णांची विचारपूस केली. पोलीस प्रशासनाने तत्परतेने कारवाई करत मुख्य सूत्रधाराच्या ठिकाणावर छापा टाकून १३० हून अधिक दारूच्या बाटल्या जप्त केल्या असून, तिन्ही मुख्य आरोपींविरुद्ध कडक कायदेशीर कारवाई सुरू केली आहे.



# 5 मजली इमारतीला आग, 9 ठार

## मृतांत बांगलादेशींचा समावेश, इमारतीत अनेक हाटेल्स, 80 जणांची सुटका, 6 जखमी

**कोलकाता/वृत्तसंस्था :** कोलकात्यातील मिर्झा गालिब स्ट्रीटवरील एका पाच मजली इमारतीत मंगळवारी पहाटे पावणेदोनच्या सुमारास आग लागली. या इमारतीत अनेक हाटेल्स होती. या घटनेत दोन महिला आणि एका चार वर्षांच्या मुलासह नउ जणांचा मृत्यू झाला. हे सर्वजण बेशुद्ध अवस्थेत आढळले होते. या दुर्घटनेत सहा जण जखमी झालेत. आतापर्यंत ८० जणांना सुरक्षितपणे बाहेर काढण्यात आले आहे. आग लागली तेव्हा हाटेलमधील बहुतांश जण झोपलेले होते. इमारतीत वेगाने दाट धूर पसरल्याने अनेकांचा गुदमरून मृत्यू झाला. मृतांमध्ये भारतीय आणि बांगलादेशी नागरिकांचा समावेश आहे. मात्र अद्याप त्यांची ओळख पटलेली नाही. मृतांचा आकडा वाढण्याची भीती पोलिसांनी व्यक्त केली आहे.आगीची माहिती मिळताच अग्निशमन दलाच्या पाच गाड्या, तसेच पोलीस आणि आपत्ती व्यवस्थापन पथके घटनास्थळी दाखल झाली. दाट धुरामुळे अग्निशमन दलाच्या जवानांना वरच्या मजल्यांवर पोहोचताना मोठ्या अडचणींचा सामना करावा लागला. आग नियंत्रणात आणण्यात आली असली तरी इमारत अजूनही प्रचंड गरम असल्याने सध्या 'कूलिंग ऑपरेशन' (थंड करण्याची प्रक्रिया) सुरू आहे. पश्चिम बंगालचे अग्निशमन सेवा मंत्री कौशिक चौधरी यांनी सांगितले की, ही आग शार्ट सर्किटमुळे लागल्याचा संशय आहे. मात्र, फोरेन्सिक तपासणीनंतरच याला दुजोरा मिळेल.घटनास्थळाला भेट दिल्यानंतर मंत्र्यांनी इमारतीमधील ⇨(पान २ वर)



# मिलिटरी शाळेतील अल्पवयीन विद्यार्थिनीचा लैंगिक छळ

- नागपूरची धक्कादायक घटना,
- संस्था चालकाला बेड्या ठोकल्या

**नागपूर/प्रतिनिधी :** नागपूर जिल्ह्यातील सावनेर तालुक्यातील केळवद येथील एका नामांकित सैनिकी स्कूलमध्ये अल्पवयीन विद्यार्थिनींचा लैंगिक आणि मानसिक छळ केल्याची अत्यंत संतापजनक आणि धक्कादायक घटना समोर आली आहे. सैनिकी प्रशिक्षणाच्या नावाखाली विद्यार्थिनींशी अश्लील चाळे करणे, चुकीच्या पद्धतीने स्पर्श करणे आणि त्यांना अनुचित कृत्यांसाठी प्रवृत्त केल्याचा गंभीर आरोप शाळेच्या संचालकावर झाला आहे. या प्रकरणी एका १७ वर्षीय विद्यार्थिनीच्या तक्रारीवरून केळवद पोलिसांनी गुन्हा दाखल करत आरोपी संचालकाला अटक केली आहे.

**मध्यरात्री कार्यालयात बोलावून अत्याचार-** संबंधित आरोपी संचालक सैनिकी प्रशिक्षणाचा बहाणा करून विद्यार्थिनींचा छळ करत होता. अनेकदा मध्यरात्रीच्या सुमारास अल्पवयीन विद्यार्थिनींना स्वतःच्या कार्यालयात बोलावून त्यांच्याशी अश्लील चाळे केले जात होते. पीडित विद्यार्थिनींनी सुमारे दोन महिन्यांपूर्वीच या गंभीर प्रकाराबाबत शाळेतील शिक्षकांकडे तक्रार केली होती. मात्र, शाळा प्रशासनाने आणि शिक्षकांनी या तक्रारीकडे जाणीवपूर्वक दुर्लक्ष केल्याचा गंभीर आरोपही विद्यार्थिनींनी केला आहे.

**१४ पैकी ११ विद्यार्थिनींनी सोडली शाळा-** या सैनिकी अकॅडमीमध्ये एकूण ५६ विद्यार्थी शिक्षण घेत असून, त्यात १४ अल्पवयीन मुलींचा समावेश होता. संस्थाचालकाचे हे काळे कारस्थान चव्हाट्यावर आल्यानंतर आणि पोलिसांत गुन्हा दाखल झाल्यानंतर विद्यार्थिनींमध्ये प्रचंड भीतीचे वातावरण ⇨(पान २ वर)

# ...तर मुलांना संपत्तीतून बाहेर काढण्याचा आई वडिलांना अधिकार

## सुप्रीम कोर्टाचा महत्त्वाचा निर्णय

**नवी दिल्ली/वृत्तसंस्था :** ज्येष्ठ नागरिकांना आपल्या मुलांना संपत्ती बेदखल करण्याचा अधिकार आहे. वाढत्या वयामुळे आई वडिलांची असुरक्षितता आणि अपमान होता कामा नये. प्रत्येक व्यक्तीला सन्मानाने जगण्याचा हक्क आहे असा महत्त्वाचा निर्णय सुप्रीम कोर्टाने दिला आहे. कोर्टाने अलाहाबाद हायकोर्टाचा आदेश बदलला आहे. ज्यात कोर्टाने मुलगा आणि सूनेला घरातून बाहेर काढण्याबाबत ट्रिब्यूनल कोर्टाने दिलेला आदेश रद्द केला होता. ज्येष्ठ नागरिकांच्या सन्मानाचे रक्षण करण्यासाठी मुलांना मालमत्तेतून बाहेर काढण्याचा आदेश देण्याचा अधिकार न्यायाधिकरणाला आहे असं सुप्रीम कोर्टाने स्पष्ट केले आहे.

न्या. नरसिम्हा आणि न्या. आलोक अराधे यांच्या खंडपीठाने या प्रकरणावर सुनावणी करताना म्हटलं की, ज्येष्ठांचा सन्मान आणि संरक्षण सुनिश्चित करणे हा कायद्याचा उद्देश आहे. एखादा सुसंस्कृत समाज आपल्या ज्येष्ठांना किती सन्मान, आदर आणि संरक्षण देतो यावरूनच त्या समाजाची पातळी अनेकदा ठरवली जाते असं त्यांनी सांगितले.

**काय आहे प्रकरण?-** लखनौच्या विकास नगरमधील एका निवासी घराचे मालक रवीकांत गुप्ता यांनी दाखल केलेल्या अपिलावर सुप्रीम कोर्टाने हा निर्णय दिला आहे. त्यांनी अलाहाबाद हायकोर्टाच्या आदेशाला आव्हान दिले होते, ज्यात मुलगा आणि सुनेविरुद्ध जारी केलेले आदेश रद्द केले होते. रवीकांत गुप्ता यांच्या ८१ वर्षीय आईला कथितरित्या जबरदस्तीने वृद्धाश्रमात पाठवण्यात आल्यावर हे प्रकरण उघडकीस आले. त्यानंतर ५ जून २०२२ रोजी रवीकांत यांनी २००७ च्या कायद्यानुसार आपल्या मुलाला मालमत्तेतून बाहेर काढण्यासाठी जिल्हाधिका-यांकडे याचिका दाखल केली. १५ नोव्हेंबर २०२२ रोजीच्या एका आदेशात उपविभागीय दंडाधिका-यांनी ती मालमत्ता रवीकांत गुप्ता यांची स्व-अर्जित मालमत्ता होती आणि त्यांच्या मुलाने आपल्या आजीला घरात राहू दिले नव्हते व उपद्रव निर्माण केला होता असं आदेशात नमूद केले. परिणामी जिल्हा दंडाधिका-यांनी मुलाला मालमत्तेतून बाहेर काढण्याचा आदेश दिला. नंतर ९ ऑगस्ट २०२३ रोजी जिल्हा दंडाधिका-यांनी आपला आदेश कायम ठेवत मुलगा आणि त्याच्या पत्नीला घराचा ताबा रवीकांत गुप्ता यांना देण्याचे निर्देश दिले. त्यानंतर मुलगा आणि त्याच्या पत्नीने अलाहाबाद हायकोर्टात या आदेशांना आव्हान दिले.



**हायकोर्टाचा आदेश सुप्रीम कोर्टाने केला रद्द-** 'पालक आणि ज्येष्ठ नागरिकांचे देखभाल आणि कल्याण अधिनियम' अंतर्गत असलेल्या अधिका-यांना मालमत्तेतून बाहेर काढण्याचे आदेश जारी करण्याचा अधिकार नाही असं जुन्या निर्णयाचा हवाला देत हायकोर्टाने म्हटलं होते. त्यानंतर जेव्हा हे प्रकरण सुप्रीम कोर्टात पोहचले तेव्हा अलाहाबाद हायकोर्टाचा आदेश रद्द करण्यात आला. हायकोर्टाने न्यायाधिकरणाच्या आदेशात हस्तक्षेप करून चूक केली आहे. कारण ज्येष्ठ नागरिकांच्या कल्याणासाठी आणि संरक्षणासाठी निष्कासनाचे आदेश जारी करण्याचा अधिकार न्यायाधिकरणाला आहे. हा प्रस्थापित कायदा आहे असं सुप्रीम कोर्टाने स्पष्ट केले आहे.

# सिझेरियन प्रसूतीदरम्यान महिलेच्या पोटात ग्लोव्हज राहिले



**मुंबई/प्रतिनिधी :** बीड जिल्हा रुग्णालयात प्रसूतीदरम्यान झालेल्या हलगर्जीपणाच्या आरोपांची आता चौकशी सुरू झाली आहे. लातूरचे सहाय्यक संचालक डॉ. संजय ढगे यांच्या नेतृत्वाखाली चार सदस्यीय चौकशी समिती आज सकाळपासून जिल्हा रुग्णालयाची झाडाझडती घेत असून तब्बल चार तासांपासून डॉक्टर, नर्स आणि कर्मचा-यांची कसून चौकशी सुरू आहे.

दुसरीकडे बीडचे जिल्हा शल्य चिकित्सक डॉ. सतीश कुमार सोळंके हे ससून रुग्णालयाचा अहवाल आणण्यासाठी पुणे येथे गेले आहेत. तो अहवाल आल्यानंतर चौकशी समिती या संपूर्ण प्रकरणात कायदेशीर कारवाई करणार आहे. तसेच या प्रकरणाचे सत्यही समोर येणार आहे.

**आरोग्य विभागाकडून चौकशी समिती गठीत** -बीड जिल्हा रुग्णालयात १९ वर्षीय संध्या सूरज गायकवाड यांच्यावर सिझेरियन प्रसूतीदरम्यान हलगर्जीपणा झाल्याचा नातेवाईकांनी आरोप केला होता. सिझेरियन शस्त्रक्रियेनंतर महिलेच्या पोटामध्ये हॅन्ड ग्लोव्हज आणि कागदी रुमाल राहिल्याचा आरोप करण्यात आला होता. या धक्कादायक आरोपानंतर आरोग्य विभागाने चौकशी समिती गठीत केली आहे.

**चौकशी पथकाकडून रुग्णालयाची झाडाझडती-** लातूरचे सहाय्यक संचालक डॉ. ढगे यांच्यासह चार सदस्यीय समिती आज सकाळपासून बीड जिल्हा रुग्णालयात तळ ठोकून आहे. ऑपरेशन थिएटर, लेबर रूम आणि सिझेरियन वार्डमधील संबंधित डाक्टर, नर्स आणि कर्मचा-यांचे जबाब नोंदवण्याचे काम सुरू आहे. गेल्या ⇨(पान २ वर)

# एमएमआरडीएच्या भरतीतही गैरव्यवहार

**मुंबई/प्रतिनिधी :** मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणातील (एमएमआरडीए) सहाय्यक अभियंता पदासाठी राबवण्यात आलेल्या भरती प्रकियेत गैरप्रकार झाल्याच्या तक्रारींची गंभीर दखल घेत एमएमआरडीएने भरती प्रक्रियेची चौकशी करण्याचा निर्णय घेतला आहे. त्यासाठी राज्याचे माजी मुख्य सचिव जॉनी जोसेफ यांच्या अध्यक्षतेखाली उच्चस्तरीय समिती गठीत केली असून चौकशी पूर्ण होईपर्यंत भरती प्रक्रिया थांबवण्यात आली.



एमएमआरडीएने २३५ रिक्त सहाय्यक अभियंता पदासाठी टाटा कन्सल्टन्सी सर्व्हिसेस या कंपनी मार्फत भरती प्रक्रिया राबवली. या परीक्षेला २० हजार ४५९ उमेदवार बसले होते. परीक्षेचा निकाल जाहीर झाल्यानंतर काही विशिष्ट परीक्षा केंद्रातील विद्यार्थ्यांना सर्वाधिक गुण मिळाल्याचे दिसून आले. ज्या उमेदवारांना मुंबई महापालिका, पुणे महापालिका, सिडको अथवा अन्य संस्थांच्या परीक्षेत अतिशय कमी गुण मिळाले, तेच उमेदवार एमएमआरडीएच्या परीक्षेत टॉपर ठरल्याने आश्चर्य व्यक्त होत होते. परीक्षेतील काही गुणवंत उमेदवार हे नगरविकास विभागातील काही अधिका-यांशी संबंधित असल्याची चर्चा आहे.विरोधी पक्षाने या भरती प्रक्रियेची चौकशी करण्याची मागणी केली होती. या पार्श्वभूमीवर एमएमआरडीएने सहाय्यक अभियंता पदाच्या परीक्षेतील गैरप्रकाराच्या तक्रारींची चौकशी कारण्यासाठी तीन सदस्यीय समिती नेमली. जॉनी जोसेफ यांच्या अध्यक्षतेखालील समितीत सदस्य म्हणून आयआयटी मुंबईचे प्राध्यापक डॉ. श्यामप्रसाद करगडे आणि दासका सत्यनारायण मूर्ती यांचा समावेश आहे. चौकशीसाठी समितीला विशिष्ट मुदत देण्यात आलेली नाही. मात्र, समितीकडून चौकशी पूर्ण होईपर्यंत भरती प्रक्रियेतील पुढील कार्यवाही करण्यात येणार नाही. समितीचा अंतिम अहवाल प्राप्त झाल्यानंतर प्राधिकरणाकडून अहवालातील निष्कर्षांच्या आधारे पुढील निर्णय घेण्यात येईल, असे एमएमआरडीए स्पष्ट केले.

# चिमुरडीवर अत्याचार करून निर्घृण हत्या

**पुणे/प्रतिनिधी :** जुन्नर तालुक्यातील पिंपळवंडी येथे चिमुकलीवर अत्याचार करून तिची निर्घृण हत्या करणा-या नराधमाच्या कृत्याने संपूर्ण पुणे जिल्हा हादरला आहे. हे संतापजनक कृत्य केल्यानंतर हा आरोपी पोलिसांना आणि गावक-यांना गुंगारा देण्यासाठी निष्पापपणाचा आव आणत फिरत होता. मात्र, बघा बघा मी CCTV मध्ये दिसतोय... हे आरोपीचेच वाक्य त्याच्या मुळावर आले अन् पोलिसांच्या सतर्कतेमुळे या नराधमाचे बिंग फुटले.




समोर आलेल्या माहितीनुसार, पीडित मुलगी कांजण्या आल्यामुळे शाळेत गेली नव्हती. तिचे आई-वडील शेतात मजुरीसाठी गेले असताना नराधमाने संधी साधली. चिमुरडीला सायकल शिकवण्याच्या बहाण्याने आरोपीने तिला जवळच्या उसाच्या शेतात नेले आणि तिच्यावर अत्याचार करून तिची हत्या केली. आई-वडील घरी परतल्यानंतर मुलगी न दिसल्याने त्यांनी शोधाशोध सुरू केली.

साहिल खैरे असं या नराधमाचं नाव असून तो बहिणीच्या घरी कामानिमित्त आला होता. बहिणीच्या घराच्या जवळच राहणा-या चिमुकलीसोबत त्याची ओळख झाली अन् त्यानंतर त्याने तिच्यावरच हात टाकला. चिमुकलीला सायकलवरून जवळच असलेल्या उसाच्या शेतात नेले आणि तेथे तिच्यावर पाशवी अत्याचार केला.



# नो एंट्रीच्या नवीन अधिसूचनेला विरोध

## अत्यावश्यक वस्तूंचा पुरवठा ठप्प होण्याची शक्यता




**अमरावती/प्रतिनिधीः-** शहरात सकाळी साडेसहा ते रात्री साडेनऊ पर्यंत जड वाहनांना नो एन्ट्रीची अधिसूचना घोषित करण्यात आली आहे.नो एंट्री च्या नवीन नियमांमुळे हैराण झालेल्या अमरावती गुड्स ट्रान्सपोर्ट असोसिएशनने २५ आणि २६ ऑगस्ट रोजी दोन दिवसांचा सांकेतिक बंद करण्याची घोषणा आज बुधवार १९ ऑगस्ट रोजी झालेल्या पत्रकार परिषदेमध्ये केली आहे.

प्रशासनाने जुनी टायमिंग लागू न केल्यास या नंतर अनिश्चित काळासाठी शहरातील सर्व मालवाहतूक आणि डिलिव्हरी बंद करण्याचा इशाराही देण्यात आला आहे. अधिकाऱ्यांनी सांगितले आहे की, गुड्स ट्रान्सपोर्ट असोसिएशनही शहरातील किरकोळ माल वाहकांची प्रमुख संघटना आहे. या संघटनेच्या सदस्यांमार्फत दररोज जीवनावश्यक वस्तूंची डिलिव्हरी शहरात केली जाते.यात औषध, धान्य, किराणा, भाजीपाला, कपडा, मशिनरी, बांधकाम साहित्य यांसारख्या वस्तूंचा समावेश आहे. हा माल दिल्ली, पंजाब, गुजरात, महाराष्ट्र, तामिळनाडू, मध्यप्रदेश यासारख्या विविध राज्यांमधून अमरावतीत येतो. संघटनेचे म्हणणे आहे की, या वाहतुकीमुळेच शहरातील हजारो व्यापारी, हमाल, चालक आणि दुकानदारांची रोजीरोटी चालते.अलीकडेच प्रशासनाने शहरात अवजड वाहनांसाठी 'नो एंट्री'चे टायमिंग बदलले. नवीन टायमिंगमुळे ट्रान्सपोर्टच्या गाड्यांना वेळेत माल आणणे आणि पोहोचवणे शक्य होत नाहीये. यामुळे माल उशिरा पोहोचतोय, खर्च वाढतोय आणि व्यापाऱ्यांचे नुकसान होत आहे. याच कारणामुळे असोसिएशनच्या सर्व सदस्यांमध्ये तीव्र नाराजी पसरली आहे.यामुळे असोसिएशन ने २५ आणि २६ ऑगस्ट रोजी दोन दिवस सांकेतिक बंद पाळण्याचा निर्णय घेतला आहे. प्रशासनाने आधी लागू असलेली 'नो एंट्री'ची टायमिंग पुन्हा सुरू करावी. त्यानुसार शहरात सकाळी ८ ते १० वाजेपर्यंत आणि दुपारी २ ते ४.३० वाजेपर्यंत सूट देण्यात आली होती. जुना मोटर स्टँड, मोरबाग, सक्कर साथ, ट्रान्सपोर्ट लाईन, ट्रान्सपोर्ट नगर या भागात निर्धारित वेळेत गाड्या आणण्यासाठी विशेष परवानगी द्यावी. असोसिएशन ने स्पष्ट केले आहे की, जर या मागण्या मान्य झाल्या नाहीत तर २६ ऑगस्ट नंतर अनिश्चित काळासाठी शहरातील डिलिव्हरीचे काम पूर्णपणे बंद केले जाईल. पत्रकार परिषदेमध्ये पियुष अग्रवाल, पंकज शहा, वसीम खान, सुधीर पावडे, पवन शर्मा ,साजिद मेमन, राजेश चव्हाण, मोहम्मद इमरान, आसिफ खान, संजय चौधरी, पुणित लुल्ला, अन्वर खान, राहुल साबले आदि उपस्थित होते.

# सांडपाण्यावर प्रक्रिया केलेल्या पाण्याचा शेती सिंचनाला होणार फायदा

## तिवसा शहरासाठी सांडपाणी प्रक्रिया प्रकल्प मंजूर




**तिवसा/प्रतिनिधीः-** शहरातील सांडपाण्यावर अत्याधुनिक पध्दतीने प्रक्रिया करून शुद्ध केलेल्या पाण्याचा शेतकऱ्यांना शेती सिंचनाला मोठा फायदा होणार आहे.नुकताच तिवसा शहरासाठी सांडपाणी प्रकल्प मंजूर करण्यात आला असून नगरविकास विभाग व स्वच्छ भारत मिशन नागरी २.० अंतर्गत यास मंजुरी मिळाल्याने तिवसा शहरासह शेतकऱ्यांना याचा मोठा फायदा होणार आहे.

अमरावती जिल्ह्यातील तिवसा शहराच्या शाश्वत विकासात आज आणखी एक ऐतिहासिक टप्पा गाठला गेला आहे. तिवसा नगरपंचायतीच्या वतीने सातत्याने करण्यात आलेल्या पाठपुराव्याला यश आले असून, महाराष्ट्र शासनाचा नगर विकास विभाग व स्वच्छ भारत मिशन (नागरी) २.० अंतर्गत तिवसा शहरासाठी सांडपाणी प्रक्रिया प्रकल्प मंजूर करण्यात आला आहे.

**प्रकल्पाचे तांत्रिक व प्रशासकीय स्वरूप** प्रकल्प क्षमता: २.३० MLD* (दशलक्ष लिटर प्रति दिन)

आय अँड डी लांबी: ४.०० किलोमीटर

सिव्हर नेटवर्क लांबी: १७.६० किलोमीटर

अंमलबजावणी: EPC तत्त्वावर ३०६ नागरी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या यादीत तिवसाचा समावेश.

हा प्रकल्प मंजूर आणण्यासाठी माजी पालकमंत्री यशोमती ठाकूर, खासदार बळवंत वानखडे, माजी नगराध्यक्ष वैभव वानखडे, नगराध्यक्ष प्रतिभा गौरखेडे, उपाध्यक्ष प्रिया विघ्ने, आरोग्य सभापती अमर वानखडे, विरोधी पक्षनेते अनिल थुल, माजी सभापती किसन मुंदाने व सर्व नगरसेवकांनी पाठपुरावा केला होता. तसेच, शहरात भुयारी गटार योजना राबवण्यासाठी नगर विकास खात्याकडे प्रस्ताव पाठवला असून जागतिक बँक किंवा नगरोत्थान योजनेतून त्याला लवकरच मंजुरी मिळण्याची शक्यता आहे.

**राज्य प्रतिनिधींकडून कामाची पाहणी व सत्कार-** स्वच्छ महाराष्ट्र अभियान (नागरी) २.० चे राज्य डेप्युटी कमिशनर महेश चौधरी यांनी तिवसा नगरपंचायतीला भेट देऊन शहरात सुरू असलेल्या घनकचरा व्यवस्थापन प्रकल्प, नमो उद्यान व मियावाकी उद्यानाची प्रत्यक्ष पाहणी केली. याप्रसंगी नमो उद्यान येथे नगरपंचायतीच्या वतीने महाराष्ट्र राज्याचे SBM २.० उपायुक्त महेश चौधरी यांचा नगराध्यक्ष प्रतिभा गौरखेडे, माजी नगराध्यक्ष वैभव वानखडे, विरोधी पक्षनेते अनिल थुल, नगरसेवक आशिष ढोले, सभापती अमर वानखडे, मुख्याधिकारी शिवदास मुसळे, स्वच्छता निरीक्षक राहुल इमले,यांच्या हस्ते सत्कार व सन्मान करण्यात आला.यावेळी गजानन भोंबे, अभियंता दयानंद डेहणकर, पाणीपुरवठा अभियंता ऋषिकेश देशमुख, लेखापाल वैभव भालेराव, प्रितेश वाघमारे, उमेश राऊत, सुनिल बाखडे, शिवा शापामोहन, रहीम शहा, गौरव चौधरी, आशिष नांदगावकर, प्रणव गौरखेडे, सागर वानखडे आकाश मकेश्वर, विश्वजीत बाखडे, व नागरीक उपस्थित होते.

# लॅपटॉप-मोबाईल चोरांना अटक

## स्पर्धा परीक्षार्थींच्या खोलीवर चोरट्यांची नजर



**अमरावती/प्रतिनिधीः-** गाडगेनगर परिसरात स्पर्धा परीक्षेची तयारी करणाऱ्या विद्यार्थिनीच्या खोलीतून लॅपटॉप व मोबाईल लंपास करणाऱ्या दोघांचा शहर गुन्हे शाखेने छडा लावला. चोरीचा मुद्देमाल विक्रीच्या तयारीत असतानाच पोलिसांनी एकाला पकडले. त्याच्या चौकशीतून दुसऱ्या साथीदाराचा माग काढत पोलिसांनी दोघांकडून दोन लॅपटॉप, तीन मोबाईल आणि चोरीसाठी वापरलेली दुचाकी असा एकूण १ लाख ६८ हजार रुपयांचा मुद्देमाल हस्तगत केला.

प्रतिक्षा प्रल्हादराव शिरपुरकर (वय २५) या गाडगेनगर परिसरात भाड्याच्या खोलीत राहून स्पर्धा परीक्षेची तयारी करीत होत्या. ११ मे रोजी त्यांच्या खोलीतून दोन लॅपटॉप व तीन मोबाईल चोरीस गेले होते. याप्रकरणी गाडगेनगर पोलिसांनी गुन्हा क्रमांक ५२४/२०२६ दाखल केला होता. गुन्हे शाखेने तपासाची सूत्रे हाती घेतल्यानंतर परिसरातील सीसीटीव्ही फुटेज आणि तांत्रिक माहितीच्या आधारे संशयितांचा शोध सुरू केला. दरम्यान, १८ ऑगस्ट रोजी चोरीचा लॅपटॉप विकण्यासाठी एक तरुण इतवारा बाजारात येणार असल्याची माहिती पोलिसांना मिळाली. त्यानुसार पथकाने इतवारा बाजार परिसरात सापळा लावला. हिरो स्प्लेंडरवर आलेल्या संशयिताला ताब्यात घेऊन झडती घेतली असता त्याच्याकडे तीन मोबाईल आणि लाल कव्हरमध्ये एक लॅपटॉप मिळाला. या वस्तूंच्या खरेदी-विक्रीबाबत समाधानकारक माहिती न मिळाल्याने पोलिसांनी चौकशी केली. त्यावेळी सदर साहित्य गाडगेनगर भागातून चोरी केल्याची कबुली त्याने दिल्याचे पोलिसांनी सांगितले.

चौकशीत त्याने चोरीतील आणखी एक लॅपटॉप व दोन मोबाईल परिचित व्यक्तीकडे ठेवले असल्याची माहिती दिली. त्यानंतर पोलिसांनी त्या व्यक्तीलाही ताब्यात घेत उर्वरित मुद्देमाल जप्त केला.

निखिल विलास ताठे (वय २१, रा. महेंद्र कॉलनी, अमरावती) याच्याकडून Victus लॅपटॉप, तीन मोबाईल आणि हिरो स्प्लेंडर असा १ लाख २५ हजार रुपयांचा मुद्देमाल, तर शेख नजीर शेख कदीर (वय २९, रा. जमीला नगर, अमरावती) याच्याकडून HP लॅपटॉप व Redmi मोबाईल असा ४३ हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला.

# १ व १० वरिल उर्वरित

### मेळघाटातील आदिवासी विद्यार्थ्यांना

यांनी रुग्णालयात जाऊन उपचार घेत असलेल्या विद्यार्थ्यांची भेट घेतली. त्यांनी विद्यार्थ्यांच्या प्रकृतीची डॉक्टरांकडून माहिती घेतली तसेच विद्यार्थ्यांशी प्रत्यक्ष संवाद साधून त्यांना धीर दिला.

सध्या रुग्णालयात उपचार घेत असलेल्या सर्व पाच विद्यार्थ्यांची प्रकृती ठणठणीत असल्याची माहिती समोर आली आहे. विद्यार्थ्यांच्या उपचारामध्ये कोणतीही कमतरता राहू नये आणि त्यांच्या प्रकृतीवर योग्य लक्ष ठेवण्यात यावे, असे निर्देश खासदार बळवंत वानखडे यांनी दिले. दरम्यान, या प्रकरणावरून खासदार बळवंत वानखडे यांनी महर्षी पब्लिक स्कूलच्या व्यवस्थापनावर गंभीर आरोप केले आहेत. संस्थाचालकांना सरकार आणि स्थानिक प्रशासनाकडून पाठीशी घातले जात असल्याचा आरोप त्यांनी केला. विद्यार्थ्यांच्या आरोग्य आणि सुरक्षिततेबाबत कोणत्याही प्रकारचा निष्काळजीपणा सहन केला जाणार नाही, अशी भूमिका त्यांनी मांडली.

या संपूर्ण प्रकरणाची निष्पक्ष आणि सखोल चौकशी करून विद्यार्थ्यांच्या प्रकृती बिघडण्यामागील नेमके कारण समोर आणावे, तसेच दोषी आढळल्यास संबंधितांवर कठोर कारवाई करण्यात यावी, अशी मागणी खासदार वानखडे यांनी केली आहे. या घटनेमुळे निवासी व शैक्षणिक संस्थांमधील विद्यार्थ्यांच्या भोजनाची गुणवत्ता, स्वच्छता आणि आरोग्य सुरक्षेचा प्रश्न पुन्हा ऐरणीवर आला असून, प्रशासनाच्या चौकशीतून नेमकी वस्तुस्थिती समोर येणे महत्त्वाचे ठरणार आहे.

### सार्वजनिक गणेशोत्सवातील

विश्वस्त व्यवस्था वगळून जिल्ह्यातील सर्व सार्वजनिक गणेशोत्सव मंडळांतर्फे गणेशोत्सव कार्यक्रमासाठी रोख रकमेच्या किंवा वस्तूच्या स्वरूपात पैसा,देणगी किंवा वर्गणी गोळा करण्याच्या पूर्वपरवानगीकरिता www.Charity.Ma harashtra.gov.in या संकेतस्थळावर आवश्यक कागदपत्रांसह अर्ज करून धर्मदाय उपआयुक्त किंवा सहायक धर्मदाय आयुक्त अमरावती यांच्या कडून पूर्वपरवानगी देण्यात येणार आहे. यासाठी ऑनलाई अर्ज पूर्ण भरावा व त्यासोबत गणेशोत्सव मंडळाच्या सर्व सदस्यांची स्वाक्षरी असलेल्या ठरावाची प्रत, सर्व सदस्यांचे ओळखपत्र, जागेबाबत जागा मालकाचे नाहरकत प्रमाणपत्र, ग्रामपंचायत किंवा नगरपरिषद किंवा महानगरपालिका यांचे नाहरकत प्रमाणपत्र, अर्जातील माहिती सत्य व बरोबर असल्याबाबत अर्जदाराचे प्रतिज्ञापत्र, मागील वर्षीच्या परवानगीची प्रत आणि मागील वर्षाच्या जमा खर्चाचा हिशोब जोडणे गरजेचे आहे.

### मुलीला फुस लावून पळवून नेणा-या

स्टेशनचे ठाणेदार राहुल आठवले यांनी सदर गुन्हयातील आरोपीचा शोध घेण्याकरिता विशेष पथकाची नेमणुक करून त्यांना आरोपी व पिडीतेचा शोध घेण्याबाबत निर्देश दिले. त्या अनुषंगाने स्कॉड विभागाचे पथक आरोपीचा शोध घेण्याकरीता रवाना करण्यात आले.मोर्शी पोलीस पथकाने गोपनीय माहीतीवरून आरोपीचा दि.१७/८/२०२६ रोजी ग्राम सेलु ता.कळमेश्वर जि.नागपुर येथे शोध घेऊन आरोपी कार्तिक रंजन दाढे (वय २३ वर्षे रा. मनिमपुर ता.मोर्शी जि. अमरावती) याला व संबंधित पिडीता यांना ताब्यात घेतले.पिडीतेस तिच्या पालकांच्या ताब्यात देण्यात आले असून आरोपीस सदर गुन्हयामध्ये अटक करण्यात आली.

सदरची कारवाई पोलीस अधिक्षक निकेतन कदम, अप्पर पोलीस अधिक्षक दत्ता तोटेवाड, उपविभागीय पोलीस अधिकारी उमेश पाटील यांचे मार्गदर्शनात पोलीस निरीक्षक राहुल आठवले यांचे नेतृत्वात पो.स्टे. मोर्शी येथील पोउपनी तुषार चव्हाण पोलीस अंमलदार लता थोटे, छत्रपती करपते,स्वप्नील बायस्कर,महेश प्रसाद,अथर्व कोहळे यांनी केली आहे.

### अंजनगाव सुर्जी पोलीस स्टेशनच्या

सोडली होती.या पथकाचे आणखी एक वैशिष्ट्य म्हणजे त्यांनी शहरासह ग्रामीण भागातील गावा-गावात खबऱ्यांचे मजबूत नेटवर्क उभे केले होते. या खबऱ्यांमुळे प्रत्येक गुन्हेगाराची माहिती पोलिसांना तात्काळ मिळत होती आणि गुन्ह्यांची उकल होण्यास मदत होत होती.इतकी चांगली कामगिरी करणारे हे डी.बी. पथक अचानक बरखास्त करण्यामागचे नेमके कारण मात्र अद्याप समोर आलेले नाही. पोलीस अधीक्षकांच्या या निर्णयामुळे आश्चर्य व्यक्त केले जात आहे. याबाबत वरिष्ठ स्तरावरून अधिकृत माहिती येणे बाकी आहे.या निर्णयामुळे अंजनगाव सुर्जी पोलीस स्टेशनच्या हद्दीतील गुन्हेगारांवर वचक कमी होण्याची भीती नागरिकांमधून व्यक्त होत आहे.

### ४.५ लाखांच्या देशी दारूसह कार

कारला (MH ०४ GD ८२५४) पोलिसांनी थांबवण्याचा इशारा केला. मात्र, चालकाने गाडी न थांबवता पुढे नेण्याचा प्रयत्न केला. पोलिसांनी तत्परतेने पाठलाग करून कार अडवली. वाहनाची पाहणी केली असता त्यात मोठ्या प्रमाणात देशी दारूचा साठा आढळून आला.

पोलीस ठाण्यात आणून चौकशी केली असता आरोपीने आपले नाव जगदीश दामोदर लेवटे (वय ३८, रा. करजगाव) असे सांगितले. पोलिसांनी दारू आणि कार असा एकूण ४ लाख ५० हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त केला आहे.

ही कारवाई चांदूरबाजारचे ठाणेदार अधिकार सोनवणे, पोलीस कर्मचारी नितीन डोंगरे, अजय ठाकरे आणि विनोद वाघमारे यांनी केली आहे.

### तिवस्यात अवैध सावकारी

आर्थिक लूट करत अतिरिक्त व्याज वसुल केले जात आहे.एका तक्रारीच्या अनुषंगाने तिवसा शहरातील आठवडी बाजार शिवाजी चौकात असलेल्या सुनील सुरटकार यांच्या घराचीं तिवसा सहाय्यक निबंधक सहकारी विभागाने झडती घेतली. त्यांच्या घरात अवैध सावकारीच्या उद्देशाने ठेवलेल्या दोन दुचाकी, मुद्रक, धनादेश अशी महत्वाचीं कागदपत्रे जप्त करत त्यांच्या मालकीचे असलेली दोन दुकाने सील करण्यात आली. ही कारवाई जिल्हानिबंधक आर.व्ही भुयार यांच्या मार्गदर्शनात पथक प्रमुख प्रिती धामणे,सहाय्यक अविनाश महल्ले,मनोज रोहनकर, शीतल राठोड,पोलीस कॉन्स्टेबल आदित्य ठाकूर, दिपाली वानखडे यांनी केली. या कारवाईमुळे शहरातील अवैध सावकारी करणाऱ्यांचे चांगलेच धाबे दणाणले आहे.

### सराईत गुन्हेगार शेख सुफियान

शस्त्रासह दरोडा, जीवे मारण्याची अथवा गंभीर दुखापत करण्याची धमकी, शांतता भंग करण्याच्या उद्देशाने अपमान, अश्लील कृत्ये, बेकायदा शस्त्र बाळगणे, अग्निशस्त्र बाळगणे तसेच हद्दपार आदेशाचे उल्लंघन अशा गंभीर स्वरूपाचे एकूण १० गुन्हे दाखल आहेत. गुन्हेगारी कारवायांना आळा घालण्यासाठी त्याच्यावर यापूर्वी प्रतिबंधात्मक कारवाई करण्यात आली होती. तसेच त्याला तडीपारही करण्यात आले होते. मात्र, त्यानंतरही त्याच्या गुन्हेगारी कारवायांमध्ये फरक पडला नसल्याने पोलिसांनी त्याच्याविरुद्ध MPDA अंतर्गत स्थानबद्धतेचा प्रस्ताव तयार केला.

फ्रेजरपुरा पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक रविंद्र राजुलवार यांनी हा प्रस्ताव तयार करून फ्रेजरपुरा विभागाच्या सहायक पोलीस आयुक्त नयन अलूरकर आणि परिमंडळ-१चे पोलीस उपायुक्त यशवंत सोळंके यांच्यामार्फत पुढील कार्यवाहीसाठी सादर केला. पोलीस उपायुक्त (मुख्यालय) प्राजंली सोनवणे आणि गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक अतुल वर यांच्या मार्गदर्शनाखाली प्रस्तावाची प्रक्रिया पूर्ण करण्यात आली.

या प्रस्तावावर पोलीस आयुक्त राकेश ओला यांनी १९ ऑगस्ट रोजी स्थानबद्धतेचा आदेश पारित केला. त्यानंतर वरिष्ठ पोलीस निरीक्षक रविंद्र राजुलवार यांच्या मार्फत आदेशाची अंमलबजावणी करण्यात आली. शेख सुफियान याला स्थानबद्धतेच्या कालावधीसाठी त्याच दिवशी अमरावती मध्यवर्ती कारागृहात दाखल करण्यात आले.

या कारवाईत MPDA सेलचे सहायक पोलीस निरीक्षक इम्रान नायकवडे, पोलीस उपनिरीक्षक अजय मिश्रा, पोलीस अंमलदार चेतन कराडे तसेच फ्रेजरपुरा पोलीस ठाण्याचे पोलीस उपनिरीक्षक राहुल महाजन, पोलीस हेडकॉन्स्टेबल संतोष नागे आणि डी.बी. पथकाने सहभाग घेतला.

### पवननगरातील देहव्यापारावर पोलिसांचा

प्राजंली सोनवणे यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आली. अनैतिक मानवी वाहतूक कक्षाच्या पोलीस निरीक्षक ज्योती विल्लेकर यांच्या नेतृत्वाखाली दामिनी पथकातील पोलीस हवालदार राजेश यादव, महिला पोलीस कर्मचारी भाग्यश्री पवार, पल्लवी कोळकार, मनोज बोकाडे, देवानंद बागडे आदींनी कारवाईत सहभाग घेतला.

**महिला, विद्यार्थिनी व बालकांना आवाहन-** अमरावती शहर पोलीस आयुक्तालयाच्या हद्दीत महिला, विद्यार्थिनी किंवा बालकांना छेडछाड, चिडीमारी, रोडरोमिओगिरी अथवा अन्य कोणत्याही प्रकारचा त्रास होत असल्यास घाबरून न जाता पोलिसांशी संपर्क साधावा, असे आवाहन भरोसा सेलच्या वतीने करण्यात आले आहे. नागरिकांनी ११२, १०९१ किंवा १०९८ या हेल्पलाइन क्रमांकांवर माहिती द्यावी. छेडछाड अथवा अन्य गैरप्रकार आढळून आल्यास संबंधितांविरुद्ध कायद्यानुसार कठोर कारवाई करण्यात येईल, असा इशाराही पोलिसांनी दिला आहे.

### सिझेरियन प्रसूतीदरम्यान महिलेच्या

चार तासांपासून ही चौकशी सुरू असून, या प्रकरणातील नेमकी वस्तुस्थिती चौकशी समितीच्या अहवालातून समोर येणार आहे. चौकशी समितीच्या अहवालानंतर संबंधितांवर काय कारवाई केली जाते, याकडे आता सर्वांचे लक्ष लागले आहे.

संबंधित गरोदर महिलेला बाळंतपणासाठी बीडच्या जिल्हा रुग्णालयात दाखल करण्यात आले होते. तेथे डॉक्टरांनी तिचे सिझरियन ऑपरेशन केले. महिलेने एका गोंडस मुलीला जन्म दिला. बाळंतपण व्यवस्थित पार पडल्याचे वाटत असतानाच पुढील चार दिवसांत महिलेचा त्रास प्रचंड वाढला. पोटात असह्य वेदना होउ लागल्याने आणि प्रकृती खालावत गेल्याने नातेवाईकांनी डॉक्टरांकडे विचारणा केली. तपासणीअंती समोर आलेल्या सत्याने सर्वांनाच धक्का बसला. ऑपरेशन करणा-या डॉक्टरांच्या निष्काळजीपणामुळे वैद्यकीय वापराचे हँडग्लोज आणि ड्रेसिंग पट्टी महिलेच्या पोटातच राहिली होती. रुग्णालयातील कर्मचा-यांच्या या अक्षम्य चुकीमुळे महिलेला गंभीर इन्फेक्शन झाले आणि तिची प्रकृती चिंताजनक झाली. पुण्यातील ससून रुग्णालयात तिच्यावर शस्त्रक्रिया करण्यात आली असून तिची मृत्यूशी झुंज सुरू आहे.

### ५ मजली इमारतीला आग,

अत्यंत वाईट परिस्थितीबद्दल आणि तिथे अनेक हाटेल्स सुरू असल्याबद्दल आश्चर्य व संताप व्यक्त केला. मंत्र्यांच्या म्हणण्यानुसार, इमारत व्यवस्थापनाने सुरक्षितता आणि बांधकामाशी संबंधित मूलभूत नियमांचे पालन केले नाही. हाटेलच्या कामकाजातील विविध अनियमिततेबाबतच्या तक्रारीही समोर आल्या आहेत. जखमींना जवळच्या रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे.

**इमारत मालक फरार; गुन्हा दाखल होणार-** पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, इमारतीचा मालक सध्या फरार आहे. 'न्यू मार्केट' पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्याची प्रक्रिया सुरू करण्यात आली आहे. पोलिसांकडून मालकाच्या निवासस्थानासह विविध ठिकाणी त्याचा शोध घेण्यासाठी छापे टाकले जात आहेत. आगीचे नेमके कारण आणि सुरक्षिततेच्या नियमांचे झालेले उल्लंघन यांबाबत तपास सुरू आहे. पश्चिम बंगालमधील बीरभूम जिल्ह्यात तारापीठ मंदिरालगतच्या एका हाटेलला आग लागल्याने नउ जणांचा मृत्यू झाला, तर अन्य नउ जण गंभीर जखमी झाले.प्राथमिक माहितीनुसार, शार्ट सर्किटमुळे ही आग लागली असावी. जखमींना उपचारासाठी जवळच्या रुग्णालयात हलवण्यात आले आहे.

### मिलिटरी शाळेतील अल्पवयीन

निर्माण झाले. या घटनेच्या धक्कादायक धक्क्यानंतर १४ पैकी तब्बल ११ विद्यार्थिनींनी तातडीने ही शाळा सोडली आहे.

पोक्सो अंतर्गत संस्था चालकावर गुन्हा दाखल, पोलिसांनी बेड्या ठोकल्या

पीडित १७ वर्षीय मुलीने धाडस दाखवत केळवद पोलीस ठाण्यात आपबिती सांगितल्यानंतर पोलिसांनी तातडीने सूत्रे हलवली. आरोपी संचालकाविरुद्ध बाल लैंगिक अत्याचार प्रतिबंधक कायदा आणि भारतीय न्याय संहितेच्या इतर कलमांखाली गुन्हा दाखल करून त्याला बेड्या ठोकल्या आहेत. या घटनेमुळे सैनिकी स्कूलसारख्या शिस्तबद्ध मानल्या जाणा-या संस्थेमध्ये अल्पवयीन मुलींच्या सुरक्षेचा प्रश्न ऐरणीवर आला आहे.

**SANT GADGE BABA AMRAVATI UNIVERSITY, AMRAVATI**

No. [illegible] Date [illegible]

**WANTED**

Name of the Society :- Dnyanganga Shikshan Prasarak Sanstha, Wanoja Tq. Mangrulpir Dist. Washim

Name of the College :- Smt. Salunkabai Raut Arts & Commerce College Wanoja Tq. Mangrulpir Dist. Washim (M.S.) 444402

Applications are invited for Full Time Regular Posts as per following details in the faculty of Science & Technology/Humanities/Commerce & Management/ Interdisciplinary Studies

Vacancies for Grant-in-aid Courses / Programmes

| S.N. | Name of the Post | Subject / Courses | Category wise No. of Post dt. [illegible] |
|---|---|---|---|
| 1 | Assistant Professor | English | [illegible] |
| 2 | Assistant Professor | History | |
| 3 | Assistant Professor | Economics | |

[illegible]

Smt. Kamalabai J. [illegible] President | Smt. Sushilabai R. Raut Secretary | Dr. D.R. [illegible] Principal

**बांधकाम विभाग, जिल्हा परिषद, वाशिम**
**काम वाटप सभा क्र.२ (सन २०२६-२०२७)**

अति,मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, वाशिम यांच्या वतीने कार्यकारी अभियंता बांधकाम विभाग, जिल्हा परिषद, वाशिम हे कामवाटप समिती सभा दिनांक २१.०८.२०२६ रोजी आयोजित करण्यात आली आहे. दिनांक २०.०८.२०२६ रोजी सकाळी ११.०० ते दिनांक २१.०८.२०२६ रोजी दुपारी १२.०० वाजेपर्यंत योग्य त्या प्रवर्गातील कंत्राटदारांकडून अर्ज मागविण्यात येत आहे. कामांची यादी नमुना www.zpwashim.com या संकेतस्थळावर तसेच बांधकाम विभाग, जि.प.वाशिम चे नोटीस बोर्डावर दिनांक २०.०८.२०२६ ते २१.०८.२०२६ रोजी पाहण्यास उपलब्ध आहे.

स्वाक्षरी/-
कार्यकारी अभियंता (बांध.)
जिल्हा परिषद, वाशिम

# जनमाध्यम

एक प्रतिष्ठित सवय

अकोला । वाशिम । बुलडाणा

■ गुरुवार, २० ऑगस्ट २०२६ ■ मूल्य ३.०० ■ पृष्ठे ४

paper : www.janmadhyam.com
mail : Jmakola.thakur@gmail.com


# वाशिम एमआयडीसीच्या विकासासाठी ४८ कोटी ६७ लाखांचा निधी मंजूर

## हरिष सारडा यांच्या लॉजिस्टिक पार्कच्या संकल्पनेला उद्योगमंत्र्यांची सकारात्मकता

### पायाभूत सुविधांच्या प्रश्नांवर तातडीने उपाययोजना

■ प्रतिनिधी | वाशिम ■

वाशिम एमआयडीसीतील पायाभूत सुविधांसह विविध प्रलंबित प्रश्नांच्या सोडवणुकीसाठी मंत्रालयात उद्योगमंत्री मा. ना. उदयजी सामंत यांच्या दालनात महत्त्वपूर्ण बैठक पार पडली. महाराष्ट्राचे कृषीमंत्री तथा वाशिम जिल्ह्याचे पालकमंत्री श्री. दत्तामामा भरणे यांच्या पुढाकाराने झालेल्या या बैठकीत एमआयडीसीच्या पायाभूत सुविधांसाठी तब्बल ४८ कोटी ६७ लाख रुपयांचा निधी मंजूर करण्यात आला. त्यामुळे वाशिममधील उद्योजक



व व्यापारी वर्गात समाधानाचे वातावरण निर्माण झाले आहे.

वाशिम एमआयडीसीतील विविध अडचणींबाबत १५ ऑगस्ट रोजी एका शिष्टमंडळाने पालकमंत्री दत्तामामा भरणे यांची भेट घेऊन समस्या मांडल्या होत्या. या समस्यांची दखल घेत पालकमंत्र्यांनी तातडीने उद्योगमंत्र्यांसोबत बैठक आयोजित करून प्रश्न मार्गी लावण्यासाठी पुढाकार घेतला. बैठकीत एमआयडीसीच्या पायाभूत सुविधांवर सविस्तर चर्चा करण्यात आली आणि त्यासाठी ४८ कोटी ६७ लाख रुपयांच्या निधीला मंजुरी देण्यात आली. बैठकीत उद्योजक हरिष सारडा यांनी वाशिमसाठी प्रस्तावित लॉजिस्टिक पार्कची संकल्पना प्रभावीपणे मांडली. लॉजिस्टिक पार्कमुळे वाशिमच्या औद्योगिक आणि व्यापारी क्षेत्राला मोठी चालना मिळू शकते, असे त्यांनी स्पष्ट केले. यावेळी त्यांनी केंद्रीय मंत्री मा. नितीनजी गडकरी यांच्या विकासदृष्टीचा आवर्जून उल्लेख करत लॉजिस्टिक पार्कच्या माध्यमातून वाशिमला वाहतूक व उद्योग क्षेत्रात नवे केंद्र म्हणून विकसित करण्याची गरज व्यक्त केली. यावर उद्योगमंत्री उदय सामंत यांनी सकारात्मक प्रतिसाद देत लवकरच लॉजिस्टिक पार्कच्या कामाला सुरुवात करण्याचे आश्वासन दिले. या बैठकीस उद्योजक निलेश बियाणी, डॉ. अंगद राऊत, पवन मालपाणी, उमेश राठोड, अतुल भूतकर तसेच व्यापारी वर्गाचे प्रतिनिधी नवीन शर्मा उपस्थित होते. आमदार अमित झनक, आमदार भावनाताई गवळी आणि आमदार बसंत बाबू खंडेलवाल बैठकीला उपस्थित होते. खासदार संजयजी देशमुख, आमदार श्यामजी खोडे तसेच जिल्हाधिकारी योगेश कुंभेजकर हे ऑनलाइन माध्यमातून सहभागी झाले.

# न्यायालयीन कर्मचारी आंदोलनाच्या तयारीत

## राज्यातील ३४ हजार कर्मचारी समान वेतनासाठी एकवटणार

■ प्रतिनिधी | वाशिम ■

उच्च न्यायालयाप्रमाणेच दुय्यम न्यायालयातील कर्मचाऱ्यांनाही वेतन मिळावे, या मागणीसाठी राज्यातील सर्व संघटना एल्गार पुकारणार आहेत. राज्यातील सुमारे ३४ हजार कर्मचाऱ्यांकडून आंदोलनाचे हत्यार उपसले जाणार असल्याची माहिती येथील संघटनेचे प्रतिनिधी पंकज चव्हान यांनी दिली.

मुंबई उच्च न्यायालयातील कर्मचाऱ्यांना वेतन मिळते त्याच धर्तीवर समान वेतन दुय्यम न्यायालयातील कर्मचाऱ्यांना मिळावे, या मागणीसाठी काही वर्षे प्रयत्न सुरू आहेत. कर्मचाऱ्यांकडून विनंती मागणी, निवेदन अशा पद्धतीने पाठपुरावा सुरू आहे. याबाबत उच्च न्यायालयाने राज्य शासनाला जानेवारी २०२५ मध्ये अहवाल देण्याचे आदेश दिले आहेत. मात्र, राज्य शासनाकडून हा अहवाल प्रलंबित आहे. वारंवार निवेदनाद्वारे माहिती देऊनही राज्य शासनाकडून दखल घेतली जात नाही. त्यामुळे न्यायालयातील कर्मचाऱ्यांच्या राज्यातील सर्व संघटनांनी एकत्रित येऊन आंदोलनाचा एल्गार करण्याचा निर्णय नुकताच मुंबईत घेतला आहे. याबाबत संघटनेच्या पदाधिकाऱ्यांनी वाशिमचे पालकमंत्री दत्तामामा भरणे यांचीही भेट घेऊन निवेदन दिले. यामध्ये न्यायालयीन कर्मचारी संघटनेचे पदाधिकारी रविंद्र पी सोनवणे, प्रशांत कारंजकर, दुर्गेश राठोड, जी पी राजेकर आणि पंकज चव्हाण यांचा समावेश होता.



**असे होईल आंदोलन**

**६ सप्टेंबर :** काळ्या फिती लावून काम करणे

**१६ आणि १७ ऑक्टोबर:** सलग दोन दिवस काळ्या फिती लावून निषेध

**५ नोव्हेंबर :** सामूहिक रजा

**१६ नोव्हेंबरपासून :** बेमुदत काम बंद आंदोलन

'न्यायालयीन कर्मचाऱ्यांना समान वेतनासाठी राज्य शासनाकडे निवेदनाद्वारे वारंवार मागणी, विनंती केली आहे. मात्र, दुर्लक्ष केले जात आहे. त्यामुळे बेलिफ कर्मचारी महासंघ, स्टेनोग्राफर असोसिएशन, गट 'ड' कर्मचारी महासंघ, कर्मचारी महासंघ गट 'क' अशा सर्वांनी मुंबईत एकत्रित येऊन आंदोलनाचा निर्णय घेतला आहे.'

**रविंद्र पी सोनवणे,**
जिल्हाध्यक्ष, न्यायालयीन कर्मचारी गट क संघटना, वाशिम

# प्रशिक सहकारी पतसंस्थेच्या ठेवीदारांच्या आमरण उपोषणास उपस्थित राहण्याचे आवाहन




■ प्रतिनिधी | कारंजा ■

प्रशिक सहकारी पतसंस्थेतील हजारो ठेवीदारांच्या अडकलेल्या ठेवी परत मिळाव्यात, जबाबदारांवर कठोर कारवाई व्हावी आणि ठेवीदारांना न्याय मिळावा या प्रमुख मागण्यांसाठी १५ ऑगस्ट २०२६ पासून सकाळी ८. ०० वाजता कारंजा तहसील कार्यालय परिसरात सुरू होणाऱ्या आमरण उपोषणाला आता व्यापक सामाजिक व कायदेशीर पाठिंबा मिळत आहे. या पार्श्वभूमीवर नागरिक, ठेवीदार, महिला, ज्येष्ठ नागरिक, शेतकरी, कामगार आणि सर्व समाजबांधवांनी मोठ्या संख्येने उपोषणस्थळी उपस्थित राहण्याचे जाहीर आवाहन करण्यात आले आहे.या आंदोलनाला पाठिंबा देत नगरसेवक सागर राणा अंभोरे, ॲड. मिलिंद खंडारे, मंगेश पाटील मुंदे, अमोल लुलेकर, ॲड. राहुल मनवर, विलास सिरसाट आणि पुरुषोत्तम गुंजाटे यांनी संयुक्तपणे आवाहन केले आहे की, हा लढा केवळ काही ठेवीदारांचा नसून संपूर्ण समाजाच्या विश्वासाचा आणि सर्वसामान्यांच्या घामाच्या पैशाचा प्रश्न आहे.

मान्यवरांनी प्रसिद्धीस दिलेल्या निवेदनात म्हटले आहे की, प्रशिक सहकारी पतसंस्थेच्या अनेक ठेवीदारांचे लाखो रुपयांचे ठेव रक्कम दीर्घकाळापासून अडकून पडली आहे. वारंवार निवेदने, मागण्या, पाठपुरावा आणि प्रशासनाकडे धाव घेतल्यानंतरही ठोस निर्णय होत नसल्याने ठेवीदारांमध्ये तीव्र संताप निर्माण झाला आहे. काही कुटुंबांची आर्थिक घडी विस्कळीत झाली असून, अनेक ज्येष्ठ नागरिक, महिलांनी आयुष्यभराची बचत या संस्थेत ठेवली होती. त्या रकमा परत न मिळाल्याने अनेकांना गंभीर आर्थिक अडचणींना सामोरे जावे लागत आहे. नगरसेवक सागर राणा अंभोरे यांनी सांगितले की, 'ठेवीदारांच्या न्यायासाठी सुरू होणाऱ्या या आंदोलनात समाजाने मोठ्या प्रमाणात सहभागी होणे आवश्यक आहे. हा प्रश्न केवळ पैशांचा नाही, तर सहकार व्यवस्थेवरील विश्वासाचा आहे. ठेवीदारांना न्याय मिळेपर्यंत संघर्ष सुरू राहील.' ॲड. मिलिंद खंडारे यांनी स्पष्ट केले की, 'कायद्याच्या चौकटीत राहून ठेवीदारांना न्याय मिळवून देण्यासाठी सर्वतोपरी प्रयत्न केले जातील.

# धावत्या रोड रोलरला आग लागल्याने भगतसिंग चौकात धावपळ

## अग्निशमन दलाच्या दिरंगाईने नागरिक संतप्त रस्त्याच्या कामाच्या गुणवत्तेवरही प्रश्नचिन्ह

■ प्रतिनिधी | मूर्तिजापूर ■

शहरातील भगतसिंग चौक परिसरात रस्त्याची डागडुजी, खड्डे बुजविणे तसेच गतिरोधक तयार करण्याचे काम सुरू असतानाच कामासाठी वापरण्यात येणाऱ्या रोड रोलरलाच अचानक आग लागल्याने एकच खळबळ उडाली. भर चौकात रोलर पेटल्याने नागरिकांची धावपळ झाली, तर काही काळ वाहतुकीची कोंडी निर्माण झाली.

रोड रोलरला आग लागल्याची माहिती तातडीने अग्निशमन दलाला देण्यात आली. मात्र, घटनास्थळापासून हाकेच्या अंतरावर अग्निशमन दलाचे कार्यालय असतानाही पथक दाखल होण्यास विलंब झाल्याचा आरोप नागरिकांनी केला.

अग्निशमन दलाचे कर्मचारी वार्डात फवारणीच्या कामासाठी गेल्याचे सांगण्यात येत आहे. त्यामुळे आपत्कालीन यंत्रणेच्या तत्परतेवरच नागरिकांनी संताप व्यक्त केला. दरम्यान, अग्निशमन दल घटनास्थळी दाखल झाल्यानंतर काही वेळातच आगीवर नियंत्रण मिळविण्यात आले. सुदैवाने या घटनेत कोणतीही जीवितहानी झाली नाही. मात्र, आगीच्या घटनेमुळे परिसरात काही काळ तणावाचे वातावरण निर्माण झाले होते.

**दहा-बारा वर्षांपासून रस्त्याचा 'खेळ' सुरूच!**

मुर्तिजापूर शहरातील मुख्य रस्त्याचा प्रश्न गेल्या दहा-बारा वर्षांपासून कायम आहे. रस्ता खराब झाला की डागडुजी, पुन्हा खड्डे आणि पुन्हा डागडुजी, असा प्रकार सुरू असल्याने नागरिक त्रस्त झाले आहेत. आता डागडुजीच्या कामासाठी वापरण्यात येणाऱ्या रोड रोलरलाच आग लागल्याने रस्त्याच्या कामाची गुणवत्ता आणि वापरण्यात येणाऱ्या यंत्रसामग्रीच्या देखभालीवरही प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे.

**'टक्केवारी'च्या खड्डयांची चर्चा**

मुख्य रस्त्यावर मोठ्या प्रमाणात खड्डे पडले असून रस्त्याच्या कामात 'टक्केवारी'चा खेळ होत असल्याची चर्चा नागरिकांमध्ये रंगली आहे. मात्र, या आरोपांची अधिकृत पुष्टी झालेली नाही. वारंवार लाखो रुपये खर्च करूनही रस्त्याची अवस्था सुधारत नसेल, तर कामाच्या गुणवत्तेची तपासणी नेमकी कोण करणार, असा सवाल नागरिक उपस्थित करीत आहेत.

**मोठी दुर्घटना घडली तर?**

घटनास्थळापासून नगरपालिका आणि अग्निशमन दलाचे कार्यालय अगदी जवळ असतानाही आग नियंत्रणात आणण्यासाठी झालेल्या विलंबामुळे नागरिकांमध्ये नाराजी आहे. एखादी मोठी दुर्घटना घडल्यास आपत्कालीन यंत्रणा किती वेगाने



प्रतिसाद देईल, असा सवालही या घटनेनंतर उपस्थित झाला आहे. संबंधित विभागाने रस्त्याच्या कामाची गुणवत्ता, यंत्रसामग्रीची सुरक्षितता आणि अग्निशमन दलाच्या आपत्कालीन प्रतिसाद व्यवस्थेची गंभीरपणे दखल घ्यावी, अशी मागणी नागरिकांकडून होत आहे.

# कारंज्यात आज महावितरणचे 'ग्राहक समाधान शिबिर'

**कारंजा :** वीज ग्राहकांच्या समस्या व तक्रारींना तातडीने न्याय मिळावा, महावितरणच्या विविध सेवा-सुविधांची माहिती ग्राहकांना मिळावी आणि प्रलंबित प्रश्नांचा स्थानिक पातळीवरच निपटारा व्हावा, यासाठी महावितरणच्या वतीने संपूर्ण वाशिम जिल्ह्यात गुरुवार, दि. २० ऑगस्ट रोजी 'ग्राहक समाधान शिबिरा'चे आयोजन करण्यात आले आहे. या उपक्रमांतर्गत कारंजा उपविभागीय कार्यालयातही विशेष शिबिर आयोजित करण्यात आले आहे. कारंजा येथे सकाळी ११ ते दुपारी ३ वाजेपर्यंत हे शिबिर होणार असून, कारंजा शहरासह संपूर्ण तालुक्यातील वीज ग्राहकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून आपल्या समस्या व तक्रारी थेट अधिकाऱ्यांसमोर मांडाव्यात.


**तहसिलदार तथा तालुका दंडाधिकारी यांचे कार्यालय अकोला, जि. अकोला.**

जा.क्र./तह./प्रस्तु-१/कावि-९१७/२०२६ दिनांक - /०८/२०२६

**मौजे म्हैसांग ता.जि. अकोला येथील गट क्र. ४९३ क्षेत्र - १.५८ हे. आर. व गट क्र. ५२५ क्षेत्र - ०.८१ हे. आर. या शेतजमिनीवर कुळ घोषीत व मालकी हक्क मिळवुन ७/१२ मध्ये नावाची नोंद करणेबाबत.**

जाहीरनामा

सर्वत्र लोकांना याव्दारे कळविण्यात येते की, अर्जदार श्री. नारायण लक्ष्मण विजेकार रा. म्हैसांग ता.जि. अकोला यांनी राधाकिसन तोष्णीवाल पब्लीक ट्रस्टी मॅनेजींग ट्रस्टी श्रीविष्णु राधासिकन तोष्णीवाल यांचे नावे असलेली मौजे म्हैसांग ता. जि. अकोला येथील गट क्र. ४९३ क्षेत्र - १.५८ हे. आर. व गट क्र. ५२५ क्षेत्र - ०.८१ हे.आर. या शेतजमिनीवर कुळ घोषीत करुन मालकी हक्क मिळवुन ७/१२ मध्ये नावाची नोंद करणेबाबत या कार्यालयास अर्ज सादर केला आहे. अर्जदार यांनी या कार्यालयात प्रकरण सादर केल्यानुसार उपरोक्त प्रकरणात ज्यांना आक्षेप / हरकती घ्यावयाच्या असतील त्यांनी ०७ दिवसांचे आंत या कार्यालयात लेखी स्वरुपात आपले आक्षेप / हरकती सादर कराव्यात. मुदतीनंतर आलेले आक्षेप / हरकत विचारात घेतल्या जाणार नाहीत याची नोंद घ्यावी.

शिक्का

**(कुणाल झाल्टे)**
**तहसिलदार, अकोला**



**जाहीर नोटीस**

**वि. सह दिवाणी न्यायाधीश (क. स्तर) अकोला यांचे न्यायालयात**

एम. जे. सी. नं. १२५५/२०२६ प्रोसेस नं.९८४०/२०२६

चौ.ता. १५/०९/२०२६ दिनांक : ३१/०७/२०२६

**अर्जदार :** १. हर्पल नाना गावंडे मो. क्र. ९६५७०४२२१० रा. मु. जलालाबाद, पो. दापुरा, ता. जि. अकोला. २. संदीप नाना गावंडे रा. वैभव वाडी, वाडेगाव, ता. बाळापूर, जि. अकोला. ३. रत्नप्रभा नाना गावंडे रा. मु. जलालाबाद, पो. दापुरा, ता. जि. अकोला. ४. छाया सुरेंद्र बंड रा. पोस्ट ऑफिस जवळ, दहीसाथ, अमरावती..

**विरुध्द**

**गैरअर्जदार :** निल.

**मयताचा पत्ता :-** मयत : नाना नामदेवराव गावंडे

**पत्ता :-** रा. मु. जलालाबाद, पो. दापुरा, ता. जि. अकोला.

या अर्थीउपरोक्त अर्जदार हयांनी मुंबई विनिमय अधिनियम १८२७, कलम २ अन्वये या न्यायालयात वारसा प्रमाणपत्र मिळण्यासाठी अर्ज केला आहे. त्या अर्जामध्ये असे नमूद केले आहे की, मयत नाना नामदेवराव गावंडे यांचे दि. १२/०७/२०१७ रोजी गहते घर जलालावाद पो. दापुरा, ता. जि. अकोला येथे निधन झाले आहे.

वरील अर्जदार त्यांचे कायदेशिर वारस आहेत, त्याशिवाय इतर कोणीही मयतास वारस नाही. सबब वारस प्रमाणपत्र मिळण्यास अर्जदारांनी अर्ज दाखल केला आहे.

त्याअर्थी सदर अर्जामध्ये कोणाची कसल्याही प्रकारची हरकत असल्यास दिनांक १५/०९/२०२६ रोजी सकाळी १:०० वाजता स्वतः जातीने अगर निर्दिष्ट केलेल्या वकीला मार्फत न्यायालयामध्ये हजर होउन आपली लेखी हरकत दाखल करावी. अन्यथा कोणाची कसल्याही प्रकारची हरकत नाही. असे गृहीत धरून सदर अर्ज निकाली काढण्यात येईल. हयाची नोंद घ्यावी. आज दिनांक ३१/०७/२०२६ रोजी माझे सही व न्यायालयाचे शिक्क्यानिशी दिले.

शिक्का

**आदेशानुसार**
प्र. अधिक्षक
दिवाणी न्यायालय (व-स्तर), अकोला


# देशभक्तीच्या रंगात रंगले राधाबाई गणगणे विद्यालय

## ८० वा स्वातंत्र्य दिन उत्साहात; 'ऑपरेशन सिंदूर'वरील नृत्य ठरले आकर्षण



■ प्रतिनिधी | अकोट ■

मुंडगाव येथील स्थानिक राधाबाई गणगणे विद्यालय व कनिष्ठ महाविद्यालयात ८० वा स्वातंत्र्य दिन देशभक्तीच्या उत्साहपूर्ण वातावरणात साजरा करण्यात आला. ध्वजारोहणासह देशभक्तीपर गीत, नृत्य आणि विद्यार्थ्यांना खाऊ वाटप अशा विविध उपक्रमांनी स्वातंत्र्य दिन सोहळ्याला रंगत आली. संस्थेचे अध्यक्ष डॉ. उमाकांत अंबळकार यांच्या प्रमुख उपस्थितीत कार्यक्रम पार पडला. यावेळी चंद्रशेखर अंबळकार, निळकंठ पाचकोर, कमलाकर वलवले, दिगंबरराव खन्नाडे यांच्यासह माजी प्राचार्य विनोद मालधुरे, सुधाकर तायडे, माजी शिक्षक तुळशीदास वानखडे, नंदकुमार नावकर, अनिल थाटर, कर्मचारी निशिकांत पिंपळे, माजी सरपंच भरक्षे तसेच गावातील प्रतिष्ठित नागरिक, माजी विद्यार्थी व देशप्रेमी नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. मान्यवरांच्या हस्ते ध्वजारोहण करून राष्ट्रध्वजाला मानवंदना देण्यात आली.

कार्यक्रमाचे विशेष आकर्षण ठरले ते विद्यार्थ्यांनी सादर केलेले देशभक्तीपर नृत्य. 'ऑपरेशन सिंदूर' या गाण्यावर विद्यार्थ्यांनी जोशपूर्ण आणि प्रभावी नृत्य सादर करत उपस्थितांची मने जिंकली. या सादरीकरणाला टाळ्यांच्या कडकडाटात उत्स्फूर्त दाद मिळाली. यावेळी विनोद रसे, प्रा. शंकर गवई, प्रा. माणिक राठोड आणि दीपक गेडाम यांनी कराओके ट्रॅकवर देशभक्तीपर गीते सादर केली. विद्यार्थिनी कीर्ती गवई हिने सादर केलेल्या 'ए मेरे वतन के लोगो' या भावस्पर्शी गीताने उपस्थितांना भावुक केले. गीताच्या सादरीकरणाने संपूर्ण परिसर देशप्रेमाच्या भावनेने भारावून गेला. माजी सैनिक दशरथ ठाकरे यांच्या हस्ते विद्यार्थ्यांना गोळ्यांचे वाटप करण्यात आले. तसेच विद्यालयाच्या वतीने विद्यार्थ्यांना खाऊचे वाटप करण्यात आले. कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी मुख्याध्यापक देवेंद्र सोनटक्के यांच्यासह राजेंद्र मुऱ्हेकार, विनोद रसे, आनंद चंदनकर, दिगंबर घुगे, निलेश देशमुख, हेमंत गणगणे, माणिक राठोड, शंकर गवई, मिलिंद शेलकर, दीपक गेडाम, अनिता कोडापे, सुवर्णा येवतकर, गीता वलवले, स्वाती मडघे, सुदर्शा पाटकर, अशोक लहाने, अतुल खलोकार, प्रवीण अंबळकार तसेच शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी व विद्यार्थ्यांनी परिश्रम घेतले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. शंकर गवई यांनी केले, तर आभार मिलिंद शेलकर यांनी मानले.

# गाजरगवत निर्मूलनासाठी कृषी विज्ञान केंद्र वाशिमचा व्यापक जनजागृती सप्ताह

■ प्रतिनिधी | वाशिम ■

राष्ट्रीय कृषी संशोधन प्रणाली (NARS) अंतर्गत भारतीय कृषी अनुसंधान परिषद (ICAR) यांच्या कृषी तंत्रज्ञान अनुप्रयोग संशोधन संस्था (ATARI), पुणे यांच्या मार्गदर्शनाखाली सुविदे फाउंडेशनद्वारा संचालित कृषी विज्ञान केंद्र, वाशिम यांच्या वतीने दि. १६ ते २२ ऑगस्ट २०२६ या कालावधीत गाजरगवत निर्मूलन जनजागृती सप्ताह राबविण्यात येत आहे. कृषी विज्ञान केंद्र, वाशिमचे वरिष्ठ शास्त्रज्ञ व प्रमुख डॉ. रवींद्र काळे यांच्या मार्गदर्शनाखाली केंद्रातील सर्व विषयतज्ज्ञांच्या पथकाद्वारे शेतकरी, ग्रामीण युवक, महिला व ग्रामस्थांमध्ये गाजरगवताच्या प्रादुर्भावामुळे होणारे



पीक उत्पादनातील नुकसान, जैवविविधतेवरील परिणाम तसेच मानव व पशुधनाच्या आरोग्यावर होणारे दुष्परिणाम याबाबत जनजागृती करण्यात येत आहे.

गाजरगवत हे अत्यंत आक्रमक, वेगाने प्रसारित होणारे व बहुवर्षायू स्वरूपाचे तण असून त्याचे नियंत्रण केवळ एकाच पद्धतीने न करता एकात्मिक तण व्यवस्थापन पद्धतीने करणे आवश्यक आहे. शाश्वत ग्रामविकासाच्या उद्दिष्टांच्या पूर्ततेसाठी गाजरगवताचा प्रसार रोखून कृषी परिसंस्था, जैवविविधता आणि सामाजिक आरोग्याचे संरक्षण करण्यावर या अभियानात विशेष भर देण्यात येत आहे.

याअंतर्गत यांत्रिक, रासायनिक, जैविक तसेच एकात्मिक पद्धतींचा शास्त्रोक्त वापर करण्याबाबत मार्गदर्शन केले जात आहे. विशेषतः गाजरगवत फुलोऱ्यात येण्यापूर्वी त्याचे खुरपणी, कोळपणी अथवा आंतरमशागतीच्या वेळी जमिनीत गाडून व्यवस्थापन करण्याचे महत्त्व शेतकऱ्यांना समजावून सांगितले जात आहे.

# ना. बावनकुळेंवरील वक्तव्यावरून तेली समाज आक्रमक!

## जरांगे पाटलांच्या वक्तव्याचा तीव्र निषेध; जिल्हाधिकाऱ्यांना निवेदन, कायद्यानुसार कारवाईची मागणी

■ प्रतिनिधी | अकोला ■

राज्याचे मंत्री ना. चंद्रशेखर बावनकुळे यांच्याबाबत मनोज जरांगे पाटील यांनी केलेल्या वक्तव्यावरून अकोल्यातील तेली समाज आक्रमक झाला आहे. जरांगे यांनी बावनकुळे यांच्यावर केलेले आरोप निराधार, तथ्यहीन व बिनबुडाचे असल्याचा आरोप करीत तेली समाज अकोला जिल्ह्याच्या वतीने या वक्तव्याचा तीव्र निषेध करण्यात आला. याप्रकरणी प्रशासनाने गांभीर्याने दखल घेऊन कायद्यानुसार योग्य ती कार्यवाही करावी, अशी मागणी जिल्हाधिकाऱ्यांना दिलेल्या निवेदनातून करण्यात आली.

तेली समाज अकोला जिल्ह्याच्या वतीने १८ ऑगस्ट रोजी जिल्हाधिकाऱ्यांना निवेदन देण्यात आले. बावनकुळे हे राज्य सरकारमधील जबाबदार मंत्री असून त्यांच्या सार्वजनिक पदाची प्रतिष्ठा मलिन करणारी वक्तव्ये करणे योग्य नसल्याचे निवेदनात नमूद करण्यात आले आहे. बावनकुळे हे ओबीसी समाजाचे प्रतिनिधित्व करीत असल्याने त्यांना जाणीवपूर्वक लक्ष्य केले जात असल्याची भावना ओबीसी



समाजामध्ये निर्माण झाली आहे. एका समाजाच्या भावनांना खतपाणी घालून दुसऱ्या समाजातील व्यक्तीला लक्ष्य करणे हा सामाजिक सलोखा राखण्याचा मार्ग नाही. अशा प्रकारची चिथावणीखोर व वैयक्तिक स्वरूपाची वक्तव्ये सामाजिक वातावरण दूषित करू शकतात, असा इशाराही तेली समाजाने दिला आहे. मंत्र्यांची नार्को चाचणी करण्यासारख्या मागण्या करून त्यांची सार्वजनिक प्रतिष्ठा धुळीस मिळविण्याचा प्रयत्न करणे ही राजकीय मतभेद व्यक्त करण्याची पद्धत नसल्याचे निवेदनात म्हटले आहे. राजकीय मतभेद असले तरी ते लोकशाही आणि कायदेशीर मार्गाने व्यक्त केले जावेत, अशी भूमिका समाजाच्या वतीने मांडण्यात आली.

दरम्यान, मनोज जरांगे पाटील यांच्या वक्तव्यामुळे ओबीसी समाजामध्ये निर्माण झालेल्या तीव्र भावना शासनाच्या निदर्शनास आणून द्याव्यात. तसेच अशा वक्तव्यांना वेळीच आळा घालण्यासाठी प्रशासनाने गांभीर्याने दखल घेऊन कायद्यानुसार योग्य ती कार्यवाही करावी, अशी मागणी तेली समाज अकोला जिल्ह्याच्या वतीने करण्यात आली आहे. निवेदन देतेवेळी दिलीप नायसे, दीपक इचे, प्रवीण झापर्डे, निलेश मालगे, गोपाल झापर्डे, विनोद नालट, विजय थोटांगे, गजानन बोराळे, राजेश वानखडे, महेंद्र अकोटकर, संतोष भिरड, धनंजय मेहसरे, रमेश अकोटकर, जयेश भिसे, श्रीकृष्ण चाटी, देवेंद्र भिरड, ललित भगत, प्रकाश डवले यांच्यासह समाजबांधव मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# जनमाध्यम

paper www.janmadhyam.com

एक प्रतिष्ठित सवय

■ वर्धा ■ वर्षे १४ ■ अंक २६३ ■ गुरुवार, २० ऑगस्ट २०२६ ■ पृष्ठे ४ ■ मुल्य ३.०० रु.


# मृद व जलसंवर्धनासाठी महा वॉकेथॉनमध्ये मोठ्या संख्येने सहभागी व्हा

## उद्या मृद व जलसंधारणाचा जागर, हजारोंचा सहभाग

**-आंबेडकर चौकात शपथ व वॉकेथॉनचा शुभारंभ**
**-यशस्वी आयोजनासाठी विविध समित्यांचे गठण**

**वर्धा जनमाध्यम :** मृद व जलसंधारणाच्या जनजागृतीसाठी दि.२१ ऑगस्ट रोजी 'महा वॉकेथॉन-वॉक फॉर वॉटर' या उपक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. वॉकेथॉन नागरिक, विद्यार्थ्यांच्या सहभागाने यशस्वीरित्या पार पाडण्यासाठी विविध समित्या नेमण्यात आल्या आहे. आज समिती प्रमुखांकडून तयारीचा आढावा घेण्यात आला. वॉकेथॉनच्या माध्यमातून होणाऱ्या मृद व जलसंधारणाच्या जागरमध्ये नोंदणी करून मोठ्या संख्येने सहभागी होण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

वॉकेथॉनची थीम सेव सॉईल, सेव वॉटर, सीक्यूर टूमारो अशी असून पाणी अडवा, पाणी जिरवा, जलयुक्त महाराष्ट्र घडवा हे घोषवाक्य आहे. माजी मुख्यमंत्री सुधाकरराव नाईक यांच्या जयंती निमित्त २१ ऑगस्ट रोजी राज्यभर जलसंधारण दिन साजरा करण्यात येणार आहे. शाश्वत विकासासाठी मृदसंधारण व जलसंधारण हे आवश्यक असून त्याचे महत्त्व पटवून देण्याकरिता राज्यात १५ ते २१ ऑगस्ट दरम्यान जलसंधारण सप्ताह आयोजित करण्यात येत आहे. सप्ताहनिमित्त महा वॉकेथॉन-वॉक फॉर वॉटरचे आयोजन करण्यात आले आहे.

दि.२१ ऑगस्ट रोजी सकाळी ६ वाजता डॉ.बाबासाहेब आंबेडकर पुतळा चौकातून मान्यवरांच्याहस्ते हिरवी झेंडी दाखवून महा वॉकेथॉनला सुरुवात होईल. तत्पूर्वी मृद व जलसंधारणाची शपथ होईल. शुभारंभानंतर महात्मा गांधी चौक, शासकीय विश्रामगृह, नगर परिषद, पोष्ट ऑफिस, कारागृह समोरून मार्गक्रमण करत वॉकेथॉन पुन्हा आंबेडकर चौकात येईल व समारोप होईल. वॉकेथॉन मध्ये सहभागी प्रत्येक व्यक्तीस ई-प्रमाणपत्र मिळणार आहे. तर प्रथम दहा विजेत्यास जिल्हास्तरावर सन्मानचिन्ह देण्यात येणार आहे. वॉकेथॉनलामध्ये लोकप्रतिनिधींसह अधिकारी व कर्मचारी, नामांकित व प्रतिष्ठीत व्यक्ती, डॉक्टर, कलाकार, उद्योजक, राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय खेळाडू, विद्यार्थी, एनसीसी, एनएसएस, माय भारत, नेहरु युवा केंद्र, भारत स्काऊट्स अँड गाईड्स, रेडक्रॉस, होमगार्ड, स्वयंसेवी संस्था, रोटरी व लायन्स क्लब, रनिंग क्लब, सायकलिंग क्लब सदस्य, उद्योग व व्यापारी संघटना, सीएसआर भागीदार कंपन्या, क्रीडा संघटना, गुड मॉर्निंग ग्रुप्स, व्यायाम शाळा, स्वयंसेवी संस्था, महिला सहभागी होणार आहे. वॉकेथॉनलामध्ये सहभागी होण्यासाठी https://register. mahaevent. co.in/ #/ या लिंकद्वारे किंवा क्युआर कोडद्वारे सहभागी होता येईल, असे प्रशासनाच्यावतीने कळविण्यात आले आहे.




# गणेशनगरात देहव्यापाराचा अड्डा उद्ध्वस्त

## पोलिसांचा छापा; तीन महिलांची सुटका, मुख्य सूत्रधार महिलेसह चौघी ताब्यात

**वर्धा जनमाध्यम :** शहरालगतच्या बोरगाव (मेघे) येथील गणेशनगर परिसरात घरातच सुरू असलेल्या कथित अवैध देहव्यापाराचा पोलिसांनी पर्दाफाश केला. अनैतिक मानवी तस्करी पथकाने बुधवारी सायंकाळी ६.३० वाजताच्या सुमारास छापा टाकून चार महिलांना ताब्यात घेतले. यामध्ये अवैध व्यवसाय चालविणाऱ्या मुख्य सूत्रधार महिलेचाही समावेश आहे. पोलिसांच्या कारवाईमुळे परिसरात एकच खळबळ उडाली.

पोलिसांना गणेशनगर परिसरातील एका घरात महिलांना बोलावून अवैध देहव्यापार सुरू असल्याची गोपनीय माहिती मिळाली होती. त्यानुसार अनैतिक मानवी तस्करी पथकातील अधिकारी आणि कर्मचाऱ्यांनी सापळा रचून संबंधित ठिकाणी छापा टाकला.

पाहणीदरम्यान तेथे महिलांकडून देहव्यापार करून घेतला जात असल्याचे प्राथमिक तपासात समोर आले.

कारवाई दरम्यान पोलिसांनी घरमालक महिलेसह अन्य तीन महिलांना ताब्यात घेतले. तसेच कथित अवैध व्यवसायातून मिळालेली काही रोख रक्कमही पोलिसांनी जप्त केली. प्राथमिक चौकशीत बोरगाव (मेघे) येथील गणेशनगर परिसरातीलच एक महिला हा व्यवसाय चालवत असल्याचे समोर आले आहे.



### महिला व बालकल्याण समितीसमोर करणार हजर

पोलिसांच्या कारवाईतून सुटका करण्यात आलेल्या तीन महिलांना पुढील कार्यवाहीसाठी महिला व बालकल्याण समितीसमोर हजर करण्याची प्रक्रिया सुरू होती. तसेच संबंधितांविरुद्ध गुन्हा दाखल करण्याची कार्यवाही वृत्त लिहिपर्यंत सुरू होती.

ही कारवाई पोलिस अधीक्षक सौरभकुमार अग्रवाल आणि अपर पोलिस अधीक्षक सदाशिव वाघमारे यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आली.

# पुलगावात नशेचा सौदा उधळला; ब्राउन शुगरसह दोघांना अटक

## ५७ हजार २०० रुपयांचा मुद्देमाल जप्त; ६.५६ ग्रॅम हेरॉईन हस्तगत

**पुलगाव जनमाध्यम :** शहरात विक्री करण्यासाठी ब्राउन शुगर आणणाऱ्या दोघांना पुलगाव पोलिसांनी सापळा रचून अटक केली. या कारवाईत पोलिसांनी आरोपींकडून ६.५६ ग्रॅम ब्राउन शुगरसह दोन मोबाईल असा एकूण ५७ हजार २०० रुपयांचा मुद्देमाल जप्त केला.

अटक करण्यात आलेल्यांमध्ये धनराज चटपकर (वय २३, रा. इंदिरानगर, पुलगाव) आणि जावेद अहमद मुख्तार अहमद (वय ४३, रा. गुंजखेडा, ता. देवळी) यांचा समावेश आहे.

पोलिसांना मिळालेल्या गुप्त माहितीच्या आधारे संशयितांवर पाळत ठेवून त्यांना ताब्यात घेण्यात आले. झडती घेतली असता त्यांच्याकडून ६.५६ ग्रॅम ब्राउन शुगर आढळून आले. या अमली पदार्थाची अंदाजे किंमत ३७ हजार २०० रुपये आहे. याशिवाय धनराज चटपकर याच्याकडून एक मोबाईल, तर जावेद अहमद याच्याकडून एक मोबाईल जप्त करण्यात आला. दोन्ही आरोपींविरुद्ध पुलगाव पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला असून, या प्रकरणाचा पुढील तपास सहायक पोलिस निरीक्षक मदनकर करीत आहेत.



ही कारवाई गुन्हे तपास पथकाचे पोलिस उपनिरीक्षक शहाजी घोडके, संदीप बोरबन, सोमेश गंथाडे, अजय अनंतवार, नकुल शेंडे, अमोल आडे आणि प्रवीण राठोड यांच्या पथकाने केली.

# संतोषच्या हत्येप्रकरणी चौघांना २३ ऑगस्टपर्यंत पोलिस कोठडी

**वडनेर जनमाध्यम :** शेकापुर (बाई) येथील संतोष पांडुरंग कैकाडे यांच्या हत्या प्रकरणात अटक करण्यात आलेल्या आरोपी पत्नी सपना कैकाडे हिच्यासह शुभम रमेश कैकाडे, सचिन प्रभाकर बसुणे आणि प्रशांत रमेश करपे या चौघांना न्यायालयाने २३ ऑगस्टपर्यंत पोलिस कोठडी सुनावली.

प्रेमसंबंधात पती अडथळा ठरत असल्याने पत्नीने प्रियकराच्या मदतीने पतीच्या हत्येचा कट रचल्याचे पोलिस तपासात समोर आले आहे. या प्रकरणात चौघांना अटक केल्यानंतर बुधवारी न्यायालयात हजर करण्यात आले. पोलिसांनी तपासासाठी आरोपींची कोठडी मागितली. न्यायालयाने पोलिसांची मागणी मान्य करत चौघांनाही २३ ऑगस्टपर्यंत पोलिस कोठडी सुनावली.

पुढील तपास वडनेर पोलिस करीत आहेत.

# प्रियकराच्या पैशांवर डोळा; प्रेयसीनेच रचला चोरीचा कट

## मित्रांच्या मदतीने रोख, मोबाईल लंपास; सावंगी पोलिसांनी दोन तासांत चौघांना बेड्या

**वर्धा जनमाध्यम :** प्रियकराच्या बॅगमध्ये लाखो रुपये असल्याचा संशय. पैशांवर डोळा ठेवून प्रेयसीनेच मित्रांच्या मदतीने चोरीचा कट रचला. प्रियकर पोल्ट्री फार्मवर असतानाच तिघांना तेथे पाठवून रोख रक्कम आणि मोबाईल लंपास केला. मात्र, चोरीचा हा डाव फार काळ लपून राहिला नाही. सावंगी पोलिसांनी अवघ्या दोन तासांत तपासाची चक्रे फिरवत प्रेयसीसह तिच्या तीन साथीदारांना अटक केली. या कारवाईत कारसह तब्बल १ लाख ८३ हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला.

प्रवीण माणिक खापरे रा. चारमंडळ याने याबाबत सावंगी पोलिसांत तक्रार दिली. प्रवीण हा प्रेयसी निलीमा सयाम हिच्यासोबत रोठा शिवारातील किरायाच्या पोल्ट्री फार्मवर गेला होता. तो खोलीत असताना तीन अनोळखी व्यक्ती तेथे आले. त्यांनी मोबाईल, काळ्या रंगाची बॅग आणि पॅन्टमधील पाच हजारांची रोकड असा मुद्देमाल लंपास केला. त्यानंतर खोलीला बाहेरून कडी लावून तिघे कारने पसार झाले.

तक्रार दाखल होताच पोलिसांनी तपास सुरू केला. सुरुवातीला निलीमा सयाम हिच्यावर संशय बळावल्याने पोलिसांनी तिला ताब्यात घेत चौकशी केली. चौकशीत तिने चोरीचा कट उघड केला. तिच्या माहितीवरून शिवाशीष अशोक सराटे, सुरज सुरेश मुंडेकार आणि दर्शन अनिल दाहाटे या तिघांना पोलिसांनी अटक केली.

पोलिस अधीक्षक सौरभकुमार अग्रवाल, अपर पोलिस अधीक्षक सदाशिव वाघमारे आणि उपविभागीय पोलिस अधिकारी सुनील महाडीक यांच्या मार्गदर्शनाखाली पोलिस निरीक्षक विनोद गिरी यांच्या पथकाने ही कारवाई केली. पोलिसांच्या तत्परतेमुळे चोरीचा गुन्हा अवघ्या दोन तासांत उघडकीस आला.

# जंगली वराहाची दुचाकीला धडक; एक ठार, एक गंभीर

## कापसीजवळ भीषण अपघात

**उपचारादरम्यान माधव क्षीरसागर यांचा मृत्यू**

**मोझरी (शेकापूर) जनमाध्यम :** कापसीकडून मोझरीकडे येणाऱ्या दुचाकीला अचानक जंगली वराहाने जोरदार धडक दिल्याने झालेल्या अपघातात एकाचा मृत्यू झाला, तर एक जण गंभीर जखमी झाला. ही घटना मंगळवारी रात्री ८ वाजताच्या सुमारास कापसीजवळ घडली. माधव मारुती क्षीरसागर (५०, रा. मोझरी शेकापूर) असे मृताचे नाव असून संजय रामराव सातपुते (४९, रा. पोटी) हे गंभीर जखमी आहेत.

संजय सातपुते आणि माधव क्षीरसागर हे एमएच ३२ के ४८६९ क्रमांकाच्या दुचाकीने कापसीकडून मोझरीकडे येत होते. कापसीजवळ दुचाकी पोहोचताच अचानक जंगली वराह रस्त्यावर आला आणि त्याने दुचाकीला जोरदार धडक दिली. धडकेमुळे दुचाकीवरील दोघेही रस्त्यावर कोसळले. यात दोघांनाही गंभीर दुखापत झाली.

अपघाताची माहिती मिळताच परिसरातील नागरिकांनी घटनास्थळी धाव घेतली. नागरिकांनी दोन्ही जखमींना तातडीने राळेगाव येथील रुग्णालयात दाखल केले. मात्र त्यांची प्रकृती गंभीर असल्याने पुढील उपचारासाठी यवतमाळ येथील रुग्णालयात हलविण्यात आले. यवतमाळ येथे उपचार सुरू असताना माधव क्षीरसागर यांचा मृत्यू झाला. तर संजय सातपुते यांच्यावर उपचार सुरू आहेत. अचानक रस्त्यावर आलेल्या वन्यप्राण्यामुळे झालेल्या या अपघाताने परिसरात हळहळ व्यक्त होत आहे.




वन्यप्राण्यांचा वाढता वावर आणि त्यामुळे निर्माण होणाऱ्या अपघातांचा धोका लक्षात घेता वनविभागाने उपाययोजना कराव्यात, अशी मागणी नागरिकांकडून होत आहे.

# श्री समर्थ लहानूजी महाराजांचा ५५वा पुण्यतिथी महोत्सव आजपासून

**आर्वी जनमाध्यम :** श्री समर्थ संत लहानूजी महाराज यांचा ५५ वा पुण्यतिथी महोत्सव आज गुरुवार २० ऑगस्ट ते २७ ऑगस्टदरम्यान श्री क्षेत्र टाकरखेड येथे विविध धार्मिक, आध्यात्मिक आणि सामाजिक उपक्रमांनी भक्तिमय वातावरणात साजरा होणार आहे. नारळी पौर्णिमेपर्यंत चालणाऱ्या या पुण्यपर्वात पंचक्रोशीतील हजारो भाविक सहभागी होणार आहेत.



महोत्सवाची सुरुवात पहाटे ५ वाजता मौन साधना, सामुदायिक ध्यान, प्रार्थना, रामधून आणि ग्रामफेरीने होईल. सकाळी ६ वाजता धर्मध्वजारोहण होणार असून यावेळी डॉ. सतीश ठाकरे, सोपान भाललडक, शरद पेठे, योगेश यादव आणि अमोल जवळेकर उपस्थित राहणार आहेत. सकाळी ६.३० ते ८ या वेळेत सौ. कल्पना व अविनाश देशमुख यांच्या हस्ते श्री समर्थांच्या समाधी व मूर्तीचा महाभिषेक आणि महापूजा होईल.

सकाळी ८ ते ९ या वेळेत श्री समर्थ लीलामृत ग्रंथाचे सामुदायिक पारायण श्रीमती रजनी कडू तथा ग्रामस्थ महिला मंडळ टाकरखेड यांच्या सहभागातून होणार आहे. सकाळी ११ वाजता महाप्रसाद व भोगआरती, तर दुपारी १२ ते २ या वेळेत महाप्रसाद वितरण करण्यात येईल. दुपारी २ ते ५ या वेळेत ह.भ.प. विजय महाराज ठाकूर वारोळीकर काटोल यांचे संगीतमय भागवत होणार आहे. यासोबतच विविध सामाजिक व रचनात्मक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे.

सायंकाळी धूपआरती, सामुदायिक प्रार्थना व चिंतन तसेच हरिपाठ होईल. रात्री ९ ते १०.२० या वेळेत कीर्तन, भजन आणि सांगीतिक कार्यक्रम रंगणार आहेत.

२७ ऑगस्ट रोजी नारळी पौर्णिमेनिमित्त सकाळी संत ज्ञानेश्वर माऊली, संत तुकाराम महाराज आणि राष्ट्रसंत तुकडोजी महाराज यांच्या पूजनाने कार्यक्रमाची सांगता होईल. त्यानंतर ह.भ.प. तुकारामबाबा सखारामपूरकर बेवाड, बुलढाणा यांचे गोपालकाला कीर्तन होणार आहे.

सकाळी ११.३० ते १२.३० या वेळेत संत शंकर महाराज पिंपळखुटा, संत सयाजी महाराज, खा. अमर काळे, आ. सुमित वानखेडे, माजी आ.दादाराव केचे आणि संस्थानचे अध्यक्ष बाळासाहेब पावडे यांचे प्रासंगिक उद्बोधन होणार आहे. त्यानंतर श्री समर्थांना मौन श्रद्धांजली, समर्पण गीत आणि महाआरती होईल.

महाप्रसादानंतर पंचक्रोशीतील हजारो भाविकांच्या उपस्थितीत श्री समर्थांच्या पालखीसह बाहेरगावाहून आलेल्या पालख्यांचा सोहळा होणार आहे. या पुण्यपर्वात भाविकांनी मोठ्या संख्येने सहभागी व्हावे, असे आवाहन संस्थानचे विश्वस्त, ग्रामवासी तसेच बाळासाहेब पावडे आणि वसंत महल्ले यांनी केले आहे.

# केक कापला चिमुकल्यांनी, डोळ्यांत दाटली माया; अमर काळेंच्या वाढदिवशी फुलली माणुसकीची छाया

**वर्धा जनमाध्यम :** राजकारण म्हटले की सभा, सत्कार, हारतुरे आणि शक्तिप्रदर्शन हे चित्र डोळ्यांसमोर उभे राहते. मात्र या चौकटीला छेद देत खासदार अमर काळे यांनी आपला वाढदिवस निराधार चिमुकल्यांच्या सहवासात साजरा करून सामाजिक बांधिलकीचा वेगळा संदेश दिला. १७ ऑगस्ट रोजी केशव सिटी सिंदी मेघे परिसरातील आसमंत स्नेहालयाला भेट देत त्यांनी अनाथ, निराधार आणि गरजूंची आस्थेने विचारपूस केली. चिमुकल्यांनी केक कापून खासदार काळेंचा वाढदिवस साजरा केला आणि स्नेहालयाचा परिसर आनंदाने भारावून गेला.

शिवाजी चौधरी यांच्या पुढाकारातून सुरू असलेल्या आसमंत स्नेहालयात आईवडिलांचे छत्र हरपलेली मुले, बेवारस अवस्थेत सापडलेली बालके, आधाराची गरज असलेले ज्येष्ठ तसेच मनोरुग्ण व्यक्तींचा सांभाळ केला जातो. या सेवाकार्याची माहिती घेताना खासदार काळे यांनी स्नेहालयाची पाहणी केली. प्रत्येक व्यक्तीची विचारपूस करताना त्यांनी केवळ राजकीय प्रतिनिधी म्हणून नव्हे तर संवेदनशील माणूस म्हणून संवाद साधला.



चिमुकल्यांच्या संघर्षाची कहाणी ऐकताना काळे भावुक झाले. या मुलांच्या चेहऱ्यावरचे हास्य हीच खरी श्रीमंती आहे. त्यांच्या आयुष्यात आधार आणि सुरक्षितता निर्माण करण्यासाठी समाजाने पुढे आले पाहिजे, अशी भावना त्यांनी व्यक्त केली.

समाजातील दुर्लक्षित घटकांना मायेची सावली देणाऱ्या आसमंत स्नेहालयाचे कार्य कौतुकास्पद असून अशा उपक्रमांना समाजाने आणि लोकप्रतिनिधींनी पाठबळ देणे गरजेचे असल्याचेही त्यांनी सांगितले. वाढदिवसाच्या निमित्ताने झालेली ही भेट राजकीय औपचारिकतेपेक्षा माणुसकीचा जागर करणारी ठरली.

यावेळी नगराध्यक्ष सुधीर पांगुळ, संदीप किटे, प्रकाश कांबळे, प्रणय कदम यांच्यासह स्नेहालयातील कर्मचारी, पदाधिकारी व नागरिक उपस्थित होते.


### नावात बदल

माझे पासपोर्ट नंबर N9622527 वरील माझे ABEDABEGUM असे नाव होते. माझ्या पॅन कार्ड व आधार कार्ड वरील ABEDA RAHIM SHEKH नाव नमूद असून, या नावाने ओळखले जात आहे.
**पत्ता :-** महादेवपुरा वर्धा ४४२००१




# जागतिक छायाचित्रण दिनी वर्धेत कॅमेऱ्यांची अनोखी रॅली

**वर्धा जनमाध्यम :** जागतिक छायाचित्रण दिनानिमित्त वर्धा जिल्हा छायाचित्रकार असोसिएशनच्या वतीने हा दिवस हर्षोल्हासात साजरा करण्यात आला. यानिमित्त शहरातून भव्य बाईक रॅली काढण्यात आली. रॅलीत वर्धा शहरासह जिल्ह्यातील विविध भागांतील छायाचित्रकार मोठ्या संख्येने सहभागी झाले होते. कॅमेरे आणि छायाचित्रण साहित्य घेऊन निघालेल्या छायाचित्रकारांमुळे शहरातील वातावरण लक्षवेधी झाले होते. छायाचित्रण कलेला प्रोत्साहन देणे तसेच या क्षेत्रातील व्यावसायिकांना एकत्र आणण्याचा संदेश या रॅलीतून देण्यात आला. रॅलीदरम्यान छायाचित्रकारांनी एकजुटीचे दर्शन घडवत जागतिक छायाचित्रण दिनाचा उत्साह द्विगुणित केला. या उपक्रमाला नागरिकांचाही उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला.


### जाहीर नोटीस

#### सार्वजनिक नोटीस

सर्वसामान्य जनतेस याव्दारे जाहीर नोटीस देण्यात येते की, माझे अशील रशीदा फीरोज अन्सारी हे मौजा सोनेगाव (ढो.), ता. हिंगणघाट, जि. वर्धा, ग्रामपंचायत कुटकी हद्दीतील, वॉर्ड क्र. ०३, मालमत्ता क्र. १३५ (जुना मालमत्ता क्र. ९८), क्षेत्रफळ ३४.८४ चौ. मी. (३७५.००चौ. फूट), त्यावर बांधलेल्या घरासह, सदर मिळकतीचे मालक व कब्जेदार आहेत.नमुना क्र. ८ प्रमाणे मिळकतीच्या चतुःसीमा खालीलप्रमाणे आहेत :

पूर्वेस : अनुबाई बावणे यांचे घर,
पश्चिमेस : रस्ता,उत्तरेस : रस्ता,
दक्षिणेस : शेत,सदर रशीदा फीरोज अन्सारी हे मागील १३ वर्षांपासून सदर मिळकतीचा मालकी हक्क व ताबा उपभोगत असून, त्याबाबतचा फेरफार प्रमाणपत्र ग्रामपंचायत कुटकी यांनी दिनांक १३/०८/२०२६ रोजी निर्गमित केलेले आहे.सदर मिळकत ही गावठाण हद्दीतील मिळकत असून, त्याबाबतचे प्रमाणपत्र ग्रामपंचायत कुटकी यांनी दिनांक २६/०६/२०२६ रोजी निर्गमित केलेले आहे.आता रशीदा फीरोज अन्सारी हे वरील वर्णन केलेली मालमत्ता क्र. १३५ क्षेत्रफळ ३४.८४चौ. मी. (३७५.०० चौ. फूट) ही मिळकत . साकीर फीरोज अन्सारी व आशिक फीरोज अन्सारी यांच्या नावे बक्षीसपत्र (गिफ्ट डीड) करून देणार आहेत.

सदर प्रस्तावित लाभार्थी, साकीर फीरोज अन्सारी व श्आा शिक फीरोज अन्सारी यांनी सदर मिळकत तारण/सुरक्षा म्हणून दाखवून पिरामल फायनान्स लिमीटेड कडून कर्ज सुविधेसाठी अर्ज केलेला आहे. म्हणून, सदर मिळकतीबाबत अथवा प्रस्तावित व्यवहाराबाबत कोणत्याही व्यक्ती, संस्था, प्राधिकरण अथवा इतर कोणास कोणत्याही प्रकारचा हक्क, मालकी हक्क, हितसंबंध, दावा, हरकत, बोजा, धारणाधिकार, तारण, गहाण, अडथळा किंवा अन्य कोणताही हक्क/दावा असल्यास, त्यांनी त्याबाबतची लेखी हरकत व त्यासंबंधीची आवश्यक कागदपत्रे ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ७ (सात) दिवसांच्या आत खाली नमूद केलेल्या पत्त्यावर सादर करावीत.

निर्धारित मुदतीत कोणतीही हरकत अथवा दावा प्राप्त न झाल्यास, सदर मिळकतीबाबत कोणत्याही व्यक्तीस कोणताही दावा अथवा हरकत नाही असे गृहीत धरून, माझे अशील/संबंधित पक्ष सदर व्यवहार स्वतःच्या जोखमी व जबाबदारीवर पुढे करतील व त्यानंतर कोणत्याही व्यक्तीच्या दाव्याची अथवा हरकतीची दखल घेतली जाणार नाही.

स्थळ : वर्धा
दिनांक : १९/०८/२०२६

**ॲड. आर. आर. तिवारी**
**रामनगर, वर्धा.मो. क्र.: ९९२२४२६१६८**



### तहसिलदार, आर्वी यांचे कार्यालय प्रशासकीय इमारत, तळेगाव रोड, आर्वी जि. वर्धा-४४२२०१

क्रमांक स.म.अ./जन्म-मृत्यू/कावि-७५६/२०२६ दिनांक २४ जुलै, २०२६

#### जाहीरनामा

ज्याअर्थी, विधि व न्याय विभाग, भारत सरकार, नवी दिल्ली यांची दिनांक ११/०८/२०२३ ची अधिसूचना अन्यये जन्म-मृत्यू नोंदणी अधिनियम, १९६९ चे कलम १३ मध्ये सुधारणा करण्यात आली आहे. त्यानुसार, ज्या जन्म व मृत्यूच्या नोंदणीबाबत १ वर्षापेक्षा अधिक कालावधीने सूचना प्राप्त होते, अशा प्रकरणात नाँदी घेण्यासाठी कार्यकारी दंडाधिकारी, ज्यांना जिल्हा दंडाधिकारी यांनी प्राधिकृत केले आहे, अशा कार्यक्षेत्रासाठी ज्या ठिकाणी अशा व्यक्तीचा जन्म व मृत्यू आला आहे, त्याबाबतच्या अचूकतेबाबत खात्री करुन विलंब शुल्क आकारुन अशा नोंदी घेण्याबाबत आदेशित करण्याची सुधारीत तरतूद करण्यात आली आहे. जन्म-मृत्यू नोंदणी अधिनियम, १९६९ मधील कलम १७ व महाराष्ट्र जन्म-मृत्यू नोंदणी नियम, २००० मधील नियम १३ (३) नुसार जन्म-मृत्यू घटना नोंदणी संदर्भातील निबंधक, जन्म व मृत्यू यांनी अनुपलब्धता प्रमाणपत्र देण्यासंबंधी तरतूद करण्यात आली आहे. तरोच सार्वजनिक आरोग्य विभाग, महाराष्ट्र शासन यांचेकडील शासन निर्णय क्रमांक जमृनों २५२५/ई.ऑ.९९११८१) प्र.क्र.२२/कु.क. दिनांक १२ मार्च, २०२५ मध्ये जन्म-मृत्यु नोंदणी अधिनियम, १९६९ व सुधारणा अधिनियम, २०२३ अन्वये विलंबाने करावयाच्या जन्म-मृत्यु नोंदीबाबतची कार्यपध्दती निश्चित केली आहे.

ज्याअर्थी, श्रीमती वैशाली वसंतराव मांडगावकर, रा. बेढोणा ता. आर्वी जि. वर्धा यांच्या जन्माची नोंद ग्रामपंचायत कार्यालय, बेढोणा येथे उपलब्ध नसल्यामुळे त्यांच्या जन्म-मृत्यू नोंदीचे अनुपलब्धता प्रमाणपत्र, जन्माचे पुरावे, शैक्षणिक पुराये, रहीवासाचे पुरावे, मालमत्तेचे पुरावे, ओळखीबाबतचे पुरावे व कौटुंबिक पुराव्यासह सचिव तथा जन्म-मृत्यू निबंधक, ग्रामपंचायत कार्यालय, बेढोणा ता.आर्वी जि. वर्धा यांनी या कार्यालयास प्रस्ताव सादर केला आहे.

त्याअर्थी, श्रीमती वैशाली वसंतराव मांडगावकर, रा.बेढोणा ता. आर्वी जि. वर्धा यांच्या विलंबाने जन्माच्या नोंदीबाबत कोणाचे काही आक्षेप / हरकती असल्यास त्या सदर जाहीरनामा प्रसिध्द झाल्यापासून ३० दिवसाचे आत (विहीत मुदतीत) कार्यालयीन कामकाजाचे दिवशी व वेळी लेखी स्वरुपात दाखल कराव्यात. विहीत मुदतीनंतर आक्षेप / हरकतींचा विचार करण्यात येणार नाही याची नोंद घ्यावी.

**(हरीश काळे)**
**तहसिलदार आर्वी**

## सलमान-शाहरूखच्या ताटात बनावट पनीर?

# हायफाय 'ऑटर्स क्लब'वर तुकाराम मुंढेंची कारवाई




**मुंबई/प्रतिनिधी :** ॲनालॉग पनीरचा वापर केल्यामुळे राज्यात पहिली मोठी कारवाई करण्यात आली आहे. वांद्र्यातील प्रतिष्ठित आणि सेलिब्रिटींच्या लाडक्या अशा ऑटर्स क्लबवर एफडीएनं धाड टाकली आहे. ॲनालॉग पनीरचा वापर आढळून आल्यानं या क्लबचा परवाना निलंबित करण्यात आला आहे.

बालिवूडचा किंग खान शाहरु ख खान, भाईजान सलमान खान, रणवीर सिंग, वरु ण धवन ही यादी इथचं संपत नाही तर बालिवूडमधील अनेक बडे सेलिब्रिटी वांद्र्यातील ऑटर्स क्लबचे मेंबर आहेत पण आता या ऑटर्स क्लबच्या रेस्टारंटवर तुकाराम मुंडे यांच्या एफडीएनं कारवाईचा बडगा उगारला आहे. एफडीएनं ऑटर्स क्लबच्या रेस्टारंटचा परवाना निलंबित केला आहे. या कारवाईला कारणीभूत ॲनालाग पनीरचा वापर ठरलं आहे. या रेस्टारंटमध्ये ॲनालाग पनीरचा वापर करु न पदार्थ तयार केले जात असल्याची तक्रार करण्यात आली होती. पंजाब सिंध डेअरीचं रेग्युलर पनीरच्या नावाखाली विकल्या जाणा-या ॲनालाग पनीरचा वापर करण्यात येत होता. तक्रारीनंतर एफडीएनं टाकलेल्या धाडीत या रेस्टारंटमध्ये अनेक नियमांचं उल्लंघन होत असल्याचं दिसून आलं आहे. सेलिब्रिटींच्या या आवडत्या क्लबमधील रेस्टारंटचं धक्कादायक वास्तव एफडीएच्या धाडीत समोर आलंय.

**सेलिब्रिटींचा आवडता क्लब, समोर आलं धक्कादायक वास्तव**

एफडीए अधिका-यांनी टाकलेल्या या धाडीत क्लबच्या किचनमध्ये अस्वच्छता, अन्नाची अयोग्य साठवणूक आणि देखभालीच्या गंभीर त्रुटी आढळून आल्या किचनमध्ये अस्वच्छ आणि तुटलेल्या फरश्या तसंच ड्रेनेजसाठीही योग्य सोय नसल्याचं दिसून आलं. रेफ्रिजरेटरमध्ये खराब गॅस्केट आणि तापमान नियंत्रणात त्रुटी आढळल्या. तर जेवणासाठी वापरल्या जाणा-या तेलाचा कोणताही रेकार्ड आढळला नाही. सर्वात गंभीर बाब म्हणजे राज्यव्यापी बंदी असूनही रेग्युलर पनीरच्या नावाखाली ॲनालाग पनीरचा वापर करु न खाद्यपदार्थांची विक्री करण्यात येत होती. कार्टर रोडवरील समुद्रकिनारी असलेला हा क्लब बालीवूड सेलिब्रिटींमध्ये लोकप्रिय आहे. सलमान खान, शाहरु ख खान, रणवीर सिंग सारखे सदस्य असलेल्या या क्लबची मेंबरशिप करोडो रु पयांमध्ये असल्याचा अंदाज आहे.

**कोण कोण या क्लबचे मेंबर?**


सलमान खान, सोहेल खान, शाहरु ख खान, गौरी खान,आर्यन खान सुहाना खान, रणवीर सिंग, रवीना टंडन, राशा थडानी, समीरा रेड्डी, रितेश सिधवानी, फरहान अख्तर असे अनेक सेलिब्रिटी या क्लबचे मेंबर्स आहेत एफडीएच्या कारवाईनंतर ऑटर्स क्लबचे क्क्र अशोक मोटवानी यांनी एका वृत्तपत्राला आपली प्रतिक्रिया दिली आहे. FDA ने त्यांना ८६ टक्के गुण दिलं असून रेस्टारंटमध्ये वापरल्या जाणा-या पनीर पॅकेटवर 'proprietary paneer' लिहिलं होतं आणि ते FSSAI-सर्टिफाइड होतं, असं स्पष्टीकरण त्यांनी दिलं

गेल्या काही महिन्यांपासून राज्यात एफडीएनं कारवाईचा धडाका लावला असून त्याअंतर्गत कोट्यवधींचे अन्नपदार्थ नष्ट करण्यात आलेत आहेत. तर अनेक हाटेल आणि आस्थापनांचे परवाने निलंबित करण्यात आले आहेत राज्यभरातील कारवाईसोबतच तुकाराम मुंढे यांच्या टीमनं आता मुंबईतील तक्रारींवर लक्ष केंद्रीत केलं असून मंगळवारी एकाच दिवशी ऑटर्स क्लबसह दहिसरचे डेली फ्रेश बेकर्स आणि केक्स...खार वेस्टचं प्रिन्स ऑफ वेल्स रेस्टारंट, अंधेरीचं कॅफे सिफारिश, चेंबूरमधील झेप्टोचं गोदाम तर विलेपार्लेतील राज ऑईल ट्रेडिंग या आस्थापनांवर कारवाई केली आहे.एफडीएकडून नियमांचं उल्लंघन केल्याप्रकरणी या सर्व आस्थापनांचे परवाने निलंबित करण्यात आला आहे.

## नाशिक पुन्हा भूकंपाच्या धक्क्याने हादरले

### भीतीने लोकांची पळापळ

**नाशिक/प्रतिनिधी-** जिल्ह्यात पुन्हा एकदा सौम्य भूकंपाचे धक्के जाणवले आहेत. नाशिकच्या पेठ तालुक्यात आज १९ ऑगस्ट रोजी सकाळी ९ वाजता सौम्य भूकंपाचे धक्के जाणवले आहेत. मागील महिनाभरात अनेकदा भूकंपाचे धक्के जाणवले आहेत. सातत्याने होर्णा-या भूकंपाच्या धक्क्याने नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण पसरले आहे. या भूकंपाच्या धक्क्याने काही नागरिकांची एकच पळपळ झाली. मिळालेल्या माहितीनुसार, नाशिक जिल्ह्यातील गोंदे, करंजाळी, भायगाव, देवगाव, आडगाव भुवन, एकदरे परिसरात भूकंपाचे धक्के जाणवले आहेत. या भागात बुधवारी सकाळी ९ वाजता भूकंपाचे धक्के जाणवले. या भूकंपाच्या धक्क्यांमुळे परिसरात काही काळ भीतीचे वातावरण पसरलं आहे. मात्र, या घटनेत कोणतीही जीवितहानी किंवा मनुष्यहानी झालेली नाही. नाशिक जिल्ह्यात पुन्हा भूकंपाचे धक्के जाणवल्याने नागरिकांमध्ये चिंता निर्माण झाली आहे. सकाळच्या सुमारास अनेक जण कामानिमित्त घराबाहेर पडले होते. अचानक भूकंपाचे धक्के जाणवू लागल्याने स्थानिकांमध्ये तीव्र घबराट पसरली. जिल्ह्यात वारंवार होणा-या भूकंपामुळे प्रशासनाने दखल घेउन उपाययोजना कराव्यात, अशी मागणी नाशिककरांकडून केली जात आहे. मागील काही दिवसांत नाशिकमध्ये अनेकदा भूकंपाचे जाणवल्याचे समोर आले आहे.



# साखरेची शंभरीकडे वाटचाल

**मुंबई/प्रतिनिधी :** सध्या सणासुदीच्या काळाला सुरु वात झाली आहे. या काळातच ग्राहकांना मोठा झटका बसला आहे. कारण साखरेच्या दरात मोठी वाढ होत असल्याचे चित्र पाहायला मिळत आहे. या सणासुदीच्या काळात मोठ्या प्रमाणात मिठाईची खरेदी विक्री होत असते. मात्र, साखरेच्या वाढत्या दरामुळे मिठाईच्या किंमतीमध्ये देखील वाढ होण्याची शक्यता आहे. गेल्या १८ दिवसात साखरेच्या दरात तब्बल १८ रु पयांची वाढ झाली आहे.



मध्य प्रदेशात साखरेच्या दरात मोठी वाढ होत आहे. गेल्या अवघ्या १८ दिवसांत साखरेचा भाव जवळपास १८ रु पये प्रति किलोने वाढला आहे. भोपाळच्या घाउक बाजारात आता साखरेचा भाव ६१ रु पये प्रति किलोवर पोहोचला आहे. व्यापा-यांच्या मते, साखरेच्या दरात इतकी मोठी वाढ यापूर्वी कधीही झालेली नाही.

**साखरेच्या दरात एवढी वाढ का होतेय ?-** साखरेच्या दरात नेमकी एवढी वाढ का होत आहे? असा सवाल उपस्थित केला जात आहे. तर व्यापा-यांच्या मते, साखरेच्या वाढत्या किमतींचे एक प्रमुख कारण म्हणजे सरकारचे साठा धोरण. केंद्र सरकारने सध्या साखरेच्या साठ्यावर खूप मोठी मर्यादा घातली आहे. व्यापा-यांचा विश्वास आहे की, जर ही साठा मर्यादा कमी केली, तर बाजारात उपलब्धता वाढू शकते आणि किमती काही प्रमाणात नियंत्रणात ठेवता येउ शकतात अशी माहिती व्यापा-यांनी दिली आहे.

**इथेनॉल उत्पादनाचा परिणाम-** देशातील अनेक साखर कारखान्यांनी इथेनॉलचे उत्पादन वाढवण्यावर भर दिला आहे. इथेनॉल उत्पादनासाठी उसाचा वाढता वापर हे आणखी एक साखरेच्या दरवाढीचे प्रमुख कारण असल्याचे म्हटले जाते. साखरेऐवजी इथेनॉल उत्पादनासाठी उसाचा काही भाग वापरला जात असल्याने साखर उत्पादनावर परिणाम झाला आहे. बाजारातील मागणीच्या तुलनेत पुरवठा कमी झाल्याने त्याचा थेट परिणाम किमतींवर होत असल्याची माहिती अभ्यासकांनी दिली आहे.

**साखरेच्या किमती आणखी वाढ होणार का?**

सणासुदीचा हंगाम सुरु होणार आहे. अशा परिस्थितीत, साखरेच्या वाढत्या किमतींचा परिणाम मिठाई आणि इतर खाद्यपदार्थांवरही होउ शकतो. व्यापा-यांच्या मते, जर ही दरवाढ अशीच सुरु राहिली, तर येत्या काही दिवसांत साखर आणखी महाग होउ शकते. याचा अर्थ असा की, सणासुदीच्या काळात मिठाई खरेदी करण्यासाठी सर्वसामान्यांच्या खिशाला कात्री लागू शकते.

# मागील पाच वर्षांत टँकरद्वारे पाणीपुरवठा झालेल्या गावांचा जलयुक्त शिवार 3.0 मध्ये प्राधान्य मिळणार

- जलसंधारणाची कामे तातडीने हाती घेण्याच्या सूचना
- निश्चित झालेल्या प्रकल्पांसाठी आवश्यक निधी उपलब्ध करून देणार
- जलस्त्रोत बळकटीकरणासाठी सर्व विभागांनी समन्वयाने नियोजन करण्याच्या सूचना

**मुंबई/प्रतिनिधी :**महाराष्ट्रातील मागील पाच वर्षांत टँकरद्वारे पाणीपुरवठा करावा लागलेल्या पाणी टंचाईग्रस्त गावांचा जलयुक्त शिवार अभियान ३.० मध्ये प्राधान्याने समावेश करून, या गावांमध्ये जलसंधारणाची कामे तातडीने हाती घ्यावीत, असे निर्देश मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिले. वर्षा निवासस्थानी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या अध्यक्षतेखाली मृद व जलसंधारण व्यवस्थापनाबाबत बैठक झाली. यावेळी राज्यातील जलसंधारणाची कामे, जलस्रोतांचे बळकटीकरण तसेच विविध विभागांच्या समन्वयातून जलव्यवस्थापन अधिक प्रभावी करण्याबाबत सविस्तर चर्चा झाली. मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले, राज्यातील सूक्ष्म पाणलोट क्षेत्रांचा विकास आणि जलस्रोतांचे बळकटीकरण याला प्राधान्य देणे आवश्यक आहे. ज्या प्रकल्पांची कामे निश्चित करण्यात आली आहेत, त्यासाठी आवश्यक निधी उपलब्ध करू न दिला जाईल. या कामांना प्राधान्याने गती देण्यासाठी सर्व संबंधित विभागांनी समन्वयाने नियोजन करावे. त्यामुळे जलसंधारणाची कामे अधिक परिणामकारकपणे आणि थेट पद्धतीने पूर्ण करता येतील.



मागील पाच वर्षांत ज्या गावांमध्ये टँकरद्वारे पाणीपुरवठा करावा लागला, अशा गावांचे विशेष सर्वेक्षण करू न त्यांना जलयुक्त शिवार अभियान ३.० मध्ये प्राधान्य द्यावे. या गावांमध्ये स्थानिक भौगोलिक परिस्थिती आणि पाण्याची गरज लक्षात घेउन जलसंधारणाची कामे निश्चित करावीत. जलस्रोतांच्या बळकटीकरणामुळे निर्माण झालेला सकारात्मक परिणाम नागरिकांपर्यंत पोहोचविण्यासाठी जलसंधारणाशी संबंधित यशकथा तयार करू न त्यांचा प्रभावी प्रसार करावा, अशा सूचनाही मुख्यमंत्री फडणवीस यांनी दिल्या.

यावेळी मुख्यमंत्र्यांचे जलविषयक सल्लागार श्रीराम वेदिरे यांनी मृद व जलसंधारण व्यवस्थापनाबाबत सादरीकरण केले. मृद व जलसंधारण मंत्री संजय राठोड, मुख्य सचिव राजेश अग्रवाल, मित्राचे मुख्य कार्यकारी अधिकारी प्रवीणसिंह परदेशी, वित्त विभागाचे अपर मुख्य सचिव (वित्तीय सुधारणा) विकासचंद्र रस्तोगी, सार्वजनिक बांधकाम विभागाचे अपर मुख्य सचिव मिलिंद म्हैसकर, पाणीपुरवठा व स्वच्छता विभागाचे अपर मुख्य सचिव पराग जैन-नैनुटीया, मुख्यमंत्र्यांचे अपर मुख्य सचिव लोकेश चंद्र, प्रधान सचिव ड?. श्रीकर परदेशी, मृद व जलसंधारण विभागाचे सचिव जितेंद्र पापळकर, पर्यावरण व वातावरणीय बदल विभागाच्या सचिव जयश्री भोज, कृषी विभागाचे सचिव परिमल सिंग, ग्रामविकास विभागाचे सचिव चंद्रकांत पुलकुंडवार, रोजगार हमी योजना विभागाचे सचिव अप्पासो धुळाज, आदी वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते.

## तरूण पिढीला नशेच्या दुष्टचक्रात जाण्यापासून रोखण्यासाठी सामूहिक प्रयत्न करणे आवश्यक-मुख्यमंत्री



**मुंबई/प्रतिनिधी :** तरुण पिढी नशेच्या आहारी गेल्यानंतर उपाययोजना करण्यापेक्षा तरुणांना नशेच्या गर्तेत ढकलणा-या प्रवृत्तींना प्रतिबंधित करावे. तरु णांच्या समस्या लक्षात घेउन त्यांना सहानुभूतीने या दुष्टचक्रात जाण्यापासून रोखावे, असे निर्देश मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी वर्षा निवासस्थानी नशा मुक्त महाराष्ट्र धोरण सादरीकरणाबाबत आयोजित बैठकीत दिले. नशामुक्त महाराष्ट्रासाठी शासकीय यंत्रणाचा दृष्टिकोन महत्वाचा ठरणार आहे. सर्व संबंधित विभागांनी आपली जबाबदारी ओळखून प्रभावी भूमिका बजाविल्यास पुढील काळात निश्चितच नशामुक्त महाराष्ट्र घडविता येईल, अशी अपेक्षाही मुख्यमंत्र्यांनी व्यक्त केली .बैठकीला गृह (ग्रामीण)राज्यमंत्री डॉ.पंकज भोयर, गृह (शहरे) राज्यमंत्री योगेश कदम उपस्थित होते.

नशेच्या दुष्टचक्रात अडकलेल्या तरु णांना यामधून बाहेर पडण्यासाठी प्रत्येक शासकीय रु ग्णालयांमध्ये नशा मुक्ती केंद्र स्थापन करण्याच्या सूचना देत मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले, वैद्यकीय शिक्षण विभागाच्या सर्व शासकीय वैद्यकीय महाविद्यालयांमध्ये नशामुक्ती केंद्र कार्यान्वित करावीत. राज्यामध्ये केंद्र शासनाच्या माध्यमातून कार्यरत असलेल्या नशामुक्ती केंद्रांचे सक्षमीकरण करण्यात यावे. यासाठी आवश्यकता असल्यास निधीची तरतूद करण्यात यावी. या केंद्रांच्या माध्यमातून नशामुक्तीचे प्रभावी कार्यान्वयन होण्यासाठी विशिष्ट कार्यप्रणाली विकसित करावी. नशामुक्त झालेली तरु णाई पुन्हा नशेच्या गर्तेत जाउ नये, यासाठी नशा मुक्ती केंद्रांच्या साखळीसोबतच त्यास कारणीभूत ठरत असलेल्या घटकांवर नियंत्रण आणावे.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले, प्रत्येक शाळा आणि महाविद्यालयाचा परिसर हा टपरीमुक्त असावा. याबाबत कुठलीही तडजोड करता कामा नये. सर्व शैक्षणिक संस्थांचा परिसर हा अमली पदार्थ मुक्त असावा. संबंधित शैक्षणिक संस्थांच्या प्राचार्य, मुख्याध्यापक यांनी शैक्षणिक आस्थापनेचा कॅम्पस अमली पदार्थ मुक्त घोषित करण्याची कार्यवाही करावी. शालेय शिक्षणात अमली पदार्थांचे दुष्परिणाम यावर आधारित अभ्यासक्रम समावेशाची कार्यवाही पूर्ण करावी. अमली पदार्थ विषयक गुन्ह्यांमध्ये एनडीपीएस (नार्कोटिक ड्रग्ज अँड सायकोट्रापिक सबस्टन्सेस ॲक्ट) सारख्या कायद्यांचा प्रभावी उपयोग करीत गतीने निकालाची कार्यवाही पूर्ण होण्यासाठी जलदगती न्यायालये स्थापन करावी. यासोबतच अशा गुन्हांच्या निपटा-यांसाठी केंद्र शासनाच्या धर्तीवर विशेष सरकारी अभियोत्यांच्या पॅनलची व्यवस्था करावी. हे पॅनल राज्य शासनाच्या अधिकारांतर्गत नियुक्त करण्याची तरतूद असावी.

## अनुसूचित जातीच्या विद्यार्थ्यांनी महाडीबीटी 2.0 वर शिष्यवृत्तीसाठी अर्ज करावा

**मुंबई/प्रतिनिधी :** अनुसूचित जाती प्रवर्गातील विद्यार्थ्यांना मॅट्रिकोत्तर शिष्यवृत्ती योजनांचा लाभ मिळण्यासाठी शैक्षणिक वर्ष २०२६-२७ करिता महाडीबीटी २.० प्रणालीवर ऑनलाइन अर्ज प्रक्रिया सुरू करण्यात आली आहे. पात्र विद्यार्थ्यांनी विहित मुदतीत अर्ज सादर करावेत, असे आवाहन सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागाने केले आहे.

महाडीबीटी २.० प्रणालीवर भारत सरकार मॅट्रिकोत्तर शिष्यवृत्ती, भारत सरकार मॅट्रिकोत्तर शिक्षण शुल्क प्रतिपूर्ती (फ्रीशिप), राजर्षी छत्रपती शाहू महाराज गुणवत्ता शिष्यवृत्ती, व्यावसायिक अभ्यासक्रमातील अनुसूचित जातीच्या विद्यार्थ्यांसाठी निर्वाह भत्ता तसेच शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्थांमधील पीपीपी योजनेंतर्गत उपलब्ध सुविधांसाठी अर्ज करता येणार आहेत.शिष्यवृत्तीची रक्कम विद्यार्थ्यांच्या आधार संलग्न बँक खात्यात जमा होणार असल्याने अर्ज भरताना आधार क्रमांकासह मोबाईल क्रमांक, ई-मेल व बँक खात्याची अचूक माहिती नोंदविणे आवश्यक आहे. विद्यार्थ्यांनी महाडीबीटी २.० प्रणालीवर नवीन नोंदणी करून ग्ढ्ण्ड्ढ क्ष्ङ्ग तयार करावी. यासाठी पूर्वीच्या महाडीबीटी पोर्टलवरील युजर आयडी व पासवर्डची आवश्यकता राहणार नाही.नवीन तसेच नूतनीकरण अर्ज भरताना विद्यार्थ्यांनी जात प्रमाणपत्र, उत्पन्नाचा दाखला, अधिवास प्रमाणपत्र, शैक्षणिक पात्रतेची कागदपत्रे आदी आवश्यक कागदपत्रे ऑनलाइन सादर करावीत. अर्ज सबमिट करण्यापूर्वी नोंदविलेली माहिती काळजीपूर्वक तपासून आवश्यक कागदपत्रे अपलोड करावीत.

महाविद्यालयांनी विद्यार्थ्यांकडून प्राप्त अर्जांची छाननी व आवश्यक कागदपत्रांची पडताळणी करू न अर्ज पुढील कार्यवाहीसाठी ऑनलाइन सादर करावेत. विद्यार्थ्यांकडून अर्जाच्या प्रक्रियेसाठी अनावश्यक शुल्क आकारू नये, अशा सूचनाही देण्यात आल्या आहेत. महाडीबीटी २.० पोर्टलवर अर्ज भरताना तांत्रिक अडचण उद्भवल्यास ०२२-४९१५०८००/१८००१०२५३४४ अथवा helpdesk@mahadbt.gov.in या हेल्पडेस्कशी संपर्क साधवा .तसेच शिष्यवृत्तीचा लाभ पात्र विद्यार्थ्यांना वेळेत मिळण्यासाठी विद्यार्थ्यांनी व संबंधित महाविद्यालयांनी विहित कालावधीत आवश्यक कार्यवाही पूर्ण करावी, असे आवाहन करण्यात सहायक आयुक्तसमाज कल्याण मुंबई शहर यांनी यांनी केले आहे.

## विजय यांच्या राज्यात आता तिस-या अपत्यासाठीही महिलांना १ वर्षाची मॅटरनिटी रजा

**चेन्नई/ वृत्तसंस्था-** तमिळनाडू सरकारने आपल्या राज्यातील सरकारी महिला कर्मचा-यांसाठी एक आनंदाची बातमी दिली आहे. मुख्यमंत्री जोसेफ विजय यांच्या नेतृत्वाखालील सरकारने आता राज्यातील सरकारी महिला कर्मचा-यांना तिस-या अपत्यासाठी तब्बल १ वर्षाची मॅटरनिटी रजा देण्यास मंजुरी दिली आहे. पहिल्या दोन अपत्यांसाठी देखील हाच निमय लागू असणार आहे.




सध्याच्या घडीला विवाहित सरकारी कर्मचा-यांना दोन अपत्यांसाठी ३६५ दिवसांची मॅटरनिटी रजा मिळते. आता दोन किंवा त्यापेक्षा जास्त मुलांसाठी मॅटरनिटी रजा १२ आठवड्यांची होती. आता ३६५ दिवसांची मॅटरनिटी रजा मिळणार आहे. दरम्यान, याबाबतची माहिती राज्याचे मानव्य संसाधन मंत्री डी सार्थककुमार यांनी विधानसभेत दिली.ते म्हणाले, सध्याच्या परिस्थितीत तमिळ नाडू सरकार हे कल्याणकारी सरकार आहे. त्यांचा भर हा सामाजिक कल्याण आणि महिलांच्या सक्षमीकरण्यावर आहे. त्यामुळे सरकारी महिला कर्मचा-यांसाठी तिस-या अपत्यासाठी मॅटरनिटी रजा ही वाढवून ३६५ दिवस करण्यात आली आहे.

**वेगवेगळ्या सरकारांनी वाढवली रजा-** आधी मॅटरनिटी रजा ही ९० दिवसांची होती. ती २०११ मध्ये सहा महिन्याची करण्यात आली. त्यानंतर २०१६ मध्ये ती ९ महिन्यांची करण्यात आली आहे. मात्र जुलै २०२१ मध्ये ती वाढवून ३६५ दिवस करण्यात आली. हा मॅटरनिटी लिव्ह वाढवण्याचा निर्णय अण्णा द्रमुक आणि द्रमुकच्या सरकारांनी घेतला होता. नियामानुसार दोन किंवा दोनपेक्षा कमी अपत्यांसाठी सर्वसामान्य परिस्थितीत ३६५ दिवसांची रजा देण्यात येते.

**पगारी रजा ८४ दिवसांची-** मात्र आता सर्वोच्च न्यायालयायाच्या निर्देशानंतर आणि राज्य सरकारच्या विधेयक सुधारणेनंतर राज्यातील सरकारी महिला कर्मचा-यांना दोन किंवा त्यापेक्षा जास्त अपत्यांसाठी १२ आठवडे म्हणजे ८४ दिवस पूर्ण पगारी रजा मिळणार आहे. वरिष्ठ अधिका-याने याबाबतची विस्तृत सरकारी आदेश जारी करण्यात येईल. या नियमाची अंमलबजावणी निर्णय सभागृहात जाहीर झाल्यापासून करण्यात येणार आहे.

## स्थानिक स्वराज्य संस्थांच्या शाळांतील विद्यार्थ्यांना मोफत दप्तर

### 174.19 कोटी रुपयांच्या प्रस्तावास प्रशासकीय मान्यता

मुंबई, दि. १९ : राज्यातील स्थानिक स्वराज्य संस्थांच्या शाळांमध्ये शिक्षण घेणा-या इयत्ता पहिली ते आठवीच्या विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्य पुरविणे या उपक्रमांतर्गत मोफत शालेय दप्तर उपलब्ध करून देण्यास राज्य शासनाने प्रशासकीय मान्यता दिली आहे. या योजनेसाठी सुमारे १७४ कोटी १९ लाख ३५ हजार ४२४ रु पयांच्या प्रस्तावास मान्यता देण्यात आली असून, यासंदर्भातील शासन निर्णय शालेय शिक्षण विभागाने निर्गमित केला आहे. बालकांचा मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा हक्क अधिनियम, २००९ तसेच राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२० च्या उद्दिष्टांच्या अनुषंगाने विद्यार्थ्यांना गुणवत्तापूर्ण आणि आनंददायी शिक्षणासाठी आवश्यक सुविधा उपलब्ध करून देण्यावर शासनाचा भर आहे. त्याच पार्श्वभूमीवर स्थानिक स्वराज्य संस्थांच्या शाळांमधील विद्यार्थ्यांना मोफत दप्तर उपलब्ध करून देण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. या निर्णयानुसार, दप्तर खरेदीसाठी ई-निविदा प्रक्रियेचा अवलंब करण्यात येणार असून, शासनाच्या प्रचलित खरेदी नियमावलीनुसार पारदर्शक पद्धतीने संपूर्ण प्रक्रिया राबविण्यात येईल. दप्तरांच्या किमतीमध्ये डिझाइन, पुरवठा, वाहतूक आणि जीएसटीसह सर्व बाबींचा समावेश असेल. या योजनेसाठी आवश्यक निधी वितरणाबाबतचे स्वतंत्र आदेश नंतर जारी करण्यात येतील. विद्यार्थ्यांची शाळेतील उपस्थिती, शैक्षणिक सहभाग आणि शिक्षणासाठी आवश्यक मूलभूत सुविधा उपलब्ध करून देण्याच्या दृष्टीने हा निर्णय महत्त्वपूर्ण ठरणार असून, राज्यातील लाखो विद्यार्थ्यांना त्याचा लाभ मिळणार आहे. शासन निर्णयाद्वारे यास प्रशासकीय मान्यता प्रदान करण्यात आली आहे.



## कोरेगाव भीमा येथील प्राथमिक आरोग्य केंद्राचा मार्ग मोकळा

**मुंबई दि.१९** : पुणे जिल्ह्यातील शिरूर तालुक्यातील कोरेगाव भीमा येथे मंजूर असलेल्या, मात्र जागेअभावी प्रलंबित राहिलेल्या प्राथमिक आरोग्य केंद्राचा प्रश्न अखेर सुटला आहे. उपमुख्यमंत्री सुनेत्रा अजित पवार यांच्या अध्यक्षतेखाली मुंबईतील सह्याद्री अतिथीगृह येथे आयोजित विशेष बैठकीत यावर महत्वपूर्ण निर्णय घेण्यात आला. कोरेगाव भीमा येथील ६४ आर जमीन उपलब्ध असून, जागेच्या नियोजनाबाबत उपमुख्यमंत्र्यांनी स्पष्ट सूचना दिल्या. परिवहन विभागाने रस्त्याच्या कडेला व्यावसायिक कारणासाठी आवश्यक असलेली जागा विकसित करावी आणि उर्वरित उपलब्ध जागा प्राथमिक आरोग्य केंद्राच्या उभारणीसाठी जिल्हा परिषदेकडे तात्काळ हस्तांतरित करावी, असे निर्देश उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार यांनी दिले. या निर्णयामुळे गेल्या काही काळापासून जागेअभावी रखडलेले प्राथमिक आरोग्य केंद्र प्रत्यक्ष सुरू होण्याचा मार्ग सुकर झाला असून, कोरेगाव भीमा व परिसरातील नागरिकांना लवकरच उत्तम आरोग्य सुविधा उपलब्ध होणार आहेत. या बैठकीस आरोग्य मंत्री प्रकाश आबिटकर, पुणे जिल्हा परिषदेचे अध्यक्ष वीरधवल जगदाळे, परिवहन विभागाचे अपर मुख्य सचिव संजय सेठी, जिल्हा परिषद सदस्य मोनिका हरगुडे, उपमुख्यमंत्र्यांचे सचिव डा. राजेश देशमुख, पुण्याचे जिल्हाधिकारी जितेंद्र डूडी (दूरदृश्य संवाद प्रणाली द्वारे), पुणे जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी गजानन पाटील आदी मान्यवर उपस्थित होते.

## आजपासून मराठी सक्ती

**मुंबई / प्रतिनिधी-** राज्यातील रिक्षा आणि टॅक्सी चालकांना मराठी भाषेचे किमान व्यावहारिक ज्ञान असणे अनिवार्य असून, या नियमाची अंमलबजावणी गुरु वार २० ऑगस्टपासून करण्यात येणार आहे. मराठीचे व्यावहारिक ज्ञान नसलेल्या चालकांना सुरु वातीला एक महिन्याची नोटीस देण्यात येईल. या कालावधीत मराठीचे ज्ञान प्राप्त न केल्यास त्यांचा बॅज तीन महिन्यांपर्यंत निलंबित करण्यात येईल, असा इशारा परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांनी बुधवारी दिला. त्यानंतरही मराठी शिकण्यास जाणीवपूर्वक नकार दिल्यास बॅज आणि परवाना रद्द करण्याची कारवाई करण्यात येईल, असेही त्यांनी स्पष्ट केले. राज्यात १९८९ पासून असलेल्या नियमाच्या आधारे रिक्षा आणि टॅक्सी चालविण्यासाठी व्यावहारिक मराठीचे ज्ञान आवश्यक आहे. १२ ऑगस्ट २०२६ रोजी करण्यात आलेल्या संबंधित कायदेशीर तरतुदीनुसार आता या नियमाची काटेकोर अंमलबजावणी करण्यात येणार असल्याचे सरनाईक यांनी सांगितले. मराठी शिकणार नाही, बोलणार नाही, अशा प्रकारची भूमिका घेणा-या चालकांविरोधात कायद्याच्या चौकटीत कारवाई करणे हे परिवहन विभागाचे कर्तव्य आहे. अशा चालकांना आता कोणतीही अतिरिक्त मुदत न देता कायद्यानुसार कारवाई केली जाईल, असेही त्यांनी स्पष्ट केले.



**नवीन बॅज देताना मराठीची व्हीडीओ रेकॉर्डिंगद्वारे तपासणी**

आतापर्यंत सुमारे ९ लाख ६५ हजार रिक्षा-टॅक्सी परवाने आणि बॅज देण्यात आले आहेत. यापुढे नवीन परवाना आणि बॅज देताना चालकाला व्यावहारिक मराठीचे ज्ञान आहे की नाही, याची आरटीओ अधिकारी प्रत्यक्ष संवादाद्वारे तपासणी करेल आणि त्याचे व्हीडीओ रेकॉर्डिंग केले जाईल. मराठीचे व्यावहारिक ज्ञान असल्याचे स्पष्ट झाल्यानंतरच बॅज देण्यात येणार असल्याचेही सरनाईक म्हणाले.

# संपादकीय

प्रबंध संपादक : प्रदीप देशपांडे

## भाजपातील फेरबदल

राजकारणात संघटनात्मक फेरबदल ही नवी बाब नाही. ती नैसर्गिक असतेच असे नाही. बरेचदा अपरिहार्यता आणि नव्या राजकीय समीकरणांची किनारही त्याला असते. पक्षाच्या पुढील वाटचालीचे संकेत त्यातून मिळत असतात. भाजपने राष्ट्रीय पदाधिकाऱ्यांची नवी फळी जाहीर करून सध्या दिलेला संदेशही त्यामुळेच महत्त्वाचा ठरतो. पक्षाध्यक्ष नितीन नवीन यांनी जाहीर केलेल्या नव्या राष्ट्रीय कार्यकारिणीत अनुभवी आणि तुलनेने तरुण पदाधिकाऱ्यांचा समावेश करतानाच राज्यनिहाय समतोल साधण्याचा प्रयत्न दिसतो. ६५ जणांच्या या यादीत जवळपास ५० नवे चेहरे असून १२ महिला आहेत. आगामी विधानसभा निवडणुका आणि त्यानंतर २०२९ च्या लोकसभा निवडणुकीची तयारी या व्यापक पार्श्वभूमीवर हा फेरबदल केला आहे. भाजप हा गेल्या दशकात देशातील सर्वांत प्रभावशाली राजकीय संघटनांपैकी एक बनला आहे. निवडणुकीच्या राजकारणात त्याची ताकद केवळ लोकप्रिय नेतृत्वावर अवलंबून नसून तळागाळातील संघटनात्मक जाळ्यावरही उभी आहे. त्यामुळे राष्ट्रीय पदाधिकाऱ्यांची निवड करताना कोणत्या प्रदेशाला किती प्रतिनिधित्व दिले जाते, कोणत्या सामाजिक समूहाला किती स्थान दिले जाते आणि कोणत्या नेत्याला कोणती जबाबदारी दिली जाते, याला विशेष अर्थ असतो. नवीन यांच्या नव्या टीममध्ये २३ राज्ये आणि केंद्रशासित प्रदेशांना प्रतिनिधित्व दिले आहे. पैकी चार आदिवासी प्रतिनिधींमध्ये महाराष्ट्र, पश्चिम बंगाल, मध्य प्रदेश आणि ईशान्य भारतातील नेत्यांचा समावेश आहे; मात्र सामाजिक आणि भौगोलिक प्रतिनिधित्वाची आकडेवारी ही संघटनात्मक यशाची हमी नसते. प्रतिनिधित्वाचे राजकारण तेव्हाच अर्थपूर्ण ठरते, जेव्हा त्या प्रतिनिधींना प्रत्यक्ष निर्णय प्रक्रियेत भूमिका मिळते आणि त्यांच्या प्रदेशातील राजकीय वास्तवाचा पक्षाच्या धोरणावर परिणाम होतो. अन्यथा विविधतेचे प्रदर्शन आणि प्रत्यक्ष सत्ताकेंद्र यांत दरी निर्माण होऊ शकते. भाजपसमोरचा आव्हानाचा भाग याच ठिकाणी आहे. पक्षाचा विस्तार मोठा झाला आहे. त्याच्या अपेक्षा आणि हितसंबंधही तितकेच व्यापक झाले आहेत. अशावेळी केंद्रीय नेतृत्व आणि राज्य पातळीवरील संघटना यांच्यातील समन्वय अधिक महत्त्वाचा ठरतो. पुढील वर्षी होणाऱ्या विधानसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर नव्या रचनेत उत्तर प्रदेशला झुकते माप दिले आहे. येथील नवनियुक्त आठ नेत्यांपैकी स्मृती इराणी यांची राष्ट्रीय सरचिटणीसपदी नियुक्ती विशेष उल्लेखनीय आहे. या फेरबदलातील आणखी एक महत्त्वाची बाब म्हणजे, राम माधव यांचे पुनरागमन. २०१४ नंतर भाजपच्या विस्ताराच्या काळात राष्ट्रीय सरचिटणीस म्हणून माधव यांनी महत्त्वाची भूमिका बजावली होती. ईशान्य भारतात पक्षविस्तार आणि जम्मू-काश्मीरमध्ये पीडीपीसोबतच्या युतीत त्यांचा सहभाग उल्लेखनीय होता. आता राष्ट्रीय उपाध्यक्ष म्हणून त्यांना पुन्हा जबाबदारी दिली आहे. संघटन विस्तार आणि गुंतागुंतीच्या राजकीय आघाड्यांचे व्यवस्थापन याबाबतचा त्यांचा अनुभव पक्षाला पुन्हा उपयोगी पडू शकतो. माजी मुख्यमंत्री बिप्लबकुमार देब आणि तीरथसिंह रावत यांनाही पुन्हा महत्त्वाची भूमिका मिळाली. म्हणजेच भाजपने पूर्णपणे नव्या पिढीवर अवलंबून राहण्याऐवजी अनुभवाच्या राजकारणालाही नव्या चौकटीत स्थान दिले आहे. नवीन यांच्या नव्या टीमचे आणखी एक वैशिष्ट्य म्हणजे, इतर पक्षांतून भाजपमध्ये आलेल्या नेत्यांना मिळालेले स्थान. बैजयंत पांडा, डी. पुरंदेश्वरी आणि मनप्रीतसिंग बादल यांना महत्त्वाच्या जबाबदाऱ्या दिल्या. संदीप पाठक आणि रोहन गुप्ता या तुलनेने नव्या प्रवेशकांनाही राष्ट्रीय पातळीवर स्थान मिळाले. राजस्थानच्या माजी मुख्यमंत्री वसुंधरा राजे यांचे पद कायम ठेवताना त्यांचे विरोधक सतीश पुनिया यांना सरचिटणीसपद दिले. विनोद तावडे, पीयूष गोयल, डॉ. भारती पवार आणि शिवप्रकाश या महाराष्ट्राच्या चार जणांचा नव्या टीममध्ये समावेश आहे. पक्षाची संघटनात्मक रचना प्रत्यक्ष जमिनीवर प्रभावीपणे राबविण्यात दाखवलेली चुणूक तावडे यांच्या निवडीच्या मुळाशी आहे. २०२२च्या राष्ट्रपतिपदाच्या निवडणुकीत द्रौपदी मुर्मू यांच्या निवडणूक व्यवस्थापनाची जबाबदारी त्यांच्यावर होती. बिहारमध्ये प्रभारी म्हणून काम करताना राज्यातील सतत बदलणाऱ्या राजकीय समीकरणांमध्ये भाजप आणि राष्ट्रीय लोकशाही आघाडीची रणनीती ठरविण्यात ते महत्त्वाच्या भूमिकेत राहिले. २०२३ मध्ये संयुक्त जनता दल आणि राष्ट्रीय जनता दलाच्या सरकारऐवजी रालोआचे सरकार सत्तेवर येण्यातही त्यांची संघटनात्मक भूमिका महत्त्वाची मानली गेली. लोकसभा निवडणुकीपासून बिहार विधानसभा निवडणूक विजयापर्यंत त्यांच्या कामाची सातत्यपूर्ण छाप दिसून आली.काही जुन्या आणि प्रभावशाली चेहऱ्यांना नव्या राष्ट्रीय संघटनेत बाजूला केले आहे. अमित मालवीय हे यातील सर्वाधिक चर्चेत असणारे नाव. भाजपच्या माहिती-तंत्रज्ञान विभागाच्या नेतृत्वात त्यांनी दीर्घकाळ काम केले. आता त्यांच्या जागी दीपक म्हस्के यांना जबाबदारी दिली आहे. ६५ जणांच्या संघात सहा पदाधिकारी ४० वर्षांखालील, १५ जण ४० ते ४९ या वयोगटातील आणि २१ जण ५० ते ५९ या वयोगटातील आहेत. तीन माजी मुख्यमंत्री यात आहेत. आकडेवारीचा हा मेळ भाजपला एका बाजूला अनुभवी नेतृत्व टिकवून ठेवायचे आहे आणि दुसऱ्या बाजूला पुढील पिढीला संघटनेच्या मध्यवर्ती पातळीवर आणायचे आहे, असे सूचित करतो. पक्षाध्यक्ष तुलनेने तरुण असल्याने त्यांची कार्यपद्धती आणि नव्या टीमची रचना यांत तरुणाईला मिळालेले स्थान विशेष महत्त्वाचे ठरते; पण तरुण चेहऱ्यांना स्थान देणे आणि तरुण मतदारांच्या प्रश्नांना राजकीय अजेंड्यावर स्थान देणे या दोन भिन्न गोष्टी आहेत. देशात तरुणाईसमोर रोजगार, शिक्षण, स्पर्धा परीक्षांतील अनागोंदी आणि महागाई हे प्रश्न आहेत. नव्या संघटनेने या प्रश्नांना धोरणात्मक चर्चेच्या केंद्रस्थानी आणणे गरजेचे आहे. काँग्रेसप्रमाणे निवडणूक संपली की संघटना विसावते, असे भाजपचे स्वरूप नाही. निवडणूक नसतानाही पक्षाची यंत्रणा कार्यरत असते. नवीन यांना नवी टीम उभी करण्यासाठी सहा महिन्यांहून अधिक काळ लागला असला, तरी अखेर समोर आलेली रचना संतुलित दिसते. भाजपने धाडसी उलथापालथ करण्याऐवजी नियंत्रित बदलाचा मार्ग स्वीकारला आहे. यामुळे लगेचच पक्षाच्या राजकीय दिशेत मोठा बदल होईल असे मानणे घाईचे ठरेल; मात्र संघटना अधिक व्यापक, लवचिक आणि निवडणूककेंद्री करण्याचा प्रयत्न यातून स्पष्टपणे दिसतो. भाजपसमोरील खरी कसोटी या टीमच्या कामगिरीची असेल. विविध गटांना एकत्र ठेवणे, राज्यांतील अंतर्गत संघर्ष नियंत्रित करणे, नव्या मतदारांशी संवाद वाढवणे आणि अनुभवी नेतृत्वाचा प्रभावी वापर करणे हे आव्हान नवीन यांच्यासमोर असेल.जुन्या अनुभवाला नव्या ऊर्जेची जोड किती परिणामकारकरीत्या दिली जाते, यावर या नव्या संघटनेचे यश अवलंबून असेल.

**घाऊक आणि किरकोळ महागाईच्या दरात लक्षणीय वाढ होऊनही रिझर्व्ह बँकेच्या पतधोरण समितीने यंदा रेपो दर स्थिर ठेवण्याला प्राधान्य दिले. चलनविषयक धोरण हे केवळ वर्तमान परिस्थितीवर आधारित नसून भविष्यातील आर्थिक घडामोडी लक्षात घेऊन आखले जाते. त्यामुळे महागाईचा कल वाढीचा राहिला तर आगामी बैठकीमध्ये व्याजदरात बदल करण्याची शक्यता नाकारता येत नाही. ऑक्टोबरमध्ये होणाऱ्या पुढील महत्त्वाच्या बैठकीपर्यंत मान्सूनची स्थिती, अन्नधान्याचे उत्पादन आणि त्याचा बाजारभावांवर होणारा परिणाम अधिक स्पष्ट झालेला असेल. त्यानंतरच रिझर्व्ह बँक पुढील निर्णय घेण्याची शक्यता आहे.**

## रेपो दर स्थिर, पण..



भारतीय रिझर्व्ह बँकेच्या चलनविषयक धोरण समितीने (एमपीसी) सलग तीन दिवसांच्या बैठकीनंतर अपेक्षेप्रमाणे रेपो दरात कोणताही बदल न करण्याचा निर्णय घेतला आहे. सध्या धोरणात्मक रेपो दर ५.२५ टक्क्यांवर कायम ठेवण्यात आला आहे. वित्तीय बाजारांनीही याच निर्णयाची अपेक्षा व्यक्त केली होती. या निर्णयामागे महागाईचे सध्याचे स्वरूप, जागतिक आर्थिक परिस्थिती, मान्सूनची अनिश्चितता आणि पुढील काही महिन्यांतील संभाव्य आर्थिक घडामोडी या सर्व बाबींचा विचार करण्यात आला आहे. मात्र सध्याची ही स्थिरता कायम राहील, याची खात्री देता येत नाही. पुढील काळात महागाई वाढल्यास व्याजदरांमध्ये बदल करणे रिझर्व्ह बँकेसाठी अपरिहार्य ठरू शकते. जून महिन्यात देशातील किरकोळ महागाईचा दर ४.४ टक्के नोंदविण्यात आला. हा दर रिझर्व्ह बँकेच्या मध्यमकालीन ४ टक्के लक्ष्यापेक्षा किंचित जास्त असला तरी त्याआधी सलग १६ महिन्यांपर्यंत महागाई लक्ष्याच्या खाली राहिली होती. त्यामुळे या वाढीकडे काही प्रमाणात नैसर्गिक सामान्यीकरण म्हणून पाहिले जात आहे. शिवाय सध्याच्या महागाईवर प्रामुख्याने अन्नधान्य आणि इंधनाच्या किमतींचा परिणाम दिसून येतो. त्यामुळे महागाईचा दबाव संपूर्ण अर्थव्यवस्थेत समान प्रमाणात पसरलेला नाही.

अन्नधान्य आणि इंधन या अस्थिर घटकांचा विचार वगळून मोजल्या जाणाऱ्या मुख्य महागाईचा दर मे आणि जून महिन्यात ३.९ टक्के इतकाच राहिला. यामधून मौल्यवान धातूंच्या वाढत्या किमतींचा प्रभावही वजा केला तर हा दर आणखी कमी होतो. यावरून उत्पादन, सेवा आणि इतर क्षेत्रांमध्ये मागणीमुळे निर्माण होणारा महागाईचा दबाव अद्याप मर्यादित असल्याचे स्पष्ट होते. त्यामुळे तातडीने व्याजदर वाढविण्याची गरज रिझर्व्ह बँकेला वाटली नाही.याशिवाय पश्चिम आशियातील तणाव कमी होण्याची शक्यता आणि संभाव्य युद्धविरामामुळे आंतरराष्ट्रीय ऊर्जा किमतींवरील दबाव कमी होऊ शकतो. भारतासारख्या मोठ्या इंधन आयातदार देशासाठी हा सकारात्मक घटक आहे. दुसरीकडे यंदाच्या मान्सूनची प्रगती, पावसाचे वितरण आणि त्याचा खरीप उत्पादनावर होणारा परिणाम यांचे चित्र अद्याप पूर्णपणे स्पष्ट झालेले नाही. त्यामुळे अन्नधान्याच्या किमतींबाबतही काही महिने प्रतीक्षा करणे आवश्यक असल्याचे रिझर्व्ह बँकेला वाटले. तथापि, पुढील काही महिन्यांतील परिस्थिती सध्याइतकी अनुकूल राहीलच असे नाही. रिझर्व्ह बँकेने चालू आर्थिक वर्षासाठी महागाईचा अंदाज ०.१० टक्के कमी करून ५ टक्के केला असला तरी पुढील काही तिमाहींमध्ये महागाई वाढण्याची शक्यता व्यक्त केली आहे. विशेष म्हणजे २०२७-२८ आर्थिक वर्षाच्या पहिल्या तिमाहीत महागाई ५.३ टक्क्यांपर्यंत पोहोचू शकते, असा अंदाज वर्तविण्यात आला आहे. हा अंदाज खरा ठरल्यास चालू आर्थिक वर्षाच्या तिसऱ्या तिमाहीपासून सलग तीन तिमाही महागाई ५ टक्क्यांपेक्षा अधिक राहण्याची शक्यता आहे. हा दर रिझर्व्ह बँकेच्या सहनशीलतेच्या मर्यादेत असला तरी दीर्घकालीन ४ टक्के लक्ष्यापेक्षा तो लक्षणीय अधिक आहे. त्यामुळे महागाईचा दबाव कायम राहिल्यास चलनविषयक धोरणात बदल करणे आवश्यक ठरू शकते. सध्याचा ५.२५ टक्के रेपो दर आणि भविष्यातील महागाई यांची तुलना केली तर वास्तविक व्याजदर कमी होण्याची शक्यता निर्माण होते. चलनविषयक धोरण हे केवळ वर्तमान परिस्थितीवर आधारित नसून भविष्यातील आर्थिक घडामोडी लक्षात घेऊन आखले जाते. त्यामुळे महागाईचा कल वाढीचा राहिला तर आगामी बैठकीमध्ये व्याजदरात बदल करण्याची शक्यता नाकारता येत नाही. ऑक्टोबरमध्ये होणाऱ्या पुढील महत्त्वाच्या बैठकीपर्यंत मान्सूनची स्थिती, अन्नधान्याचे उत्पादन आणि त्याचा बाजारभावांवर होणारा परिणाम अधिक स्पष्ट झालेला असेल. त्यानंतरच रिझर्व्ह बँक पुढील निर्णय घेण्याची शक्यता आहे.

भारतासाठी एक दिलासादायक बाब म्हणजे अमेरिका-इराण तणाव वाढत असताना देशातील महागाई अनेक विकसित अर्थव्यवस्थांच्या तुलनेत नियंत्रणात होती. गेल्या काही महिन्यांत महागाईत वाढ झाली असली तरी ती अद्याप नियंत्रणाबाहेर गेलेली नाही. त्यामुळे भारताला व्याजदर वाढविण्याची घाई करावी लागलेली नाही.पश्चिम आशियातील संघर्षाचा भारतावर झालेला सर्वात मोठा परिणाम महागाईपेक्षा परकीय चलन बाजारावर झाला आहे. आंतरराष्ट्रीय बाजारात कच्च्या तेलाच्या किमती वाढल्या असल्या तरी त्याचा संपूर्ण परिणाम देशांतर्गत इंधन किमतींवर होऊ देण्यात आलेला नाही. त्यामुळे महागाईवर त्याचा मर्यादित परिणाम झाला.रुपयावरील दबाव कमी करण्यासाठी रिझर्व्ह बँकेने जूनमधील चलनविषयक धोरण बैठकीनंतर परकीय गुंतवणूक आकर्षित करण्यासाठी अनेक उपाययोजना केल्या होत्या. या उपाययोजनांचे आतापर्यंत सकारात्मक परिणाम दिसून आले असून सुमारे ४१ अब्ज डॉलर इतकी परकीय भांडवली गुंतवणूक आकर्षित करण्यात यश आले आहे. त्यामुळे रुपयाला काही प्रमाणात स्थैर्य मिळाले आहे. याशिवाय गेल्या काही महिन्यांत परदेशी संस्थात्मक गुंतवणूकदारांच्या गुंतवणुकीतही सुधारणा झाली आहे. यामुळे चालू आर्थिक वर्षात भारताच्या देयक संतुलनात अधिशेष राहू शकतो का, याकडे अर्थतज्ज्ञांचे लक्ष लागले आहे. मात्र हे चित्र मोठ्या प्रमाणावर पश्चिम आशियातील राजकीय घडामोडी आणि विकसित देशांमधील आर्थिक परिस्थितीवर अवलंबून असेल.

विशेषतः अमेरिकेच्या फेडरल रिझर्व्हकडून आगामी महिन्यांत व्याजदर वाढविले जाण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे. तसे झाल्यास भारत आणि अमेरिकेतील व्याजदरांमधील फरक कमी होईल. परिणामी परकीय गुंतवणुकीचा ओघ कमी होण्याचा धोका निर्माण होऊ शकतो. याचा परिणाम रुपयाच्या विनिमय दरावर आणि भांडवली बाजारावरही होण्याची शक्यता आहे.रिझर्व्ह बँकेच्या चलनविषयक धोरण समितीकडून अशा बाह्य घटकांना थेट प्रतिसाद देण्याची अपेक्षा नसली तरी देशांतर्गत महागाई वाढत असल्यास व्याजदरांमध्ये आवश्यक बदल करून ती अर्थव्यवस्थेला स्थैर्य देण्याचा प्रयत्न करू शकते. अशा निर्णयामुळे महागाई नियंत्रणात ठेवण्याबरोबरच रुपयालाही अप्रत्यक्ष आधार मिळू शकतो.


एकंदरीत सध्या व्याजदर कायम ठेवण्याचा निर्णय योग्य आणि संतुलित मानला जाऊ शकतो. महागाई अजूनही नियंत्रणाबाहेर गेलेली नाही तर आर्थिक वाढीचा वेग टिकवून ठेवणेही तितकेच महत्त्वाचे आहे. मात्र पुढील काही महिन्यांत अन्नधान्याच्या किमती, मान्सूनचे चित्र, जागतिक ऊर्जा बाजारातील घडामोडी, अमेरिकेची व्याजदर धोरणे आणि परकीय गुंतवणुकीचा प्रवाह यांवर बारकाईने लक्ष ठेवावे लागेल. कारण महागाईचा दबाव अपेक्षेपेक्षा अधिक वाढल्यास रिझर्व्ह बँकेला व्याजदरांमध्ये बदल करण्याशिवाय दुसरा पर्याय उरणार नाही. त्यामुळे सध्या दिलासा मिळाला असला तरी भविष्यातील चलनविषयक धोरणाची दिशा पूर्णपणे आगामी आर्थिक आकडेवारीवरच अवलंबून राहणार आहे.

**अभिजीत कुलकर्णी**

## भारतीय माहिती क्रांतीचे जनक राजीव गांधी

आज २० ऑगस्ट. भारताचे माजी पंतप्रधान आणि आधुनिक भारताच्या जडणघडणीत महत्त्वपूर्ण योगदान देणारे राजीव गांधी यांची जयंती. आधुनिक विचार, विज्ञान-तंत्रज्ञानावरील विश्वास आणि दूरदृष्टीच्या नेतृत्वामुळे राजीव गांधी यांनी भारताच्या विकासाला नवी दिशा दिली. म्हणूनच त्यांना भारतीय माहिती-तंत्रज्ञान क्रांतीचे प्रमुख शिल्पकार मानले जाते.भारताच्या पहिल्या महिला पंतप्रधान इंदिरा गांधी यांचे ज्येष्ठ पुत्र असूनही राजीव गांधी यांना सुरुवातीला राजकारणात विशेष रस नव्हता. त्यांची खरी आवड विज्ञान, तंत्रज्ञान आणि विमानउड्डाणात होती. त्यांनी व्यावसायिक वैमानिक म्हणून इंडियन एअरलाइन्समध्ये काम केले.भाऊ संजय गांधी यांच्या १९८० मधील निधनानंतर राजीव गांधी राजकारणात आले. अमेठी लोकसभा मतदारसंघातून त्यांनी निवडणूक लढवून विजय मिळवला. १९८२ मध्ये दिल्लीत झालेल्या आशियाई क्रीडा स्पर्धांच्या आयोजनातही त्यांनी महत्त्वाची भूमिका बजावली.

३१ ऑक्टोबर १९८४ रोजी इंदिरा गांधी यांची हत्या झाल्यानंतर देशासमोर निर्माण झालेल्या गंभीर परिस्थितीत राजीव गांधी यांनी पंतप्रधानपदाची जबाबदारी स्वीकारली. त्यानंतर झालेल्या लोकसभा निवडणुकीत काँग्रेसला ४०० पेक्षा अधिक जागा मिळाल्या आणि राजीव गांधींच्या नेतृत्वाला अभूतपूर्व जनादेश मिळाला.पंतप्रधान म्हणून राजीव गांधी यांचे सर्वांत मोठे योगदान म्हणजे भारताला संगणक, दूरसंचार आणि आधुनिक तंत्रज्ञानाच्या युगाकडे नेण्याची त्यांची दूरदृष्टी. '२१वे शतक हे तंत्रज्ञानाचे शतक असेल' या विचाराने त्यांनी देशात संगणकीकरण आणि दूरसंचाराच्या विस्ताराला चालना दिली. त्या काळात संगणक आणि आधुनिक तंत्रज्ञानाबाबत मोठा विरोध आणि संभ्रम असतानाही त्यांनी भविष्यातील भारताची गरज ओळखली. सॅम पित्रोदा यांच्यासारख्या तंत्रज्ञान क्षेत्रातील तज्ज्ञांच्या सहकार्याने दूरसंचार क्षेत्राच्या आधुनिकीकरणाला गती मिळाली.



राजीव गांधींच्या काळात शिक्षण क्षेत्रालाही नवी दिशा मिळाली.१९८६चे राष्ट्रीय शिक्षण धोरण, जवाहर नवोदय विद्यालयांची संकल्पना, उच्च शिक्षणात तंत्रज्ञानाचा वापर आणि ग्रामीण भागातील गुणवत्तापूर्ण शिक्षणावर भर यामुळे शिक्षणव्यवस्थेत महत्त्वपूर्ण बदल घडले.पंचायतराज संस्थांना घटनात्मक दर्जा देण्यासाठी ६४वे आणि ६५वे घटनादुरुस्ती विधेयक त्यांच्या सरकारने मांडले. ही विधेयके त्या वेळी मंजूर झाली नाहीत; मात्र स्थानिक स्वराज्य संस्थांना घटनात्मक बळ देण्याचा पाया पुढे ७३व्या आणि ७४व्या घटनादुरुस्तीमुळे मजबूत झाला. त्यामुळे स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये महिलांच्या राजकीय सहभागासाठीही नवे दालन खुले झाले.

राजीव गांधींच्या कारकिर्दीत काही निर्णयांवर तीव्र मतभेदही झाले आणि त्यांच्या सरकारला अनेक राजकीय आव्हानांना सामोरे जावे लागले. त्यामुळे त्यांच्या कार्याचे मूल्यमापन करताना उपलब्धींसोबत मर्यादा आणि वादग्रस्त निर्णयांचाही वस्तुनिष्ठ विचार करणे आवश्यक आहे. २१ मे १९९१ रोजी तमिळनाडूतील श्रीपेरुंबुदूर येथे लिबरेशन टायगर्स ऑफ तमिळ ईलम या श्रीलंकेतील दहशतवादी संघटनेशी संबंधित आत्मघाती हल्ल्यात राजीव गांधी यांची हत्या झाली. त्यांच्या स्मरणार्थ २१ मे हा दिवस भारतात दहशतवादविरोधी दिवस म्हणून पाळला जातो.राजीव गांधी यांनी भारताला तंत्रज्ञानाच्या नव्या युगाची दिशा दाखवली. संगणक आणि दूरसंचार हे केवळ भविष्यातील साधन नसून देशाच्या आर्थिक आणि सामाजिक प्रगतीचे आधारस्तंभ ठरू शकतात, हे त्यांनी त्या काळात ओळखले. आज भारत माहिती-तंत्रज्ञान, डिजिटल सेवा आणि दूरसंचार क्षेत्रात जगातील महत्त्वाच्या देशांमध्ये उभा आहे, त्यामागील पायाभरणीत राजीव गांधींच्या धोरणांचा निश्चितच मोठा वाटा आहे. आधुनिक, वैज्ञानिक आणि तंत्रज्ञानाधिष्ठित भारताचे स्वप्न पाहणाऱ्या या दूरदृष्टीच्या पंतप्रधानाला त्यांच्या जयंतीदिनी विनम्र अभिवादन!

**श्याम ठाणेदार**

### दिमागी नक्षलवाद

भारतीय स्वतंत्रता दिवसाच्या ८० व्या महोत्सवाच्या निमित्ताने पंतप्रधान मोदींनी ऐतिहासिक लाल किल्ल्यावरून देशाला संबोधित करताना सांगितले की, देशाला 'दिमागी नक्षलवादाचा'फार मोठा धोका आहे. पंतप्रधानांनी देशविघातक विचारसरणीला वाचा फोडली आहे. देशापुढे असलेली ही एक गंभीर समस्या आहे.यामुळे देशाच्या सुरक्षेला आणि देअखंडतेला फार मोठा धोका आहे. दंतेवाडामधे मोठ्या प्रमाणावर पोलिसांच्या,सुरक्षारक्षकांच्या हत्या झालेल्या आहेत. देशातील चाळीस टक्के इतका भूभाग नक्षलवादाने पीडीत आहे. नक्षलवादी विचारसरणिच्या प्रभावाला बळी पडून अनेक युवक देशविरोधी कार्यक्रमात सहभागी झालेले आहेत.कॉकरोच जनतापार्टीचे राजधानी दिल्लीतील जंतरमंतरवरील आंदोलन हे याचेच एक मासलेवाईक उदाहरण आहे. असे असताना विरोधीपक्षातील अनेक नेते स्वतःला 'दिमागी नक्षलवादी' म्हणवून घेण्यात धन्यता मानतात आणि तसे उघडपणे सांगतात.हे अत्यंत खेदजनक आणि दुःखद आहे. भारत हा लोकशाहीप्रधान देश आहे. येथे माओवादी किंवा नक्षलवादी विचारसरणीला थारा असता कामा नये. विकृत विचारसरणीचे उदात्तीकरण करणे हा तर राष्ट्रद्रोहच आहे. यामुळेच जेएनयूसारख्या विश्वविद्यालयात 'हिंदुस्तान तेरे टुकडे होंगे।'अशा घोषणा दिल्या जातात. कन्हैयाकुमार, शार्जिल इमाम सारख्या व्यक्तींचे उदात्तीकरण केले जाते. हा भारताच्या अखंडतेला आणि सुरक्षेला फार मोठा धोका आहे हे लक्षात घ्यायला हवे. आजमितिला रात्र नाही तर दिवसही वैऱ्याचा आहे अशी स्थिती आहे. यावर राष्ट्र प्रेमींचे मजबूत संघटन होणे आवश्यक आहे. यासाठी सूज्ञ जनतेनेच पुढाकार घ्यायला हवा.

**संध्या काटदरे**

### 'बिलोंगिंग-अ जर्नी ऑफ लव्ह'तून उलगडणार सोनिया गांधींच्या जीवनाचे पैलू

काँग्रेसच्या माजी अध्यक्षा सोनिया गांधी यांचे आत्मचरित्र लवकरच अमेरिकेत प्रकाशित केले जाणार असल्याचे वृत्त आहे या आत्मचरित्रामध्ये सोनिया गांधींच्या आयुष्यातील चढउतारांबद्दल खुलासे केले जाणार आहेत.नेहरू-गांधी राजकीय कुटुंबामध्ये विवाह झाल्यानंतर ज्या आव्हानांचा सामना त्यांना करावा लागला, त्यावरही प्रकाश टाकला जाणार आहे.'बिलोंगिंग-अ जर्नी ऑफ लव्ह' असे या आत्मचरित्राचे नाव असून न्यूयॉर्कस्थित लेखक अल्फ्रेड नॉफ यांनी या चरित्राचे लेखन केले आहे. १० नोव्हेंबर रोजी हे आत्मचरित्र प्रकाशित होणार आहे.सोनिया यांचा राजकारणातील प्रवेश आणि दीर्घकाळापर्यंत काँग्रेसचे अध्यक्षपदाची कारकिर्द या सर्व घटनांबाबत या आत्मचरित्रामध्ये सोनिया गांधींनी आपली भूमिका मांडली आहे. शेवटी अध्यक्षपद सोडणे आणि पंतप्रधानपद नाकारण्याच्या निर्णयामागील भूमिकेहीचाही त्यामध्ये समावेश असणार आहे.

**राजू जाधव**

### 'आत्महत्या' हा उपाय नाहीच !

२०२० सालात देशभरात १ लक्ष ५३ हजार ५२ जणांनी आत्महत्या केली तर २०२४ साली हीच संख्या १ लक्ष ७० हजार ७४६ पर्यंत पोहोचली. जानेवारी ते जून २०२६ या पहिल्या ६ महिन्यांत मराठवाड्यात ४६५ शेतकऱ्यांनी आत्महत्या केली. यात सर्वाधिक १०९ केसेस एकट्या छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यात नोंदवल्या गेल्या. यवतमाळ जिल्ह्यात जानेवारी ते मे २०२६ दरम्यान १०२ शेतकऱ्यांनी आपली जीवनयात्रा संपवली. महाराष्ट्रातील एकूण आत्महत्यांमध्ये पुरुषांचे प्रमाण ७५ ते ८० टक्के आहे. आत्महत्या करणाऱ्यांमध्ये १८ ते ४५ या वयोगटातील व्यक्तींचे प्रमाण सर्वाधिक ६५℅ पेक्षा जास्त आहे. एका सर्वेक्षणानुसार देशातील १३ टक्के तरुण कोणत्या ना कोणत्या तणावामुळे ग्रस्त असतात. जगभरातील तरुणांच्या आत्महत्यांपैकी १० टक्के आत्महत्या केवळ भारतात होतात. नॅशनल क्राईम ब्युरोच्या आकडेवारीनुसार गेल्या काही वर्षांत आत्महत्यांच्या घटनांमध्ये कमालीची वाढ झाली आहे. परीक्षेत अपेक्षित गुण न मिळाल्याने विद्यार्थ्यांची आत्महत्या, प्रेमात अपयश आल्याने तरुणांची आत्महत्या, दुर्धर आजाराने ग्रस्त झाल्याने रुग्णाची आत्महत्या, नोकरीत अपमानास्पद वागणूक मिळाल्याने नोकरदारांची आत्महत्या, व्यवसायात कर्जबाजारी झाल्यामुळे व्यावसायिकाची आत्महत्या, कामाचा ताण सहन न झाल्याने कर्मचाऱ्यांची आत्महत्या, यांसारख्या घटनांचे सध्या पीक आले आहे. आलेल्या संकटाचा सामना करण्याची उमेदच संपून गेल्यामुळे मनुष्य आत्महत्येचा मार्ग स्वीकारतो.

**जगन घाणेकर**

गुरूवार, दि. २० ऑगस्ट २०२६
E-mail:-ytljanmadhyam@gmail.com

जनमाध्यम

एक प्रतिष्ठित सवय

# बेंबळा धरणाच्या विसर्गाने शेती उद्ध्वस्त..! पूर्वसूचना यंत्रणेवर गंभीर सवाल

## ५ ते ७ हजार एकर शेती पाण्याखाली १,२०० शेतकऱ्यांना फटका, ८२.२ टक्के पीकनुकसानीचा अहवाल

✦जनमाध्यम | प्रतिनिधी

**यवतमाळ, दि. १९ :** बेंबळा धरणातून अचानक आणि मोठ्या प्रमाणात करण्यात आलेल्या पाण्याच्या विसर्गामुळे बाभूळगाव तालुक्यातील शेतकऱ्यांचे अतोनात नुकसान झाले असून, पाटबंधारे विभागाच्या नियोजनशून्य कारभारावर शेतकऱ्यांनी तीव्र संताप व्यक्त केला आहे. धरणाचे दरवाजे उघडण्यापूर्वी प्रभावी पूर्वसूचना न दिल्याने शेतातील पिकांसह पाइप, मोटारी, तुषार संच, खतांच्या गोण्या व अन्य साहित्य वाहून गेले. अनेक ठिकाणी सुपीक मातीचा थरही वाहून गेल्याने शेतीचे भवितव्यच धोक्यात आले आहे.

३० जुलै रोजी झालेल्या मुसळधार पावसानंतर धरणातील आवक वाढली. ३० जुलैच्या मध्यरात्रीपासून ३१ जुलैच्या सकाळपर्यंत टप्प्याटप्प्याने विसर्ग वाढविण्यात आला. याचा फटका पालोती, प्रतापपूर, नांदुरा बु., कानगोकुळ, हस्तापूर, नांदेसावंगी यांसह १२ गावांना बसला. सुमारे १,२०० शेतकऱ्यांची



> बेंबळा धरणाच्या विसर्गामुळे बाभूळगाव तालुक्यातील शेतकऱ्यांचे झालेले नुकसान केवळ 'बॅकवॉटर इफेक्ट' असल्याचा पाटबंधारे विभागाचा दावा पूर्णपणे चुकीचा आहे. केलेल्या सर्वेक्षणातून खरी परिस्थिती स्पष्ट होते. केवळ बॅकवॉटर मुळे पाणी तुंबून पिके जळतात, परंतु इथे शेतातील फूट-फूट माती खरडून गेली व शेती साहित्य वाहून गेले, जे थेट पाण्याच्या प्रचंड विसर्गामुळेच घडले आहे. अधिकाऱ्यांनी प्रत्यक्ष बांधावर न जाता काढलेला निष्कर्ष चुकीचा आहे.
>
> -रितेश गवारकर,
> विद्यार्थी, सावित्रीजोतीराव समाजकार्य महाविद्यालय, यवतमाळ

५ ते ७ हजार एकर शेती पाण्याखाली गेल्याचे अभ्यास अहवालात नमूद आहे. यवतमाळ येथील सावित्री जोतीराव समाजकार्य महाविद्यालयाच्या आपत्ती व्यवस्थापन कक्षातील २५ विद्यार्थ्यांनी ७ ऑगस्ट रोजी प्रत्यक्ष पाहणी करून २०० हून अधिक शेतकऱ्यांचे सर्वेक्षण केले. त्यात पीकनुकसानीची सरासरी तीव्रता ८२.२ टक्के आढळली. ९२ शेतकऱ्यांचे शंभर टक्के, तर ५९

> **दोन तास आधी पूर्वसूचना मिळाली असती तर..!**
>
> बेंबळा धरणाचे दरवाजे विनापूर्वसूचना उघडल्याने झालेल्या नुकसानीस पाटबंधारे विभागाचा निष्काळजीपणा जबाबदार आहे. रात्री सोशल मीडियावर दिलेली सूचना सर्वसामान्य शेतकऱ्यांपर्यंत पोहोचत नाही, तर ३ किमी अंतरावरील गावांपर्यंत सायरनचाही आवाज पोहोचत नाही. दवंडी देऊन किमान दोन तासांची पूर्वसूचना दिली असती, तर शेतकऱ्यांना स्प्रिंकलर, खते व साहित्य वाचवता आले असते. हेक्टरी १७ हजारांची मदत अपुरी असून, मक्त्याने किंवा देवस्थानची शेती करणाऱ्या कष्टकरी शेतकऱ्यांनाही नुकसानभरपाई मिळावी.
>
> — आकांक्षा वाघ, विद्यार्थिनी, सावित्रीबाई फुले समाजकार्य महाविद्यालय

शेतकऱ्यांचे ७५ टक्के पीक उद्ध्वस्त झाले. तब्बल २ ते ३ हजार एकर जमिनीवरील १ ते ८ इंच सुपीक माती वाहून गेल्याचेही अहवालात म्हटले आहे. धक्कादायक बाब म्हणजे सर्वेक्षणातील १७८ शेतकऱ्यांनी विसर्गापूर्वी कोणतीही पूर्वसूचना मिळाली नसल्याचे सांगितले. आपत्ती व्यवस्थापन विभागालाही अवघ्या अर्धा तास आधी माहिती देण्यात आल्याचा दावा करण्यात आला. त्यामुळे शेतकऱ्यांना आपले साहित्य सुरक्षितस्थळी हलविण्याची संधीच मिळाली नाही. शेतकऱ्यांनी पाटबंधारे विभागाच्या अधिकाऱ्यांच्या कार्यपद्धतीवरही प्रश्नचिन्ह उपस्थित केले आहे. धरणातून किती पाणी सोडायचे, किती दरवाजे उघडायचे आणि विसर्ग किती ठेवायचा, याचे योग्य नियोजन झाले नसल्याने अतिरिक्त पाणी सोडले गेल्याचा आरोप करण्यात आला. धरणाचे २० दरवाजे उघडल्याने नुकसान वाढल्याचेही शेतकऱ्यांचे म्हणणे आहे. या पार्श्वभूमीवर पिकांसह मातीची धूप, शेतातील खड्डे व शेतीसाहित्याचे स्वतंत्र पंचनामे करून एकरी ३० हजार रुपये विशेष मदत द्यावी, शेती पूर्ववत करण्यासाठी निधी उपलब्ध करून द्यावा आणि विसर्गाच्या निर्णयाची स्वतंत्र चौकशी करावी, अशी मागणी करण्यात आली आहे. या अहवालाची प्रत पालकमंत्री संजय राठोड, स्थानिक आमदार तथा आदिवासी विकास मंत्री अशोक उईके यांना देऊन ठोस कारवाईसाठी भेट घेणार असल्याची माहिती शेतकऱ्यांनी दिली. पत्रकार परिषदेला अमोल गोडे, अक्षय अलबेले, निशांत चौधरी, प्रभाकर अजबेले, अमोल चौधरी तसेच प्रा. घनश्याम दरने, डॉ. रमाकांत कोलते, पद्माकर मलकापूर, अविनाश साबापूरे, अरविंद महानूर व नितीन पखाले उपस्थित होते.

# 'दीपक'च्या कथित हप्तेखोरीने खाकीचा अंधार चव्हाट्यावर!

**बाभुळगाव, दि. १९ :** शहरातील सुगंधित तंबाखू विक्री करणाऱ्या एका व्यापाऱ्याला कारवाईची भीती दाखवून पोलीस अधिकाऱ्याने तब्बल सव्वालाख रुपये उकळल्याचा गंभीर आरोप समोर आल्याने बाभुळगाव पोलिसांच्या कारभाराची चर्चा चव्हाट्यावर आली आहे. विशेष म्हणजे, पैसे घेतल्यानंतरही संबंधित व्यापाऱ्यावर गुन्हा दाखल करण्यात आल्याचा आरोप असल्याने या प्रकाराबाबत संताप व्यक्त होत आहे. या प्रकरणाची माहिती समोर आल्यानंतर एका लोकप्रतिनिधीने थेट पोलीस ठाणे गाठून वरिष्ठ अधिकाऱ्यांकडे तीव्र नाराजी व्यक्त केल्याचे सांगितले जाते. त्यानंतर संबंधित व्यापाऱ्याचे पैसे परत करण्याचे आश्वासन देण्यात आल्याची माहिती आहे. त्यामुळे या कथित व्यवहारा मागील नेमका प्रकार काय, असा सवाल उपस्थित होत आहे. संबंधित 'दीपक' नावाच्या पोलीस अधिकाऱ्यावर यापूर्वीही कथित वसुलीचे आरोप झाल्याचे सांगण्यात येते. खडक सावंगा येथील किराणा दुकानदाराला कारवाईची धमकी देऊन ३० हजार रुपये घेतल्याचा आरोप असून, याप्रकरणी अमरावती लाचलुचपत प्रतिबंधक विभागाकडे तक्रार करण्यात आल्याची माहिती आहे. तसेच वरूड-वलीदापूर परिसरातील एका शेतकऱ्याकडून मटका कारवाईच्या नावाखाली ५० हजार ७०० रुपये घेतल्याचा आरोपही करण्यात आला होता. मात्र, संबंधित प्रकरणांत पैसे परत केल्याचे सांगितले जाते. अन्न व औषध प्रशासनाच्या आदेशांचा आधार घेत काही व्यावसायिकांवर कारवाईची भीती निर्माण करून कथित वसुली केली जात असल्याचे आरोपही पुढे आले आहेत. या आरोपांची स्वतंत्र व निष्पक्ष चौकशी होण्याची मागणी आता जोर धरू लागली आहे. दरम्यान, पोलीस निरीक्षक दीपमाला भेंडे यांनी प्रतिक्रिया देताना सांगितले, या संबंधित विषयाची चौकशी करून दोषी आढळल्यास त्याच्यावर निश्चितच कारवाई केली जाईल.सव्वालाखांच्या या कथित वसुली प्रकरणाची चौकशी निष्पक्षपणे होणार का आणि दोषी आढळल्यास संबंधितांवर कठोर कारवाई केली जाणार का, याकडे आता तालुक्याचे लक्ष लागले आहे.

# घाटंजी येथे हरित क्रांतीचे जनक कै.वसंतराव नाईक यांच्या स्मृतिदिनानिमित्त अभिवादन..!

✦जनमाध्यम | प्रतिनिधी



**घाटंजी, दि. १९ :** घाटंजी येथे श्री संत सेवालाल महाराज तांडाच्या वतीने हरित क्रांतीचे प्रणेते तथा महाराष्ट्राचे माजी मुख्यमंत्री स्व.वसंतरावजी नाईक साहेब यांच्या स्मृतिदिनानिमित्त त्यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून विनम्र अभिवादन करण्यात आले.

सलग तीन वेळा मुख्यमंत्रीपदाची शपथ घेणारे आणि महाराष्ट्रात सर्वाधिक काळ मुख्यमंत्री पदावर विराजमान असणारे, राज्यात कृषी, शिक्षण आणि औधोगिक क्षेत्रात क्रांती घडवून आणत राज्याला अन्नधान्याच्या बाबतीत स्वयंपुर्ण करणारे महाराष्ट्राला सुजलाम सुफलाम बनविणारे, रोजगार हमी योजना,स्वस्त धान्य दुकान, स्थानिक स्वराज्य संस्थेची निर्मिती, पंचायत राजची निर्मिती, जायकवाडी प्रकल्प, शिडको धरण अशा अनेक योजना राबविणारे, विदेशातून हायब्रीड बियाणे आणून शेती क्षेत्रात हरितक्रांती घडविणारे महाराष्ट्राचे माजी मुख्यमंत्री तथा बंजारा समाजाचे नेते स्व. वसंतरावजी नाईक यांना अभिवादन करण्याकरिता संत सेवालाल महाराज मंदिर घाटंजी येथे समाज बांधव एकत्र जमले होते.अभिवादन करतेवेळी उपस्थितानी नाईक साहेबांनी दूरदृष्टी ठेऊन केलेली विकासात्मक कामे आणि विचारांवरती प्रकाश टाकला.यावेळी घाटंजी तांडांचे नायक नामदेवराव आडे, कारभारी अरविंदभाऊ जाधव, डाव बंडूभाऊ जाधव, यांच्या प्रमुख उपस्थितीत अभिवादन करनण्यात आले यावेळी कैलास राठोड, मनोज राठोड, ब्रह्मानंद चव्हाण, पी.एस. राठोड, सीताराम राठोड,भागवत राठोड,बाबूसिंग राठोड, डॉ. देवीदास राठोड,रमेश राठोड,संजय आडे, नेहरू महाराज, राहुल राठोड, आदि मान्यवर उपस्थित होते.यावेळी समाजबांधवानी नाईक साहेबांच्या विचारांचा वारसा पुढे नेण्यांचा संकल्प केला.

# विकासकामांचा आढावा की आश्वासनांची पुनरावृत्ती?

## राळेगाव मतदारसंघातील प्रलंबित प्रश्नांवर प्रशासनाला धारेवर

✦जनमाध्यम | प्रतिनिधी



**बाभूळगाव, दि. १९ :** राळेगाव विधानसभा मतदारसंघातील राळेगाव, कळंब आणि बाभूळगाव तालुक्यांतील प्रलंबित विकासकामे आणि नागरिकांच्या मूलभूत प्रश्नांवर जिल्हास्तरीय आढावा बैठक घेण्यात आली. आदिवासी विकास मंत्री डॉ. प्रा. अशोक उईके यांच्या अध्यक्षतेखाली, जिल्हाधिकारी विकास मीना यांच्या उपस्थितीत झालेल्या बैठकीत विविध विभागांच्या अधिकाऱ्यांकडून प्रश्नांचा आढावा घेण्यात आला.

राजर्षी शाहू महाराज ज्येष्ठ साहित्यिक व कलावंत मानधन योजनेतील पात्र कलावंतांना लाभ, राळेगाव येथील बिरसा मुंडा सभागृहाच्या जागेचा प्रश्न तसेच तिन्ही नगरपंचायत क्षेत्रांतील अतिक्रमणधारकांना पट्टे देण्याचा मुद्दा चर्चेत आला. पंचगाव ग्रामपंचायतीसंदर्भातील तक्रारींचीही दखल घेण्यात आली. बेंबळा प्रकल्प व कालव्यांमुळे बाधित प्रकल्पग्रस्तांना सुविधा, तसेच पॉवरग्रिडच्या वीजवाहिनीमुळे बाधित कळंब व राळेगाव तालुक्यातील शेतकऱ्यांना प्रलंबित मोबदला देण्याचा प्रश्नही उपस्थित करण्यात आला. मतदारसंघाच्या औद्योगिक विकासासाठी राळेगाव, कळंब व बाभूळगाव येथे एमआयडीसी उभारण्याबाबत शासकीय जमीन उपलब्धतेची पाहणी करण्याचे निर्देश देण्यात आले. कळंब व बाभूळगाव येथे क्रीडा संकुलासाठी जागा उपलब्ध करून देण्यावर ही चर्चा झाली. दरम्यान, तिन्ही तालुक्यांतील शून्य शिक्षकी शाळांचा गंभीर प्रश्न बैठकीत ठळकपणे मांडण्यात आला. शिक्षकांच्या अभावामुळे विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान होऊ नये यासाठी खनिज विकास निधीतून मानधनावर शिक्षक उपलब्ध करून देण्याची शक्यता तपासण्याचे निर्देश मंत्री उईके यांनी दिले. प्रलंबित प्रश्नांवर केवळ बैठका न घेता प्रत्यक्ष कार्यवाही करण्याचे निर्देश देत संबंधित विभागांनी समन्वयाने प्रश्न मार्गी लावावेत, अशी भूमिका यावेळी घेण्यात आली. बैठकीस भाजपचे विविध पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.

## थोडक्यात

### शिष्यवृत्ती परीक्षेत मातोश्री विद्यालय महागावच्या १३ विद्यार्थ्यांची उत्तुंग भरारी

**महागाव :** महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषद पुणे द्वारा आयोजित वर्ग चौथा




व सातवा ह्या वर्गासाठी विद्यार्थी शोधून त्यांना स्पर्धेच्या माध्यमातून उत्तीर्ण विद्यार्थ्यांसाठी प्रोत्साहन राशीच्या माध्यमातून सहकार्य दिले जाते व पुढील स्पर्धेसाठी अधिक प्रेरित केले जाते त्यामध्ये मातोश्री विद्यालयातील नियती राऊत, अक्षत नजरधने, क्रिशराज करपे, अर्चना आखाडकर, आरुषी मखमले, सार्थक आखाडकर, रिया बंडाळे, आराधना सुरौशे, अमित रोकडे, अर्पित ढगे, चंचल गावंडे, अनुष्का शेंडगे, आरुषी भवानकर, असे एकूण १३ विद्यार्थी शिष्यवृत्तीधारक झाले आहेत. विद्यालयात नियमित घेण्यात येणारे शिष्यवृत्ती वर्ग पालकांचे वेळोवेळी मिळणारे सहकार्य तसेच विद्यार्थ्यांमध्ये असणारी जिद्द, मेहनत व चिकाटी यामुळे विद्यार्थ्यांनी आपले यश प्राप्त केले. उत्तीर्ण सर्व विद्यार्थ्यांचे संस्थापक दिगंबर जगताप व प्राचार्य तसेच समस्त कर्मचारी वृंद यांनी स्वागत करून पुढील कार्यास सदिच्छा व्यक्त केली.

### स्व.वसंतराव नाईक यांना स्मृतिदिनानिमित्त महागाव येथे अभिवादन

**महागाव :** महाराष्ट्र राज्याचे माजी मुख्यमंत्री तथा हरित क्रांतीचे प्रणेते



महानायक स्व. वसंतरावजी नाईक साहेब यांच्या स्मृतिदिनानिमित्त १८ ऑगस्ट रोजी महागाव येथील वसंतराव नाईक चौकातील त्यांच्या तैलचित्रास पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. वसंतराव नाईक साहेबांनी महाराष्ट्राच्या कृषी, सिंचन व ग्रामीण विकासाला नवी दिशा देत राज्याच्या विकासात मोलाचे योगदान दिले. त्यांच्या दूरदृष्टीपूर्ण कार्याचे स्मरण करून उपस्थितांनी त्यांना आदरांजली वाहिली. याप्रसंगी माजी जिल्हा परिषद सदस्य तथा शिवसेना उपजिल्हाप्रमुख डॉ. बी. एन. चव्हाण, डॉ. पंजाबराव राठोड, माजी नगरसेवक तथा शिवसेना तालुकाप्रमुख राजू राठोड, युवा सेना शहर समन्वयक अविनाश जाधव, दिलीप जाधव, गजानन राठोड, ओम राठोड, कुलदीप बनसोडे, संतोष नागमोते, शेख अकबर,जय जाधव, अजित चव्हाण यांच्यासह वसंत प्रेमी बांधव मोठ्या संख्येने उपस्थित होते. यावेळी उपस्थितांनी वसंतराव नाईक साहेबांच्या कार्याला अभिवादन करत त्यांच्या विचारांचा व विकासाच्या दूरदृष्टीचा वारसा पुढे नेण्याचा संकल्प व्यक्त



### पत्रकार संघटनेच्या अध्यक्षपदी रामेश्वर पुदरवार यांची निवड

**पाटणबोरी :** येथील पत्रकार संघटनेची वार्षिक बैठक १६ ऑगस्ट २०२६ रोजी कालिका माता सभागृहात उत्साहात पार पडली. माजी अध्यक्ष निलेश यमसनवार यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या या बैठकीच्या प्रारंभी दिवंगत पत्रकार संतोष नक्षणे यांच्या प्रतिमेचे पूजन करून त्यांना भावपूर्ण श्रद्धांजली अर्पण करण्यात आली. यानंतर गावातील सेवानिवृत्त सैनिक सुभाष माधवराव राजुलवार यांचा पत्रकार संघटनेचे माजी अध्यक्ष निलेश यमसनवार यांच्या हस्ते शाल, श्रीफळ व पुष्पगुच्छ देऊन सत्कार करण्यात आला. बैठकीत उपस्थित सर्व पत्रकार बांधवांच्या सर्वानुमते रामेश्वर पुदरवार यांची पाटणबोरी पत्रकार संघटनेच्या अध्यक्षपदी निवड करण्यात आली. तसेच मोबीन तिघाले यांची उपाध्यक्षपदी, प्रशांत लसंते यांची सचिवपदी, तर हणमंतू सुरावर यांची कोषाध्यक्षपदी निवड करण्यात आली. नवनिर्वाचित पदाधिकाऱ्यांचा पत्रकार संघटनेच्या वतीने पुष्पगुच्छ देऊन सत्कार करण्यात आला. यावेळी उपस्थित पत्रकार बांधवांनी नवनिर्वाचित पदाधिकाऱ्यांना पुढील कार्यकाळासाठी शुभेच्छा दिल्या.

### बालकांसाठी मोफत आरोग्य शिबिर..! स्वातंत्र्यदिनाचा अनोखा उपक्रम

**उमरखेड :** स्वातंत्र्यदिनाचे औचित्य साधून उमरखेड येथील लाइफ केअर नवजात शिशु व बाल रुग्णालयात १५ ऑगस्ट रोजी मोफत बालरोग आरोग्य तपासणी शिबिर घेण्यात आले. बसस्थानकासमोरील डॉ. लखन बालचंद पडवळे यांच्या रुग्णालयात आयोजित या शिबिराला गरजू पालकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. शिबिरात बालकांची तज्ज्ञांकडून मोफत तपासणी करून आवश्यक औषधांचेही विनामूल्य वितरण करण्यात आले. बालरोग व नवजात शिशु तज्ज्ञ डॉ. लखन पडवळे यांनी बालकांची सखोल तपासणी करून पालकांना उपचार, आहार व आरोग्यविषयक मार्गदर्शन केले. स्तनपान, बालकांची वाढ-विकास, विविध आजारांचे निदान व उपचार तसेच आवश्यकतेनुसार शस्त्रक्रियेबाबतही पालकांना माहिती देण्यात आली. गरजू बालकांना वेळेत योग्य उपचार मिळावेत आणि पालकांमध्ये आरोग्यविषयक जागृती निर्माण व्हावी, या उद्देशाने राबविण्यात आलेल्या या उपक्रमाचे पालकांनी समाधान व्यक्त केले. स्वातंत्र्यदिनाला सामाजिक बांधिलकीची जोड देणारा हा उपक्रम ठरला.

# महामार्गावर मोकाट जनावरामुळे भीषण अपघात..! एका वृद्ध महिलेचा मृत्यू, तीन गंभीर

✦जनमाध्यम | प्रतिनिधी



**यवतमाळ, दि. १९ :** किन्ही गावाजवळील उड्डाणपुलावर मोकाट जनावर अचानक रस्त्यावर आल्यामुळे दोन कारचा भीषण अपघात घडला. या अपघातात एका वृद्ध महिलेचा दुर्दैवी मृत्यू झाला असून तीन जण गंभीर जखमी झाले आहेत.

अपघाताचे स्वरूप

हायवेवर अचानक जनावर समोर आल्याने पुढील कारचालकाने तातडीने ब्रेक दाबला. त्यामुळे मागून येणाऱ्या भरधाव कारने पुढील कारला जोरदार धडक दिली. धडकेची तीव्रता इतकी प्रचंड होती की, एक कार रस्त्याच्या कडेला जाऊन ३ ते ४ वेळा पलटी झाली.

गावकऱ्यांचे मदतकार्य

अपघात घडताच स्थानिक गावकऱ्यांनी तत्परता दाखवत घटनास्थळी धाव घेतली. पलटी झालेल्या कारचा दरवाजा तोडून जीवन राठोड, अरुण देवक, गोलू कुलरकर, अथर्व गायधने, यश सोनटक्के, मोहन जाधव, सचिन मोहरकर आणि रघु राठोड यांनी जखमींना बाहेर काढले.

पोलीस कारवाई व ग्रामस्थांची मागणी

रघु राठोड यांनी तात्काळ यवतमाळ ग्रामीण पोलिसांना घटनेची माहिती दिली. पोलिसांनी घटनास्थळी पोहोचून पंचनामा केला आणि जखमींना उपचारासाठी यवतमाळच्या शासकीय रुग्णालयात दाखल केले. या महामार्गावर मोकाट जनावरांमुळे अपघातांची मालिका सुरूच असून, प्रशासनाने या जनावरांचा तातडीने कायमस्वरूपी बंदोबस्त करावा, अशी तीव्र मागणी ग्रामस्थांकडून केली जात आहे. या अपघाताचा पुढील तपास यवतमाळ ग्रामीण पोलीस करत आहेत

# यवतमाळ येथे ३०० दिव्यांगाणा मिळणार आधुनिक कृत्रिम अवयव..!

✦जनमाध्यम | प्रतिनिधी



> **शिबिरासाठी पूर्वनोंदणी अनिवार्य असून इच्छुकांनी साठे (९१७५५५८३५६) किंवा जयंत (९६१९३३१४६०) यांच्याशी संपर्क साधावा, असे आवाहन करण्यात आले आहे.**

**यवतमाळ, दि. १९ :** दिव्यांगांच्या पुनर्वसनासाठी सामाजिक संस्था आणि कॉर्पोरेट क्षेत्र पुढाकार घेत असताना सरकारी यंत्रणेच्या उदासीनतेवर प्रश्नचिन्ह उपस्थित करणारे मोफत दिव्यांग शिबिर यवतमाळात आयोजित करण्यात आले आहे.

ऑईल अँड नॅचरल गॅस कॉर्पोरेशनच्या (ONGC) सीएसआर निधीतून भारत विकास परिषदेचे दिव्यांग केंद्र, पुणे आणि वीरशैव हितवर्धक मंडळ, यवतमाळ यांच्या संयुक्त विद्यमाने ६ सप्टेंबर २०२६ रोजी लोहारा येथील महात्मा बसवेश्वर भवनात हे शिबिर होणार आहे. सकाळी ९ ते दुपारी ३ वाजेपर्यंत होणाऱ्या या शिबिरात तब्बल ३०० दिव्यांगांची मोजणी करून त्यांना प्रत्येकी ५० हजार रुपयांपेक्षा अधिक किमतीचे आधुनिक कृत्रिम मॉड्युलर पाय, हात तसेच कॅलिपर मोफत उपलब्ध करून दिले जाणार आहेत. आधुनिक तंत्रज्ञानावर आधारित हे मॉड्युलर पाय वजनाने हलके आणि 'ऑटोफोल्ड' पद्धतीचे असून, त्यांचा वापर केल्यानंतर चालणे, पळणे, पोहणे, वाहन चालविणे तसेच शेतीची कामे करणे अधिक सुलभ होणार असल्याचे आयोजकांनी सांगितले. शिबिरासाठी येणाऱ्या दिव्यांग व्यक्तीसह एका सोबत्यासाठी मोफत भोजनाची व्यवस्था करण्यात आली आहे; तसेच यवतमाळ बसस्थानकावरून सकाळी ९ ते दुपारी १२ या वेळेत पिक-अप वाहनाची सुविधा उपलब्ध राहणार आहे. दरम्यान, सामाजिक संस्था आणि कंपन्या दिव्यांगांच्या पुनर्वसनासाठी पुढे येत असताना सरकारी दिव्यांग विभागात अपुरे मनुष्यबळ आणि प्रशासकीय उदासीनता असल्याची टीका करण्यात आली आहे. "दिव्यांगांच्या प्रश्नांकडे शासनाने गांभीर्याने पाहण्याची गरज आहे," अशी अपेक्षा व्यक्त करण्यात आली.

# आरोग्य कर्मचाऱ्यावर हल्ला..! आरोपीवर कठोर कारवाईची मागणी

✦जनमाध्यम | प्रतिनिधी



**यवतमाळ, दि. १९ :** महागाव येथील आरोग्य कर्मचारी प्रशिक काळबांडे यांच्यावर झालेल्या अमानुष हल्ल्याचा राष्ट्रीय आरोग्य अभियान कर्मचारी संघटना, यवतमाळच्या वतीने तीव्र निषेध करण्यात आला.

कर्तव्य बजावताना आरोग्य कर्मचाऱ्यांवर हल्ले होत असतील, तर त्यांच्या सुरक्षिततेचा प्रश्न गंभीर असल्याची संतप्त भूमिका संघटनेने मांडली. या घटनेच्या निषेधार्थ जिल्हाधिकारी तसेच पोलीस अधीक्षक यांना संघटनेच्या वतीने निवेदन देण्यात आले. हल्ल्यातील संबंधित आरोपीचा तातडीने शोध घेऊन त्याच्यावर कठोर कायदेशीर कारवाई करावी, तसेच जिल्ह्यातील आरोग्य कर्मचाऱ्यांच्या सुरक्षेसाठी ठोस उपाययोजना कराव्यात, अशी मागणी करण्यात आली. आरोग्य कर्मचारी नागरिकांना आरोग्य सेवा देण्यासाठी अहोरात्र कार्यरत असतात. मात्र, कर्तव्य बजावत असताना त्यांच्यावर हल्ले होणे ही गंभीर व अस्वीकार्य बाब आहे. अशा घटनांमुळे कर्मचाऱ्यांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण होत असून, शासन व प्रशासनाने याकडे गांभीर्याने पाहण्याची गरज असल्याचे संघटनेने नमूद केले. आरोग्य कर्मचाऱ्यांवरील हल्ले कोणत्याही परिस्थितीत सहन केले जाणार नाहीत. आरोपीवर कठोर कारवाई होईपर्यंत संघटनेचा संघर्ष सुरूच राहील, असा इशारा संघटनेने दिला. अध्यक्ष नितीन ठाकूर, सचिव अतिशय गजभिये, उमेश तराळकर, विनेश पाटील, सुधीर उजवने, निलेश मामीडवार, पंकज गुल्हाने, प्रशांत भोयर, आशिष पोळेकर, कुणाल पिसोळे, संतोष राठोड यांच्यासह संघटनेचे पदाधिकारी, वाहन चालक व औषध निर्माण अधिकारी संघटनेचे प्रतिनिधी उपस्थित होते.

# वनपरीक्षेत्र मारवाडी येथे ७९ वा स्वातंत्र्य दिन उत्साहात साजरा..!

✦जनमाध्यम | प्रतिनिधी



**पुसद, दि. १९ :** महाराष्ट्र शासन,वन विभाग,पुसद वनविभागांतर्गत येत असलेल्या वनपरीक्षेत्र अधिकारी कार्यालय, मारवाडी (प्रादे.)येथे दिनांक १५ ऑगस्ट २०२६ रोजी भारतीय स्वातंत्र्य दिनाचा सोहळा अत्यंत उत्साहपूर्ण, भावनाव्यक्त आणि शिस्तबद्ध वातावरणात पार पडला. कार्यक्रमाच्या प्रारंभी वनपरीक्षेत्र अधिकारी कार्यालय मारवाडीच्या प्रांगणात राष्ट्रध्वजाचे सन्मानपूर्वक ध्वजारोहण करण्यात आले.

ध्वजारोहणानंतर राष्ट्रगीत व ध्वजगीताच्या धूनवर उपस्थितांनी राष्ट्रध्वजास मानवंदना दिली. स्वातंत्र्य दिनाचे औचित्य साधून पर्यावरण संवर्धनाचा संदेश देत वनपरीक्षेत्र कार्यालय परिसरात मान्यवरांच्या हस्ते वृक्षारोपण करण्यात आले. याप्रसंगी आयोजित विशेष सत्कार समारंभात वनपरीक्षेत्रात वर्षभरात उत्कृष्ट, प्रामाणिक व उल्लेखनीय कार्य करणाऱ्या वनमजुरांना तसेच कार्यालयीन कर्मचाऱ्यांना त्यांनी बजावलेल्या बहुमूल्य सेवेबद्दल व दिलेल्या योगदानाबद्दल मान्यवरांच्या हस्ते सन्मानचिन्ह प्रदान करून विशेष गौरविण्यात आले. वन विभागामध्ये राबविण्यात आलेल्या या अभिनव उपक्रमाचे उपस्थितांसह सर्व स्तरांतून कौतुक व प्रशंसा करण्यात आली. सदर कार्यक्रमास प्रमुख पाहुणे म्हणून शशांक कदम (सहाय्यक वनसंरक्षक, पुसद) उपस्थित होते. आपल्या मार्गदर्शनात त्यांनी वनांचे संरक्षण, संवर्धन आणि वनमजुरांच्या योगदानाचे महत्त्व अधोरेखित केले. कार्यक्रमाचे अध्यक्षस्थान आकाश भवाने (वनपरीक्षेत्र अधिकारी, मारवाडी) यांनी भूषविले. या प्रसंगी मारवाडी वनपरीक्षेत्रातील सर्व अधिकारी, कर्मचारी, वनपाल, वनरक्षक, वनमजूर तसेच मारवाडी ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाचे सुटसुटीत, नियोजनबद्ध व सुबक व्यवस्थापन वनपाल सुशील घरणे, वनरक्षक अनिल खंदारे, राजेश बुटले, नकुल लडके तसेच हरिपाल आडे व धीरज आडे यांनी पार पाडले. सदर सोहळ्याचे सूत्रसंचालन बंडूभाऊ गंगावणे यांनी अत्यंत आत्मीय व उत्साहपूर्ण वातावरणात केले, तर उपस्थितांचे आभार प्रदर्शन महेश मस्के यांनी मानले. कार्यक्रम शांततेत व राष्ट्रप्रेमाच्या वातावरणात संपन्न झाला.

जनमाध्यम
एक प्रतिष्ठित सवय

# जलसंधारण जनजागृती अभियानात नागरिकांनी उत्स्फुर्त सहभाग घ्यावा - जिल्हाधिकारी येरेकर

**अमरावती/का.प्र.**

माजी मुख्यमंत्री दिवंगत सुधाकरराव नाईक यांच्या जयंतीनिमित्त २१ ऑगस्ट रोजी संपूर्ण राज्यात 'जलसंधारण दिन' साजरा होत आहे. या निमित्ताने जिल्हाधिकारी कार्यालय व मृद व जलसंधारण विभागाच्या वतीने १५ ते २१ ऑगस्ट दरम्यान जलसंधारण सप्ताहाच्या औचित्याने जिल्ह्यात इंस्टाग्राम रिल स्पर्धा, 'महा वॉकेथॉन- वॉक फॉर वॉटर' सह विविध जनजागृतीपर कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे. जिल्ह्यातील नागरिकांना जलसंधारणाच्या या जनजागृती अभियानात मोठ्या संख्येने सहभागी होण्याचे आवाहन जिल्हाधिकारी आशिष येरेकर यांनी केले आहे.

राज्य शासनाच्या मृद व जलसंधारण विभागाच्या वतीने राज्याचे माजी मुख्यमंत्री स्व. सुधाकरराव नाईक यांचा २१ ऑगस्ट हा जन्मदिवस 'जलसंधारण दिन' म्हणून साजरा केला जात आहे.स्व सुधाकरराव



**२१ ऑगस्ट रोजी साजरा होणार 'जलसंधारण दिन'**

नाईक यांनी मुख्यमंत्रीपदाच्या कार्यकाळात (१९९१-९३) राज्यात जलसंधारणाची मोठी चळवळ उभी केली. 'पाणी अडवा, पाणी जिरवा' हा मूलमंत्र देऊन त्यांनी राज्यातील तीव्र दुष्काळी परिस्थितीवर मात केली. मोठ्या धरणांवर अवलंबून न राहता पाणलोट विकास आणि भूजल पुनर्भरणावर भर दिला. माती नाला बांध, समतल चर, कंटूर बंडिंग, नाला बंडिंग अशा छोट्या संरचनांवर भर देऊन जुन्या जलस्त्रोतांचे पुनरुज्जीवन केले. १९९२ मध्ये त्यांनी स्वतंत्र जलसंधारण विभागाची स्थापना केली. रोजगार हमी योजनेच्या माध्यमातून दुष्काळात लोकांना रोजगार निर्माण करून दिला आणि जलसाठे तयार केले.

राज्यात १५ ते २१ ऑगस्ट या कालावधीत 'जलसंधारण सप्ताह' साजरा करण्यात येत आहे. जलसंधारणाचा संदेश प्रभावीपणे युवा पिढीपर्यंत पोहोचविण्यासाठी रील्स स्पर्धेचेही आयोजन करण्यात आले आहे. या स्पर्धेत युवा पिढीने उत्स्फूर्तपणे सहभागी व्हावे तसेच २१ ऑगस्ट रोजी सकाळी 'महा वॉकेथॉन- वॉक फॉर वॉटर चे आयोजन करण्यात आले आहे. या वॉकेथॉनमध्ये तरुणांसह सर्व नागरिकांनी मोठ्या संख्येने सहभागी होऊन जलसंधारणाचा संदेश जनतेपर्यंत पोहोचवावा, असे आवाहन जिल्हाधिकारी श्री. येरेकर यांनी केले आहे.जिल्ह्यातही या सप्ताहाच्या निमित्ताने नागरिकां मध्ये जलसाक्षरतेसाठी जनजागृती आणि शपथ कार्यक्रम आयोजित करण्यात येत आहेत. शाळा, महाविद्यालये आणि संस्था स्तरावर विशेष कार्यशाळा. प्रबोधन रॅली, चित्रकला, निबंध आणि घोषवाक्य स्पर्धांचे आयोजन करण्यात येत आहे.

## म.ज्योतिबा फुले महाविद्यालयाच्या रासेयो विभागातर्फे 'हर घर तिरंगा' अभियान

**अमरावती/का.प्र.**

स्थानिक अस्मिता शिक्षण मंडळ द्वारा संचालित महात्मा ज्योतिबा फुले महाविद्यालयाच्या राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्या स्वयंसेवकांनी संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठाच्या रासेयो विभागाचे निर्देशानुसार हर घर तिरंगा उपक्रम महाविद्यालयाच्या प्राचार्य डॉ. मीनल भोंडे, कार्यक्रम अधिकारी प्रा. डॉ. गजानन काळे आणि प्रा. डॉ. बबिता येवले यांच्या मार्गदर्शनात राबविला.

नुकताच शासनाने हर घर तिरंगा ह्या उपक्रमाची चौथी आवृत्ती राबविण्याची घोषणा यावर्षी केली.त्याला अनुसरून महात्मा ज्योतिबा फुले महाविद्यालयाच्या रासेयो विभागाने जनजागृती रॅलीचे आयोजन,तिरंगा आणि भारत माता प्रतिमा पूजन,देशभक्ती पर गीतांचे सादरीकरण आणि प्रतिज्ञा इ. उपक्रम राबविले.प्रत्येक देशाचा राष्ट्रध्वज हा त्या राष्ट्राचे प्रतीक



असतो.महाविद्यालय परिसरातील नागरिकांना याचे महत्व पटवून देणे,राष्ट्राभिमान निर्माण करण्यासाठी आणि राष्ट्र प्रेमाचे स्फूल्लिंग चेतवण्यासाठी हर घर तिरंगा या उपक्रमाअंतर्गत महाविद्यालयाच्या परिसरात स्वयंसेवकांनी जनजागृती रॅलीचे आयोजन केले. घराघरात जाऊन नागरिकांना केवळ तिरंग्याचे महत्वच पटवून दिले नाही तर भारताच्या स्वातंत्र्य दिनी ध्वजरोहण कार्यक्रमाला उपस्थित राहण्याचे आवाहन केले. हर घर तिरंगा या उपक्रमांतर्गत स्वातंत्र्यदिनी महाविद्यालयाच्या प्राचार्य डॉ. मीनल भोंडे यांनी भारत मातेच्या प्रतिमेचे आणि तिरंग्याचे पूजन करून ध्वजाला सलामी दिली.याप्रसंगी महाविद्यालयाच्या संगीत विभागाच्या विद्यार्थ्यांनी विविध देशभक्तीपर गीते सादर केलीत.

कु नंदिनी रावळे हिने उपस्थित स्वयंसेवक, विद्यार्थी, शिक्षक आणि शिक्षकेतर कर्मचारी यांना व्यसन मुक्ततेबाबत प्रतिज्ञा दिली. याप्रसंगी मार्गदर्शन करताना प्राचार्य डॉ. मीनल भोंडे यांनी कोणत्याही राष्ट्राचे चरित्र हे त्या राष्ट्रात राहणाऱ्या जनतेच्या चरित्रावरून ठरत असते म्हणून नागरिकांनी चरित्रसंपन्न होण्यासाठी प्रयत्न करावे असे आवाहन केले. कार्यक्रमाचे आयोजन प्रा. डॉ. श्रीधर धाकुलकर, संचालक शारीरिक शिक्षण विभाग, प्रा. डॉ. गजानन काळे, रासेयो कार्यक्रम अधिकारी यांनी केले.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन व आभार प्रा. डॉ बबीता येवले, रासेयो कार्यक्रम अधिकारी यांनी मानले तर विद्यार्थ्यांना प्रतिज्ञा कुमारी नंदिनी रावळे बीए भाग २, हिने दिली.

हर घर तिरंगा या उपक्रमात महाविद्यालयीन विद्यार्थी स्वयंसेवक, शिक्षक व शिक्षकेतर बांधव आणि परिसरातील नागरिक यांनी उत्साहाने भाग घेतला.

## प्रतिबंधित प्लास्टिकविरोधी कारवाईत ८७ किलो प्लास्टिक जप्त

**अमरावती/का.प्र.**

महानगरपालिकेच्या वतीने प्रतिबंधित प्लास्टिकविरोधात विशेष तपासणी मोहीम राबविण्यात आली. मंगळवारी, दि. १८ ऑगस्ट २०२६ रोजी इतवारा बाजार रोड पेट्रोल पंप रोड परिसरात करण्यात आलेल्या कारवाईत ८७ किलो प्रतिबंधित प्लास्टिक साहित्य जप्त करण्यात आले असून, संबंधित आस्थापनांकडून एकूण १० हजार रुपयांचा दंड वसूल करण्यात आला.

महानगरपालिका आयुक्त डॉ. मंगेश गोंदावले, अतिरिक्त आयुक्त शिल्पा नाईक आणि उपायुक्त (१) भाग्यश्री बोरेकर यांच्या आदेशानुसार तसेच वैद्यकीय अधिकारी (स्वच्छता) डॉ. अजय जाधव यांच्या मार्गदर्शनाखाली ही कारवाई करण्यात आली.कारवाईदरम्यान परिसरातील एकूण सहा आस्थापनांची तपासणी करण्यात आली. त्यापैकी दोन आस्थापनांकडे प्रतिबंधित प्लास्टिक साहित्य आढळून



आल्याने ते जप्त करण्यात आले. यामध्ये दोन पोती (कट्टे) तसेच प्लास्टिक ग्लासची दोन मोठी कार्टून जप्त करण्यात आली. पीयूष राठोड यांच्याकडून प्रतिबंधित प्लास्टिक साहित्य आढळल्याप्रकरणी ५ हजार रुपयांचा दंड, तर अरुण भाऊ यांच्याकडून प्लास्टिक ग्लासची दोन मोठी कार्टून आढळल्या प्रकरणी ५ हजार रुपयांचा दंड वसूल करण्यात आला. अशा प्रकारे एकूण १० हजार रुपयांचा दंड वसूल करण्यात आला. कारवाईत प्लास्टिक बंदी नोडल अधिकारी ए. के. गोहर, प्लास्टिक बंदी स्वास्थ्य निरीक्षक सचिन सैनी, स्वास्थ्य निरीक्षक मेघराज ढेंनवाल, अतिक्रमण विभाग प्रमुख कोल्हे, अतिक्रमण विभागाचे अधिकारी व कर्मचारी तसेच बिटप्युन मयूर सारसर उपस्थित होते.

## स्व. देवानंद गोरडे यांच्या कवितेला विद्यापीठाच्या अभ्यासक्रमात मानाचे स्थान

**अंजनगाव सुर्जी/ वार्ताहर**

साहित्यिक आणि सांस्कृतिक इतिहासात सुवर्ण अक्षरांनी नोंद व्हावी अशी अभिमानास्पद घटना घडली आहे. येथील ज्येष्ठ, संवेदनशील कवी स्व. देवानंदजी गोरडे यांच्या साहित्यिक योगदानाची अधिकृत दखल घेत संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठाने त्यांच्या अजरामर कवितेला आपल्या पदवी अभ्यासक्रमात मानाचे स्थान दिले आहे.स्व. गोरडे यांच्या अत्यंत गाजलेल्या 'मला जगायचे आहे' या कवितेचा समावेश विद्यापीठाच्या बी.ए. अभ्यासक्रमातील मराठी या विषयाच्या 'माय मराठी' भाग १ व २ या निर्धारित पाठ्यपुस्तकात करण्यात आला आहे. हा सन्मान म्हणजे कवीला मिळालेला मरणोत्तर साहित्यिक गौरव असून, अंजनगाव सुर्जीच्या साहित्य क्षेत्रासाठी हा विशेष महत्त्वाचा टप्पा मानला जात आहे.

ज्ञानपथ पब्लिकेशन, अमरावती यांनी प्रकाशित केलेल्या २०२६ च्या नवीन आवृत्तीच्या पाठ्यपुस्तकात या कवितेचा समावेश करण्यात आला आहे.



यामुळे आता बी.ए. सेमिस्टर-२ च्या हजारो विद्यार्थ्यांना ही कविता अभ्यासता येणार आहे. विद्यापीठाच्या माध्यमातून स्व. गोरडे यांच्या विचारविश्वाची, त्यांच्या सामाजिक जाणिवांची आणि जीवनदृष्टीची ओळख नव्या पिढीला होणार आहे.स्व. देवानंदजी गोरडे यांनी आपल्या लेखणीतून मराठी साहित्य विश्वात आपली स्वतंत्र आणि ठाम ओळख निर्माण केली होती.यांचा 'आकाश माती' हा कविता संग्रह साहित्य प्रेमींमध्ये विशेष उल्लेखनीय आणि परिचित आहे. त्यांच्या अनेक कविता संग्रहांनी वाचकांच्या मनात घर केले आहे.स्व. गोरडे यांच्या साहित्याला विद्यापीठीय अभ्यास क्रमात स्थान मिळाल्याची बातमी समजताच अंजनगाव सुर्जी परिसरात आनंदाचे आणि अभिमानाचे वातावरण निर्माण झाले आहे. या उल्लेखनीय साहित्यिक यशाबद्दल मुरलीधर तुरखडे, सतीश हाडोळे, अशोक पिंजरकर, रमेश पांडे, रविंद्र सोनटक्के, माजी शिक्षिका रेखा वाघमारे (सोनटक्के), विजय बोके, विशाल बोबडे, सुयोग खाडे, डॉ. ऋषी मालोकार, डॉ. कविटकर, तेजस तुरखडे, सचिन अब्रुक, आरती गोरडे व परिवार तसेच समस्त ग्रामस्थांनी अभिनंदन व्यक्त करून स्व. देवानंदजी गोरडे यांच्या साहित्यिक कार्याला मनःपूर्वक अभिवादन केले आहे.त्यांच्या साहित्याचा विद्यापीठाच्या अभ्यासक्रमात झालेला हा समावेश त्यांच्या स्मृतीला चिरंतन करणारा ठरला आहे.चे शिक्षक श्रीनिवास मोहोड यांनी करून घेतले.

### प्रो. राम मेघे कॉलेज ऑफ इंजिनियरिंग एंड मॅनेजमेंट येथील

## एमबीए विभागातर्फे 'ऑटोनॉमी रेडिनेस' कार्यशाळा

**अमरावती/का.प्र.**

विदर्भ युथ वेलफेअर सोसायटी, अमरावती द्वारा संचालित प्रो. राम मेघे कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग अ‍ॅण्ड मॅनेजमेंट, बडनेरा-अमरावती येथे एमबीए विभागातर्फे एकदिवसीय 'ऑटोनॉमी रेडिनेस' कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले. कार्यशाळेत मार्गदर्शक म्हणून प्रा. आशिष देशमुख उपस्थित होते.

महाविद्यालयाला नुकताच स्वायत्त दर्जा प्राप्त झाल्याच्या पार्श्वभूमीवर, स्वायत्ततेनंतरच्या शैक्षणिक प्रक्रियेबाबत प्राध्यापकांना सविस्तर माहिती व मार्गदर्शन मिळावे, या उद्देशाने एमबीए विभागाने या कार्यशाळेचे आयोजन केले होते.विदर्भ युथ वेलफेअर सोसायटीचे अध्यक्ष डॉ. नितीन धांडे, उपाध्यक्ष अ‍ॅड. उदय देशमुख, कोषाध्यक्ष प्रा. डॉ. हेमंत देशमुख, सचिव युवराजसिंह चौधरी, कार्यकारिणी सदस्य



नितीन हिवसे, प्रा. डॉ. पूनम चौधरी, पंकज देशमुख, प्रा. विनय गोहाड व प्रा. गजानन काळे तसेच महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. अजय ठाकरे यांच्या मार्गदर्शनाखाली महाविद्यालयात विविध शैक्षणिक व विद्यार्थीहिताचे उपक्रम सातत्याने राबविण्यात येतात. त्याचाच एक भाग म्हणून या विशेष कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले.

कार्यशाळेच्या उद्घाटनप्रसंगी प्राचार्य डॉ. अजय ठाकरे यांनी स्वायत्ततेमुळे महाविद्यालयाला शैक्षणिक गुणवत्ता अधिक उंचावण्याची संधी प्राप्त झाली असल्याचे सांगितले.


बदलत्या शैक्षणिक गरजांनुसार अभ्यासक्रम अधिक उद्योगा भिमुख व कौशल्याधारित करण्यासाठी तसेच स्वायत्ततेची प्रभावी अंमलबजावणी करण्यासाठी अशा प्रकारच्या कार्यशाळा अत्यंत आवश्यक असल्याचे त्यांनी प्रतिपादन केले.मार्गदर्शक प्रा. आशिष देशमुख यांनी स्वायत्त महाविद्यालयाची शैक्षणिक कार्यपद्धती, अभ्यासक्रम निर्मिती,अध्यापन पद्धती, मूल्यमापन प्रक्रिया, परीक्षा प्रणाली तसेच स्वायत्ततेच्या अनुषंगाने प्राध्यापकांची भूमिका व जबाबदाऱ्या याबाबत सविस्तर मार्गदर्शन केले.

यावेळी प्राध्यापकांच्या विविध प्रश्नांचे निरसनही करण्यात आले. कार्यक्रमाला एमबीए विभागप्रमुख डॉ. शशिकांत थोरात, डीन पब्लिक रिलेशन डॉ. लोभस घडेकर, प्रा. आतिफ सयीद, प्रा. दिशा भोयर,प्रा. यशश्री आवारे , प्रा रश्मी मालपाणी यांच्यासह विभागातील प्राध्यापक उपस्थित होते.

## संक्षिप्त

### 'स्वातंत्र्य दिन चिरायू होवो' च्या नाऱ्याने दुमदुमले रामनगर

**अमरावती**- श्री विद्यानिकेतन शिक्षण संस्था, रामनगर, अमरावती द्वारा संचालित, विद्यानिकेतन प्राथमिक शाळा, रामनगर येथे स्वातंत्र्य दिन उत्साहात साजरा करण्यात आला. प्रसंगी प्रमुख पाहुणे म्हणून लाभलेले समाजसेवकसन्माननीय अमोल मानकर



(संस्थापक, 'समर्पण', गुरुकुल मोझरी, अम.), व त्यांच्या सहचारिणी जयश्री मानकर या अतिथी म्हणून लाभल्या. याप्रसंगी संस्थेच्या अध्यक्ष लता काशीकर व संस्थेच्या कोषाध्यक्ष संध्याॅ बक्षी, संस्थेचा कार्यकर्ता मयूर देशपांडे, सेवापूर्ती होऊनही शाळेला कायम समर्पित असणाऱ्या शिक्षिका देशमुख तसेच देशपांडे,शाळेच्या मुख्या. ज्योती जांभळे,शाळा व्यवस्थापन समितीचे सदस्य, पालक वर्ग, सहकारी शिक्षक वृंद, विद्यार्थी मित्र मोठ्या संख्येने उपस्थित होते. मान्यवरांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आले.तत्पूर्वी मुख्या.हस्ते मान्यवरांचा शाल, श्रीफळ, पुष्पगुच्छ, ग्रामगीता देऊन स्वागत व सत्कार करण्यात आला. ध्वजारोहणानंतर,राष्ट्रध्वजाला मानवंदना देऊन,राष्ट्रगीताचे गायन करण्यात आले.'आओ बच्चो तुम्हे दिखाये झाकी हिंदुस्तान की...', या उत्साहवर्धक,देशभक्तीपर गीताचे, विद्यार्थ्यांकडून सादरीकरण,शाळेचे शिक्षक श्रीनिवास मोहोड यांनी करून घेतले. शाळेच्या विद्यार्थ्यांनी अतिशय आत्मविश्वासाने, दर्जेदार भाषण,सादर करून त्यातून,विविध प्रकारचा संदेश देण्याचा प्रयत्न केला. वर्ग ५वी मधून ममता योगेश वाघमारे, वर्ग६वी मधून आराध्या अमित तिवारी, वर्ग ७वी तून प्रज्ञा इंगळे, वर्ग ४थी मधून अन्वित वाकोडे,वर्ग २री तून चैतन्या शिंगणे यांनी 'पर्यावरण रक्षणाचा' तसेच 'स्वच्छतेचा संकल्प करण्याचा', छोटे पण मोठे विचार, त्यांच्या भाषणातून व्यक्त केले. मान्यवरांच्या हास्य विद्यार्थ्यांचे बक्षीस देऊन विद्यार्थ्यांना बक्षीस देऊन प्रोत्साहित करण्यात आले.ध्वजारोहणाची ऑर्डर शाळेतील सहाय्यक शिक्षिका शितल खांदे यांनी दिली. या राष्ट्रीय या राष्ट्रीय परवाचे छायाचित्र काढण्याची जबाबदारी, शाळेच्या शिक्षिका शितल बोरकर व शाळेचा माजी विद्यार्थी, तन्मय बोरकर यानी उत्तमरीत्या सांभाळली.शाळेतील शिक्षकवृंद,शिक्षकेत्तर कर्मचारी, विद्यार्थी मित्र, पालक वर्ग,यांच्या सहकार्याने उत्साहपूर्ण वातावरणात पार पडला .

### श्री निळकंठ माध्यमिक विद्यालय

**अमरावती**-स्वातंत्र्यदिनानिमित्य ध्वजारोहण श्री निळकंठ व्यायाम मंडळाचे जेष्ठ सभासद राजेंद्र गावफळे यांच्या शुभहस्ते करण्यात आले. कार्यक्रमाचे अध्यक्ष तथा निळकंठ व्यायाम मंडळाचे जेष्ठ सभासद शेखर पांडे यांनी भूषविले याप्रसंगी संस्थेचे अध्यक्ष दिपक गुल्हाने, उपाध्यक्ष रमेश राजोटे, अ‍ॅड विवेक बारलिंगे, माजी अध्यक्ष मधुकर साऊरकर,प्रमोद गंगात्रे, सचिव पंकज लुंगीकर, जेष्ठ



सभासद धनंजय चतारे, अ‍ॅड सदानंद आरणकर,जांबुवंत देशमुख, श्री निळकंठ माध्यमिक विद्यालयाचे मुख्याध्यापक सुभाष इंगळे, प्राथमिक विद्यामंदीराच्या मुख्या. कविता कुमरे, मान्यवर पदाधिकारी, पालक, शिक्षक शिक्षकेत्तर वृंद उपस्थित होते.यावेळी विद्यार्थ्यांची भव्य प्रभातफेरी काढण्यात आली. यामध्ये विद्यार्थ्यांनी भारत माता की जय, वंदे मातरम, स्वातंत्र्य दिन चिरायू होवो चे नारे देवून परिसर दणाणून सोडला. यानंतर संस्थेचे जेष्ठ सभासद राजेंद्र गावफळे यांच्या शुभहस्ते ध्वजारोहण करण्यात आले.यानंतर निळकंठ व्यायाम मंडळाचे अध्यक्ष दिपक गुल्हाने यांनी आपले मनोगत व्यक्त करतांना सर्व मुख्याध्यापक, विद्यार्थी, कर्मचारी, पालकांना स्वातंत्रदिनाच्या शुभेच्छा देवून, निळकंठ प्राथमिक शाळेला डिजीटल बोर्ड प्राप्त झाले असून आपली शाळा आता पुर्णतः डिजीटल होत आहे. याचा चांगला उपयोग करून नवनविन शिकण्यासाठी प्राथ. व माध्यमिकच्या विद्यार्थ्यांनी लाभ घ्यावा असे आवाहन केले.गुणवंत विद्यार्थ्यांचे तसेच माध्यमिक मधील गुणवत्ताप्राप्त व क्रीडा क्षेत्रात प्राविण्य मिळविणाऱ्या विद्यार्थ्यांना बक्षीसे देवून सत्कार करण्यात आला.संचलन प्राथमिक शाळेचे सहा. शिक्षक विजय घनाडे, तसेच आभार प्रदर्शन माध्यमिक शाळेचे सहा. शिक्षक नितिन सोळंके यांनी केले कार्यक्रमाच्या यशस्वीतेकरीता शाळेचे मुख्या.सुभाष इंगळे तसेच शिक्षक-शक्षकेत्तर कर्मचाऱ्यांनी परिश्रम घेतले.

### गोपाळराव वानखडे माध्यमिक विद्यालय

**मोर्शी** - गोपाळराव वानखडे माध्यमिक विद्यालय मोर्शी येथे भारताच्या ८० व्या स्वातंत्र्य दिनी शाळेतील विद्यार्थ्यांना बुट व सॉक्सचे वाटप येथील श्रीमती भाग्यरथीबाई धुताले यांचे हस्ते करण्यात आले. त्याचा मुलगा विजय धुताले यांचे न्यु गोल्डन इंग्रजी शाळेच्या मुख्याध्यापिका शारदा ढोले यांचेशी चर्चा झाली. त्यानुसार शाळेतील विद्यार्थ्यांना बुट व सॉक्स वाटप करण्याचे ठरवले.याप्रसंगी न्यु गोल्डन इंग्रजी शाळेच्या मुख्याध्यापिका



शारदा ढोले यांचे हस्ते श्रीमती भाग्यरथीबाई धुताले यांचा शाल श्रीफळ पुष्पगुच्छ व मोमेंटो देऊन सत्कार करण्यात आला. त्याप्रसंगी संस्था अध्यक्ष कांचन वानखडे,किशनचंदजी अगणाणी,अ‍ॅड अनंत वानखडे,मनिष पावडे उपस्थित होते.विद्यार्थ्यांना शालेय वस्तूचे वाटप करण्यात आले.याप्रसंगी मुख्याध्यापक प्रविण लांडे, सर्व शिक्षक शिक्षकेत्तर कर्मचारी यांनी भाग्यरथीबाई धुताले यांचे आभार व्यक्त केले.

# शेवंतीपुष्पांनी भरगच्च कुंड्या घडविण्याचा मंत्र देणारी कार्यशाळा

**अमरावती/का.प्र.**

श्री शिवाजी शिक्षण संस्था, अमरावती संचलित श्री शिवाजी विज्ञान महाविद्यालयाच्या वनस्पतीशास्त्र विभागातर्फे, विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासा सोबतच कौशल्यविकास, उद्योजकता आणि आत्मनिर्भर तेला चालना देण्यासाठी तसेच विस्तार सेवाकार्यातून सामाजिक बांधिलकी जपण्यासाठी डीबीटी स्टार प्रकल्पांतर्गत 'शेवंती लागवड व संवर्धन' या एकदिवसीय कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले. अमरावती गार्डन क्लब आणि अमरावती हौशी बाग यांच्या समन्वयातून आयोजित या कार्यशाळेला विद्यार्थी, प्राध्यापक, बागकामप्रेमी आणि शेवंती उत्पादकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला.

कार्यक्रमाची सुरुवात दीपप्रज्वलनाने तसेच भारताचे माजी कृषिमंत्री आणि श्री शिवाजी शिक्षण संस्थेचे संस्थापक अध्यक्ष डॉ. पंजाबराव उर्फ भाऊसाहेब देशमुख यांना अभिवादन करून झाली. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाच्या आयक्यूएसी समन्वयक डॉ. संगीता इंगोले होत्या. व्यासपीठावर डॉ. गजेंद्र पचलोरे, सचिव, अमरावती गार्डन क्लब; संजय कांडलकर, अध्यक्ष, अमरावती हौशी बाग; कार्यशाळेचे प्रमुख मार्गदर्शक संजय काळे व अविनाश भोजापूरे तसेच वनस्पतीशास्त्र विभागप्रमुख डॉ. दिनेश खेडकर उपस्थित होते. यावेळी गार्डन क्लबचे माजी अध्यक्ष डॉ. व्ही. आर. देशमुख आणि डॉ. किशोर बोबडे यांचीही प्रमुख उपस्थिती लाभली.



**श्री शिवाजी विज्ञान महाविद्यालयाच्या वनस्पतीशास्त्र विभागाचे यशस्वी आयोजन**

प्रास्ताविकात डॉ. दिनेश खेडकर यांनी विद्यार्थ्यांनी पारंपरिक शिक्षणासोबत कौशल्याधारित उपक्रमांमध्ये सक्रिय सहभाग घेऊन उद्योजकतेच्या दिशेने वाटचाल करावी, असे आवाहन केले. डॉ. गजेंद्र पचलोरे यांनी शेवंती लागवडीत आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करून गुणवत्तापूर्ण उत्पादन घेण्याचे महत्त्व विशद केले. श्री संजय कांडलकर यांनी अमरावती हौशी बागच्या विविध उपक्रमांची माहिती देत शेवंती लागवडीतील आपले अनुभव उपस्थितांशी शेअर केले.अध्यक्षीय मनोगतात डॉ. संगीता इंगोले यांनी अशा उपक्रमांमुळे विद्यार्थ्यांमध्ये संशोधनवृत्ती, उद्योजकता, पर्यावरणपूरक जीवनशैली आणि बागकामाची आवड विकसित होत असल्याचे सांगितले.

तांत्रिक सत्रात वनस्पतीशास्त्र विभागाच्या डॉ. रेखा मग्गीरवार यांनी शेवंती लागवडीतील आधुनिक तंत्रज्ञान, विविध जाती, संवर्धनाच्या पद्धती तसेच प्रदर्शनासाठी शेवंतीची योग्य तयारी याविषयी सविस्तर मार्गदर्शन केले.

कार्यशाळेतील विशेष आकर्षण ठरलेल्या प्रात्यक्षिक सत्रात शेवंती लागवडीचे तज्ज्ञ संजय काळे आणि अविनाश भोजापूरे यांनी विविध जातींची ओळख, कलमे तयार करण्याची पद्धत, कुंडीतील लागवड, छाटणी, खत व पाणी व्यवस्थापन, रोग-कीड नियंत्रण आणि प्रदर्शनासाठी शेवंतीची तयारी यांचे प्रत्यक्ष प्रात्यक्षिक करून दाखविले. 'शेवंतीची भरगच्च, आकर्षक आणि प्रदर्शनक्षम कुंडी कशी घडवावी?' याचे शास्त्रीय आणि व्यावहारिक उत्तर या कार्यशाळेत मिळाले.प्रदर्शनाला उपस्थितांनी मोठ्या उत्साहाने भेट देत विविध जातींची माहिती घेतली तसेच रोपे आणि बागकाम साहित्याची खरेदी केली.

कार्यशाळेत महाविद्यालयातील विद्यार्थी-विद्यार्थिनींची विशेष उपस्थिती होती.कार्यशाळेच्या यशस्वी आयोजनासाठी वनस्पती शास्त्र विभागातील डॉ. गणेश हेडावू, डॉ. अंकित काळे, विभागीय कर्मचारी आणि विद्यार्थ्यांनी विशेष परिश्रम घेतले.संचालन डॉ. स्वाती पुंडकर यांनी तर डॉ. प्रशांत देशमुख यांनी आभार मानले.

# झुरळ, भुरळ, गरळ आणि भोवळ

**प्रत्येक नवी पिढी आधीच्या पिढीपेक्षा हुशार असते, हा उत्क्रांतीचा इतिहास आहे. याचे कारण प्रत्येक नवीन पिढीचे वातावरण तांत्रिक दृष्टीने जास्त प्रगत असते. त्यामुळे 'जेन झी'ची हुशारी कुणीच अमान्य करणार नाही. केवळ तांत्रिक बुद्धिमत्ता असून चालत नाही. त्याबरोबर वागणुकीचे भान असावे लागते. म्हणूनच सामाजिक संकेतांच्या मर्यादेत राहण्याचा शहाणपणा या पिढीने समजून घेतला तर तिचा भविष्यकाळ सुसह्य असेल.**

'जेन झी'चे आंदोलन हा अलीकडच्या काळातला ज्वलंत विषय. या विषयावर समस्त संबंधित असंबंधित लोकांनी यथेच्छ प्रतिक्रिया दिल्या. काहींनी खूप कौतुक केले तर काहींनी त्यावर कोरडे ओढले. आता एक संवेदनशील नागरिक आणि एक फुटकळ लेखक म्हणून मला व्यक्त होण्याची खुमखुमी येणारच. तसंही वाहत्या गंगेत हात धुणे हा आपला समाजधर्म आहेच की... आणि मुळात लेखणीला एकदा स्फुरण चढले, की ती माझंही ऐकत नाही! असो. सर्वप्रथम हा लेख मी कोणत्याही राजकीय-पक्षीय भूमिकेतून लिहिलेला नाही हे जाहीर करते. (हो ना. चुकून कुणी वाचलाच आणि चुकून माझ्यावर कारवाई झाली तर आपली बाजू स्पष्ट असावी.) तर झुरळ पक्षाचे मनापासून अभिनंदन. कशासाठी,तर पेपरफुटी प्रकरण आणि एकंदरीतच कोलमडलेल्या शिक्षण व्यवस्थेवर विद्यार्थ्यांनी, युवा पिढीने सरकारला जाब विचारावा ही काळाची गरज होती. त्यामुळे पक्षाच्या निर्मितीपासून, विद्यार्थी एकत्रीकरणापासून, आंदोलनातील मागण्या पूर्ण होईपर्यंत निर्माण झालेले लोकशाहीचे चित्र खरोखरच फार आशादायक आहे. ज्या 'जेन झी'ला आपण कोषात राहणारे, फेसबुक, इन्स्टाग्राम, ओटीटीच्या विश्वात रमणारे म्हणून हिणवतो, त्यांनी अभूतपूर्व आंदोलनाचा इतिहास घडवला आहे. सत्ताधाऱ्यांना प्रश्न विचारण्याची हिम्मत दाखवली आहे हे खरंच कौतुकास्पद आहे. त्यामुळे युवा पिढीच्या या शक्तिप्रदर्शनाने एक दिलासा मिळाला आहे, हे निश्चित. हा या आंदोलनाचा एक सकारात्मक पैलू.

**प्रसिद्धीमध्ये समाजमाध्यमांचा वाटा**

आंदोलनाचा दुसरा पैलू हा विशेष आहे. अनेकांना या आंदोलनाची भुरळ पडली आहे. विद्यमान सरकारची झालेली कोंडी, शिक्षणमंत्र्यांचा राजीनामा आणि विद्यार्थ्यांसमोर झुकणारी सत्ता यांचंच काहींना अप्रूप वाटले. समस्या कोणतीही असो, कशी जिरली हा मुद्दा त्यांच्या दृष्टीने सगळ्यात महत्वाचा. त्या विकृत आनंदामुळे गुदगुल्या होणारा एक वर्ग, जेन झी चे गोडवे गाताना हुरळून गेला आहे. विद्यमान सरकारला 'अडचणीत आणणे हा एकमेव अ‍ॅजेंडा असलेला हा वर्ग आज खूप आनंदात आहे. नेमके प्रश्न कोणते, ते कशा पध्दतीने सोडवायचे याविषयी त्यांना देणे-घेणे नाही. सरकारला खिंडीत पकडण हे एकमेव साध्य. मग ते कुणी, केव्हा, कसेही का करेना, अशी ही झुरळांविषयी एका विशिष्ट समाजाला भुरळ पडली आहे आणि त्यांचे पुढचे काही दिवस तरी या आनंदाच्या धुंदीत जातील हे नक्की. तापल्या तव्यावर पोळी भाजणारा हा वर्ग आयत्या चालून आलेल्या संधीचा फायदा घेऊन उंटावरून शेळ्या हाकणारे सध्या हर्षोल्हासात स्वतःची पाठ थोपटण्यात मग्न आहेत. आता या सरकारचे दिवस भरले असल्याच्या स्वप्नरंजनाची त्यांना भुरळ पडलीय. तिसरा पैलू म्हणजे समाजमाध्यमांची मदत. 'जेन झी' टेक्नोसॅव्ही असल्यामुळे आंदोलनातील प्रत्येक पायरीवरचे निर्णय हे क्षणार्धात तळागाळापर्यंत पोचत होते. त्यामुळे एकत्रीकरण, पाठिंबा (फॉलोअर्स) यासाठी पैसा आणि वेळ यांची कमालीची बचत झाली. प्रचारासाठी अनेक कल्पक पोस्ट्स, पोस्टर्स, मीम्स यांचा वापर करण्यात आला. यावरून 'जेन झी'ची सर्जनशीलता, बुद्धिमत्ता आणि प्रसंगी एआयचा केलेला वापर प्रकर्षाने दिसून आला. योग्य प्रकारे समाज माध्यम हाताळल्यास, आंदोलनाच्या यशात समाजमाध्यमांचा सिंहाचा वाटा आहे हे अर्थातच सिध्द झाले.




**'झेन झी' आक्रमकता**

हे आंदोलन पुराण इथेच संपत नाही. आंदोलनाची ही यशोगाथा केवळ एक बाजू आहे. लोकशाही जिवंत आहे हा दिलासा यातून आपल्याला मिळाला तरी 'जेन झी'च्या अमर्याद स्वातंत्र्याचा एक कुरूप आणि हिडीस चेहरा समोर आल्यामुळे एक भीतीही निर्माण झाली आहे. 'जेन झी'ने ओकलेली गरळ ही समाजमाध्यमांनी तळागाळात पोचवली आहे. या गरळीचे समाजात समर्थनही केले जात आहे. ही या पिढीची भाषा आहे. त्यात आक्रमकता असणारच, असं समर्थक म्हणताहेत. काही आक्षेपार्ह कृत्येही आंदोलकांनी जंतरमंतर येथे केली. मुलंच ती. असं वागणारच. त्यावर नैतिकतेचे निकष लावू नयेत, असे समर्थकांचे म्हणणे आहे. अभिव्यक्ती स्वातंत्र्याच्या बाबतीत ही युवा पिढी कोणतीही तडजोड करणार नाही, हा एक महत्वाचा छुपा संदेश आपल्याला या आंदोलनातून मिळाला आहे; जो एक दुर्लक्ष न करण्याजोगा पैलू आहे. आजवर प्रत्येक पिढीची एक भाषा चालत आली आहे. प्रत्येक पिढीने एक आक्रमक, जोषपूर्ण आणि मर्यादा उल्लंघून जाणारे स्वातंत्र्य उपभोगले आहे हे ही खरंच. त्यावेळी विवेक, संयम, नैतिकता, आदर, धाक यांची चौकट अस्तित्वात होती, भलेही ती काळानुरूप सैल होऊ घातली असेल. आजपर्यंत विद्यार्थ्यांची किती तरी आंदोलने झाली असतील, पण विवेक, संयम, आदरभावाची पातळी कधीही इतकी खालावली नव्हती. आता तर या शब्दांचा अर्थही 'जेन झी'ला माहित नाही. अपवादाने कुणाला माहिती असेलच तर अशी वागणूक आता आउटडेटेड झाली आहे अशी संभावना केली जाईल.

**सभ्यतेचे संकेत पाळायला हवेत**

आज विवेक, संयम, नैतिकता, कृतज्ञता, करुणा, त्याग, क्षमाशीलता, वात्सल्य हे उन्नत म्हणजेच निओकॉर्टिकल गुण आहेत. ते पिढी दर पिढी तसेच राहणार आहेत आणि भविष्यातही तसेच असणार आहेत. हे गुण अंगी असलेल्या व्यक्तींना मागासलेले, संकुचित, जुनाट, बुरसटलेले असे म्हणण्याची हल्ली पद्धत आहे. असे म्हणणारे

लोक भ्रमात आहेत, त्यांचा बुद्धिभेद झाला आहे हे माझे स्पष्ट मत आहे. काळानुरूप सगळ्याच बाबतीत बदल होत असले तरी योग्य ते नेहमीच योग्य असते. मीम्सच्या माध्यमातून 'जेन झी' ची कल्पकता आणि बुद्धी जशी दिसून आली, त्याच बरोबरीने हिडीस आणि विकृत वृत्तीही समोर आली. ती बघून जेन बूमरला भोवळ यायचीच बाकी होती. वडीलधारे असणाऱ्या राज्यकर्त्यांच्या प्रतिमेचे अश्लील प्रकारे विडंबन करणारी आंदोलनातील रणनिती? रस्त्यावर त्यांची चित्रे काढून त्या चित्रांशी अश्लील चाळे करणारी सुसंस्कृतता? टोमणे, विखार, शिव्या, गलिच्छ घोषणा... अशा युवा पिढीच्या हाती आपले भविष्य आहे? जंतरमंतरवर अशा भारतीय संस्कृतीचे प्रदर्शन झाले? अत्यंत घृणास्पद, शिवराळ भाषा 'जेन झी'ची आहे, हे कौतुकाने सांगितले जाते. शाळेत शिकताना अशीच भाषा शिकवली जाते का? भाषा आणि आचरण यांच्या योग्यतेचे निकष कधीच बदलणारे नाहीत आणि नैतिकतेबद्दल हल्ली काही बोलायचंच नसते... त्यामुळे भावना दुखावतात, अस्मिता डिवचली जाते आणि बोलणारा मूर्ख ठरवला जातो. ओटीटीवर सतत वाहणारा शिव्यांचा आणि अर्वाच्च शब्दांचा झरा अनुकरणीय नाही,हे या बुद्धिमान पिढीला समजत नसेल तर शिक्षणाचा उपयोग काय? या आंदोलनात विजय मिळाला तरी 'जेन झी'चे हे बेभान आणि बेदरकार रूप अत्यंत भयावह आहे. आयुष्यात अनुभव हा एक उत्तम गुरू असतो, जो वडीलधाऱ्या मंडळींना लाभलेला असतो,भलेही त्यांना ऑनलाइन व्यवहार करता येत नसतील. या अनुभवांसमोर नम्र होण्यासाठी फेसबुक,इन्स्टाग्रामची गरज नसते. अन्यायाविरुद्ध जरूर लढावे, सरकारला जाबही विचारावा पण विवेकाची पातळी सोडू नये.कितीही स्वातंत्र्य मिळत असले तरी समाजात वावरताना सभ्यतेचे काही संकेत पाळायचेच असतात. ते या 'जेन झी'ने पाळले नाहीत. जी जनता सध्या त्यांचा उदो उदो करते आहे, तीच त्यांना क्षणार्धात पायदळी तुडवेल. आपल्याला आंदोलनात यश मिळाले याचा आनंद मानायचा की आपला विकृत चेहरा समाजासमोर आला आहे, याचे भान ठेवायचे हे आता 'जेन झी'नेच ठरवायचे आहे कारण 'जेन झी' हुशार आहे.

**डॉ. साधना कुलकर्णी**

# 'स्कूल ठीक करो' पूर्वी 'सिस्टिम ठीक करो' मोहिमेची गरज.!

शाळेच्या प्रांगणात किंवा वर्गात झाडू मारणाऱ्या एका चिमुरड्या हाताचा व्हिडिओ सोशल मीडियावर येतो, अल्पावधीत तो लाखो लोकांपर्यंत पोहोचतो आणि काही क्षणांतच समाजमाध्यमांच्या न्यायमंदिरातून एकतर्फी निकाल जाहीर केला जातो. 'पहा, सरकारी शाळांमधील शिक्षक मुलांचे कसे शोषण करत आहेत!' 'कॉकरोच जनता पार्टी'चे प्रमुख अभिजीत दिपके असोत किंवा कॅमेरा हातात घेऊन शाळेत शिरणारे कार्यकर्ते, शिक्षकांना थेट विद्यार्थ्यांसमोर संशयिताच्या पिंजऱ्यात उभे करून सुनावणे आजकाल सोपे आणि लोकप्रिय झाले आहे. कारण समाजाच्या दृष्टीने 'शिक्षक' हा सर्वात सोपा, लाचार आणि सॉफ्ट टार्गेट घटक बनला आहे. परंतु मुलांच्या हातातील झाडू पाहून संताप व्यक्त करणाऱ्यांनी कधी स्वतःला हा मूलभूत प्रश्न विचारला आहे का, की त्या चिमुरड्यांच्या हातात झाडू येण्याची वेळ नेमकी कोणत्या व्यवस्थेने आणली आहे?

राष्ट्रसंत तुकडोजी महाराजांनी ग्रामगीतेतून स्वच्छतेला प्रार्थनेइतकेच पवित्र मानले, तर साने गुरुजींनी 'स्वच्छतेतून स्वावलंबन' ही जीवनमूल्ये विद्यार्थ्यांच्या मनात रुजवली. जपानसारख्या प्रगत राष्ट्रांमध्ये शालेय अभ्यासक्रमाचा एक अनिवार्य भाग म्हणून विद्यार्थी, शिक्षक आणि मुख्याध्यापक एकत्र येऊन वर्ग आणि परिसर स्वच्छ करतात; तिथे याला 'ओ-सोजि' म्हटले जाते, ज्यातून श्रमप्रतिष्ठा, सामाजिक समता आणि सार्वजनिक मालमत्तेची काळजी घेण्याची वृत्ती वाढीस लागते. आपल्याकडे मात्र विद्यार्थ्याने स्वतःचा वर्ग स्वच्छ ठेवण्यात हातभार लावला किंवा कचरा उचलला, तर शिक्षकांवर थेट 'वेठबिगारी'चा ठपका ठेवून गदारोळ माजवला जातो. स्वतःचा वर्ग किंवा शाळा स्वच्छ ठेवणे यात गैर काहीच नसून ती स्वयंशिस्तीची पहिली पायरी आहे. परंतु स्वयंशिस्तीचा भाग म्हणून केलेली स्वच्छता आणि शाळांमध्ये कर्मचाऱ्यांच्या पूर्ण अभावामुळे निर्माण होणारी विवशता या दोन अत्यंत वेगळ्या गोष्टी आहेत, हे समाजाने समजून घेणे गरजेचे आहे.

खासगी किंवा नामांकित कॉन्व्हेंट शाळांच्या तुलनेत जिल्हा परिषदेच्या प्राथमिक शाळांची परिस्थिती पूर्णपणे वेगळी आहे. या शाळा वंचित, शेतमजूर आणि आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकातील मुलांचे शिक्षणाचे एकमेव आश्रयस्थान आहेत. राज्यातील हजारो प्राथमिक शाळांमध्ये स्वच्छता, देखरेख आणि शिपायाची कामे करण्यासाठी स्वतंत्र चतुर्थश्रेणी कर्मचारी नेमलेलाच नाही. ही शिक्षक संघटनांची अनेक दशकांपासूनची प्रलंबित मागणी शासनाने सातत्याने दुर्लक्षित ठेवली आहे. केवळ शिपाईच नव्हे, तर तुटपुंज्या शिक्षक संख्येत दोन-तीन वर्गांची एकत्र शाळा भरवण्याची कसरत हजारो शिक्षक रोज करत आहेत. आज शेकडो शाळांना साधे वीजबिल भरण्यासाठी पुरेसा निधी मिळत नाही; परिणामी वीज जोडण्या तोडल्या जातात आणि अंधाऱ्या वर्गांत शिकण्याची वेळ मुलांवर येते. ग्रामपंचायती स्वतः आर्थिक अडचणीत आणि परावलंबी असताना त्या शाळांच्या देखभालीचा खर्च कुठून करणार? रंग उडालेल्या भिंती, तुटलेली स्वच्छतागृहे, गळणारी छपरे आणि पिण्याच्या पाण्याची अपुरी सोय अशा अत्यंत प्रतिकूल परिस्थितीत शिक्षक स्वतःच्या खिशातून पैसे खर्च करून शाळा चालवत असतात.

शाळा सुधारायची असेल तर सर्वात पहिली आणि अनिवार्य पायरी म्हणजे शिक्षकाला केवळ आणि केवळ 'शिकवण्यासाठी' मोकळा करणे ही होय. आज सरकारी शिक्षकाची अवस्था एखाद्या प्रशासकीय लिपिकासारखी झाली आहे. शिक्षकांचा बहुतांश वेळ शिकवण्याऐवजी यू-डायस, सरल प्रणाली, स्टुडंट पोर्टल, अपार आयडी निर्मिती, आधार व्हॅलिडेशन आणि दैनंदिन गुगल फॉर्म्स भरण्यातच खर्ची पडतो. याशिवाय मतदार याद्यांचे काम, बीएलओ ड्युटी, विविध सामाजिक-आर्थिक सर्वेक्षणे, जनगणना, आणि प्रधानमंत्री पोषण आहार योजनेतील धान्याची आवक-जावक, चव नोंदवही, लाभार्थी नोंदी व खर्चाचे क्लिष्ट हिशोब सांभाळण्यातच शिक्षकांची सर्व ऊर्जा संपून जाते. शिक्षकाच्या हातात खडू ऐवजी कायम मोबाईल आणि लॅपटॉप दिला, तर वर्गातील मुलांच्या शैक्षणिक गुणवत्तेचे काय होणार?एका बाजूला गुणवत्तापूर्ण शिक्षणाच्या घोषणा करायच्या आणि दुसऱ्या बाजूला शिक्षकाला विविध प्रशासकीय विभागांच्या माहिती संकलनाचे साधन बनवायचे, ही शासनाची दुटप्पी नीती या दुरवस्थेला थेट कारणीभूत आहे.

'स्कूल ठीक करो' या मोहिमेने शालेय शिक्षणाला चर्चेच्या केंद्रस्थानी आणले आहे, ही स्वागतार्ह बाब असली तरी या अभियानाची दिशा आता बदलण्याची नितांत गरज आहे. केवळ सरकारी शाळांमध्ये जाऊन उणिवांचे सनसनाटी व्हिडिओ बनवणे आणि शिक्षकांना मुलांसमोर अपमानित करणे यामुळे संपूर्ण सार्वजनिक शिक्षणव्यवस्थेविषयी समाजात अविश्वासाची भावना वाढीस लागते. पालक घाबरून आपल्या मुलांना अवाढव्य फी आकारणाऱ्या खासगी शाळांच्या जाळ्यात ढकलतात, ज्यामुळे अंतिमतः बहुजन आणि गरीब मुलांचेच नुकसान होते.

कॉकरोच जनता पार्टी आणि त्यांच्या कार्यकर्त्यांनी आता आपल्या मोहिमेचा रोख थेट धोरणकर्त्यांकडे वळवायला हवा. ज्या नामांकित खासगी शाळांना आदिवासी विकास प्रकल्पातून अनुसूचित जमातीतील मुलांच्या शिक्षण व निवासासाठी प्रति विद्यार्थी वार्षिक ७०,००० रुपये दिले जातात, किंवा RTE च्या २५ टक्के कोट्यातून कोट्यवधी रुपयांचे सरकारी अनुदान मिळते, त्या शाळांमध्ये जाऊन विद्यार्थ्यांच्या जेवणाचा दर्जा, वसतिगृहांची अवस्था आणि शैक्षणिक ऑडिट करण्याची हिंमत या मोहिमेने दाखवली पाहिजे. सामान्य पालकांना गेटबाहेर ताटकळत ठेवून मनमानी फी उकळणाऱ्या आणि शिक्षण अधिकाऱ्यांनाही न जुमानणाऱ्या खासगी शाळांच्या मुजोरीला जाब विचारला पाहिजे.

राष्ट्रीय शिक्षण धोरणानुसार शिक्षणावर सकल देशांतर्गत उत्पादनाच्या ६ टक्के निधी खर्च करण्याची तरतूद कागदावरून प्रत्यक्षात आणण्यासाठी, शाळांना वीजबिल व देखभालीसाठी स्वतंत्र अर्थसंकल्पीय तरतूद मिळवून देण्यासाठी आणि प्रत्येक शाळेला शिपाई व संगणक चालक उपलब्ध करून देण्यासाठी जर ही मोहीम मंत्रालयाच्या दारावर धडकली, तर संपूर्ण शिक्षक समाज तिच्या पाठीशी खंबीरपणे उभा राहील.

**महेश ठाकरे**
मो.७७४५८२३४९२

# नीटबरोबरच बोर्डाच्या परीक्षांनाही महत्व

देशभरात यावर्षीच्या नीट परिक्षाच्या गोंधळाने मोठा कळस गाठला. आणि लाखो विद्यार्थ्यांना तसेच पालकांना अनावश्यक अशा मनस्तापाला सामोरे जावे लागले. आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करूनही पेपरफुटीचा प्रकार थांबायला तयार नाही. खरे तर नीट परीक्षेच्या पेपरफुटीचे केंद्रदेखील महाराष्ट्रच होते. नीट परीक्षांचा गोंधळ त्याचा विद्यार्थी आणि पालकांवर होणारा परिणाम या परीक्षांच्या अपयशातून येणारे नैराश्य या सगळ्या गोष्टी लक्षात घेऊन आत्ता केंद्र सरकारलाही जाग येऊ लागली आहे. सध्या नीट परीक्षांवर जो सर्वाधिक भर दिला जातो. तो कमी करण्याच्या उद्देशाने यापुढे बोर्डाच्या परीक्षेतल्या पन्नास टक्के गुणांचाही पुढच्या अभ्यासक्रमासाठी विचार केला पाहिजे अशा प्रकारची शिफारस केंद्रीय शिक्षण मंत्रालयाकडून केली गेली. अनेक महत्वाच्या अभ्यासक्रमांना प्रवेश घेताना विद्यार्थ्यांच्या बोर्डाच्या परीक्षेतले गुण पूर्णपणे दुर्लक्षित होऊ नयेत आणि नीट परीक्षांचे, अभ्यासाचे येणारे दडपण कमी करणे यातून नीट परीक्षांचे, अभ्यासाचे येणारे दडपण कमी करणे यातून नीट परीक्षांमधल्या गैरप्रकारांनादेखील आळा बसण्याची शक्यता शिक्षण खात्याने व्यक्त केली आहे. याचा अर्थ नीटबरोबरच बोर्डाच्या परीक्षांनाही महत्व वाढेल.




आपल्या देशाच्या एकूण सामाजिक आणि भौगोलिक परिस्थितीचा विचार करून काही गोष्टींचा विचार झाला पाहिजे. विद्यार्थ्यांवर अभ्यास आणि परीक्षांचे ओझे लावत असताना तशा प्रकारच्या सोयीसुविधा आपण देत आहोत का, नीटसारख्या परीक्षेचा अभ्यास करण्याकरिता ग्रामीण किंवा आदिवासी भागात कोचिंग क्लास उपलब्ध होत नाहीत. शहरांमधून कोचिंग क्लासेसचे एवढे प्रस्थ वाढले आहे की, त्यासाठी लाखो रुपयांची फी मोजली जाते. आणि आपल्या क्लासचे वर्चस्व सिद्ध करण्यासाठी तितकेच लाखो रुपये मोजून पेपर फोडण्याचे प्रकार होतात. गेल्या तीनही वर्षांमध्ये नीटचे सगळे पेपर हे कोचिंग क्लासेसवाल्यांनीच फोडल्याचे सिद्ध झाले आहे. स्वाभाविकपणे विद्यार्थ्यांना शाळां मधल्या अभ्यासापेक्षाही कोचिंग क्लासमधला अभ्यास महत्वाचा वाटतो. म्हणजेच शाळांपेक्षा बारावीचे कोचिंग क्लासवर जास्त अवलंबून राहतात.

सामाजिकदृष्ट्या विचार करता आर्थिकदृष्ट्या कमकुवत असलेल्या विद्यार्थ्यांनी नीट परीक्षांचा अभ्यास करताना अडचणी येतात. आपल्या इथल्या गैरव्यवस्था अनेक प्रकारच्या असतात. परीक्षा केंद्रावर विद्यार्थी वेळेवर पोहोचेलच याची खात्री देता येत नाही. कारण वाहतूक कोंडी, मोर्चे, निदेर्शने, अशा अनेक समस्यांना तोंड देत विद्यार्थ्यांना परीक्षा केंद्र गाठावे लागतात. म्हणजेच भौगोलिक परिस्थितीचाही विचार करणे क्रमप्राप्त ठरते. गेल्या काही वर्षात बोर्डाच्या परीक्षांपेक्षा प्रवेश परीक्षांचे निर्माण झालेले दडपण कमी करण्यासाठी आवश्यकता होती. जर आता बोर्डाच्या परीक्षांमधल्या गुणांना पन्नास टक्के महत्व देण्याचा देण्याचा उपाय केला जात असेल तर तो निश्चितच फायदेशीर ठरेल.

**प्रा. मधुकर चुटे**
नागपूर

# चांदीपुरा विषाणू:पालकांनो, काळजी घ्या आणि सतर्क राहा!

सध्या १५ वर्षांखालील मुलांमध्ये पसरणारा 'चांदीपुरा विषाणू' (Chandipura Virus) हा एक अत्यंत गंभीर आणि वेगाने बळावणारा आजार ठरत आहे. यावर अजून कोणतीही खात्रीशीर लस किंवा थेट औषध उपलब्ध नसल्यामुळे पालकांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे, जी अत्यंत स्वाभाविक गोष्ट आहे. मात्र, योग्य काळजी आणि वेळीच घेतलेली काळजी या आजारापासून आपल्या मुलांना सुरक्षित ठेवू शकते.

हा विषाणू माणसाकडून माणसाकडे पसरत नाही. हा विषाणू प्रामुख्याने 'सँड फ्लाय' (वाळू माशी) किंवा पिसवा-गोचीड यांच्यासारख्या सूक्ष्म कीटकांच्या चावल्यामुळे होतो. पावसाळ्यात आणि दमट वातावरणात या माशांचे प्रमाण वेगाने वाढते.हा विषाणू थेट मेंदूवर परिणाम करतो (ज्याला



एन्सेफलायटिस म्हणतात). त्यामुळे लक्षणे दिसताच जर त्वरित उपचार मिळाले नाहीत, तर आजार काही तासांतच गंभीर रूप घेऊ शकतो. म्हणूनच वेळ हीच सगळ्यात महत्त्वाची आहे.

अचानक खूप जास्त ताप येणे,तीव्र डोकेदुखी आणि उलट्या होणे,मूल अस्वस्थ होणे, बडबडणे किंवा चक्कर येणे.शरीराला झटके किंवा कंप सुटणे.जर मुलांमध्ये ह्या पैकी कोणतीही लक्षणे दिसली, तर अजिबात दुर्लक्ष करू नये.घराभोवती कचरा किंवा ओलावा साचू देऊ नये. मुलांना नेहमी पूर्ण बाह्यांचे कपडे घालावेत. झोपताना शक्यतो मच्छरदाणीचा वापर करावा.मुलांना अनवाणी बाहेर खेळू देऊ नये.'लस नसल्यामुळे भीती वाटणे स्वाभाविक आहे, पण घाबरून न जाता प्रशासनाने आणि पालकांनी मिळून स्वच्छतेची काळजी घेणे गरजेचे आहे. तसेच, मुलांमध्ये तापाची लक्षणे दिसताच घरगुती उपचार न करता ताबडतोब डॉक्टरांकडे जाणे हाच यावरील एकमेव उपाय आहे.'चला, आजच जागरूक होऊया आणि आपल्या मुलांचे रक्षण करूया!

**वर्षा आवदे**
नागपूर

# 'जागतिक डास दिन'

जगभरात डासांच्या हजारो प्रजाती आढळतात. वरवर पाहता हा जीव अत्यंत सामान्य वाटतो,परंतु मानवी इतिहासावर आणि आरोग्यावर डासांनी केलेला परिणाम अत्यंत गंभीर आहे. आपल्या परिसराची स्वच्छता ठेवूनच आपण डासांपासून स्वतःचे आणि आपल्या कुटुंबाचे रक्षण करू शकतो.दरवर्षी २० ऑगस्ट रोजी जगभरात 'जागतिक डास दिन' (वर्ल्ड मास्क्युटो डे) साजरा केला जातो. डास हा जगातील सर्वात प्राणघातक जीव मानला जातो, कारण त्याच्या चावण्यामुळे दरवर्षी लाखो लोकांचा मृत्यू होतो. या दिवसाचा मुख्य उद्देश डासांमुळे पसरणाऱ्या गंभीर आजारांविषयी (मलेरिया, डेंग्यू,चिकुनगुनिया, यलो फिव्हर,झिका) लोकांमध्ये जागरूकता निर्माण करणे हा आहे. २० ऑगस्ट १८९७ रोजी ब्रिटिश डॉक्टर सर रोनॉल्ड रॉस यांनी शोध लावला की, मादी ॲनोफेलीस डास मानवामध्ये मलेरिया (हिवताप)चा प्रसार होतो या ऐतिहासिक शोधामुळे मलेरियावर नियंत्रण मिळवणे सोपे झाले. त्यांच्या या शोधार्थ दरवर्षी २० ऑगस्ट हा दिवस 'जागतिक डास दिन' म्हणून पाळला जातो.

डास केवळ माणसाला चावत नाहीत, तर ते अनेक भयानक रोगांचे वाहक (व्हेक्टर्स) आहेत. केवळ मादी डास मानवाचे रक्त शोषतात, कारण त्यांना अंडी घालण्यासाठी रक्तातील प्रथिनांची गरज असते. यादरम्यान त्या मानवी शरीरात घातक विषाणू आणि जिवाणू सोडतात.



डासांमुळे होणारे प्रमुख आजार आणि त्यांचे वाहक-१. मलेरिया: मादी ॲनोफेलीस डासामुळे पसरतो.२. डेंग्यू आणि चिकुनगुनिया: एडिस इजिप्ती या डासामुळे होतो (हा डास सहसा दिवसा चावतो).३. हत्तीरोग: क्युलेक्स डासांमुळे पसरतो.मृत्यूचे प्रमाण: जागतिक आरोग्य संघटनेच्या अहवालानुसार, जगात दरवर्षी लाखो लोकांचा मृत्यू डासांमुळे होणाऱ्या आजारांमुळे होतो. म्हणूनच डासाला 'जगातील सर्वात घातक प्राणी' मानले जाते.आर्थिक आणि सामाजिक नुकसान - डासांमुळे केवळ आरोग्याचेच नुकसान होत नाही, तर मानवी समाजावर याचा मोठा आर्थिक भार पडतो.वैद्यकीय खर्च: डासांमुळे होणाऱ्या आजारांच्या उपचारांवर कुटुंबांचा आणि सरकारचा मोठा खर्च होतो.उत्पादकतेत घट:आजारपणामुळे लोकांचे कामाचे दिवस वाया जातात, ज्यामुळे देशाच्या आर्थिक उत्पादकतेवर परिणाम होतो.

डासांचा उपद्रव आणि मानवाचा संघर्ष-मानवाने डासांपासून स्वतःचे रक्षण करण्यासाठी अनेक उपाय शोधले आहेत.निसर्गातील डासांचे स्थान (पर्यावरणीय महत्त्व)जरी डास मानवासाठी शत्रू असले, तरी निसर्गाच्या अन्नसाखळीत (फुड चेन) त्यांचे एक महत्त्वाचे स्थान आहे.अन्नसाखळी: डासांचे डिंभ (अळ्या) हे मासे आणि बेडकांसाठी प्रमुख अन्न आहेत. मोठे डास हे पक्षी, वटवाघुळ आणि कोळी यांचे भक्ष्य बनतात.परागकण: नर डास मानवाला चावत नाहीत, ते फुलांमधील रस शोषतात आणि वनस्पतींच्या परागीकरणात (पोली नेशन) मदत करतात.

डासांचे निर्मूलन करणे हे निरोगी आरोग्यासाठी अत्यंत आवश्यक आहे. डास आणि मानव यांच्यातील संघर्ष शतकानुशतके सुरू आहे आणि तो पुढेही राहील. विज्ञान आणि तंत्रज्ञानाच्या मदतीने मानव डासांवर नियंत्रण मिळवण्याचा प्रयत्न करत आहे. परंतु, संपूर्णपणे डासांचे उच्चाटन करणे पर्यावरणीय समतोलासाठी घातक ठरू शकते. त्यामुळे 'परिसराची स्वच्छता' आणि 'स्वतःचे रक्षण' हाच डासांपासून वाचण्याचा सर्वात प्रभावी मार्ग आहे. कारण मलेरिया आणि डेंग्यूचा वार, स्वच्छतेनेच होईल त्यावर प्रहार.

प्रतिबंधात्मक उपाय -पाणी साचू देऊ नका: घराभोवती, कुलर,जुने टायर, कुंड्या किंवा छतावर पाणी साचू देऊ नका, कारण साचलेल्या पाण्यात डास अंडी घालतात. रात्री झोपताना मच्छरदाणीचा नियमित वापर करा.पूर्ण कपडे घाला: विशेषतः पावसाळ्यात बाहेर जाताना अंग झाकणारे कपडे परिधान करा.रिपेलेंट्सचा वापर: डास प्रतिबंधक क्रीम, कॉइल किंवा लिक्विडचा वापर करा.आठवड्यातून एक दिवस कोरडा पाळा: घरातील पाण्याचे कंटेनर किंवा टाक्या आठवड्यातून एकदा रिकाम्या करून पूर्णपणे स्वच्छ कराव्या.'स्वच्छता राखूया, डासांना पळवूया' हा मंत्र प्रत्येकाने पाळला पाहिजे.डासांचे होईल जेव्हा निर्मूलन, आनंदी होईल प्रत्येक जण!

**तारा द्वा. शर्मा,** अमरावती

paper : www.janmadhyam.com
mail : Jmakola.thakur@gmail.com

जनमाध्यम
एक प्रतिष्ठित सवय

अकोला
जिल्हा विशेष

# अल्पसंख्याकांच्या न्यायहक्कासाठी ठामपणे लढणार : आ. साजिद खान पठाण

■ प्रतिनिधी | अकोला ■

**अकोला पश्चिम विधानसभा मतदारसंघाचे आमदार साजिद खान पठाण यांची महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमिटीच्या अल्पसंख्याक विभागाच्या अध्यक्षपदी नियुक्ती झाल्यानंतर त्यांनी बुधवारी मुंबईतील टिळक भवन येथे पदभार स्वीकारला. अखिल भारतीय काँग्रेस कमिटीच्या अल्पसंख्याक विभागाचे राष्ट्रीय अध्यक्ष तथा खासदार इम्रान प्रतापगढी यांनी ही नियुक्ती केली आहे. संघटनात्मक आणि सामाजिक कार्याची दखल घेत काँग्रेसने आ. पठाण यांच्यावर राज्यातील अल्पसंख्याक विभागाची महत्त्वपूर्ण जबाबदारी सोपविली आहे.**

## टिळक भवनात पदभार स्वीकारला; महाराष्ट्रातील प्रत्येक गाव आणि बूथवर काँग्रेसची संघटना मजबूत करण्याचा निर्धार



पदभार स्वीकारल्यानंतर आ. साजिद खान पठाण यांनी अल्पसंख्याक समाजाच्या न्याय्य हक्कांसाठी आक्रमकपणे लढण्याचा निर्धार व्यक्त केला. 'महाराष्ट्रातील अल्पसंख्याक समाजाच्या हितासाठी सातत्याने संघर्ष करू. समाजावर अन्याय झाल्यास सरकारच्या विरोधात ठामपणे आवाज उठवू. समाजातील प्रत्येक घटकाला न्याय मिळवून देण्यासाठी काँग्रेसच्या माध्यमातून प्रभावीपणे काम करू,' असा निर्धार त्यांनी व्यक्त केला.

काँग्रेस संघटना तळागाळापर्यंत मजबूत करण्यावरही त्यांनी विशेष भर दिला. महाराष्ट्रातील प्रत्येक गाव आणि प्रत्येक बूथवर काँग्रेसची संघटनात्मक ताकद वाढविण्यासाठी पदाधिकारी आणि कार्यकर्त्यांनी जोमाने काम करावे, असे आवाहन त्यांनी केले. पक्षाने आणि समाजाने दाखविलेला विश्वास सार्थ ठरविण्यासाठी प्रामाणिकपणे कार्य करण्याची ग्वाहीही त्यांनी यावेळी दिली.

आ. पठाण यांच्या नियुक्तीमुळे राज्यातील अल्पसंख्याक समाजाच्या विविध प्रश्नांना काँग्रेसच्या माध्यमातून अधिक प्रभावीपणे वाचा फोडण्याची संधी निर्माण झाली असून, अल्पसंख्याक विभागाच्या संघटनात्मक विस्तारालाही नवी दिशा मिळण्याची अपेक्षा व्यक्त होत आहे. पदभार स्वीकारण्याच्या कार्यक्रमाला अखिल भारतीय काँग्रेस कमिटी अल्पसंख्याक विभागाचे राष्ट्रीय अध्यक्ष खासदार इम्रान प्रतापगढी, महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ, विधानसभेतील काँग्रेसचे गटनेते विजय वडेट्टीवार, आमदार डॉ. नितीन राऊत, आमदार अमीन पटेल, आमदार असलम शेख, आमदार शिरीष नाईक, बिहारचे आमदार मनोज भाई, महाराष्ट्र अल्पसंख्याक विभागाचे प्रभारी अहमद खान, माजी मंत्री अनिस अहमद, माजी आमदार डॉ. वजाहत मिर्झा, माजी आमदार एम. एम. शेख, मुफ्ती हरून नदवी, बाबू खान, तारीक फारुखी, हुषमा बानो, निजामुद्दीन, राहीन, अबिद खान, अनिस कुरेशी, जीनल गळा, सिन्थिया घोडके, सलाम शेख, प्रकाश तायडे, महेंद्र गवई, सरजीत सिंग, नदीम इनामदार, रुबीना फुजुल शेख, नवनीत सिंग गांधी, फरीद देशमुख, जावेद अन्सारी, इब्राहिम पठाण, अजिज बिरादार, मो. नुमान, सतलाश, राहत इंदोरी, विलास इंगोले, हाफिज खान, डॉ. फरीद काझी आणि सूफियान वणु यांच्यासह महाराष्ट्रातील काँग्रेस अल्पसंख्याक विभागाचे पदाधिकारी, कार्यकर्ते व समर्थक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

नवनियुक्त प्रदेशाध्यक्ष आ. साजिद खान पठाण यांनी अल्पसंख्याक समाजाच्या प्रश्नांवर सातत्याने आवाज उठविण्यासोबतच काँग्रेसची विचारधारा आणि संघटना गावागावांत पोहोचविण्याचा निर्धार व्यक्त केला. त्यामुळे त्यांच्या नेतृत्वाखाली महाराष्ट्र प्रदेश काँग्रेसच्या अल्पसंख्याक विभागाला नवी ऊर्जा मिळण्याची अपेक्षा व्यक्त होत आहे.

# सेवाभाव, सचोटी आणि समाजभान जोपासत प्रामाणिकपणे कार्य करा : कुलगुरू डॉ. शरद गडाख

## कार्यस्थळावरील भावनिक बुद्धिमत्ता व वर्तणुकीतील उत्कृष्टतेवर पाच दिवसीय प्रशिक्षणाचे उद्घाटन

■ प्रतिनिधी | अकोला ■

'आपण समाजाचे देणे लागतो, या भावनेतून प्रत्येकाने विशेषतः शासकीय, निमशासकीय, खासगी, सहकारी तसेच सेवाभावी संस्थांमध्ये कार्यरत अधिकारी-कर्मचाऱ्यांनी समाजाप्रती सेवाभाव, कामाप्रती निष्ठा आणि संस्थेप्रती सचोटी जोपासून प्रामाणिकपणे कार्य करावे. यातूनच आत्मनिर्भर आणि सक्षम देशनिर्मितीला खऱ्या अर्थाने चालना मिळेल,' असे प्रतिपादन डॉ. पंजाबराव देशमुख कृषी विद्यापीठाचे कुलगुरू कर्नल डॉ. शरद गडाख यांनी केले.



डॉ. पंजाबराव देशमुख कृषी विद्यापीठ, अकोला अंतर्गत विस्तार शिक्षण संचालनालय आणि विस्तार शिक्षण संस्था, आनंद (गुजरात) यांच्या संयुक्त विद्यमाने कृषी विज्ञान केंद्र व विस्तार विभागातील अधिकारी-कर्मचाऱ्यांसाठी 'कार्यस्थळावरील भावनिक बुद्धिमत्ता आणि वर्तणुकीतील उत्कृष्टता' या विषयावर आयोजित पाच दिवसीय प्रशिक्षण कार्यक्रमाचे उद्घाटन शेतकरी सदनातील 'कृषिजागर' सभागृहात झाले. यावेळी उपस्थितांना मार्गदर्शन करताना डॉ. गडाख बोलत होते.

'जितके आपण आपल्या कामाप्रती प्रामाणिक आणि कर्तव्यतत्पर राहू, तितके तणावमुक्त राहण्यास मदत होईल. परिणामी मानसिक, शारीरिक आणि सामाजिकदृष्ट्या निरोगी, सक्षम व कणखर व्यक्तिमत्त्व घडेल,' असे सांगत डॉ. गडाख यांनी विविध उदाहरणांच्या माध्यमातून उपस्थितांना प्रामाणिकपणाचे महत्त्व पटवून दिले. विजय नेहमीच सत्याचा होतो, हा संदेशही त्यांनी यावेळी दिला. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी विस्तार शिक्षण संचालक डॉ. धनराज उंदीरवाडे होते. प्रशिक्षण संयोजक डॉ. निधी ठाकूर यांची प्रमुख उपस्थिती होती. डॉ. उंदीरवाडे यांनी प्रास्ताविकातून प्रशिक्षणाचा उद्देश स्पष्ट केला. कृषी विज्ञान केंद्रातील अधिकारी, विषय विशेषज्ञ व कर्मचाऱ्यांमध्ये सकारात्मक कार्यसंस्कृती रुजविणे, मानसिक ताणतणावाचे व्यवस्थापन करणे तसेच शेतकऱ्यांशी संवाद साधताना भावनिक बुद्धिमत्तेचा प्रभावी वापर करणे, हा प्रशिक्षणाचा मुख्य उद्देश असल्याचे त्यांनी सांगितले.

शेतकऱ्यांशी विश्वासाचे नाते महत्त्वाचे डॉ. निधी ठाकूर यांनी भावनिक बुद्धिमत्तेचे महत्त्व अधोरेखित केले. केवळ तांत्रिक व शास्त्रीय ज्ञान पुरेसे नसून शेतकऱ्यांशी विश्वासाचे नाते निर्माण करण्यासाठी आत्मजागरूकता आणि सहानुभूती आवश्यक असल्याचे त्यांनी सांगितले.

कार्यस्थळावरील ताणतणाव, हंगामातील वाढलेला कामाचा ताण, क्षेत्रभेटी तसेच प्रशासकीय आव्हाने हाताळताना मानसिक आरोग्य कसे जपावे, शांतपणे कठीण परिस्थितीवर कशी मात करावी, याचे व्यावहारिक प्रशिक्षण देण्यात येणार आहे. तसेच सहकाऱ्यांमधील आंतरशाखीय समन्वय, सकारात्मक संवाद आणि नकारात्मक अथवा आक्रमक परिस्थितीत संयम राखून उत्कृष्ट कामगिरी कशी करावी, याबाबतही मार्गदर्शन केले जाणार आहे.

प्रशिक्षणादरम्यान विविध खेळ, गटचर्चा आणि 'रोल प्ले'च्या माध्यमातून सहभागी अधिकारी-कर्मचाऱ्यांना प्रत्यक्ष अनुभव दिला जाणार असून, त्यातून संघभावना आणि परस्पर समन्वय वाढण्यास मदत होणार असल्याचे आयोजकांनी सांगितले. यावेळी वनविद्या महाविद्यालयाचे सहयोगी अधिष्ठाता डॉ. शैलेश हरणे, कुलगुरूंचे तांत्रिक सचिव डॉ. नितीन कोष्टी, प्रशिक्षण संयोजिका डॉ. नीता कलसारिया, मुख्य विस्तार शिक्षण अधिकारी डॉ. उमेश चिंचमलातपुरे, विस्तार प्रशिक्षण अधिकारी डॉ. अरुणा काटोले यांच्यासह विस्तार शिक्षण संचालनालयातील अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन व आभार प्रदर्शन मुख्य संपादक प्रा. संजीवकुमार सलामे यांनी केले.

# पीएम सुर्यघर योजनेत परिमंडळाने केला २०० मेगावॅटचा टप्पा पार; परिमंडळात ५४ हजार घरावर होत आहे वीज निर्मिती

■ प्रतिनिधी | वाशिम ■

**अकोला :** प्रधानमंत्री सूर्यघर मोफत वीज योजनेला महावितरणच्या अकोला परिमंडळात उत्तम प्रतिसाद मिळाला आहे. परिमंडळातील ५३ हजार ८५४ वीजग्राहकांनी या योजनेचा लाभ घेतला असून त्यांच्याकडील प्रकल्पाची एकूण स्थापित क्षमता २०० मेगावॅट पार झाली आहे. दरमहा तीनशे युनिटपर्यंत वीज वापरणाऱ्या ग्राहकांना मोफत वीज मिळावी आणि अतिरिक्त वीज विकून उत्पन्न मिळावे यासाठी केंद्र सरकारने ही योजना सुरू केलेली आहे. या योजनेत अकोला जिल्ह्यातील २० हजार ३४२ ग्राहकांनी ७८.०१ मेगावॅट, बुलडाणा जिल्ह्यातील २४ हजार २७१ ग्राहकांनी ८८.६१ आणि वाशिम जिल्ह्यातील ९ हजार २४१ ग्राहकांनी ३३.५८ मेगावॅट क्षमतेचे सौर ऊर्जा संच घराच्या छतावर उभारले आहेत. प्रधानमंत्री सूर्यघर मोफत वीज योजनेत केंद्र सरकारकडून छतावरील सौर ऊर्जा निर्मितीचे संच बसवणाऱ्या वीजग्राहकांना एक किलोवॅटसाठी ३० हजार रुपये, दोन किलोवॅटसाठी ६० हजार रुपये व तीन किलोवॅट किंवा त्यापेक्षा अधिक क्षमतेच्या संचासाठी ७८ हजार रुपये अनुदान मिळते. एक किलोवॅटच्या सौर यंत्रणेतून दरमहा सुमारे १२० युनिट वीज तयार होते. गरजेपेक्षा जास्त वीज तयार झाल्यामुळे वीजबिल जवळपास शून्य होते तसेच अतिरिक्त वीज महावितरणला देता येते.

## जाहीर नोटीस

**वि.०३ रे सह दिवाणी न्यायाधीश (क. स्तर) अकोला यांचे न्यायालयात**

एम. जे. सी. नं. १२९७/२०२६ — प्रोसेस नं.१००३०/२०२६
चौ.ता. १७/०९/२०२६ — दिनांक : ०४/०८/२०२६

**अर्जदार :** १. कौसल्या जगदेव दाते २. भास्कर जगदेव दाते अर्जदार क्र. १ व २ रा. वाशिंबा, पो. डोंगरगाव, ता. जि. अकोला. ३. सौ. त्रिगुणाबाई मधुकरराव काकड रा. रूस्तमाबाद, ता. बार्शिटाकळी, जि. अकोला. ४. मिराबाई शांताराम बंड रा. मु. पो. डोंगरगाव, ता. जि. अकोला. ५. दिनकर जगदेव दाते ६. संजय जगदेव दाते अर्जदार क. ५ व ६ रा. वाशिंबा, पो. डोंगरगाव, ता. जि. अकोला.

**विरुध्द**

**गैरअर्जदार :** निल.
**मयताचा पत्ता :-** मयत : जगदेव चहादू दाते
**पत्ता :-** रा. वाशिंबा, पो. डोंगरगाव, ता. जि. अकोला.

या अर्थीउपरोक्त अर्जदार हयांनी मुंबई विनिमय अधिनियम १८२७, कलम २ अन्वये या न्यायालयात वारसा प्रमाणपत्र मिळण्यासाठी अर्ज केला आहे. त्या अर्जामध्ये असे नमूद केले आहे की, मयत जगदेव चहादू दाते यांचे दि. ३०/०६/२०१६ रोजी वाशिंबा ता. जि. अकोला येथे निधन झाले आहे.

वरील अर्जदार त्यांचे कायदेशिर वारस आहेत, त्याशिवाय इतर कोणीही मयतास वारस नाही. सबब वारस प्रमाणपत्र मिळण्यास अर्जदारांनी अर्ज दाखल केला आहे.

त्याअर्थी सदर अर्जामध्ये कोणाची कसल्याही प्रकारची हरकत असल्यास दिनांक १७/०९/२०२६ रोजी सकाळी १:०० वाजता स्वतः जातीने अगर निर्दीष्ट केलेल्या वकीला मार्फत न्यायालयामध्ये हजर होउन आपली लेखी हरकत दाखल करावी. अन्यथा कोणाची कसल्याही प्रकारची हरकत नाही. असे गृहीत धरुन सदर अर्ज निकाली काढण्यात येईल. हयाची नोंद घ्यावी. आज दिनांक ०४/०८/२०२६ रोजी माझे सही व न्यायालयाचे शिक्क्यानिशी दिले.

शिक्का
**आदेशानुसार**
प्र. अधिक्षक
दिवाणी न्यायालय (व-स्तर), अकोला

## जाहीर नोटीस

**वि.०२ रे सह दिवाणी न्यायाधीश (क. स्तर) अकोला यांचे न्यायालयात**

एम. जे. सी. नं. १३०८/२०२६ — प्रोसेस नं.१०३४०/२०२६
चौ.ता. २८/०९/२०२६ — दिनांक : ११/०८/२०२६

**अर्जदार :** १. गजानन बळीराम काळपांडे रा. गाडगे नगर पारस, ता. बाळापूर, जि. अकोला. २. विमल मधुकर धांडे रा. व्दारा मधुकर धांडे, शिवसेना वसाहत, बजरंग चौक, अकोला, ता. जि. अकोला

**विरुध्द**

**गैरअर्जदार :** निल.
**मयताचा पत्ता :-** मयत : कृष्णाबाई बळीराम काळपांडे
**पत्ता :-** रा. शिवसेना वसाहत, बजरंग चौक, अकोला, ता. जि. अकोला.

या अर्थउपरोक्त अर्जदार हयांनी मुंबई विनिमय अधिनियम १८२७ कलम २ अन्वये या न्यायालयात वारसा प्रमाणपत्र मिळण्यासाठी अर्ज केला आहे. त्या अर्जामध्ये असे नमूद केले आहे. की, मयत कृष्णाबाई बळीराम काळपांडे यांचे दि. ०७/१०/२०२२ रोजी शिवसेना वसाहत, जुने शहर, अकोला येथे निधन झाले आहे.

वरील अर्जदार त्यांचे कायदेशिर वारस आहेत, त्याशिवाय इतर कोणीही मयतास वारस नाही. सबब वारस प्रमाणपत्र मिळण्यास अर्जदारांनी अर्ज दाखल केला आहे.

त्याअर्थी सदर अर्जामध्ये कोणाची कसल्याही प्रकारची हरकत असल्यास दिनांक २८/०९/२०२६ रोजी सकाळी ९:०० वाजता स्वतः जातीने अगर निर्दष्ट केलेल्या वकीला मार्फत न्यायालयामध्ये हजर होउन आपली लेखी हरकत दाखल करावी. अन्यथा कोणाची कसल्याही प्रकारची हरकत नाही, असे गृहीत धरून सदर अर्ज निकाली काढण्यात येईल. हयाची नोंद घ्यावी. आज दिनांक ११/०८/२०२६ रोजी माझे सही व न्यायालयाचे शिक्क्यानिशी दिले.

शिक्का
**आदेशानुसार**
प्र. अधिक्षक
दिवाणी न्यायालय (व-स्तर), अकोला

# गटविकास अधिका-यांच्या आदेशानंतरही चौकशीला ब्रेक!

## दिग्रस बुद्रुक ग्रामपंचायत अपहार प्रकरण दडपण्याचा आरोप; १२ दिवस उलटूनही समितीचा अहवाल नाही

■ प्रतिनिधी | खेट्री ■

पातूर पंचायत समिती अंतर्गत दिग्रस बुद्रुक ग्रामपंचायतीतील कथित अपहार प्रकरणाच्या चौकशीला गटविकास अधिकाऱ्यांच्या आदेशानंतरही 'ब्रेक' लागल्याचे समोर आले आहे. चौकशीसाठी तीन अधिकाऱ्यांची समिती गठीत करून सात दिवसांत अहवाल सादर करण्याचे आदेश ४ ऑगस्ट रोजी देण्यात आले होते. मात्र, आदेशाला १२ दिवस उलटूनही समितीने चौकशी पूर्ण करून अहवाल सादर केलेला नाही. त्यामुळे या प्रकरणाची चौकशी दडपण्याचा प्रयत्न होत असल्याचा आरोप ग्रामस्थांकडून केला जात आहे.




### समितीला स्मरणपत्र देणार

'दिग्रस बुद्रुक ग्रामपंचायतीच्या अपहार प्रकरणी ४ ऑगस्ट रोजी तीन अधिकाऱ्यांची समिती गठीत करून सात दिवसांत अहवाल सादर करण्याचे आदेश दिले होते. मात्र, अद्याप अहवाल प्राप्त झालेला नाही. त्यामुळे चौकशी समितीला स्मरणपत्र देण्यात येणार आहे.'

**प्रदीप गुजर,** गटविकास अधिकारी, पंचायत समिती पातूर

दिग्रस बुद्रुक ग्रामपंचायतीतील १५व्या वित्त आयोगाच्या सामान्य निधीच्या कथित गैरवापरप्रकरणी तत्कालीन सचिवावर कारवाई करण्याची मागणी सामाजिक कार्यकर्ते विजय ताले यांनी केली होती. यासाठी त्यांनी २७ जुलै रोजी पातूर पंचायत समिती कार्यालयात 'भीक मांगो' आंदोलन केले होते. आंदोलनातून जमा झालेले २१३ रुपये तत्कालीन सचिवाला मनीऑर्डरद्वारे पाठविण्यासाठी त्यांनी गटविकास अधिकाऱ्यांकडे सुपूर्द केले होते.

या आंदोलनाची दखल घेत गटविकास अधिकाऱ्यांनी ४ ऑगस्ट रोजी तीन अधिकाऱ्यांची चौकशी समिती गठीत केली. समितीला सात दिवसांत चौकशी करून अहवाल सादर करण्याचे स्पष्ट आदेश देण्यात आले होते. मात्र, निर्धारित मुदत उलटूनही समितीतील अधिकारी ग्रामपंचायतीत चौकशीसाठी गेले नसल्याचे सांगण्यात येत आहे. त्यामुळे आदेशाची अंमलबजावणी नेमकी का रखडली, असा सवाल उपस्थित होत आहे. चौकशी समितीच्या कार्यपद्धतीकडे दिग्रस बुद्रुक ग्रामस्थांचे लक्ष लागले असून, प्रशासन या प्रकरणात आता काय भूमिका घेते, याची उत्सुकता आहे.

## जाहीर नोटीस

**वि. सह दिवाणी न्यायाधीश (क. स्तर) अकोला यांचे न्यायालयात**

एम. जे. सी. नं. १३५७/२०२६ — प्रोसेस नं.१०३९८/२०२६
चौ.ता. २८/०९/२०२६ — दिनांक : १२/०८/२०२६

**अर्जदार :** १. श्रावन सहदेव वानखडे रा. सांगवी बु, ता. जि. अकोला. २. रंजनाबाई मदन तायडे रा. गोरेगाव, ता. जि अकोला ३. राजकन्या बंडू तायडे रा. रायखेड, ता. तेल्हारा, जि. अकोला. ४. चंदा साहेबराव वानखडे रा. वल्लभ नगर, ता. जि. अकोला. ५. चैताली ऋषिकेश तायडे रा. शिवनी, ता. जि. अकोला. ६. रोहन साहेबराव वानखडे रा. वल्लभ नगर, ता. जि. अकोला

**विरुध्द**

**गैरअर्जदार :** निल.
**मयताचा पत्ता :-** मयत : १. सहदेव बक्षी वानखडे २. पंचफुलाबाई सहदेवराव वानखडे
**पत्ता :-** रा. सांगवी बु, ता. जि. अकोला.

या अर्थीउपरोक्त अर्जदार हयांनी मुंबई विनिमय अधिनियम १८२७, कलम २ अन्वये या न्यायालयात वारस प्रमाणपत्र मिळण्यासाठी अर्ज केला आहे. त्या अर्जामध्ये असे नमूद केले आहे की, मयत सहदेव बक्षी वानखडे यांचे दि. १३/११/२०२५ रोजी व मयत पंचफुलाबाई सहदेवराव वानखडे यांचे दि. ०३/०६/ २०२६ रोजी सांगवी बु, ता. जि. अकोला येथे निधन झाले आहे.

वरील अर्जदार त्यांचे कायदेशिर वारस आहेत, त्याशिवाय इतर कोणीही मयतांस वारस नाही. सबब वारस प्रमाणपत्र मिळण्यास अर्जदारांनी अर्ज दाखल केला आहे.

त्याअर्थी सदर अर्जामध्ये कोणाची कसल्याही प्रकारची हरकत असल्यास दिनांक २८/०९/२०२६ रोजी सकाळी ११:०० वाजता स्वतः जातीने अगर निर्दोष्ट केलेल्या वकीला मार्फत न्यायालयामध्ये हजर होउन आपली लेखी हरकत दाखल करावी. अन्यथा कोणाची कसल्याही प्रकारची हरकत नाही. असे गृहीत धरुन सदर अर्ज निकाली काढण्यात येईल. हयाची नोंद घ्यावी. आज दिनांक १२/०८/२०२६ रोजी माझे सही व न्यायालयाचे शिक्क्यानिशी दिले.

शिक्का
**आदेशानुसार**
प्र. अधिक्षक
दिवाणी न्यायालय (व-स्तर), अकोला

## जाहीर नोटीस

**वि.०२ रे सह दिवाणी न्यायाधीश (क. स्तर) अकोला यांचे न्यायालयात**

एम. जे. सी. नं. १३९८/२०२६ — प्रोसेस नं.१०६५५/२०२६
चौ.ता. २३/०९/२०२६ — दिनांक : १९/०८/२०२६

**अर्जदार :** जतीन क्रिष्णाकांत पोपट रा. टिळक रोड, मानेक टॉकिज जवळ, अकोला. ता. जि. अकोला.

**विरुध्द**

**गैरअर्जदार :** निल.
**मयताचा पत्ता :-** मयत : क्रिष्णाकांत नारायणदास पोपट
**पत्ता :-** रा. टिळक रोड, मानेक टॉकिज जवळ, अकोला. ता. जि. अकोला.

या अर्थीउपरोक्त अर्जदार हयांनी मुंबई विनिमय अधिनियम १८२७, कलम २ अन्वये या न्यायालयात वारसा प्रमाणपत्र मिळण्यासाठी अर्ज केला आहे. त्या अर्जामध्ये असे नमूद केले आहे की, मयत क्रिष्णाकांत नारायणदास पोपट यांचे दि. २७/०७/२०२६ रोजी आयकॉन हॉस्पिटल, अकोला येथे निधन झाले आहे.

वरील अर्जदार त्यांचे कायदेशिर वारस आहेत, त्याशिवाय इतर कोणीही मयतास वारस नाही. सबब वारस प्रमाणपत्र मिळण्यास अर्जदारांनी अर्ज दाखल केला आहे.

त्याअर्थी सदर अर्जामध्ये कोणाची कसल्याही प्रकारची हरकत असल्यास दिनांक २३/०९/२०२६ रोजी सकाळी ११:०० वाजता स्वतः जातीने अगर निर्दोष्ट केलेल्या वकीला मार्फत न्यायालयामध्ये हजर होउन आपली लेखी हरकत दाखल करावी. अन्यथा कोणाची कसल्याही प्रकारची हरकत नाही. असे गृहीत धरुन सदर अर्ज निकाली काढण्यात येईल. हयाची नोंद घ्यावी. आज दिनांक १९/०८/२०२६ रोजी माझे सही व न्यायालयाचे शिक्क्यानिशी दिले.

शिक्का
**आदेशानुसार**
अधिक्षक
दिवाणी न्यायालय (व-स्तर), अकोला

## तहसिलदार तथा कार्यकारी दंडाधिकारी अकोला यांचे कार्यालय, अकोला

क्र.प्रस्तु.-२/कावि-१६४४/२०२६ — दिनांक १७/०८/२०२६

**जाहीरनामा**

याव्दारे सर्व लोकांना सुचित करण्यात येते की, सार्वजनिक आरोग्य विभाग, शासन निर्णय दिनांक १२ सार्च, २०२५ नुसार जन्म-मृत्यु नोंदणी करीता अर्जदार अमोल माणिकराव वानखडे, मु.पो. शिवणी रमाबाई आंबेडकर नगर, शिवनी यांची मुलगी नामे विशू अमोल वानखडे जन्म डॉ. के. एस. पाटील हॉस्पीटल अँन्ड पॉलीक्लिनिक अकोला येथे दिनांक १३.०५.२०२२ रोजी झाला असून यांच्या जन्माची नोंद निबंधक, जन्म मृत्यु नोंदणी विभाग, महानगरपालीका अकोला येथे नजर चुकीने करण्यात आली नाही. करिता अर्जदार यांनी जन्माची नोंद घेण्याकरीता आदेश होणेबाबत निबंधक, जन्म मृत्यु नोंदणी विभाग, महानगरपालीका अकोला येथे विनंती अर्ज सादर केला आहे.

त्यानुसार, अमोल माणिकराव वानखडे, मु.पो. शिवणी रमाबाई आंबेडकर नगर, शिवनी विशू अमोल वानखडे यांची मुलगी नामे विशू अमोल वानखडे यांचा जन्माची नोंद घेण्याकरिता कोणाला काही आक्षेप / हितसंबंध असतील त्यांनी आपले आक्षेप हरकत अर्ज हया कार्यालयात जाहिरनामा प्रसिध्दी पासुन सुट्टीचे दिवस वगळून पंधरा दिवसांचे आत कार्यालयीन वेळेत या कार्यालयात लेखी स्वरुपात दाखल करावे, विहित मुदतीनंतर प्राप्त झालेले आक्षेप हरकती विचारात घेतल्या जाणार नाही. याची नोंद घ्यावी.

स्थळ :- अकोला
दिनांक :-

शिक्का
**तहसिलदार**
**अकोला**

# कंत्राटी महिला कर्मचाऱ्याची पुनर्नियुक्तीची याचिका फेटाळली!

## कामगार न्यायालयाचा महत्त्वपूर्ण निर्वाळा; अभिलेख, साक्षी-पुराव्यांच्या आधारे निर्णय

■ प्रतिनिधी | अकोला ■

जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणेअंतर्गत जीवन उन्नती अभियानात कंत्राटी कर्मचारी म्हणून कार्यरत असलेल्या गीताई गावंडे यांच्या पुनर्नियुक्तीच्या मागणीसाठी दाखल करण्यात आलेली याचिका कामगार न्यायालय, अकोला यांनी दि. १७ ऑगस्ट २०२६ रोजी फेटाळून लावली. उपलब्ध अभिलेख, साक्षी-पुरावे, कंत्राटी नियुक्तीच्या अटी तसेच संबंधित प्रकरणातील न्यायालयीन नोंदींचे सखोल परीक्षण केल्यानंतर न्यायालयाने हा निर्णय दिला.

### साक्षी-पुरावे आणि अभिलेखांचे सखोल परीक्षण

अंतिम सुनावणीदरम्यान गीताई गावंडे यांनी स्वतःची साक्ष नोंदवली. त्यांच्या वतीने विविध दस्तऐवज सादर करण्यात आले. प्रतिपक्षाच्या वतीने जिल्हा व्यवस्थापन अधिकारी नरेंद्र काकड यांची साक्ष नोंदविण्यात आली. दोन्ही बाजूंनी संबंधित कागदपत्रे, न्यायालयीन निर्णय व अन्य अभिलेख सादर करून जोरदार युक्तिवाद करण्यात आला. न्यायालयाने उपलब्ध अभिलेख, साक्षी-पुरावे आणि दोन्ही पक्षांचे म्हणणे यांचे सखोल अवलोकन केल्यानंतर याचिकाकर्त्याच्या दाव्यात अपेक्षित कायदेशीर आधार नसल्याचे स्पष्ट केले आणि पुनर्नियुक्तीची मागणी करणारी याचिका फेटाळून प्रकरण निकाली काढले. या निकालामुळे कंत्राटी सेवेचे स्वरूप, कराराच्या अटी, सेवा समाप्तीचे कारण आणि कर्मचाऱ्याच्या आचरणाशी संबंधित आरोप यांचा न्यायालयीन परीक्षणात किती महत्त्वाचा विचार केला जातो, हे अधोरेखित झाले आहे. सदर प्रकरणात तत्कालीन जिल्हा परिषद मुख्य कार्यकारी अधिकारी बी. वैष्णवी, प्रकल्प संचालक मनोज जाधव आणि जिल्हा व्यवस्थापन अधिकारी नरेंद्र काकड यांच्या वतीने भारत सरकारचे नोटरी तसेच ज्येष्ठ विधीज्ञ गणेश परियाल यांनी कामकाज पाहिले.

गीताई गावंडे यांची सन २०१३ पासून ११ महिन्यांच्या कंत्राटी पद्धतीने वेळोवेळी नियुक्ती व कराराचे नूतनीकरण करण्यात आले होते. मात्र, फेब्रुवारी २०२३ ते डिसेंबर २०२३ या कालावधीतील करार संपल्यानंतर त्यांना पुनर्नियुक्ती देण्यात आली नाही. विभागाकडील काही शासकीय दस्तऐवज व प्रभार त्यांच्या ताब्यात असल्याचा मुद्दाही या प्रकरणात पुढे आला. दरम्यान, गरजू, होतकरू महिला, मजूर व बचतगटातील महिलांना कर्जप्रकरणे मंजूर करून देण्यासाठी मदत करण्याच्या मोबदल्यात ३० हजार रुपयांची मागणी केल्याची तक्रार संबंधित विभागाकडे प्राप्त झाली होती. या तक्रारीच्या अनुषंगाने झालेल्या चौकशीदरम्यान आरोपांबाबत तथ्य आढळल्याचा दावा विभागाच्या बाजूने करण्यात आला.

तत्कालीन जिल्हा परिषद मुख्य कार्यकारी अधिकारी बी. वैष्णवी, तत्कालीन प्रकल्प संचालक मनोज जाधव, जिल्हा व्यवस्थापन समन्वय अधिकारी नरेंद्र काकड यांच्यासह संबंधित अधिकाऱ्यांसमक्ष झालेल्या चौकशीचा संदर्भही न्यायालयीन कार्यवाहीत आला. विभागाच्या म्हणण्यानुसार, चौकशीदरम्यान संबंधित महिलेने रक्कम मागितल्याच्या आरोपाबाबत कबुली दिली होती. त्यानंतर पुनर्नियुक्ती न देता त्यांची कंत्राटी सेवा समाप्त करण्यात आली.

### न्यायालयीन लढाईचा दीर्घ प्रवास

सेवा समाप्तीनंतर गीताई गावंडे यांनी कामगार न्यायालयात धाव घेत, आपली सेवा समाप्त करणे ही अनुचित कामगार प्रथा असून नैसर्गिक न्यायाच्या तत्त्वांच्या विरोधात असल्याचा दावा केला. या प्रकरणात तत्कालीन जिल्हा परिषद मुख्य कार्यकारी अधिकारी बी. वैष्णवी, प्रकल्प संचालक मनोज जाधव आणि जिल्हा व्यवस्थापन अधिकारी नरेंद्र काकड यांना प्रतिपक्ष करण्यात आले.

प्रकरणाच्या प्रारंभिक टप्प्यात, अंतिम निर्णय होईपर्यंत तात्पुरत्या स्वरूपात कामावर घेण्यासंदर्भात न्यायालयीन आदेशही झाले. त्याची अंमलबजावणी न झाल्याच्या कारणावरून पुढील न्यायालयीन कार्यवाही झाली. त्यानंतर उच्च न्यायालयाच्या नागपूर खंडपीठाने प्रकरण सहा महिन्यांच्या आत निकाली काढण्याचे निर्देश दिले. त्यानुसार कामगार न्यायालयाने निर्धारित कालावधीत प्रकरणाची सुनावणी पूर्ण केली.

जनमाध्यम — जनमाध्यम न्युज अँड पब्लीकेशन प्रा.लि.च्या मालकीचे हे वृत्तपत्र मुद्रक, प्रकाशक प्रदीप देशपांडे यांनी प्लॉट नं. बी -५०, सातुर्णा औद्योगिक वसाहत, बडनेरा रोड, अमरावती-४४४६०७ येथे छापून बी-२४ दोरकर हाऊस, महसुल कॉलनी, एसटी स्टॅण्डच्या मागे अकोला - ४४४००१ येथे प्रकाशित केले.

**संपादक - प्रदीप देशपांडे**
संचालक (वृत्त) - अभिराम देशपांडे
(Responsible for selection of News Under PRB Act)

**अकोला आवृत्ती वर्ष - ३० अंक २५०**
आर.एन.आय.रजी.नं. MAHMAR/1997/04048 पोस्टल लायसन क्र. AKL/HO/03/2004

**मुख्य कार्यालय :—** अंबापेठ, राजकमल चौक, अमरावती - ४४४६०१
फोन - ९८२३०१६३००, ९४२२९५६२६८
ई-मेल - atimadhyam@gmail.com, abhiram.deshpande70@gmail.com

# गणेशोत्सवापूर्वी वर्धेचे रस्ते खड्डेमुक्त होणार का?

## उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदेंचे राज्यातील पालिकांना आदेश; वर्धेत मात्र खड्ड्यांचे साम्राज्य कायम

**वर्धा/ जनमाध्यम**

गणेशोत्सवाला अवघे काही दिवस शिल्लक असताना राज्यातील रस्त्यांवरील खड्ड्यांचा प्रश्न पुन्हा ऐरणीवर आला आहे. उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी राज्यातील सर्व महानगरपालिका आणि नगरपालिकांना गणेशोत्सवापूर्वी रस्ते खड्डेमुक्त करण्याचे स्पष्ट निर्देश दिले आहेत. मात्र, या आदेशाची अंमलबजावणी वर्ध्यात कितपत होते, याकडे आता नागरिकांचे लक्ष लागले आहे. शहरातील अनेक प्रमुख मार्गांसह अंतर्गत रस्त्यांची अक्षरशः चाळण झाली असून, गणेश मंडळांच्या मिरवणुका आणि विसर्जन मार्गांवर खड्ड्यांचे आव्हान उभे ठाकले आहे.

गणेशोत्सव हा वर्ध्यात मोठ्या उत्साहात साजरा केला जातो. विविध मंडळांच्या मिरवणुका, देखावे आणि विसर्जन सोहळ्यामुळे शहरातील रस्त्यांवर मोठी गर्दी होते. अशा परिस्थितीत रस्त्यांवरील खड्डे अपघाताला निमंत्रण ठरू शकतात. त्यामुळे उत्सवापूर्वी शहरातील प्रत्येक रस्त्याची पाहणी करून धोकादायक खड्डे तातडीने बुजविण्याची गरज निर्माण झाली आहे.

राज्यातील प्रमुख शहरांतील रस्त्यांच्या स्थितीचा आढावा घेताना शिंदे यांनी पालिका प्रशासनाला युद्धपातळीवर काम करण्याचे निर्देश दिले आहेत. खड्डे दुरुस्तीसाठी स्वतंत्र पथके नियुक्त करावीत. २४ तास यंत्रणा सज्ज ठेवावी. नागरिकांच्या



तक्रारींसाठी दूरध्वनी क्रमांक तसेच ऑनलाइन यंत्रणा उपलब्ध करून द्यावी. प्राप्त तक्रारींचे तातडीने निराकरण करावे. पालिका मुख्याधिकारींनी कार्यालयात बसून कागदी अहवाल घेण्याऐवजी प्रत्यक्ष रस्त्यावर उतरून कामांची पाहणी करावी, असेही निर्देश देण्यात आले आहेत.

विशेष म्हणजे पावसाळ्यात तात्पुरती मलमपट्टी करण्या ऐवजी प्री-कास्ट आणि जिओ-पॉलिमर टेक्नॉलॉजीसारख्या आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करण्याचे निर्देश देण्यात आले आहेत. दुरुस्तीपूर्वी आणि दुरुस्तीनंतरची छायाचित्रे प्रसिद्ध करून कामात पारदर्शकता ठेवण्याचेही आदेश आहेत.

**वर्ध्यात प्रश्न कायम**

राज्य सरकारने आदेश काढला असला तरी वर्ध्यातील रस्त्यांची परिस्थिती पाहता हा आदेश प्रत्यक्षात कधी उतरतो, हा प्रश्न नागरिकांकडून उपस्थित केला जात आहे. शहरातील प्रमुख रस्ते, बाजारपेठेकडे जाणारे मार्ग, अंतर्गत रस्ते आणि गणेश विसर्जन मार्गांची तातडीने पाहणी करण्याची गरज आहे. केवळ खड्ड्यांमध्ये माती किंवा मुरूम टाकून मलमपट्टी न करता टिकाऊ दुरुस्ती करण्याची मागणी नागरिकांकडून होत आहे.

**मिरवणूक मार्गांची विशेष पाहणी गरजेची**

गणेशोत्सवाच्या काळात मोठ्या प्रमाणावर भाविक आणि गणेशभक्त रस्त्यावर येतात. त्यामुळे मिरवणूक मार्ग आणि विसर्जन घाटाकडे जाणारे रस्ते सुरक्षित असणे अत्यावश्यक आहे. रस्त्यांवरील खड्ड्यां सोबतच विद्युत तारांची पाहणी, अडथळे हटविणे आणि वाहतूक व्यवस्थेचे नियोजन करण्याची जबाबदारीही प्रशासनावर आहे.

आदेश कागदावरच राहणार की वर्ध्याला मिळणार खड्डेमुक्ती

उपमुख्यमंत्री शिंदे यांनी राज्यातील पालिकांना गणेशोत्सवा पूर्वी रस्ते खड्डेमुक्त करण्याचे आदेश दिले आहेत. आता वर्धा नगरपालिका प्रशासन या आदेशाची किती गांभीर्याने अंमलबजावणी करते, हे पाहणे महत्त्वाचे ठरणार आहे. गणेशोत्सवाच्या आधी वर्ध्यातील रस्त्यांवरील खड्डे बुजले तर नागरिकांना मोठा दिलासा मिळेल.

अन्यथा सरकारी आदेश आणि प्रत्यक्ष रस्त्यावरील वास्तव यातील फरक पुन्हा एकदा स्पष्ट होण्याची शक्यता आहे.




## गोठ्यातून चार शेळ्यांची चोरी

**खरांगणा-** घराशेजारील गोठ्यात बांधलेल्या दोन शेळ्या आणि दोन पिल्ले अज्ञात चोरट्याने लंपास केल्याची घटना खरांगणा परिसरात उघडकीस आली. या घटनेत राजेश बांगडकार यांचे सुमारे २४ हजार रुपयांचे नुकसान झाले. बांगडकार यांनी घराशेजारील गोठ्यात दोन शेळ्या व दोन पिल्ले बांधून ठेवली होती. दुसऱ्या दिवशी सकाळी गोठ्यात शेळ्या दिसून न आल्याने त्यांनी परिसरात शोध घेतला. मात्र, बराच शोध घेऊनही शेळ्या सापडल्या नाहीत. अखेर अज्ञात चोरट्याने शेळ्या चोरून नेल्याचे स्पष्ट झाल्यानंतर बांगडकार यांनी खरांगणा पोलिस ठाण्यात तक्रार दाखल केली. त्यांच्या तक्रारीवरून पोलिसांनी चोरीचा गुन्हा नोंदविला आहे. या प्रकरणाचा पुढील तपास सहायक पोलिस निरीक्षक अंबादास टोपले यांच्या मार्गदर्शनाखाली सहायक फौजदार विनोद सानप करीत आहेत.

## जेसीबी विक्रीच्या बहाण्याने १५ लाखांचा गंडा

**आर्वी :** जेसीबी विक्री करण्याच्या बहाण्याने १५ लाख रुपये घेऊन फसवणूक केल्याप्रकरणी आर्वी पोलिसांनी कैलाश कटयारी याच्याविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे. रामनगर वॉर्डातील रहिवासी कैलाश कटयारी याने गांधी चौक परिसरातील देवेंद्र गुल्हाणे यांच्याशी जेसीबी विक्रीचा व्यवहार केला. एमएच ३२ एएस १८५८ क्रमांकाचा जेसीबी घेण्यासाठी गुल्हाणे यांनी दोन टप्प्यांत १५ लाख रुपये दिले. व्यवहारानंतर संबंधित कागदपत्रेही त्यांना देण्यात आली. जेसीबी गुल्हाणे यांच्या नावावर करण्याची प्रक्रिया आरटीओ कार्यालयात ऑनलाइन करण्यात आली होती. मात्र, पूर्वी घेतलेले काम पूर्ण करण्याच्या कारणावरून कटयारी जेसीबी घेऊन गेला. त्यानंतर जेसीबी किंवा घेतलेली रक्कम परत करण्यास त्याने टाळाटाळ केली. आपली फसवणूक झाल्याचे लक्षात आल्यानंतर गुल्हाणे यांनी आर्वी पोलिसांत धाव घेत तक्रार दाखल केली. त्यावरून पोलिसांनी गुन्हा नोंदवून तपास सुरू केला आहे.

## दारूसाठी पाणी न दिल्याने दुकानदार भावंडांना मारहाण

**वर्धा :** दारू पिण्यासाठी पाणी न दिल्याच्या कारणावरून कारमधून आलेल्या युवकांनी दोन दुकानदार भावंडांना मारहाण केल्याची घटना नालवाडी परिसरात घडली. सावरमल जाखड यांचा नालवाडी परिसरात मार्बलचा व्यवसाय असून ते भाऊ रामस्वरूप यांच्यासोबत प्रतिष्ठान सांभाळतात. घटनेच्या वेळी दोघे भाऊ आणि कर्मचारी दुकानात होते. एमएच ३२ एएस ५२७८ क्रमांकाच्या कारमधून काही युवक दुकानात आले. त्यांनी दारू पिण्यासाठी पाणी मागितले. मात्र, दुकानातील पाण्याची बाटली घेऊन जाण्याचे सांगून तेथेच दारू पिण्यास नकार देण्यात आला. यानंतर कारमधून आणखी काही युवक खाली उतरले. पाणी न दिल्याच्या कारणावरून त्यांनी सावरमल आणि रामस्वरूप यांना मारहाण करून जखमी केल्याचे तक्रारीत नमूद आहे. या प्रकरणी रामनगर पोलिसांनी चार युवकांविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे. पुढील तपास पोलिस निरीक्षक पौर्णिमा राखोंडे करीत आहेत.

# अस्थी नदीत नकोत, मातीत पुरा; त्यावर झाड लावा

**वर्धा/जनमाध्यम**

रस्ता, वीज, पाणी अशा मूलभूत सुविधा नसतानाही बुद्ध टेकडी हिरवीगार करण्यासाठी बुद्ध टेकडी मित्र परिवार सातत्याने करीत असलेले कार्य अभिनंदनीय आहे. आता वृक्षारोपणासोबतच नद्यांचे प्रदूषण रोखण्याचे कार्यही हाती घ्या, असे आवाहन खासदार अमर काळे यांनी केले.

बुद्ध टेकडीवर रविवारी आयोजित वृक्षारोपण व सन्मान समारंभात ते बोलत होते. समाजामध्ये अस्थी व राख नदीत विसर्जित करण्याची प्रथा आहे. मात्र, अस्थी व राख खड्ड्यात पुरून त्यावर वृक्षारोपण करण्याची पर्यावरणपूरक परंपरा समाजाने स्वीकारावी. ही जाणीव मोठ्या प्रमाणात निर्माण झाली तर नद्यांचे प्रदूषण कमी करण्यास हातभार लागेल, असे काळे यांनी सांगितले. भारताचे प्रथम पंतप्रधान पंडित जष्ठजवाहरलाल नेहरू यांच्या अस्थी वाहत्या पाण्यात विसर्जित करण्यात आल्या नव्हत्या, याचा संदर्भ देत त्यांनी पर्यावरण संवर्धनाचे महत्त्व अधोरेखित केले. पर्यावरणासाठी आयुष्य झोकून देणारे चिपको आंदोलनाचे प्रणेते सुंदरलाल बहुगुणा यांचा २१ मे हा स्मृतिदिन 'वृक्ष दिन' म्हणून साजरा करण्याची मागणी केंद्रीय पर्यावरणमंत्र्यांकडे केल्याचेही त्यांनी सांगितले.



### नद्यांचे प्रदूषण रोखण्याची चळवळ उभी करा

### बुद्ध टेकडीवरून खा. अमर काळेंचे आवाहन

खासदार काळे यांच्या वाढदिवसानिमित्त वृक्षारोपण करून त्यांचा संविधान ग्रंथ, सन्मानचिन्ह व पुष्पगुच्छ देऊन सत्कार करण्यात आला. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी गोवर्धन टेंभुर्णे होते.

नगराध्यक्ष डॉ. सुधीर पांगुळ, संदीप किटे, सुरेश विघ्ने, प्रभाकर भगत, रणजित पाटील यांच्यासह बुद्ध टेकडी मित्र परिवाराचे कार्यकर्ते उपस्थित होते.

# मृत्यूच्या दारातून परतला ५४ वर्षीय रुग्ण; डॉक्टरांच्या तत्परतेने मिळाले जीवनदान

## एव्हीबीआरएचच्या डॉक्टरांचे यशस्वी उपचार; आतड्याचा खराब भाग काढून पुनर्जोडणी

**वर्धा / जनमाध्यम**

आचार्य विनोबा भावे ग्रामीण रुग्णालयात ५४ वर्षीय पुरुष रुग्णावर तातडीने शस्त्रक्रिया करून डॉक्टरांनी त्याचे प्राण वाचविले. रुग्णाला पाच दिवसांपासून तीव्र पोटदुखी व शौचास त्रास होत होता. तपासणीत आतड्यांमध्ये अडथळा आढळून आल्याने तातडीने एक्सप्लोरेटरी लॅपरोटॉमी करण्यात आली.



शस्त्रक्रियेदरम्यान टर्मिनल इलियमचा रक्तपुरवठा बंद झाल्याने आतड्याचा काही भाग गॅंग्रीन झाल्याचे आढळले. इंटससेप्शनमुळे ही गुंतागुंत निर्माण झाल्याची शक्यता व्यक्त करण्यात आली. खराब झालेला आतड्याचा भाग काढून उर्वरित आतड्यांची ॲनास्टोमोसिसद्वारे पुनर्जोडणी करण्यात आली. तसेच रुग्णाच्या सुरक्षिततेसाठी प्रॉक्सिमल आयलिओस्टॉमी करण्यात आली.

युनिट हेड व सर्जन डॉ. दर्शना तोटे यांच्या मार्गदर्शनाखाली डॉ. शुभम दुर्गे, डॉ. तुषार दहमिवाल, डॉ. प्रणव दळवी, डॉ. प्रभाकरन, डॉ. ई. माधुरी व डॉ. ऋतिक गांधी यांनी शस्त्रक्रियेत सहभाग घेतला. भूलतज्ज्ञ, नर्सिंग व ऑपरेशन थिएटर कर्मचाऱ्यांच्या समन्वयामुळे उपचार यशस्वी झाले.

रुग्णाची प्रकृती स्थिर असून चार आठवड्यांनंतर स्टोमा बंद करण्याचे नियोजन आहे.

डीएमआयएचईआरचे सीओओ डॉ. निलेश अग्रवाल, रुग्णालय संचालक डॉ. चंद्रशेखर महाकाळकर व एव्हीबीआरएचचे मुख्य वैद्यकीय अधीक्षक डॉ. अभय मुढे यांनी संपूर्ण टीमचे कौतुक केले.

# माहेर शांतीनिवासात श्रावण महोत्सव उत्साहात

**सेलू/ जनमाध्यम**

माहेर शांतीनिवास वृद्धाश्रम, सेलू-घोराड यांच्या वतीने श्रावण महोत्सव २०२६ उत्साहपूर्ण वातावरणात साजरा करण्यात आला. यावेळी माहेर संस्थेच्या संस्थापिका व संचालिका सिस्टर लुसी कुरियन, प्रियदर्शनी महिला विकास संस्थेच्या अध्यक्षा शीतलताई पंकज भोयर, वर्धा शहर पोलिस उपनिरीक्षक गीतांजली गारगोटे यांच्यासह योगिता संजय इंगळे, सुषमा मानमोडे, सुवर्णा संजय धोंगडे व जुवाडीच्या उपसरपंच कविता अमर गुंदी यांची प्रमुख उपस्थिती होती.



महोत्सवानिमित्त महिलांसाठी पारंपरिक खेळ, विविध वेशभूषा, उखाणे स्पर्धा तसेच पर्यावरणपूरक उपक्रम घेण्यात आले. सहभागी महिलांना बक्षिसे देऊन गौरविण्यात आले. यावेळी २०० फळझाडे व फुलझाडांचे वाटप करण्यात आले. ही झाडे घरी लावून त्यांचे संगोपन करण्याचे आवाहन करण्यात आले. कार्यक्रमाचे प्रमुख आकर्षण ठरलेल्या साई भजन मंडळातील ५५ ते ७० वयोगटातील आजींनी विविध गाण्यांवर उत्स्फूर्त नृत्य सादर करून उपस्थितांची मने जिंकली. कलेला वयाचे बंधन नसते, हे त्यांनी नृत्यातून सिद्ध केले.

प्रजापिता ब्रह्मकुमारी सेलूच्या वैष्णवी दीदींनी उपस्थितांना व्यसनमुक्तीची शपथ दिली.

नवज्योती व त्रिमूर्ती ग्रामसंघ, कलावर्धीने परफॉर्मिंग आर्ट अकॅडमी वर्धा, डॉ. चंद्रकांत सहारे व लीना सोरते यांच्या समूहांनीही विविध कला सादर केल्या. सूत्रसंचालन नलिनी फाजगे यांनी केले. माया शेळके यांनी आभार मानले. कार्यक्रमासाठी अतुल शेळके, रेश्मा आदमने, प्रियंका कोवे, दीपाली भलावी, अर्चना दुरबडे, तुकाराम ढोकले, प्रमोद काटवे, साहिल दुधबडे व सुरज ढोले यांनी सहकार्य केले.

# माती परीक्षणातून शेतीला नवी दिशा

**वर्धा/ जनमाध्यम**

पवनूर येथे मृदा आरोग्य पत्रिकांचे मोफत वाटप; संतुलित खत व्यवस्थापनाचा दिला सल्ला

पवनूर : मातीचे आरोग्य जपून उत्पादन खर्च कमी करण्यासोबतच पिकांची उत्पादकता वाढविण्यासाठी माती परीक्षण अत्यंत महत्त्वाचे आहे. याच उद्देशाने बजाज कृषी महाविद्यालय, पिपरीच्या ग्रामीण जागरूकता व कार्यानुभव कार्यक्रमांतर्गत पवनूर येथील शेतकऱ्यांना मृदा आरोग्य पत्रिकांचे मोफत वितरण करण्यात आले. कृषिदूत विद्यार्थ्यांनी शेतकऱ्यांना माती परीक्षणाचे महत्त्व, संतुलित खत व्यवस्थापन आणि आधुनिक शेती



तंत्रज्ञानाबाबत मार्गदर्शन केले.

खरीप हंगामापूर्वी सातव्या सत्रातील कृषिदूत विद्यार्थ्यांनी शेतांमधून मातीचे नमुने संकलित केले.

त्यानंतर महाविद्यालयाच्या अत्याधुनिक प्रयोगशाळेत मृदा शास्त्र व कृषी रसायनशास्त्र विभागाचे सहाय्यक प्राध्यापक डॉ. एम. के. घोडे यांच्या मार्गदर्शनाखाली नमुन्यांचे परीक्षण करण्यात आले. परीक्षणामध्ये मातीतील १५ महत्त्वपूर्ण गुणधर्मांचे विश्लेषण करण्यात आले. त्यानुसार प्रत्येक शेतकऱ्याला जमिनीची मृदा आरोग्य स्थिती, उपलब्ध अन्नद्रव्ये तसेच पिकानुसार आवश्यक खतांची शिफारस असलेली मृदा आरोग्य पत्रिका देण्यात आली. विशेष म्हणजे ही सेवा शेतकऱ्यांना पूर्णपणे विनामूल्य उपलब्ध करून देण्यात आली.

# वर्धेत प्रथमच आढळली काळ्या छातीची सुगरण

**वर्धा / जनमाध्यम**

जिल्ह्याच्या समृद्ध पक्षीवैविध्यात आणखी एका दुर्मिळ पक्ष्याची भर पडली आहे. काळ्या छातीची सुगरण अर्थात ब्लॅक ब्रेस्टेड वीव्हर या पक्ष्याची वर्धा जिल्ह्यात प्रथमच छायाचित्रीत नोंद झाली आहे. समुद्रपूर तालुक्यातील ग्रामीण भागात हा पक्षी आढळून आला.

हिंगणघाटचे पक्षी अभ्यासक व सर्पमित्र प्रविण कडू, वर्ध्याचे पक्षी अभ्यासक व वन्यजीव छायाचित्रकार राहुल वकारे, यशवंत शिवणकर आणि अनिल गडवानी यांनी ही नोंद केली. उंच गवतामध्ये नर आणि मादी असे एकूण सहा पक्षी आढळले. याठिकाणी पाच अर्धवट बांधलेली घरटी दिसून आली असून घरटी बांधण्याचे काम सुरू असल्याचे निरीक्षणात आले.



काळ्या छातीची सुगरण ही प्लोसियस बेंगालेन्सिस या शास्त्रीय नावाने ओळखली जाते. सुमारे १५ सेंटीमीटर लांबीचा हा पक्षी १८ ते २२ ग्रॅम वजनाचा असतो. प्रजनन काळातील नराच्या कपाळाचा भाग पिवळा असून चेहरा, मानेचा मागील भाग आणि छातीचा मोठा भाग काळा असतो. गवताळ प्रदेश आणि पाणथळ भाग हा या पक्ष्याचा अधिवास आहे.

पूर्व विदर्भातील चंद्रपूर, नागपूर, गोंदिया आणि भंडारा जिल्ह्यांत या पक्ष्याच्या नोंदी उपलब्ध आहेत. मात्र वर्धा जिल्ह्यात यापूर्वी नोंद नसल्याने हे दर्शन पक्षी अभ्यासाच्या दृष्टीने महत्त्वपूर्ण मानले जात आहे.

# अंबिकापूर फाट्यावरून विद्युत वाहिनीचे वायर लंपास करणारे तिघे जेरबंद

## आष्टी पोलिसांची धडक कारवाई; २९ हजारांचा मुद्देमाल जप्त, ७०० मीटर कंडक्टर वायर हस्तगत

**आष्टी शहीद/ जनमाध्यम**

तालुक्यातील अंबिकापूर फाट्याजवळ नव्याने उभारण्यात आलेल्या विद्युत वाहिनीचे तब्बल ७०० मीटर कंडक्टर वायर चोरीला गेल्याची घटना उघडकीस आली होती. या प्रकरणाचा आष्टी पोलिसांनी जलदगतीने तपास करीत तीन आरोपींना जेरबंद केले. आरोपींकडून चोरीस गेलेला २९ हजार रुपये किमतीचा संपूर्ण कंडक्टर वायर जप्त करण्यात आला आहे.

किशोर इन्फ्रास्ट्रक्चर प्रायव्हेट लिमिटेडचे साईड इंजिनियर राहुल चरणदास गजभिये यांनी याबाबत आष्टी पोलिसांत तक्रार दिली होती. १४ ऑगस्ट रोजी दुपारी एक वाजताच्या सुमारास अंबिकापूर बस स्टॉपजवळ नव्याने उभारण्यात आलेल्या विद्युत वाहिनीचे सुमारे ७०० मीटर कंडक्टर वायर अज्ञात चोरट्याने लंपास केलष्ठकेल्याचे निदर्शनास आले. या तक्रारीवरून आष्टी पोलिस ठाण्यात अपराध क्रमांक २८२/२०२६ नुसार भारतीय न्याय संहितेच्या कलम ३०३ २ आणि ३ ५ अन्वये गुन्हा दाखल



करण्यात आला. तपासादरम्यान पोलिसांना मिळालेली गोपनीय माहिती आणि तांत्रिक तपासाच्या आधारे सचिन देवराव कांबळे वय ४८ रा. थार आष्टी. दीपक विलासराव भोजने वय २९ रा. इंदिरानगर आष्टी आणि मंगेश यशवंतराव कुडमेथे वय ३७ रा. थार आष्टी यांना ताब्यात घेण्यात आले. चौकशीत आरोपींनी गुन्ह्याची कबुली दिल्याचे पोलिसांनी सांगितले. त्यानंतर पोलिसांनी आरोपींकडून चोरीस गेलेला २९ हजार रुपये किमतीचा ७०० मीटर कंडक्टर वायर जप्त केला. त्यामुळे विद्युत वाहिनीवरील चोरीचा गुन्हा उघडकीस आणण्यात पोलिसांना यश आले. ही कारवाई पोलिस अधीक्षक सौरभ कुमार अग्रवाल आणि अपर पोलिस अधीक्षक सदाशिव वाघमारे यांच्या मार्गदर्शनाखाली आष्टी पोलिस ठाण्याचे ठाणेदार सहाय्यक पोलिस निरीक्षक राजेश जोशी. पोलिस उपनिरीक्षक निलेश भिलावे. पोलिस अंमलदार सचिन सोनोने. सतीश नंदागवळी. वैभव साबळे. अमर डाकूलकर आणि पवन देशमुख यांनी केली.

जनमाध्यम

जनमाध्यम न्युज अँड पब्लीकेशन प्रा.लि.च्या मालकीचे हे वृत्तपत्र मुद्रक, प्रकाशक प्रदीप देशपांडे यांनी प्लॉट नं.बी.-५०, सातुर्णा औद्योगिक वसाहत, बडनेरा रोड, अमरावती-४४४६०७ येथे छापून जनमाध्यम कार्यालय, हवालदारपुरा, वर्धा-४४२२२१ येथे प्रकाशित केले.

**संपादक - प्रदीप देशपांडे**
**संचालक (वृत्त) - अभिराम देशपांडे**

(Responsible for selection of News Under PRB Act)

**वर्धा आवृत्ती वर्ष** - १४ **अंक** - २६३

आर.एन.आय.रजी.नं. MAHMAR/२०१३/५१०९३

**मुख्य कार्यालय :–** अंबापेठ, राजकमल चौक, अमरावती-४४४६०१

फोन - ९८२३०१६३००, ९४२२९५६२६८

**ई-मेल**-atimadhyam@gmail.com,
abhiramdeshpande@gmail.com

# नवविवाहितेच्या आत्महत्येमुळे खळबळ
## चार महिन्यापूर्वीच झाले होते लग्न

**दर्यापूर/प्रतिनिधीः-** चार महिन्यांपूर्वी मोठ्या उत्साहात आणि थाटामाटात लग्न होऊन सासरी गेलेल्या वैष्णवी भूषण वाकोडे हिने आपल्या राहत्या घरी टोकाचे पाऊल उचलत छताच्या पंख्याला गळफास लावून आत्महत्या केल्याची घटना बाबळी येथे समोर आली आहे. सासुरवासामुळे तिने आत्महत्या केल्याचे स्पष्ट झाले. त्यानुसार, दर्यापूर पोलिसांनी मृताच्या आईच्या तक्रारीवरून १८ ऑगस्ट रोजी मृत विवाहितेचा पती भूषण सुभाष वाकोडे (रा. बाभळी, दर्यापूर) याच्याविरूद्ध आत्महत्येस प्रवृत्त केल्याचा गुन्हा नोंदवला आणि त्याला अटक केली आहे.अंजनगाव सुर्जी तालुक्यातील रहिवासी असलेल्या वैष्णवी अनिल आवारे (वय २२) हिचा विवाह २१ एप्रिल २०२६ रोजी भूषण वाकोडे याच्या सोबत रिती रिवाजा प्रमाणे झाला होता.


## फ्लॅट विकणे आहे

शास्त्री नगर , टोपे नगर बोर्ड ऑफिस जवळ असलेला डुप्लेक्स फ्लॅट विकणे आहे . एक बेड रूम , किचन, स्वतंत्र डायनिंग , प्रशस्त हॉल, एक गेस्ट रूम, टेरेस असा फ्लॅट आहे.

**संपर्क : ९४२२८५७१६९ ९४२२१२०४०६**


---

प्रो.नं.१९३४/२०२६
दिवाणी न्यायालय, व.स्तर, दर्यापूर
दि.०६.०८.२०२६

वि.दिवाणी न्यायालय (व.स्तर) दर्यापूर जि.अमरावती येथील
ए.एम.जोशी, २ रे सह दिवाणी न्यायाधीश (व.स्तर) यांचे न्यायालयात

किरकोळ अर्ज क्र./३२८/२०२६ दिनांक ०३.०९.२०२६

## जाहीर नोटीस

**अर्जदार -**
१. दिलीप बाबुलालजी मलिये, वय ६४ वर्षे, धंदा - शेती
रा.बलोदे लेआऊट, हिंगणा रोड, अकोला, ता.जि.अकोला
२. कन्हैया बाबुलालजी मलिये, वय ६३ वर्षे, धंदा - शेती
३. सतीशबाबुलालजी मलिये, वय ४९ वर्षे, धंदा - शेती
२ व ३ रा.राजपुत पुरा, दर्यापूर, ता.दर्यापूर, जि.अमरावती
४. सुनिता किशोर बहीरे, वय ५९ वर्षे, धंदा - घरकाम
रा.दर्यापूर रोड देवगिरे नगर, अंजनगांव सुर्जी, ता.अंजनगांव, जि.अम.
५. संगीता राजेश नाईक, वय ५२ वर्षे, धंदा - घरकाम
रा.स.नं.३८/१, शिवप्रभा बिल्डीग, फ्लॅट नं.सी-१३, एक्स सर्विसमन कॉलनी, कोथरुड क्षेत्रीय कार्यालयाजवळ शिवानंद गार्डन, कोथरुड, पुणे
६. सुषमा रमेश ठोसरीवाल, वय ४८ वर्षे, धंदा - घरकाम
रा.आर्वी रोड, नवीन पोलीस क्वॉर्टरसमोर, व्हीटीसी, पिंपरी मेघे, वर्धा
७. जयश्री अमित नाईक, वय ४६ वर्षे, धंदा - घरकाम
रा.स.नं.२५/६/२/१, फ्लॅट नं.२४, डी-विंग, नारायण कॉम्प्लेक्स, नित्यानंद हॉल जवळ हिंगणे खुर्द, सिंहगड रोड, आनंद नगर, पुणे ता.जि.पुणे

--- **विरुध्द** ---

गैरअर्जदार- निरंक

या जाहीर नोटीसद्वारे सर्वांना कळविण्यात येते की, **सिंधू बाबुलाल मलिये** हे दिनांक **२२.०६.२०२६** रोजी मरण पावले आहेत.

अर्जदार यांनी मृतकाचे वारस असल्याबाबत **बॉम्बे रेग्युलेशन ॲक्टचे कलम २ प्रमाणे** वारस प्रमाणपत्र मिळणेबाबत न्यायालयात अर्ज केला आहे. जर कोणास वारसाचे प्रमाणपत्र देण्याबाबत काही आक्षेप असेल तर त्यांनी नोटीस प्रसिध्द झाल्यापासून ३० दिवसांचे आत आपला आक्षेप सादर करावा. अन्यथा अर्जदारांना मृतकाचे वारस ठरविण्यात येऊन त्यांना वारस प्रमाणपत्र देण्यात येईल.

**मालमत्तेचे वर्णन** मयत **सिंधू बाबुलाल मलिये** यांचे नांवे मौजा शिवर खु., ता.दर्यापूर, जि.अमरावती येथे शेत गट नं.१३८, क्षेत्रफळ १३ हे.४९ गुंठे, आकारणी रु.७०.०० पैकी ० हे.९४ आर. भो.वर्ग १ अशी शेती आहे. या मिळकतीची बाजारभाव किंमत १,००,०००/- रु.आहे.

आज दि.१९.१२.२०२४ रोजी माझ्या सहीने व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिले.

शिक्का

**आदेशानुसार**
सहा.अधीक्षक (प्रशासन)
दिवाणी न्यायालय, व.स्तर, दर्यापूर

---

**दिवाणी न्यायालय, वरिष्ठ स्तर,**
**वि.श्री.एस.एस.भिंगारदेव, ८ वे सह दिवाणी न्यायाधीश (क.स्तर) अमरावती**

किरकोळ दिवाणी अर्ज क्र.१६७५/२०२६
**राजू इइनराव इंगळे अधिक पाच -वि- निरंक**
पुढील ता.०१.१०.२०२६

## जाहीरनामा/सायटेशन

**अर्जदार :**
1. Raju Babanrao Ingale, Age about 58 Yrs. Occu.: Labour
R/o Behind Poonam Photo Studio, Gadge Nagar, Shivaji Nagar, Amt.
2. Sandhya Avdhutrao Sagane, Age about 54 Yrs. Occu.: Household
R/o Sai Nagar, Kandali, Dist. Amravati.
3. Sanjay Babanrao Ingale, Age about 51 Yrs. Occu.: Labour
R/o Behind Police Station, Police Quarter Paratwada, Tq.Achalpur, Dist.Amravati.
4. Usha Suresh Gaikwad, Age about 61 Yrs. Occu.: Household
R/o Near Shitlamata Mandir Mata Khidki, Ukali, Amravati.
5. Vidhya Rajesh Khadse, Age about 50 Yrs. Occu.: Household
R/o Behind Dr.Khadse Hospital Wadali, Camp, Amravati.
6. Ashatai Babanrao Gawai, Age about 64 Yrs. Occu.: Household
R/o Ambika Apartment, New Colony, Dastur Nagar, Amravati.

-- **विरुध्द** --

**गैरअर्जदार :** Nil

सर्वत्र लोकांस सुचित करण्यात येते की, **मयत** Baban Fattuji Ingale हे दिनांक 23.06.2002 रोजी **अमरावती, ता.जि.अमरावती** येथे मयत झाले. अर्जदार Raju Babanrao Ingale + 5 - Vs- Nil यांनी वरीलप्रमाणे या कोर्टात सदर्हु मयत यांचे वारसाचे प्रमाणपत्र मिळण्याबाबत APPLICATION UNDER SECTION 2 OF BOMBAY REGULATION ACT CLAUSE VIII OF 1827 FOR GRANT OF LEGAL HEIRSHIP CERTIFICATE प्रमाणे अर्ज दाखल केलेला आहे.

त्यापेक्षा Raju Babanrao Ingale + 5 - Vs- Nil वरीलप्रमाणे सदर्हु मयतांचे वारसदार नव्हे असे कोणास समजावण्याचे असेल तर या जाहीरनाम्याचे प्रसिध्दीच्या तारखेपासून एक महिन्याचे आत त्याने या कोर्टात हजर होवून आपल्या हरकती कळवाव्यात आणि या लेखावरुन असे कळविण्यात येते की, जर सदर्हु मुदतीत कोणी योग्य हरकत न दाखविल्यास सदर्हु कोर्ट अर्जदार यांचे हक्काबद्दल लागलीच पुरावा घेवून त्यांचा हक्क साबीत दिसल्यास त्यांना सदर्हु मयत यांचे वारसाचे प्रमाणपत्र देण्यात येईल.

आज दिनांक **१७.०८.२०२६** रोजी माझ्या सहीने व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिले.

शिक्का

आदेशानुसार,
**सहायक अधीक्षक**
दिवाणी न्यायालय वरिष्ठ स्तर, अमरावती

---

No.2
CIVIL JUDGE SENIOR DIVISION
IN THE COURT OF Sharad Balbhim Kaldate
Jt.C.J.J.D. J.M.F.C. AMRAVATI

**SUMMONS FOR SETTLEMENT OF ISSUES (0.5, R, 1, 5)**

R.C.S./53/2019
**Raju @ Rajkumar Sheetaldas Zambani - Vs - Ravindra Narayan Bhatkar 7**
**Next Date : 29.09.2026**

To,
1) Ravindra Narayan Bhatkar 7
Mudliyar Nagar, Amravati
Tq.Dist.Amravati (Maharashtra)
2) Tanba Laxmanrao Dethe
Santoshi Nagar, Amravati, Tq. Dist. Amravati.
3) Jaykumar Mansaram Gajbhiye
V.M.V.Road, Amravati, Tq. Dist. Amravati
4) Rekha Sureshrao Pokale
Pravin Nagar, Amravati, Tq. Dist. Amravati.

Whereas **Raju @ Rajkumar Sheetaldas Zambani** has instituted a suit against you for you are hereby summoned to appear in this Court in person, or by a pleader duly instructed, and able to answer all material questions relating to the suit, or who shall be accompanied by some persons able to answer all such questions, on the 29.09.2026 at 11.00 o'clock in the forenoon, to answer the claim; and further you are hereby directed to file on that day a written statement of your defence and to produce on th e said day all documents in your possession or power upon which you base your defence or claim for set-off or counter-claim, and where you rely on any other document whether in your possession or power or not, as evidence in support of your defence or claim for set-off or counter-claim, you shall enter such documents in a list to be annexed to the written statement.

Take notice, that, in default of your appearance on t he day before mentioned, the suit will be heard and determined in your absence.

Given under my hand and the seal of the Court, this 17.08.2026

शिक्का

**Jt.C.J.J.D. J.M.F.C.,Amravati**

**Notice :** 1. Should you apprehend your witnesses will not attend of their own accord, you can have a summons from this Court to compel the attendance of any witness, and the production of any document that you have a right to call on the witness to produce, on applying to the Court and on depositing the necessary expenses.
2. If you admit the claim, you should pay the money into Court together with the costs of the suit, to avoid execution of the decree, which may be against your person or property, or both.


जनमाध्यम

जनमाध्यम न्युज अँड पब्लीकेशन प्रा.लि.च्या मालकीचे हे वृत्तपत्र मुद्रक, प्रकाशक प्रदीप देशपांडे यांनी प्लॉट नं. बी-५०, सातुर्णा औद्योगिक वसाहत, बडनेरा रोड, अमरावती - ४४४६०७ येथे छापून जनमाध्यम कार्यालय, रेल्वेपुलाजवळ, राजकमल चौक, अमरावती -४४४६०१ येथे प्रकाशित केले.

**संपादक-प्रदीप देशपांडे**
**संचालक (वृत्त) - अभिराम देशपांडे**
(Responsible for selection of News Under PRB Act)

**अमरावती आवृत्ती वर्ष - ३७ अंक ३४२**
आर.एन.आय.रजी.नं. 49763/89 पोस्टल लायसन क्र. ATI/RNP/47/2023-2025



**मुख्य कार्यालय :–** अंबापेठ, राजकमल चौक, अमरावती - ४४४६०१
फोन - ९८२३०१६३००,९४२२९५६२६८
**ई-मेल** - atimadhyam@gmail.com, abhiram.deshpande70@gmail.com


---

## जाहीरनामा

**श्रीमती रोहिणी वि. मनोरे, दिवाणी न्यायाधिश (क.स्तर.) तिवसा, जि.अमरावती यांचे न्यायालय**

**आर.एम.जे.सी.क्र.१८२/२०२६** **ने.ता.१५.०९.२०२६**

**अर्जदार -**
1. **Shaikh Asharaf s/o. Shaikh Hasan**
Aged about 84 years. Occu.: Nil
R/o. Ward No.2, Akhatwada, Tq. Teosa, Dist. Amravati
2. **Shaikh Hamja s/o. Shaikh Hasan**
Age about 77 years. Occu.: Nil
R/o. Ward No.2, Akhatwada, Tq. Teosa, Dist. Amravati

--VERSUS--

**गैरअर्जदार -** NIL

या नोटीस व्दारे सर्व लोकांस सुचित करण्यात येते की,**शेख अशरफ शेख हसन व इतर** यांनी दिवाणी न्यायाधिश (क.स्तर) तिवसा यांचे न्यायालयात वारसा हक्काचे प्रमाणपत्र मिळण्याकरिता **APPLICATION UNDER CLAUSE 2 OF BOMBAY REGULATION VIII OF 1827** अन्वये अर्ज दाखल केला आहे.

अर्जदाराचे असे म्हणणे आहे की, **शेख हसन शेख रहेमु** यांचा मृत्यू दिनांक **१५/०८/२००१** रोजी वार्ड नं.२, आखतवाडा, ता.तिवसा, जि.अमरावती येथे झालेला आहे. अर्जदार यांचे शिवाय मयतांचे इतर कोणीही वारसदार नाही असे अर्जदाराने अर्जामध्ये नमूद केले आहे.

वरील प्रमाणे सदर्हू **शेख हसन शेख रहेमु** मय्यतांचे वारसदार नव्हे असे कोणास समजविण्याचे असेल तर या जाहिरनाम्याचे प्रसिध्दीच्या तारखेपासुन एक महिन्याचे आत या न्यायालयात हजर होवुन आपल्या हरकती कळवाव्यात आणि या लेखावरुन असेही कळविण्यात येते की, जर सदर्हू मुदतीत कोणी योग्य हरकत न दाखविल्यास न्यायालय अर्जदारास त्यांचे हक्काबद्दल लागलीच पुरावा घेवुन त्यांना वारसा हक्काचे प्रमाणपत्र घोषित करुन देण्यात येईल.

आज दिनांक **१८ माहे ऑगस्ट २०२६** रोजी माझ्या सहीने व न्यायालयाच्या शिक्यानिशी दिला.

शिक्का

आदेशानुसार,
**सहाय्यक अधीक्षक**
दिवाणी न्यायालय क.स्तर, तिवसा

---

## जाहीर नोटीस

**वि.२ रे सह दिवाणी न्यायाधीश (व.स्तर), अमरावती यांचे न्यायालयात**

**सक्शेशन नं.१४५४/२०२६** **चौ.ता.२४.०८.२०२६**

**अर्जदार -**
1. **Anish Navneetlal alias Navnitlal Mehta**
Age 59 years, Occu. Business
R/o. A-701. Daga Sapphire Camp Road, Joshi Colony, Amravati
2. **Paresh Navneetlal alias Navnitlal Mehta**
Age 66 years, Occu. Business
R/o. Mangilal Plot, Jog Compound, Camp, Amravati
3. **Sunil Navneetlal alias Navnitlal Mehta**
Age 64 years, Occu. Business, R/o. Thane (West)

-- **विरुध्द** --

**गैरअर्जदार -**
1. **Indian Bank Amravati**
Near Dr. Panjabrao Alias Bhausaheb Deshmukh Memorial Medical College (PDMMC) Hospital, Amravati
2. **Karvey Computershare Private Limited**
through its Registrar/ Director,
office at Plot No. 17-24, Vithal Rao Nagar, Madhapur, Hyderabad- 500 081

ज्याअर्थी अर्जदार यांनी भारतीय वारसा कायदा १९२५ च्या कलम ३७२ अन्वये या न्यायालयात उत्तराधिकार प्रमाणपत्र मिळण्यासाठी अर्ज केला आहे. त्या अर्जामध्ये असे नमुद केले आहे की, **मयत नवनीतताल चंपकलाल मेहता यांचे निधन दि.०३/०७/२०१५ रोजी अमरावती** येथे झाले असून वरील अर्जदार त्याचे कायदेशिर उत्तराधिकारी आहेत व इतर कोणीही मय्यतास उत्तराधिकारी नाही. सबब उत्तराधिकार प्रमाणपत्र मिळावे.

त्याअर्थी सदर अर्जास कोणाची कसल्याही प्रकारची हरकत असल्यास त्यांनी जाहीर नोटिस प्रसिध्द झाल्यापासून १५ दिवसांचे आत स्वतः जातीने अगर निर्दिष्ट केलेल्या वकिला मार्फत **वि. दिवाणी न्यायाधिश (व.स्तर), अमरावती** या न्यायालयामध्ये हजर होवून आपली लेखी हरकत दाखल करावी. अन्यथा कोणाची कसल्याही प्रकारची हरकत नाही असे गृहित धरून सदर अर्ज निकाली काढण्यात येईल. हयाची नोद घ्यावी.

आज दि.१२/०८/२०२६ रोजी माझ्या सही व न्यायालयाच्या शिक्यानिशी दिली.

शिक्का

**आदेशानुसार,**
**सहाय्यक अधीक्षक (प्रशासन )**
**दिवाणी न्यायालय,(व.स्तर) अमरावती**

---

१८४९/२०२६
दिवाणी न्यायालय, व.स्तर, दर्यापूर
दि.३०.०७.२०२६

वि.२ रे सह दिवाणी न्यायालय (व.स्तर) दर्यापूर जि.अमरावती येथील
ए.एम.जोशी, २ रे सह दिवाणी न्यायाधीश (व.स्तर) यांचे न्यायालयातील

किरकोळ अर्ज क्र.३३१/२०२६ दिनांक ०७.०९.२०२६

## जाहीर नोटीस

**अर्जदार -**
१. छाया गणेशराव पुंडकर, वय ७२ वर्षे, धंदा - घरकाम
२. पुरुषोत्तम गणेशराव पुंडकर, वय ३९ वर्षे, धंदा - शेती
३. दिपक गणेशराव पुंडकर, वय ४० वर्षे, धंदा - शेती
नं.१ ते ३ रा.कुंभारगांव, ता.अंजनगांव सुर्जी, जि.अमरावती
४. मीना ओमप्रकाश पाथरे, वय ३६ वर्षे, धंदा - घरकाम
रा.जवळा शहापूर, ता.चांदूर बाजार, जि.अमरावती

--- **विरुध्द** ---

गैरअर्जदार- निरंक

या जाहीर नोटीसद्वारे सर्वांना कळविण्यात येते की, **गणेश उत्तम पुंडकर** हे दिनांक **१२.१०.२०२३** रोजी मरण पावले आहेत.

अर्जदार यांनी मृतकाचे वारस असल्याबाबत **बॉम्बे रेग्युलेशन ॲक्टचे कलम २ प्रमाणे** वारस प्रमाणपत्र मिळणेबाबत न्यायालयात अर्ज केला आहे. जर कोणास वारसाचे प्रमाणपत्र देण्याबाबत काही आक्षेप असेल तर त्यांनी नोटीस प्रसिध्द झाल्यापासून ३० दिवसांचे आत आपला आक्षेप सादर करावा. अन्यथा अर्जदारांना मृतकाचे वारस ठरविण्यात येऊन त्यांना वारस प्रमाणपत्र देण्यात येईल.

**मालमत्तेचे वर्णन** मयत **गणेश उत्तम पुंडकर** यांचे नांवे मौजा वडाळगव्हाण, ता.दर्यापूर, जि.अमरावती येथील शेत गट नं.२७८, ० हे.८२ आर, आ.रु.४.१३ येणे प्रमाणे मिळकत आहे. सदर मिळकतीची बाजारभाव किंमत ५०,०००/- रु.आहे.

आज दि.१९.१२.२०२४ रोजी माझ्या सहीने व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिले.

शिक्का

**आदेशानुसार**
सहा.अधीक्षक (प्रशासन)
दिवाणी न्यायालय, व.स्तर, दर्यापूर

---


**दि अमरावती जिल्हा मध्यवर्ती सहकारी बॅंक मर्या.**
**मु.का.इर्विन चौक, कॅम्प रोड, अमरावती**
**फोन ०७२१-२५५२०९९/२६६३३७८/७९**
**ई-मेल** amtdccbho@rediffmail.com

## जाहीरात

बॅंकेचे खोलापूर व लोणी टाकळी शाखा येथील नवीन काउंटर, कॅशिअर कॅबिन तसेच फर्निचर १८ एमएम प्लायवूड मध्ये आय.एस.आय.मार्क मध्ये ड्रॉवर कपाट राहील. तरी इच्छुक निविदा धारकांनी संबंधित शाखेला भेट देऊन जागेची पाहणी करुन घ्यावी. तसेच काउंटरची रुंदी व ऊंची, डिझाईन बॅंकेचे पॅनलवरील इंजिनिअर यांचेशी संपर्क साधून आपल्या कामाची निविदा बॅंकेचे मुख्य कार्यालय अमरावती येथे दिनांक २८.०८.२०२६ पर्यत अगर तत्पुर्वी बॅंकेच्या वेळेमध्ये सादर करावी.

दिनांक १९.०८.२०२६

**मुख्य कार्यकारी अधिकारी**


---

**दिवाणी न्यायालय, वरिष्ठ स्तर,**
**विद्यमान श्री.आर.आर.खामतकर,४ थे सह दिवाणी न्यायाधीश (क.स्तर) अमरावती यांचे न्यायालयात**

किरकोळ अर्ज क्र.१६२५/२०२६
**सौ.समिधा अधिक एक -वि- निरंक**
पुढील ता.०९.०९.२०२६

## जाहीरनामा/सायटेशन

**अर्जदार :**
१. सौ.समिधा सागर महाजन (लग्नापुवीचे नांव समिधा विकास महाजन)
वय ४२ वर्षे, व्यवसाय - गृहिणी
रा.प्रशांत कॉलनी, अकोली रोड, अकोट, ता.अकोट, जि.अकोला
२. सौ.कल्याणी प्रणव आष्टीकर (लग्नापुवीचे नांव कल्याणी विकास महाजन)
वय ३७ वर्षे, व्यवसाय - गृहिणी
रा.प्लॉट नं.२६, नित्यानंद कॉलनी, अकोली रोड, साईनगर, अमरावती

-- **विरुध्द** --

**गैरअर्जदार :** Nil

सर्वत्र लोकांस सुचित करण्यात येते की, **मयत विकास मनोहरराव महाजन** यांचे दिनांक **१५.०६.२०२६** रोजी **अमरावती** येथे निधन झाले. तसेच त्यांची पत्नी **सौ.शुभांगी विकास महाजन** या दि.**१८.०१.२०१०** रोजी अमरावती येथे मयत झाल्या. **अर्जदार सौ.समिधा सागर महाजन अधिक एक** यांनी वरीलप्रमाणे या कोर्टात सदर्हु मयत यांचे वारसाचे प्रमाणपत्र मिळण्याबाबत APPLICATION UNDER SECTION 2 OF BOMBAY REGULATION ACT CLAUSE VIII OF 1827 FOR GRANT OF LEGAL HEIRSHIP CERTIFICATE प्रमाणे अर्ज दाखल केलेला आहे.

त्यापेक्षा **सौ.समिधा सागर महाजन अधिक एक**वरीलप्रमाणे सदर्हु मयतांचे वारसदार नव्हे असे कोणास समजावण्याचे असेल तर या जाहीरनाम्याचे प्रसिध्दीच्या तारखेपासून एक महिन्याचे आत त्याने या कोर्टात हजर होवून आपल्या हरकती कळवाव्यात आणि या लेखावरुन असे कळविण्यात येते की, जर सदर्हु मुदतीत कोणी योग्य हरकत न दाखविल्यास सदर्हु कोर्ट अर्जदार यांचे हक्काबद्दल लागलीच पुरावा घेवून त्यांचा हक्क साबीत दिसल्यास त्यांना सदर्हु मयत यांचे वारसाचे प्रमाणपत्र देण्यात येईल.

आज दि.**१२.०८.२०२६** रोजी माझ्या सहीने व न्यायालयाच्या शिक्क्यानिधी दिले.

शिक्का

आदेशानुसार,
**सहायक अधीक्षक**
दिवाणी न्यायालय वरिष्ठ स्तर
अमरावती

---

**दिवाणी न्यायालय, वरिष्ठ स्तर, अमरावती**
**वि.श्री.आर.आर.खामतकर ५ वे सह दिवाणी न्यायाधीश (क.स्तर) अमरावती यांचे न्यायालयात**

**किरकोळ अर्ज क्र.१६४०/२०२६**
**रेखा + ३-वि-निरंक**
**पुढील ता.०९.०९.२०२६**

## जाहीरनामा/सायटेशन

**अर्जदार :**
1. **Smt. Rekha Bhimraoji Bambal**
Age 62 years. Occu.: Household
R/o. 29, Sumit Niwas Pawan Nagar, No.1, Gopal Nagar
Behind Deulkar Market, Sai Nagar, S.O. Amravati
2. **Sau. Smita Mahendra Shirpurkar**
Age 42 years. Occu.: Household
Gods Country Wing "F" Flat No. 304
Alalndi Charholi Khurd, Pune
3. **Sau. Shweta Sagar Gohatre**
Age 40 years. Occu.: Household
R/o. Shakuntala Apartment, Shyam Nagar, Amravati
4. **Sumitkumar Bhimraoji Bambal**
Age 38 years. Occu.: Service
R/o. Near Hanuman Mandir, Pavan Nagar,
Near Gopal Nagar, Amravati

**विरुध्द**

**गैरअर्जदार - NIL**

सर्वत्र लोकांस सुचित करण्यात येते की, **मयत Bhimrao Gopalrao Bambal** हे दिनांक १८.०९.२०२४ रोजी अमरावती येथे मयत झाले. अर्जदार **Smt. Rekha Bhimraoji Bambal+3** यांनी वरीलप्रमाणे या कोर्टात सदर्हु मयत यांचे वारसाचे प्रमाणपत्र मिळण्याबाबत **APPLICATION UNDER SECTION 2 OF BOMBAY REGULATION ACT CLAUSE VIII OF 1827 FOR GRANT OF LEGAL HEIRSHIP CERTIFICATE** प्रमाणे अर्ज दाखल केलेला आहे.

त्यापेक्षा **Smt. Rekha Bhimraoji Bambal+3** वरीलप्रमाणे सदर्हु मयतांचे वारसदार नव्हे असे कोणास समजावण्याचे असेल तर या जाहीरनाम्याचे प्रसिध्दीच्या तारखेपासून एक महिन्याचे आत त्याने या कोर्टात हजर होवून आपल्या हरकती कळवाव्यात आणि या लेखावरुन असे कळविण्यात येते की, जर सदर्हु मुदतीत कोणी योग्य हरकत न दाखविल्यास सदर्हु कोर्ट अर्जदार यांचे हक्काबद्दल लागलीच पुरावा घेवून त्यांचा हक्क साबीत दिसल्यास त्यांना सदर्हु मयत यांचे वारसाचे प्रमाणपत्र देण्यात येईल.

आज दिनांक **१४.०८.२०२६** रोजी माझ्या सहीने व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिले.

शिक्का

आदेशानुसार,
**सहायक अधीक्षक**
**दिवाणी न्यायालय वरिष्ठ स्तर, अमरावती**

---

**मा.दिवाणी न्यायाधिश क.स्तर नांदगाव खंडेश्वर यांचे न्यायालयामधील**

**किरकोळ (RMJC) अर्ज क्र.२२५/२०२६** **ने.ता.१६.०९.२०२६**

१. **सुभद्रा रुंजाजी सुरजुसे**
२. **वेणुताई गुलाबराव नेमाडे,** रा.तळेगाव दशासर, ता.धामणगाव रेल्वे, जि.अमरावती
३. **नलिनी अशोकराव सोनोने,** रा.रेल्वे स्टेशन जवळ, आर्वी, ता.आर्वी, जि.वर्धा
४. **मारोती रुंजाजी सुरजुसे**
५. **साहेबराव रुंजाजी सुरजुसे**
६. **प्रशांत रमेश ढाले** क्र.१,४,५ व ६ रा.मंगरुळ चव्हाळा, ता.नांदगाव खंडे, जि.अमरावती
७. **रोशनी राजेश लोणार,**रा.शिवाजी चौक, तिवसा, ता.तिवसा, जि.अमरावती

**// वि //**
**निरंक**

ज्याअर्थी **मयत रुंझाजी अवधुत सुरजुसे** यांचा **मृत्यू दि.२४.११.२००८** मध्ये मंगरुळ चव्हाळा,ता.नांदगाव खंडेश्वर,जि.अमरावती येथे झाला.मयताचे **अर्जदार क्र.१ ही पत्नी, अर्जदार क्र.२ व ३ हया मुली, अर्जदार क्र.४ व ५ ही मुले** असून **अर्जदार क्र. ६ हा नातु व अर्जदार क्र.७ ही मुलगी आहे.** मयत यांचे अर्जदार हेच कायदेशिर वारस आहेत.करिता कायदेशीर वारसदार म्हणून प्रमाणपत्र मिळणेकरिता अर्जदार यांनी विद्यमान न्यायालयामध्ये मुंबई रेग्युलेशन ॲक्ट १८२७ चे कलम ०८ परि.२ अंतर्गत अर्ज सादर केला आहे. त्याअर्थी ज्या कोणास वरील अर्जदारांविरुध्द काही आक्षेप किंवा हरकती घ्यावयाच्या असेल तर त्यांनी नेमलेल्या तारखेस रोजी सकाळी **१०.३०** वाजता मा.दिवाणी न्यायालय, नांदगाव खंडेश्वर येथे न्यायालयात व्यक्तिगत किंवा रितसर निर्दिष्ट केलेल्या वकीलामार्फत हजर रहावे. तसे न केल्यास उक्त अर्जाची सुनावणी होवून निकाल दिला जाईल.

**आज दिनांक १४ ऑगस्ट २०२६** रोजी माझ्या सही व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिले.

शिक्का

आदेशानुसार,
**सहायक अधीक्षक**
मा. दिवाणी न्यायालय, नांदगाव खंडेश्वर

---

## जाहीर नोटीस

आम जनतेस या जाहीर नोटीसीव्दारे कळविण्यात येते की, आमच्या पक्षकार **श्रीमती शकुंतलाबाई माधवराव सरनाईक व त्यांचे पती माधवराव देवराव सरनाईक** यांच्या मालकीच्या फ्लॅट क्र.३०१, विंग-ए,लोटस गार्डन अपार्टमेंट स्कीम, विसावा कॉलनी, कॅम्प, अमरावती चे मूळ **खरेदीखत (दस्त अनुक्रमांक २७९१/२०१४,नोंदणी दिनांक ११/०८/२०१४) हे दिनांक १५/०७/२०२६** रोजी सायंकाळी ७.०० वा.च्या सुमारास विसावा कॉलनी ते वेलकम पॉईंट (नागपूर रोड, अमरावती ) दरम्यान रिक्षाने प्रवास करतांना हरवले आहे.

सदर मुळ खरेदीखत हरवल्याबाबत **गाडगे नगर पोलीस स्टेशन, अमरावती** येथे लेखी तक्रार **दिनांक १७/०८/२०२६ रोजी** नोंदवण्यात आलेली आहे.

जर कोणास सदर मुळ खरेदीखत सापडले असल्यास, त्यांनी ही नोटीस प्रसिध्द झाल्यापासून १५ दिवसाच्या आत खालील पत्यावर संपर्क साधून दस्तऐवज परत करावा. करिता सदरची जाहीर सुचना आम जनतेच्या माहितीस्तव प्रकाशित केली आहे.

**(ॲड.पी.यु.देशमुख)**
**अधिवक्ता**
**पत्ता - खापर्डे बगिचा, डॉ.बेलसरे यांच्या दवाखान्याजवळ, इर्विन चौक, अमरावती**
**मो.८४५९०५२४९०**

---

**दिवाणी न्यायालय, वरिष्ठ स्तर,**
**विद्यमान श्री.आर.आर.खामतकर, ४ थे सह दिवाणी न्यायाधीश (क.स्तर) अमरावती यांचे न्यायालयात**

किरकोळ अर्ज क्र.१६४३/२०२६
**रेहाना अधिक तीन -वि- निरंक**
पुढील ता.११.०९.२०२६

## जाहीरनामा/सायटेशन

**अर्जदार :**
1. Rehana Tayyabali Saifee, Age 72 Yrs. Occu.: Housewife
R/o Bohara Masjid, Saifee Marg, Amravati
2. Najmuddin Tayyabali Saifee, Age 51 Yrs. Occu.:Business
R/o Bohara Masjid, Saifee Marg, Amravati
3. Tasneem Asagarali Lightwala, Age 46 Yrs.Occu.:Housewife
R/o Kamri Marg, Chatri Chowk, Ujjain City,Distt.Ujjain
4. Mustafa Tayyabali Saifee, Age 43 Yrs. Occu.: Job
R/o Bohara Masjid, Saifee Marg, Amravati

-- **विरुध्द** --

**गैरअर्जदार :** Nil

सर्वत्र लोकांस सुचित करण्यात येते की, **मयत** Tayyabali Nisarali Saifee यांचे दिनांक **१७.०७.२०२३** रोजी **अमरावती** येथे निधन झाले. **अर्जदार** Rehana Tayyabali Saifee+3 यांनी वरीलप्रमाणे या कोर्टात सदर्हु मयत यांचे वारसाचे प्रमाणपत्र मिळण्याबाबत APPLICATION UNDER SECTION 2 OF BOMBAY REGULATION ACT CLAUSE VIII OF 1827 FOR GRANT OF LEGAL HEIRSHIP CERTIFICATE प्रमाणे अर्ज दाखल केलेला आहे.

त्यापेक्षा Rehana Tayyabali Saifee+3 वरीलप्रमाणे सदर्हु मयतांचे वारसदार नव्हे असे कोणास समजावण्याचे असेल तर या जाहीरनाम्याचे प्रसिध्दीच्या तारखेपासून एक महिन्याचे आत त्याने या कोर्टात हजर होवून आपल्या हरकती कळवाव्यात आणि या लेखावरुन असे कळविण्यात येते की, जर सदर्हु मुदतीत कोणी योग्य हरकत न दाखविल्यास सदर्हु कोर्ट अर्जदार यांचे हक्काबद्दल लागलीच पुरावा घेवून त्यांचा हक्क साबीत दिसल्यास त्यांना सदर्हु मयत यांचे वारसाचे प्रमाणपत्र देण्यात येईल.

आज दि.**१४.०८.२०२६** रोजी माझ्या सहीने व न्यायालयाच्या शिक्क्यानिधी दिले.

शिक्का

आदेशानुसार,
**सहायक अधीक्षक**
दिवाणी न्यायालय वरिष्ठ स्तर
अमरावती

---

**दिवाणी न्यायालय, वरिष्ठ स्तर,**
**वि.श्री.एस.एस.भिंगारदेव, ८ वे सह दिवाणी न्यायाधीश (क.स्तर) अमरावती**

किरकोळ दिवाणी अर्ज क्र.१३९१/२०२६
**सिंधुताई अजाबराव वानखडे अधिक तीन -वि- निरंक**
पुढील ता.२५.०८.२०२६

## जाहीरनामा/सायटेशन

**अर्जदार :**
1. Sindhutai Ajabrao Wankhade Aged 82 Yrs. Occu.: Household
2. Nitin Ajabrao Wankhade, Aged 59 Yrs. Occu.: Agriculturist
Both R/o Prabhat Colony, Dashara Maidan Road, Amravati
3. Pravin Ajabrao Wankhade, Age 58 Yrs. Occu.: Contractor
R/o Prabodhan Colony, Near Vyankatesh Lawn Swastik Nagar, Amravati
4. Suhas Ajabrao Wankhade, Aged 56 Yrs. Occu.: Pvt.Job
R/o B-10, Ravindra Apartment Near RPTS Surendra Nagar, Nagpur

-- **विरुध्द** --

**गैरअर्जदार :** Nil

सर्वत्र लोकांस सुचित करण्यात येते की, मयत Ajabrao Kashirao Wankhade हे दिनांक **१४.०२.२०२६** रोजी **अमरावती, ता.जि.अमरावती** येथे मयत झाले. अर्जदार Sindhutai Ajabrao Wankhade+3 यांनी वरीलप्रमाणे या कोर्टात सदर्हु मयत यांचे वारसाचे प्रमाणपत्र मिळण्याबाबत APPLICATION UNDER SECTION 2 OF BOMBAY REGULATION ACT CLAUSE VIII OF 1827 FOR GRANT OF LEGAL HEIRSHIP CERTIFICATE प्रमाणे अर्ज दाखल केलेला आहे.

त्यापेक्षा Sindhutai Ajabrao Wankhade+3 वरीलप्रमाणे सदर्हु मयतांचे वारसदार नव्हे असे कोणास समजावण्याचे असेल तर या जाहीरनाम्याचे प्रसिध्दीच्या तारखेपासून एक महिन्याचे आत त्याने या कोर्टात हजर होवून आपल्या हरकती कळवाव्यात आणि या लेखावरुन असे कळविण्यात येते की, जर सदर्हु मुदतीत कोणी योग्य हरकत न दाखविल्यास सदर्हु कोर्ट अर्जदार यांचे हक्काबद्दल लागलीच पुरावा घेवून त्यांचा हक्क साबीत दिसल्यास त्यांना सदर्हु मयत यांचे वारसाचे प्रमाणपत्र देण्यात येईल.

आज दिनांक **१३.०८.२०२६** रोजी माझ्या सहीने व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिले.

शिक्का

आदेशानुसार,
**सहायक अधीक्षक**
दिवाणी न्यायालय वरिष्ठ स्तर
अमरावती

---

**दिवाणी न्यायालय, वरिष्ठ स्तर, अमरावती**
**वि.श्री.एस.एस.भिंगारदेव ८ वे सह दिवाणी न्यायाधीश (क.स्तर) अमरावती यांचे न्यायालयात**

**किरकोळ अर्ज क्र.१६७१/२०२६**
**Shital Milind Lad+8 Versus NIL**
**पुढील ता.२८.०९.२०२६**

## जाहीरनामा/सायटेशन

**Applicants :-**
1. **Shital Milind Lad**, Aged about 37 Yrs. Occu.: Household
R/o. Bari Pura, Juni Wasti, Badnera, Tq. & Dist. Amravati
2. **Maithili Milind Lad** (minor)
Aged about 14 Yrs. Occu.: Education,
R/o. Bari Pura, Juni Wasti, Badnera, Tq. & Dist. Amravati
3. **Ojaswi Milind Lad** (minor)
Aged about 13 Yrs. Occu.: Education,
R/o. Bari Pura, Juni Wasti, Badnera, Tq. & Dist. Amravati
4. **Raghav Milind Lad** (minor),
Aged about 13 Yrs. Occu.: NIL
R/o. Bari Pura, Juni Wasti, Badnera, Tq. & Dist. Amravati
Applicant no. 2 to 4 through their natural guardian Mother, i.e. Applicant No. 1
5. **Murlidhar Raghunathrao Lad**,
Aged about 75 Yrs. Occu.: Father,
R/o. Bari Pura, Juni Wasti, Badnera, Tq. & Dist. Amravati
6. **Mamta Prashant Ikhar,**
Aged about 39 Yrs. Occu.: Household,
R/o. Ward No.03, Kurha, Tq. Tiosa, Dist. Amravati
7. **Mukta Gajanan Petle,** Aged about 41 Yrs. Occu.: Household,
R/o. 41, Prabhujunj, Sant Gadge Baba Colony, Mardi Road, Amravati, Tq. & Dist. Amravati.
8. **Sampada Dilip Ikhar,** Aged about 46 Yrs., Occu.: Household,
R/o. Arvi, Tq. Arvi, Dist. Wardha
9. **Seema Pralhad Behar,** Aged about 35 Yrs., Occu.: Household,
R/o. FL-E2-608, Nirwan Viva, NR-1112
13 (part) behind ashhaverli, Ambegaon Bk.
Part Haveli, Pune

--VERSUS--

**Non-Applicant** - NIL

सर्वत्र लोकांस सुचित करण्यात येते की, **मयत Shalini Murlidharrao Lad** हया दिनांक १२.०३.२०१४ रोजी अमरावती येथे मयत झाले.अर्जदार **Shital Milind Lad+ 8** यांनी वरीलप्रमाणे या कोर्टात सदर्हु मयत यांचे वारसाचे प्रमाणपत्र मिळण्याबाबत **APPLICATION UNDER SECTION 2 OF BOMBAY REGULATION ACT CLAUSE VIII OF 1827 FOR GRANT OF LEGAL HEIRSHIP CERTIFICATE** प्रमाणे अर्ज दाखल केलेला आहे.

त्यापेक्षा **Shital Milind Lad+ 8** वरीलप्रमाणे सदर्हु मयतांचे वारसदार नव्हे असे कोणास समजावण्याचे असेल तर या जाहीरनाम्याचे प्रसिध्दीच्या तारखेपासून एक महिन्याचे आत त्याने या कोर्टात हजर होवून आपल्या हरकती कळवाव्यात आणि या लेखावरुन असे कळविण्यात येते की, जर सदर्हु मुदतीत कोणी योग्य हरकत न दाखविल्यास सदर्हु कोर्ट अर्जदार यांचे हक्काबद्दल लागलीच पुरावा घेवून त्यांचा हक्क साबीत दिसल्यास त्यांना सदर्हु मयत यांचे वारसाचे प्रमाणपत्र देण्यात येईल.

आज दिनांक **१४.०८.२०२६** रोजी माझ्या सहीने व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिले.

शिक्का

आदेशानुसार,
**सहायक अधीक्षक**
दिवाणी न्यायालय वरिष्ठ स्तर, अमरावती

---

## जाहीर नोटीस

**दिवाणी प्रक्रिया संहित कलम ५ नियम २० अंतर्गत**
**मा.दिवाणी न्यायाधिश क.स्तर नांदगाव खंडेश्वर यांचे न्यायालयामधील**

**रुख्माबाई गोविंदराव बावने**
--- **वि.** ---
**ज्योती हरीचंद्र कोल्हे**

**दि.कि.अर्ज क्र.१५५/२०२५** **ने.ता.१६/०९/२०२६**

**गैरअर्जदार नामे -** **१. अनिल गोविंदराव बावने (गैरअर्जदार क्र.४)**
**रा. देवी नगर, विट भट्टी जवळ, कॅम्प, अमरावती ता.जि.अमरावती**

न्यायालयाच्या समाधानासाठी हे सिध्द झाले आहे की, वर उल्लेख केलेल्या प्रतिवादी नामे यांना नियमित नोटीस पाठविली असता त्या तामिल होत नाहीत म्हणुन दिवाणी प्रकिया संहिता चे आदेश ५ नियम २० अंतर्गत ही घोषणा त्याच्या विरुध्द जारी करण्यात येत आहे आणि त्यांना १६/०९/२०२६ रोजी सकाळी १०.३० वाजता वैयक्तिकरित्या किंवा त्यांच्या वकिलांमार्फत दिवाणी न्यायालय, नांदगाव खंडेश्वर, जि.अमरावती येथे हजर राहावे.

लक्षात ठेवा की, जर तो/ती आधी उल्लेख केलेल्या दिवशी हजर राहिला/राहिली नाहीत तर, वरील प्रकरणाची सुनावणी त्यांच्या अनुपस्थित कायद्यानुसार केली जाईल आणि निर्णय यांच्या गैरहजेरीमध्ये दिला जाईल.

संबंधिताची स्वाक्षरी आणि शिक्यानिशी शेरा नोंदवावा.

शिक्का

**आदेशानुसार,**
**प्र.सहायक अधीक्षक**
**मा.दिवाणी न्यायालय, नांदगाव खंडेश्वर**

---

## जाहीर नोटीस

प्रो.नं. २०४५/२०२६
दिवाणी न्यायालय, व.स्तर, दर्यापूर
दि.१८.०८.२०२६

**वि.दिवाणी न्यायालय (व.स्तर) दर्यापूर जि.अमरावती येथील**
**एम.ए.शिलार, दिवाणी न्यायाधीश (व.स्तर) यांचे न्यायालयात**

किरकोळ अर्ज क्र.३३८/२०२६ दिनांक २३.०९.२०२६

**अर्जदार -**
१. **प्रमोद शंकरराव येवले,** वय ६४ वर्षे, धंदा - शेती
२. **रावसाहेब शंकरराव येवले,** वय ५८ वर्षे, धंदा - शेती
दोन्ही रा.चिपर्डा, ता.दर्यापूर, जि.अमरावती

--- **विरुध्द** ---

**गैरअर्जदार-** **निरंक**

या जाहीर नोटीसद्वारे सर्वांना कळविण्यात येते की, **विमल शंकरराव येवले** हया दिनांक **३१.०१.२०२६** रोजी मरण पावल्या आहेत.

अर्जदार यांनी मृतकाचे वारस असल्याबाबत **कलम २ बॉम्बे रेग्युलेशन ॲक्ट प्रमाणे** वारस प्रमाणपत्र मिळणेबाबत न्यायालयात अर्ज केला आहे. जर कोणास वारसाचे प्रमाणपत्र देण्याबाबत काही आक्षेप असेल तर त्यांनी नोटीस प्रसिध्द झाल्यापासून ३० दिवसांचे आत आपला आक्षेप सादर करावा. अन्यथा अर्जदारांना मृतकाचे वारस ठरविण्यात येऊन त्यांना वारस प्रमाणपत्र देण्यात येईल.

आज दि.१८.०८.२०२६ रोजी माझ्या सहीने व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिले.

शिक्का

**आदेशानुसार**
सहा.अधीक्षक (प्रशासन)
दिवाणी न्यायालय, व.स्तर, दर्यापूर

---

**दिवाणी न्यायालय, वरिष्ठ स्तर,**
**वि.श्री.एस.एस.भिंगारदेव, ८ वे सह दिवाणी न्यायाधीश (क.स्तर) अमरावती**

किरकोळ दिवाणी अर्ज क्र.१६३८/२०२६
**सुनिता आनंदराव बालचक्र -वि- निरंक**
पुढील ता.१७.०९.२०२६

## जाहीरनामा/सायटेशन

**अर्जदार :**
1. Sunita Anandrao Bhalchakra Aged 76 Yrs. Occu.: Household
R/o Near Ambhore Guruji House, Rahul Nagar, Bichhu Tekadi, Amt.
2. Sudha Suresh Parve, Aged 56 Yrs. Occu.: Labourer
R/o Chapale Dawakhana Rahul Nagar,Bichhu Tekadi, Amravati

-- **विरुध्द** --

**गैरअर्जदार :** Nil

सर्वत्र लोकांस सुचित करण्यात येते की, मयत Anand Dalpatiji Bhalchakra हे दिनांक **२१.०४.२०२०** रोजी **अमरावती, ता.जि.अमरावती** येथे मयत झाले. अर्जदार Sunita Anandrao Bhalchakra + Others यांनी वरीलप्रमाणे या कोर्टात सदर्हु मयत यांचे वारसाचे प्रमाणपत्र मिळण्याबाबत APPLICATION UNDER SECTION 2 OF BOMBAY REGULATION ACT CLAUSE VIII OF 1827 FOR GRANT OF LEGAL HEIRSHIP CERTIFICATE प्रमाणे अर्ज दाखल केलेला आहे.

त्यापेक्षा Sunita Anandrao Bhalchakra + Others वरीलप्रमाणे सदर्हु मयतांचे वारसदार नव्हे असे कोणास समजावण्याचे असेल तर या जाहीरनाम्याचे प्रसिध्दीच्या तारखेपासून एक महिन्याचे आत त्याने या कोर्टात हजर होवून आपल्या हरकती कळवाव्यात आणि या लेखावरुन असे कळविण्यात येते की, जर सदर्हु मुदतीत कोणी योग्य हरकत न दाखविल्यास सदर्हु कोर्ट अर्जदार यांचे हक्काबद्दल लागलीच पुरावा घेवून त्यांचा हक्क साबीत दिसल्यास त्यांना सदर्हु मयत यांचे वारसाचे प्रमाणपत्र देण्यात येईल.

आज दिनांक **१२.०८.२०२६** रोजी माझ्या सहीने व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिले.

शिक्का

आदेशानुसार,
**सहायक अधीक्षक**
दिवाणी न्यायालय वरिष्ठ स्तर, अमरावती

---

**दिवाणी न्यायालय, वरिष्ठ स्तर,**
**विद्यमान श्री.ए.बी.कट्टे, २ रे सह दिवाणी न्यायाधीश (क.स्तर) अमरावती यांचे न्यायालयात**

किरकोळ अर्ज क्र.१६६९/२०२६
**निर्मला व ईतर -वि- निरंक**
पुढील ता.१७.०९.२०२६

## जाहीरनामा/सायटेशन

**अर्जदार :**
१. निर्मला रामचंद्र डोईफोडे, वय ६५ वर्षे, व्यवसाय - घरकाम
रा.शासकीय वसाहत नांदगांव पेठ, अमरावती
२. पद्मा प्रदीप ढोके, वय ४६ वर्षे, व्यवसाय - घरकाम
रा.मु.पो.कारखेडा, जि.वाशिम
३. पंकज रामचंद्र डोईफोडे, वय ३८ वर्षे, व्यवसाय - मजुरी
रा.झोपडपट्टी नांदगांव पेठ, ता.जि.अमरावती

-- **विरुध्द** --

**गैरअर्जदार :** Nil

सर्वत्र लोकांस सुचित करण्यात येते की, **मयत रामचंद्र बळीराम डोईफोडे** यांचे दिनांक **२५.०७.२०२३** रोजी **अमरावती** येथे निधन झाले. अर्जदार **निर्मला व ईतर विरुध्द निरंक** यांनी वरीलप्रमाणे या कोर्टात सदर्हु मयत यांचे वारसाचे प्रमाणपत्र मिळण्याबाबत APPLICATION UNDER SECTION 2 OF BOMBAY REGULATION ACT CLAUSE VIII OF 1827 FOR GRANT OF LEGAL HEIRSHIP CERTIFICATE प्रमाणे अर्ज दाखल केलेला आहे.

त्यापेक्षा **निर्मला व ईतर विरुध्द निरंक** वरीलप्रमाणे सदर्हु मयतांचे वारसदार नव्हे असे कोणास समजावण्याचे असेल तर या जाहीरनाम्याचे प्रसिध्दीच्या तारखेपासून एक महिन्याचे आत त्याने या कोर्टात हजर होवून आपल्या हरकती कळवाव्यात आणि या लेखावरुन असे कळविण्यात येते की, जर सदर्हु मुदतीत कोणी योग्य हरकत न दाखविल्यास सदर्हु कोर्ट अर्जदार यांचे हक्काबद्दल लागलीच पुरावा घेवून त्यांचा हक्क साबीत दिसल्यास त्यांना सदर्हु मयत यांचे वारसाचे प्रमाणपत्र देण्यात येईल.

आज दि.**१२.०८.२०२६** रोजी माझ्या सहीने व न्यायालयाच्या शिक्क्यानिधी दिले.

शिक्का

आदेशानुसार,
**सहायक अधीक्षक**
दिवाणी न्यायालय वरिष्ठ स्तर, अमरावती

# मरणोपरांत धिरजने दिले इतरांना जीवनदान

## किडनी आणि यकृत दान
## अवयव दान करण्याचा कलावते कुटुबियांचा धाडसी निर्णय

**चांदुर रेल्वे/वार्ताहर**

आपल्या मित्रांसोबत नाथ-बद्रीनाथ यात्रेला जाऊन आनंदाने घरी परतलेल्या ३० वर्षीय धीरज संतोष कलावते यांना कदाचित कल्पनाही नव्हती की हा त्यांचा शेवटचा प्रवास ठरेल. तीर्थयात्रेवरून परतताना झालेल्या रस्ते अपघातात गंभीर जखमी न झालेल्या धीरज यांनी मंगळवार, १८ तारखेला रुग्णालयात अखेरचा श्वास घेतला. पण मृत्यूनंतरही, धीरजचा जीव इतरांच्या शरीरात श्वासाच्या रूपात जिवंत राहील. आपल्या सर्वात प्रिय सदस्याला गमावण्याच्या असह्य दुःखात, धीरजचे अवयव दान करण्याचा धाडसी निर्णय घेऊन त्याच्या कुटुंबीयांनी माणुसकीचे एक अनोखे उदाहरण घालून दिले आहे.

धीरज संतोष कलावते (३०, चांदूर रेल्वे) आपल्या मित्रांसह केदारनाथ-बद्रीनाथ दर्शनासाठी गेला होता.१२ ऑगस्ट रोजी, पाच तरुण दर्शनानंतर गाडीने घरी परतत होते. दरम्यान, तळेगाव-चांदूर रेल्वे मार्गावरील शेंदुरजना खुर्द गावाजवळ त्यांच्या गाडीचा एक भीषण रस्ते अपघात झाला. अपघात इतका भीषण होता की, यात धिरजचा मित्र ललीत युवराज सवाने (वय ३० वर्ष) या तरुणाचा जागीच मृत्यू झाला, तर धीरजच्या डोक्याला आणि छातीला गंभीर दुखापत झाली.



अपघातानंतर, धीरजला उपचारासाठी गंभीर अवस्थेत अमरावती येथील खाजगी रुग्णालय, रिम्समध्ये दाखल करण्यात आले. तो डॉक्टरांच्या देखरेखीखाली आहे.उपचार सुरू करण्यात आले, परंतु त्याच्या प्रकृतीत अपेक्षेप्रमाणे सुधारणा झाली नाही. सतत उपचार आणि औषधोपचार करूनही, त्याची प्रकृती गंभीरच राहिली. कुटुंबीयांच्या इच्छेनुसार, सुमारे दोन दिवसांपूर्वी धीरजला रेडियंट हॉस्पिटलमध्ये दाखल करण्यात आले. येथेही, डॉक्टरांच्या टीमने त्याला वाचवण्यासाठी सर्वतोपरी प्रयत्न केले. धीरजला आयसीयूमध्ये तज्ज्ञ डॉक्टरांच्या देखरेखीखाली ठेवण्यात आले होते. तथापि, त्याची प्रकृती गंभीरच राहिली. मंगळवार, १८ ऑगस्ट रोजी, डॉक्टरांनी कुटुंबीयांना धीरजच्या गंभीर प्रकृतीबद्दल आणि त्याच्या बरे होण्याची शक्यता खूपच कमी असल्याचे सांगितले. हे ऐकून कुटुंब पूर्णपणे खचून गेले. काही दिवसांपूर्वीच तीर्थयात्रेवरून सुखरूप परतण्याची आशा बाळगलेला मुलगा, भाऊ आणि कुटुंबाचा आधार गमावण्याचा विचार असह्य होता. पण या कठीण आणि भावनिक परिस्थितीत, कलावते कुटुंबाने एक असा निर्णय घेतला ज्यामुळे धीरजच्या आयुष्याला एक नवीन अर्थ प्राप्त झाला. जड अंतःकरणाने, कुटुंबाने धीरजचे अवयव दान करण्यास संमती दिली. कुटुंबाने ठरवले की जरी धीरज त्यांच्यात राहणार नसला तरी, त्याचे अवयव गरजू व्यक्तीला नवीन जीवन देऊ शकतील. रुग्णालयातील डॉक्टरांनीही कुटुंबाच्या या निर्णयाला मानवतेसाठी उचललेले एक अत्यंत महत्त्वाचे पाऊल म्हटले आहे.

### धीरज कुटुंबाचा रक्षक होता

धीरज फक्त ३० वर्षांचा आणि अविवाहित होता. तो एक खाजगी नोकरी करत असे आणि कुटुंबाच्या पिठाच्या गिरणीचा व्यवसायही सांभाळत असे. चांदूर रेल्वे स्टेशनजवळ राहणाऱ्या धीरजच्या कुटुंबात त्याचे आई-वडील, एक धाकटी बहीण आणि दोन चुलत भावंडे आहेत. त्यांचे कुटुंब एकत्र राहत होते. सुमारे दोन महिन्यांपूर्वी त्याच्या काकांचे निधन झाले आणि कुटुंबाची मोठी जबाबदारी त्याच्या खांद्यावर आली. पण नियतीने वेगळाच डाव साधला होता. केदारनाथ-बद्रीनाथच्या तीर्थयात्रेवरून परत येत असताना झालेल्या एका अपघाताने संपूर्ण कुटुंबाचे आयुष्य बदलून टाकले. काही दिवसांपूर्वीच धीरजच्या तीर्थयात्रेवरून परतल्याने जे घर आनंदित झाले होते, तेच घर आता हतबल झाले आहे.

### ब्लेडियंट सुपरस्पेशालिटी हॉस्पिटल

रेडियंट हॉस्पिटलचे डॉ. सिकंदर अडवाणी आणि डॉ. हर्षल लालकारिया यांनी अवयवदान प्रक्रियेसंदर्भात नागपूर आणि इतर संबंधित तज्ज्ञ डॉक्टरांशी तात्काळ संपर्क साधला. धीरजच्या किडनी आणि यकृत प्रत्यारोपणाची प्रक्रिया सुरू करण्यात आली. स्वादुपिंडासाठी आवश्यक असलेल्या चाचण्या आणि वैद्यकीय प्रक्रिया रात्री उशिरापर्यंत सुरू होत्या. तथापि, अपघातात डोक्याला आणि छातीला झालेल्या गंभीर दुखापतींमुळे मेंदू आणि हृदय प्रत्यारोपण अशक्य मानले गेले. धीरजची किडनी आणि यकृत आता प्रत्यारोपणाची वाट पाहणाऱ्या रुग्णांना नवी आशा देऊ शकतात. रस्ते अपघातात प्राण गमावलेल्या धीरजचे अवयव दुसऱ्या एका कुटुंबाच्या जीवनात एक नवी पहाट आणतील.

### नागपूरला नेण्यासाठी एक हरित मार्गिका

धीरजचे अवयव वेळेवर नागपूरला पोहोचवण्यासाठी ग्रीन कॉरिडॉर स्थापित करण्यात आली. नागपूरहून तज्ज्ञ डॉक्टरांचे एक पथक बुधवार, १९ ऑगस्ट रोजी सकाळी ८ वाजण्याच्या सुमारास अमरावतीला पोहोचले. आवश्यक वैद्यकीय प्रक्रिया पूर्ण झाल्यानंतर, अवयव सुरक्षितपणे आणि कमीत कमी वेळेत पोहोचवण्याची तयारी झाली. रुग्णालय प्रशासनाने संबंधित पोलीस आणि प्रशासकीय अधिकाऱ्यांना याची माहिती दिली.अधिकाऱ्यांच्या सूचनेनुसार रुग्णालयापासून नागपूरपर्यंतचा मार्ग निश्चित होवून रुग्णवाहिकेला कोणताही अडथळा येणार नाही आणि महत्त्वाचे अवयव निर्धारित वेळेत प्रत्यारोपण केंद्रापर्यंत पोहोचले.



## संक्षिप्त

### नागपंचमी जत्रेला साडेतीनशे वर्षांची परंपरा

**अचलपूर**-शहरातील ऐतिहासिक केशव नारायण मंदिर परिसरात नागपंचमीनिमित्त गेल्या साडेतीनशे वर्षापासून भव्य जत्रेच्या आयोजन केल्या जाते. ही जत्रा नुकतीच संपन्न झाली. श्रावण महिन्यातल्या पहिला उत्साह नाग पंचमीनिमित्त शहरातील सापन नदीच्या काठावर नागपंचमीच्या दुसऱ्या सदर एक दिवसीय जत्रा भरली.गृहपयोगी साहित्य असा अन्य वस्तूची खरेदी भक्तांनी केली.वेगवेगळ्या ठिकाणावरून नागदेवतेच्या प्रतिमा असलेल्या पालख्या शहराच्या विविध भागातून मार्ग क्रमन करून मंदिराच्या जवळच्या यात्रेत पोहोचल्या. हजारोच्या संख्येने भाविक भक्तांनी या यात्रेमध्ये भगवान शेषनाग व केशव नारायण यांचे दर्शन घेतले. यावेळी अचलपूर पोलीस स्टेशनचा तगडा बंदोबस्त होता. यावेळी नगर परिषद नगराध्यक्ष रुपाली माथने,नगरसेवक अभय माथने,नगरसेवक चिंटू बहोरिया,देविदास इंगळे यांच्यासह श्री केशव नारायण मंदिर येथील सदस्य मंडळी , भावीक - भक्तांनी अथक परिश्रम घेतले.

### डॉ. शंतनु वाटाणे यांना मानद पीएच.डी. पदवी



**आसेगाव पूर्णा**-येथील रहिवासी शांतनु दिलीप वाटाणे यांनी डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, छत्रपती संभाजीनगर येथून मास कम्युनिकेशन अँड जर्नलिझम विषयात मानद पीएच.डी. पदवी संपादन केली. त्यांच्या या शैक्षणिक यशाबद्दल सर्वत्र अभिनंदन होत आहे.वाटाणे यांच्या संशोधनाचा विषय 'कॉर्पोरेट पब्लिक रिलेशन्स ऑफ इंडस्ट्रीज : इन मुंबई अँड औरंगाबाद – अ कम्पॅरेटिव्ह स्टडी' असा आहे. या संशोधनामध्ये मुंबई आणि छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद) या दोन प्रमुख औद्योगिक केंद्रांमधील कॉर्पोरेट जनसंपर्काच्या कार्यपद्धतीचा तुलनात्मक अभ्यास करण्यात आला आहे. हे संशोधन डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाच्या मास कम्युनिकेशन अँड जर्नलिझम विभागातील संशोधन मार्गदर्शक डॉ. व्ही. एल. धारस्कर यांच्या मार्गदर्शनाखाली पूर्ण करण्यात आले.त्यांच्या या यशामुळे कुटुंबीय, मित्रपरिवार तसेच आसेगाव पूर्णा परिसरातून त्यांच्यावर अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.

### वरुडा येथे युवकाची गळफास घेऊन आत्महत्या



**तिवसा**-तिवसा पोलीस ठाण्याच्या हद्दीत देणाऱ्या ग्राम वरुडा येथील शेतकरी कुटुंबातील एका ३५ वर्षीय युवकाने शेतात गळफास घेऊन आत्महत्या केल्याची घटना १९ ऑगस्ट रोजी सायंकाळी ६.३० वाजताचे दरम्यान उघडकीस आली.मनीष प्रकाश पाथरे असे आत्महत्या करणाऱ्या युवकाचे नाव आहे. माहितीनुसार मनीष पाथरे नेहमीप्रमाणे शेतात गेला होता. सायंकाळ होऊन सुद्धा घरी परतला नसल्याने घरच्यांनी शेतात जाऊन पाहिले असता निंबाच्या झाडाला गळफास घेतलेल्या अवस्थेत आढळून आला. घटनेची माहिती पोलीसांना देण्यात आली पोलीसांनी घटनास्थळाचा पंचनामा करत मार्ग दाखल केला मात्र मनीष पाथरे यांच्या आत्महत्याचे कारण समजू शकले नाही.पुढील तपास तिवसा पोलीस करीत आहे.

## पथ्रोट येथे सेंट्रल बँक ऑफ इंडियाचे कृषी कर्ज वितरण शिबीर


**अमरावती/का.प्र.**

सेंट्रल बँक ऑफ इंडिया यांच्या वतीने अचलपूर तालुक्यातील पथ्रोट येथे 'कृषी कर्ज वितरण शिबीर' आयोजित करण्यात आले या शिबिरात शेतकऱ्यांना सुमारे २० कोटी रुपयांच्या कृषी कर्जाचे वितरण करण्यात आले. शिबिराला अचलपूर व अंजनगाव तालुक्यातील शेतकरी तसेच विविध बचत गटांशी संबंधित सुमारे ८०० महिला सहभागी झाल्या.

पथ्रोट येथील प्रसन्न लॉनवर आयोजित या कार्यक्रमात सेंट्रल बँक ऑफ इंडियाच्या केंद्रीय कार्यालयाचे उपमहाव्यवस्थापक पुरुषोत्तम मीणा प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी नाबार्डच्या जिल्हा विकास व्यवस्थापक रश्मिता पंचाले होत्या.अचलपूरच्या गटविकास अधिकारी कल्पना जायभाये, कोमल तायडे तसेच सेंट्रल बँक ऑफ इंडियाचे विभागीय व्यवस्थापक सुनील पाण्डेय यांच्यासह बँकेचे अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.अचलपूर व अंजनगाव तालुक्यातील शेतकरी तसेच विविध बचत गटांशी संबंधित सुमारे ८०० महिला या शिबिरासाठी उपस्थित होत्या.सुनील पाण्डेय यांनी प्रास्ताविकात सेंट्रल बँक ऑफ इंडियामार्फत कृषी व ग्रामीण क्षेत्राच्या विकासासाठी राबविण्यात येणाऱ्या विविध उपक्रमांची माहिती दिली.संचालन निलेश वाघमारे यांनी केले,अग्रणी बँक व्यवस्थापक नरेश हेडाऊ यांनी तर आभार मानले.

## मेळघाटात सावकारीचे नवे फंडे
### पावतीवर १.५ टक्के व्याज, वसुली मात्र ५ टक्केपर्यंत!

**मेळघाट/वार्ताहर**



गोरगरीब आणि शेतकऱ्यांच्या अडचणीचा फायदा घेत मेळघाटातील काही सावकारांकडून पद्धतशीर आर्थिक लूट सुरू असल्याचे धक्कादायक प्रकार समोर आले आहेत. दागिने गहाण ठेवण्यासाठी आलेल्या निरक्षर कर्जदारांना दिल्या जाणाऱ्या पावतीत आणि प्रत्यक्षात वसूल केल्या जाणाऱ्या व्याजात मोठी तफावत असल्याचे दिसून येत आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, कर्जदार जेव्हा दागिने गहाण ठेवण्यासाठी सावकाराकडे जातात तेव्हा त्यांना एक पावती दिली जाते. त्या पावतीवर कर्जाची रक्कम आणि 'शेकडा मासिक व्याज दीड टक्के म्हणजेच फक्त १५ रुपये' असे दर्शवले जाते. विशेष म्हणजे पावतीवर सावकाराची सही नसते, केवळ कर्जदाराचीच सही घेतली जाते. दुसरे म्हणजे पावतीवर कर्ज देणाऱ्याचे पूर्ण नाव, पत्ता आणि गाव यांचा उल्लेखही केला जात नाही. फक्त नाव लिहून व्यवहार केला जातो.

स्थानिक नागरिकांनी संबंधित अधिकाऱ्यांनी अशा सावकारांच्या कागदपत्रांची नियमाप्रमाणे सखोल चौकशी करावी अशी मागणी केली आहे.'व्यवहार पारदर्शक असावा, पावतीवर सावकाराची सही असावी आणि इन्कम टॅक्सला खरी माहिती द्यावी ही त्यांची जबाबदारी आहे,' असे मत व्यक्त होत आहे.प्रशासनाने तात्काळ लक्ष घालून अशा गैरव्यवहार करणाऱ्या सावकारांना तंबी द्यावी, अशी अपेक्षा मेळघाटातील नागरिक व्यक्त करत आहेत.

### निरक्षरतेचा गैरफायदा

सहा महिन्यांनी जेव्हा कर्जदार मुद्दल फेडण्यासाठी येतो तेव्हा त्याच्या निरक्षरतेचा फायदा घेत प्रत्यक्षात सोन्यावरील दागिन्यांसाठी साडेतीन टक्के आणि चांदीच्या दागिन्यांसाठी पाच टक्के मासिक व्याजाची वसुली केली जाते. पावतीवर मात्र दीड टक्केच दाखवले असल्याने कर्जदाराकडे बोलायला पुरावा राहत नाही.

### शासनाचीही फसवणूक

अशा प्रकारच्या बनावट पावत्या केवळ कर्जदारांचीच नव्हे तर शासनाचीही फसवणूक करण्यासाठी वापरल्या जात असल्याचा आरोप होत आहे. लाखो रुपयांचा हा व्यवहार कागदावर कमी दाखवून इन्कम टॅक्स विभागालाही दिशाभूल करण्याचा प्रयत्न होत असण्याची शक्यता नाकारता येत नाही.

## राहुल चव्हाण ठरले उत्कृष्ट अधिकारी;जिल्हाधिकाऱ्यांच्या हस्ते गौरव

**अंजनगाव सुर्जी/वार्ताहर**



येथील तहसील कार्यालयात कार्यरत असलेले महसूल साहाय्यक अधिकारी राहुल चव्हाण यांनी शासकीय कामकाजात केलेल्या उत्कृष्ट आणि उल्लेखनीय कामगिरीची शासनाने दखल घेतली आहे.

स्वातंत्र्य दिनाच्या निमित्ताने अमरावती येथे जिल्हाधिकारी कार्यालयात आयोजित मुख्य ध्वजारोहण सोहळ्यात जिल्हाधिकारी यांच्या हस्ते राहुल चव्हाण यांना 'उत्कृष्ट सहायक महसूल अधिकारी' म्हणून प्रशस्तीपत्र देऊन सन्मानित करण्यात आले.राहुल चव्हाण हे गेल्या अनेक वर्षांपासून अंजनगाव सुर्जी तहसील कार्यालयात प्रामाणिकपणे व कर्तव्यदक्षतेने सेवा बजावत आहेत. महसूल विभागातील विविध शासकीय योजना, शेतकऱ्यांचे प्रश्न, अभिलेख व्यवस्थापन तसेच नागरिकांच्या तक्रारींचे जलद निवारण करण्यात त्यांनी नेहमीच तत्परता दाखवली आहे. त्यांच्या याच उत्कृष्ट कामकाजामुळे तहसील कार्यालयाच्या कामकाजाला गती मिळाली असून सामान्य नागरिकांमध्येही त्यांच्याविषयी आदराची भावना आहे.या पुरस्कारामुळे अंजनगाव सुर्जी तहसील कार्यालयाच्या शिरपेचात मानाचा तुरा रोवला गेला असून संपूर्ण अंजनगाव तालुक्याच्या नावलौकिकात भर पडली आहे.त्यांच्या या गौरवाबद्दल अंजनगाव सुर्जीचे तहसीलदार, तसेच संपूर्ण महसूल विभागातील अधिकारी व कर्मचारी वर्गाच्या वतीने राहुल चव्हाण यांचे मनःपूर्वक अभिनंदन करण्यात आले असून पुढील वाटचालीस शुभेच्छा देण्यात आल्या आहेत. या सन्मानामुळे काम करण्याची आणखी ऊर्जा मिळाली असून यापुढेही नागरिकांच्या सेवेसाठी अधिक जोमाने काम करणार असल्याची भावना सत्कारानंतर राहुल चव्हाण यांनी व्यक्त केली.

## पावसाची हुलकावणी;शेती पिकाला फटका

**नांदगाव खंडेश्वर/वार्ताहर**



तालुक्यासह शहरातील परिसरात पावसाने वीस दिवसापासून विश्रांती घेऊन हुलकावणी दिली आहे. सोयाबीन फुलोरा अवस्थेत असल्याने सोयाबीन सह कपाशी व तूर यासह इतरही पिकाला पावसाची गरज निर्माण झाली आहे.निसर्गाच्या लहरीपणाचा शेती पिकाला मोठ्या प्रमाणात फटका बसत आहे.तेव्हा शेतकऱ्याची काळजी वाढली असून शेतकऱ्याच्या नजरा आकाशाकडे लागून आहे.

तालुक्यात ३० जुलै रोजी अतिवृष्टी होऊन पावसाने कहर केला होता. काही तासांमध्ये २९६ मिली पाऊस झाल्याने पिके खरडून गेली होती.तेव्हापासून सरासरी वीस दिवस होऊनही तालुक्यात पावसाची दमदार हजेरी नाही.पावसाअभावी पिके कोमेजून जात असल्याने शेतकऱ्यावर पुन्हा नैसर्गिक संकट घोंगावत असल्याचे दिसून येते. ३० जुलैला तालुक्यात पावसाने धुमाकूळ घातला असून हल्ली रोज ढगाळ वातावरण असून सुद्धा पाऊस नाही.याचा पिकाच्या वाढीवर व सोयाबीनला फुलोरा अवस्थेत असल्याने धोका निर्माण होत आहे. सिंचनाची सुविधा असलेल्या शेतामध्ये कपाशी पिकाला तुषार सिंचन चालू करून पीक वाचविण्याची शेतकऱ्याची धडपड सुरू आहे.परंतु विजेच्या लपंडावाने विहिरीला पाणी असून सुद्धा शेतकरी हताश आहे. कापूस, सोयाबीन, तूर या प्रमुख पिकासह इतरही पिकाचे पावसाभावी नुकसान होण्याच्या मार्गावर असल्याने शेतकरी हवालदिल झाला आहे.आर्थिक संकटात असून सुद्धा उमेदीने पुन्हा कर्जबाजारी होऊन बियाणे खते यावर खर्च करून पेरणी केली. परंतु सोयाबीनचे पीक फुलोर व शेंगा धरण्याच्या अवस्थेत असताना पाऊस थांबल्याने जमिनीतील ओलावा झपाट्याने कमी होत आहे. तेव्हा पिकाच्या वाढीवर त्याचा विपरीत परिणाम होण्याची भीती व्यक्त केली जात आहे. हल्ली पाऊस नसल्यामुळे सोयाबीन उत्पादनात घट होण्याची दाट शक्यता निर्माण झाली आहे.येत्या आठवड्यात पाऊस येऊन पिकाला जीवदान मिळाले नाही तर उत्पादनात घट येऊन पेरणीसह बियाणे खते यावर केलेला खर्च वाया जाण्याची भीती व्यक्त होत आहे.

## अमराठी ऑटोचालकांना मिळाले मराठी भाषेचे प्रमाणपत्र
### आरटीओ विभागाचा पुढाकार

**अमरावती/का.प्र.**



राज्यात येणाऱ्या प्रवाशांशी संवाद साधताना अमराठी ऑटो रिक्षा व टॅक्सी चालकांची मराठी भाषा अधिक प्रभावी व सुलभ व्हावी, तसेच त्यांच्यामध्ये मराठी भाषेविषयी आदर व आत्मीयता निर्माण व्हावी, या उद्देशाने राबविण्यात आलेल्या 'हिंदू हृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे मराठी भाषा पाठ्यक्रम अभियानाचा' समारोप व प्रमाणपत्र वितरण सोहळा प्रादेशिक परिवहन कार्यालय, अमरावती येथे पार पडला.


महाराष्ट्र शासन परिवहन विभाग, राज्य मराठी विकास संस्था, कोकण मराठी साहित्य परिषद आणि मुंबई मराठी साहित्य संघ यांच्या संयुक्त विद्यमाने राज्यातील अमराठी ऑटो रिक्षा व टॅक्सी परवानाधारक चालकांसाठी हा अभिनव उपक्रम राबविण्यात आला.कार्यक्रमाला प्रादेशिक परिवहन अधिकारी उर्मिला पवार, मराठी भाषा प्रशिक्षणाच्या प्रमुख वक्त्या प्रा. डॉ. मंदा नांदुरकर, लेखा अधिकारी गजानन देशमुख, मोटार वाहन निरीक्षक अजित येणारे व प्रमोद गोटे यांची प्रमुख उपस्थिती होती.

दहा अमराठी चालकांचा गौरव मराठी भाषा शिकवणी वर्ग व कार्यशाळेत नियमित सहभाग घेऊन अभ्यासक्रम यशस्वीरीत्या पूर्ण केलेल्या दहा अमराठी ऑटो रिक्षा चालकांना यावेळी मान्यवरांच्या हस्ते प्रमाणपत्र देऊन गौरविण्यात आले. यामध्ये अब्दुल समद अब्दुल रहमान, शेख सलीम शेख करीम, अब्दुल रशीद अब्दुल अझीझ, इम्रान खान बशीर खान, अब्दुल मुक्तार अब्दुल गफार, अब्दुल वजीद अब्दुल अझीझ, शेख जब्बार शेख मेहमूद, मोहम्मद अफजल मोहम्मद अताउल्लाह, शेख राजा शेख रफीक आणि शेख सईद शेख शब्बीर यांचा समावेश आहे.यावेळी मार्गदर्शन करताना प्रादेशिक परिवहन अधिकारी उर्मिला पवार यांनी ऑटो रिक्षा व टॅक्सी चालकांनी प्रवाशांशी संवाद साधताना जास्तीत जास्त मराठी भाषेचा वापर करण्याचे आवाहन केले.संचालन व आभार प्रदर्शन जनसंपर्क अधिकारी अनिल मानकर यांनी केले.कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनामध्ये यशवंत रामटेके, सोहम हेमने, राजेश पाटील, अक्षय राठोड आदी कर्मचारी व अधिकाऱ्यांचा सहभाग होता. कार्यक्रमाकरिता मोठ्या संख्येने ऑटो वाहन चालक उपस्थित होते.

## परिवर्तन प्रबोधिनी व विदर्भ साहित्य संघातर्फे
# स्वातंत्र्याचे रंग कवितेच्या संग'

**अमरावती/का.प्र.**

परिवर्तन प्रबोधिनी अमरावती व विदर्भ साहित्य संघ शाखा अमरावती यांच्या संयुक्त विद्यमाने स्वातंत्र्य पर्वाच्या शुभमुहूर्तावर स्वातंत्र्याला सलामी म्हणून अमरावती येथे दिग्गज कवींचे स्वातंत्र्यावरील कवितांचे ऑनलाइन कवी संमेलन अतिशय हर्षोल्हासात पार पडले. या कवी संमेलनाचे अध्यक्ष म्हणून 'बाप'या कादंबरीचे लेखक इंजिनिअर दीपक दारव्हेकर तर माजी सभापती मनपा प्रभा आवारे उद्घाटक म्हणून लाभल्या.अतिशय जल्लोषात पार पडलेल्या या कवी संमेलनाचे प्रमुख अतिथी म्हणून डॉ. श्यामसुंदर निकम व आबासाहेब कडू हे होते. या ऑनलाईन कवी संमेलनाची सुरवात महाराष्ट्रातील ख्यातनाम



लेखिका कवयित्री, सदस्या केंद्रीय कार्यकारिणी वि. सा. संघ नागपूर डॉ. शोभाताई रोकडे यांच्या प्रास्ताविकेने झाली.

प्रसिद्ध कवी विशाल मोहोड यांनी 'हुकूमशाही', ही कविता सादर करून स्वातंत्र्याचे महत्त्व प्रतिपादित केले तर प्रसिद्ध कवी संदीप देशमुख यांनी स्वतंत्रतेच्या संकल्पना स्पष्ट करत,'स्वातंत्र्य म्हणजे काय' ही कविता सादर केली. कवी किशोर जऱ्हाड यांनी,'कधी कधी ती सांगते' ही कविता सादर करून रसिकांची मने जिंकली तर कवी विशाल कन्हेरकर यांनी आपल्या सुमधुर आवाजात 'स्वातंत्र्याची पहाट झाली', ही कविता सादर केली. प्रवीण गुल्हाने यांच्या 'उठ माणसा जागा हो' या कवितेने माणसाचे स्वातंत्र्यामधील कर्तव्य स्पष्ट केले तर प्रभाताई आवारे यांच्या,'तिरंगा आमची शान' या कवितेने भारत मातेच्या स्वातंत्र्याचे महत्त्व व स्वाभिमान जागा केला. कवयित्री शितल राऊत यांनी,'रणांगण' ही कविता २ सुमधूर आवाजात सादर करत रसिकांची मने जिंकली तर अॅड. सुरेश चापोरकर यांच्या, 'स्वातंत्र्याचे नवे पर्व' या कवितेने स्वातंत्र्याचा सूर्य प्रदीप्त झाल्यानंतरच्या आपल्या उत्कट भावना स्पष्ट केल्या.

स्वातंत्र्यपर्वाच्या महन्मंगल क्षणांये साक्षीदार होत प्रसिद्ध वऱ्हाडी कवी आबासाहेब कडू यांनी 'या रे या सारे या गाऊ एकच गाण, सुंदर संपन्न समृद्ध करूणी वाढवू देशाची शान' ही कविता सादर करत देशाबद्दलचे आपले कर्तव्य स्पष्ट केले. प्रसिद्ध कवी कादंबरीकार डॉ. श्यामसुंदर निकम साहेब यांनी,'भारत मातेचे सुपुत्र आम्ही ' ही कविता सादर करत आम्ही भारत मातेच्या कुशीत जन्मलो याबद्दलची धन्यता स्पष्ट केली. राष्ट्रीय कवयित्री डॉ. शोभाताई रोकडे यांच्या 'नदीच्या पोटात..दगड कोरडे..त्यासी ओरखडे.. प्रवाहाचे, अशा प्रकारचा आशयघन अभंग सादर करत पहिल्या कडव्यात स्वातंत्र्याबद्दलची कर्तव्यपूर्ती आणि जबाबदारी लक्षात आणून देत दुसऱ्या कडव्यात बदलत असलेल्या माणसाच्या स्वभावाबददलची खंत व्यक्त केली. डॉ. मंदा नांदूरकर यांच्या,'स्वातंत्र्याचा घोष' या अभंगाने स्वतंत्र भारतातील नागरीकाचे कर्तव्य स्पष्ट केले.शेवटी कवी संमेलनाचे अध्यक्ष इंजिनिअर दीपक दारव्हेकर यांच्या 'युद्ध अठराशे सत्तावनचे ठरले पहिले बंड स्वातंत्र्याचे'या ऐतिहासिक कवितेने स्वातंत्र्याची मुहूर्तमेढ रोल्यापासून तर स्वातंत्र्य मिळेपर्यंतचा रक्तरंजित इतिहास सर्वांसमोर उलगडून दाखविला. संचालन सुमधूर आवाजाच्या प्रसिद्ध निवेदक डॉ. मंदा नांदूरकर यांनी तर आभार प्रदर्शन कवी संदीप देशमुख यांनी केले.

# गाजीपूर-रुधाडीतील खदान-क्रशरची पाहणी संशयाच्या भोव-यात!

## पथक आले, पाहणी झाली; मात्र 'आढळले काय?' याचे उत्तर गुलदस्त्यातच

**ॲड. समीर ठाकूर**




**अकोला :** सातपुड्याच्या पायथ्याशी असलेल्या पोपटखेड गट ग्रामपंचायतीतील मौजे गाजीपूर व रुधाडी परिसरातील खदान आणि क्रशर धारकांकडून नियमांची खुलेआम पायमल्ली होत असल्याचे वृत्त सातत्याने प्रकाशझोतात आल्यानंतर अखेर प्रशासनाच्या तपासणी पथकाने मंगळवारी या परिसरात धडक देत पाहणी केली. मात्र, पाहणी झाली खरी; पण या पाहणीत नेमके काय आढळले, कोणत्या खदानी सुरू आढळल्या, बंद आदेशाचे उल्लंघन कुठे झाले, किती गौण खनिजाचा साठा आढळला आणि कोणत्या क्रशरवर नियमभंग दिसून आला, याबाबत प्रशासनाने कमालीची गुप्तता बाळगली आहे. त्यामुळे 'पथक आले, पाहणी केली आणि निघून गेले' अशीच चर्चा आता परिसरात रंगू लागली असून या पाहणी दौऱ्यावरच संशयाची सावली पडली आहे.

मागील महिन्यात गाजीपूर व रुधाडी परिसरातील गौण खनिज उत्खननाच्या प्रकरणात सहा खदानी बंद करण्याचे आदेश देण्यात आले होते. तात्पुरत्या परवान्याच्या आडून नियमांना हरताळ फासला जात असल्याच्या तक्रारी आणि वृत्तांनंतर ही कारवाई करण्यात आली होती. मात्र, आदेश कागदावर आणि उत्खनन प्रत्यक्षात सुरू, अशी परिस्थिती असल्याच्या तक्रारी पुढे आल्या. काही खदानींमध्ये गौण खनिज उत्खननासाठी ब्लास्टिंग होल मारण्यात आल्याचे सांगितले जात असताना काही ठिकाणी उत्खनन सुरूच असल्याची माहिती समोर आली होती. प्रशासनाने सहा खदानी बंद करण्याचे आदेश दिले. परंतु त्या आदेशाची प्रत्यक्ष अंमलबजावणी झाली का? बंद केलेल्या खदानींची पाहणी नियमितपणे करण्यात आली का? आदेशानंतरही उत्खनन सुरू असल्याचे आढळल्यास संबंधितांवर काय कारवाई करण्यात आली? या प्रश्नांची उत्तरे अद्याप धूसर आहेत. विशेष म्हणजे या परिसरावर लक्ष ठेवण्याची जबाबदारी असलेल्या महसूल यंत्रणेतील संबंधित तलाठी व मंडळ अधिकाऱ्यांच्या भूमिकेवरही आता प्रश्नचिन्ह उपस्थित होत आहे. 'दूध का दूध, पानी का पानी' करण्यासाठी पाहणी झाली असेल, तर मग अहवाल दडविण्याचे कारण काय? असा सवाल ग्रामस्थांकडून उपस्थित केला जात आहे.

या पाहणी पथकात जिल्हा खनिकर्म अधिकारी श्री. धांडे, प्रदूषण नियंत्रण मंडळाचे निरीक्षक श्री. चौधरी, तहसीलदार श्री. चव्हाण, मंडळ अधिकारी श्री. होपळ, तलाठी श्री. पवार तसेच जिल्हा उद्योग केंद्राचे अधिकारी यांचा समावेश असल्याची माहिती आहे. इतके अधिकारी एकाच वेळी घटनास्थळी उपस्थित असताना पाहणीत आढळलेल्या बाबींची अधिकृत माहिती समोर न आल्याने उलट संशयाला खतपाणी मिळत आहे. प्रशासनाने पारदर्शकपणे तपासणीचा अहवाल जाहीर करून दूध का दूध आणि पाणी का पाणी करावे, अशी मागणी आता जोर धरत आहे.

### ■ हजारो ब्रास साठा; कागदपत्रांची तपासणी झाली का?

या परिसरातील क्रशरवर प्रक्रिया करण्यात आलेल्या गौण खनिजाचा मोठ्या प्रमाणात साठा असल्याचेही सांगण्यात येत आहे. हा साठा किती ब्रास आहे? त्याचे मोजमाप करण्यात आले का? साठ्याशी संबंधित रॉयल्टीची कागदपत्रे तपासण्यात आली का? क्रशरवर प्रक्रिया करण्यासाठी वापरण्यात आलेले गौण खनिज नेमके कुठून आणण्यात आले? त्या खनिजाचा वैध स्रोत कोणता? संबंधितांकडे आवश्यक परवाने व करार आहेत का? याची तपासणी झाली का? तपासणी झाली असेल तर निष्कर्ष काय, आणि झाली नसेल तर का झाली नाही, याचे उत्तर प्रशासनाने देणे गरजेचे आहे.

### ■ संतोष चांडक यांच्या क्रशरवरील साठ्याचा 'हिशेब' कुठे?

याच परिसरातील गाजीपूर येथे दंडग्रस्त संतोष चांडक यांचे मालकीचे दोन क्रशर कार्यरत आहेत. त्यांच्या नावावर खदान नसल्याची माहिती समोर येत असून, कोणत्या खदानधारकाशी वैध करार करून गौण खनिज क्रशरसाठी आणले जाते, याचीही स्पष्टता नसल्याचे सांगितले जाते. तसेच गौण खनिजाचा साठा व विक्रीसंदर्भातील आवश्यक परवान्यांबाबतही प्रश्न उपस्थित करण्यात येत आहेत. असे असताना त्यांच्या क्रशरवर मोठ्या प्रमाणात प्रक्रिया केलेले गौण खनिज आढळल्यास त्याचा पंचनामा अथवा अधिकृत नोंद करण्यात आली का? साठ्याचे मोजमाप किती नोंदवले? संबंधित कागदपत्रे मागविण्यात आली का? रॉयल्टीचा हिशेब तपासण्यात आला का? या सर्व प्रश्नांची उत्तरे तपासणी अहवालातूनच स्पष्ट होणे अपेक्षित आहे.

### ■ क्रशरमधील धुळीचा लोट; प्रदूषण नियंत्रणाचा देखावा?

गाजीपूर-रुधाडी परिसरातील क्रशर यंत्रणांबाबतही अनेक प्रश्न कायम आहेत. क्रशर सुरू असताना मोठ्या प्रमाणात धुळीचे लोट हवेत उडत असल्याचे स्थानिक नागरिकांचे म्हणणे आहे. धुळीवर नियंत्रण ठेवण्यासाठी पाणी फवारणी, धूळ नियंत्रण यंत्रणा अथवा प्रदूषण प्रतिबंधक उपाययोजना प्रत्यक्षात सुरू आहेत की केवळ कागदोपत्री आणि देखाव्यापुरत्या उभारण्यात आल्या आहेत, याची तपासणी करण्यात आली का, हा कळीचा प्रश्न आहे.

प्रदूषण नियंत्रण मंडळाच्या अधिकाऱ्यांचाही या पथकात समावेश असताना या बाबींची सखोल तपासणी झाली असेल, तर त्याचे निष्कर्ष जाहीर करण्यास प्रशासनाला अडचण काय? असा सवाल उपस्थित होत आहे. कारण धुळीचे ढग नागरिकांच्या डोळ्यांना दिसतात; मग तपासणी करणाऱ्या यंत्रणेला ते दिसले नाहीत का, असा संतप्त सवाल परिसरातून विचारला जात आहे.

### ■ 'चोराच्या मनात चांदणे' ठरू नये!

प्रशासनाच्या म्हणण्यानुसार हा दौरा नियमित तपासणीचा होता. मात्र, परिसरात इतक्या गंभीर स्वरूपाच्या तक्रारी, बंद खदानी, सुरू असलेले उत्खनन, ब्लास्टिंग होल, मोठ्या प्रमाणातील गौण खनिज साठा आणि प्रदूषणाच्या तक्रारी असताना ही तपासणी केवळ औपचारिकता ठरू नये, अशी अपेक्षा नागरिक व्यक्त करीत आहेत. नियमित तपासणी असेल तर अहवालही नियमितपणे सार्वजनिक व्हायला हवा. नेमके काय आढळले, कोणती अनियमितता आढळली, किती साठा जप्त अथवा नोंदविला, कोणत्या व्यक्तींकडे कागदपत्रांची मागणी करण्यात आली आणि पुढे कोणती कारवाई प्रस्तावित आहे, हे प्रशासनाने स्पष्ट करणे आवश्यक आहे. अन्यथा 'पथक आले, पाहणी केली, पाहुणचार घेतला आणि गेले' अशीच या दौऱ्याची अवस्था होण्याची भीती व्यक्त होत आहे.

### तपासणी पथकासमोर उभे ठाकलेले सवाल

■ सहा बंद खदानींची प्रत्यक्ष पाहणी झाली का? ■ बंद आदेशानंतरही उत्खनन सुरू असल्याचे आढळले का? ■ खदानींमध्ये मारण्यात आलेल्या ब्लास्टिंग होलची नोंद घेण्यात आली का? ■ क्रशरवरील हजारो ब्रास गौण खनिज साठ्याचे मोजमाप झाले का? ■ साठ्याची रॉयल्टी व संबंधित कागदपत्रे तपासली का? ■ क्रशरसाठी गौण खनिजाचा वैध स्रोत कोणता, याची पडताळणी झाली का? ■ संतोष चांडक यांच्या दोन्ही क्रशरवरील साठ्याची अधिकृत नोंद झाली का? ■ क्रशरवरील प्रदूषण नियंत्रण यंत्रणा प्रत्यक्ष कार्यरत आहे का, याची तपासणी झाली का? ■ धुळीचे उत्सर्जन आणि पर्यावरणीय नियमांचे पालन तपासले का? ■ अनियमितता आढळल्यास कोणती कारवाई प्रस्तावित आहे? ■ पाहणीचा अधिकृत अहवाल सार्वजनिक करण्यास प्रशासन तयार आहे का?

# मरणोपरांत धीरजने दिले इतरांना जीवदान

## समाजासमोर ठेवला माणुसकीचा आदर्श



**चांदूर रेल्वे:-** साधारणता एक आठवडापूर्वी आपल्या मित्र-परिवारांसोबत केदारनाथ व बद्रीनाथ यात्रेवरून परत आलेला धीरज कलावटे आपल्या पाच मित्रासह तळेगाव येथे गेला होता. तळेगाव वरून परत येताना कार चा भीषण अपघात झाला. या अपघातामध्ये धीरजचा मित्र ललित युवराज सवाने(वय ३० वर्ष) याचा जागीच मृत्यू झाला तर धीरज च्या मेंदूला गंभीर दुखापत झाल्यामुळे त्याला ताबडतोब अमरावती येथील रेडीयंट हॉस्पिटलमध्ये दाखल करण्यात आले होते. डॉक्टरांनी अनेक शर्थीचे प्रयत्न केले मात्र दुर्दैवाने सर्व प्रयत्न फोल ठरले. काल दिनांक १८ ऑगस्ट रोजी धीरज ची मृत्युशी झुंज संपली व त्याचा दुर्दैवी मृत्यू झाला. धीरज हा अनेक समाजिक व धार्मिक कार्यात हिरीने सहभागी होत होता.स्वभावाने अतिशय सरल व मनमिळाऊ व्यक्तिमत्वाचा तो होता.धीरजच्या अकाली निधनाने संपूर्ण शहरात हळहळ व्यक्त करण्यात येत आहे. धीरजच्या परिवारात आई-वडील,एक लहान बहीण व दोन काका असा मोठा परिवार असून ह्या संपूर्ण परिवाराने धीरजच्या मरणोपरात आपले दुःख बाजूला सारून त्याच्या अवयवदानाचा निर्णय घेतला. नागपूरवरून डॉक्टरांच्या एका टीम ने अवयवदानाची ही प्रक्रिया पार पाडली. कलावटे कुटुंबीयांच्या ह्या आदर्श निर्णयाचे समाजाच्या सर्वच स्तरावरून स्वागत व कौतुक करण्यात येत आहे.

# मेळघाटातील आदिवासी विद्यार्थ्यांना विषबाधेचा संशय

## खासदार बळवंत वानखडे यांनी घेतली रुग्णालयात भेट

**अमरावती/ प्रतिनिधीः-** अमरावती जिल्ह्यातील मेळघाट भागातील आदिवासी विद्यार्थ्यांच्या प्रकृतीशी संबंधित प्रकरण पुन्हा चर्चेत आले आहे. महर्षी पब्लिक स्कूलमधील पाच विद्यार्थ्यांना अचानक उलट्या, जुलाब आणि चक्कर येण्यासारखी लक्षणे






जाणवू लागल्याने त्यांना अमरावती येथील एका खासगी रुग्णालयात उपचारासाठी दाखल करण्यात आले आहे. अन्नातून विषबाधा झाल्याचा संशय व्यक्त करण्यात येत असून, याबाबत अधिकृत तपासणीनंतरच नेमके कारण स्पष्ट होणार आहे.

घटनेची माहिती मिळताच अमरावतीचे खासदार बळवंत वानखडे☞(पान २ वर)

# सार्वजनिक गणेशोत्सवातील वर्गणी गोळा करण्यासाठी धर्मदाय आयुक्तांची पूर्वपरवानगी आवश्यक

**अमरावती/ प्रतिनिधीः-** सार्वजनिक विश्वस्त व्यवस्था वगळून जिल्ह्यातील सर्व सार्वजनिक गणेशोत्सव मंडळांतर्फे वर्गणी गोळा करण्याकरिता धर्मदाय उपआयुक्त किंवा सहायक धर्मदाय आयुक्त अमरावती यांची पूर्वपरवानगी घ्यावी, असे आवहन धर्मदाय सह आयुक्त दीपक खोचे यांनी केले आहे. पूर्व परवानगी शिवाय वर्गणी गोळा केल्याचे सिद्ध झाल्यास तीन महिन्या पर्यंत साध्या कारावासाची किंवा संकलीत रकमेच्या




दीडपट द्रव्य दंडाची शिक्षा होऊ शकते असेही सांगण्यात आले आहे.

महाराष्ट्र सार्वजनिक विश्वस्त व्यवस्था अधिनियम १९५० च्या कलम ४१-क नुसार सार्वजनिक☞(पान २

# मुलीला फुस लावून पळवून नेणा-या आरोपीस अटक


**मोर्शी/ प्रतिनिधीः-** अल्पवयीन मुलीला फुस लावून पळवून नेणाऱ्या आरोपीस आज दि.१९ ऑगस्ट रोजी मोर्शी पोलिसांनी जेरबंद केले.



पोलीस स्टेशन मोर्शी येथे दिनांक १५/१२/२०२५ रोजी फिर्यादी यांची मुलगी पिडीता हिला आरोपी कार्तिक रंजन दाढे (वय २३ वर्षे रा.मनिमपुर) याने फुस लावुन पळवुन नेल्याच्या तक्रार दाखल केली होती. त्यावरून अपराध क्र. ७२०/२०२५ कलम १३७ (२)भारतीय न्याय संहीता प्रमाणे गुन्हा नोंद करण्यात आला होता. सदरचा गुन्हा नोंद केला तेव्हापासुन मोर्शी पोलीसांनी आरोपीचा शोध घेणे सुरू केले होते. मात्र आरोपी हा त्यांना कुठेच मिळुन आला नाही. शेवटी मोर्शी पोलीस ☞(पान २ वर)

# अंजनगाव सुर्जी पोलीस स्टेशनच्या डी.बी. पथकावर बरखास्तीची कुऱ्हाड

**अंजनगाव सुर्जी/ प्रतिनिधीः-** अंजनगाव सुर्जी पोलीस स्टेशनमधील डी.बी. (डिटेक्शन ब्रांच) पथक ग्रामीण पोलीस अधीक्षक यांनी बरखास्त केल्याची माहिती पोलीस सूत्रांकडून समोर येत आहे.प्राप्त माहितीनुसार, मंगळवार दिनांक १८ रोजी ग्रामीण पोलीस अधीक्षक यांनी अंजनगाव सुर्जी पोलीस स्टेशनला दौरा केला होता. या दौऱ्यादरम्यान त्यांनी हे डी.बी. पथक बरखास्त करण्याचे आदेश दिले असल्याचे बोलले जात आहे.अंजनगाव पोलीस स्टेशनमध्ये ठाणेदार सुरज बोंडे यांच्या मार्गदर्शनाखाली हे डी.बी. पथक कार्यरत होते. या पथकाने अल्पावधीतच उल्लेखनीय कामगिरी केली होती.हे पथक कार्यरत असताना हद्दीतील अनेक गंभीर गुन्ह्यांचा तपास



तात्काळ लावण्यात आला होता. विशेषतः चोरी, घरफोडी सारख्या गुन्ह्यातील आरोपींना तात्काळ जेरबंद करण्यात या पथकाला यश आले होते.

याशिवाय हद्दीतील अवैध धंद्यांवर देखील या पथकाने मोठी कारवाई केली होती. अवैध धंदे करणाऱ्यांच्या मुसक्या आवळल्याने अनेक अवैध धंदेवाईकांनी हद्द ☞(पान २ वर)

# ४.५ लाखांच्या देशी दारूसह कार जप्त; आरोपीला अटक



**बेलोरा/ प्रतिनिधीः-** चांदूरबाजार पोलीस स्टेशनअंतर्गत जयस्तंभ चौकात रात्रीच्या गस्तीदरम्यान पोलिसांनी मोठी कारवाई करत ४ लाख ५० हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त केला आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, जयस्तंभ चौक भागात संशयास्पद रीतीने येणाऱ्या स्विफ्ट डिझायर ☞(पान २ वर)

# तिवस्यात अवैध सावकारी करणाऱ्याविरुद्ध कारवाई

## दोन दुचाकी, मुद्रांकासह धनादेश जप्त

**तिवसा/ प्रतिनिधीः-** शहरातील एका अवैध सावकारी करणाऱ्या व्यक्तीच्या घरावर आज बुधवारीं (दि.१९) तिवसा सहाय्यक निबंधक विभागाने धाड टाकून घरातून दोन दुचाकी, मुद्रांकसह धनादेश जप्त करत कारवाई केली.सुनील सुरटकार,(रा शिवाजी चौक तिवसा) असे कारवाई झालेल्या व्यक्तीचे नाव आहे.



महाराष्ट्र शासन सावकारी नियमाचे उल्लंघन करत शहरात अनेक वर्षापासून अवैध सावकारीचे धंदे फोफावले असून सर्व सामान्य लोकांचीं☞(पान २ वर)

## लक्ष्मीबाई ढोके यांचे निधन

**अमरावती/ प्रतिनिधीः-** विचोरी येथील रहिवासी सेवानिवृत्त एएसआय बाबनराव ढोके यांच्या मातोश्री लक्ष्मीबाई दौलतराव ढोके यांचे आज सकाळी आठ वाजता च्या दरम्यान ८४ व्या वर्षी वृद्धप काळाने निधन झाले. त्याचा अंतिम विधी उद्या दिनांक २०/०८/२६ रोजी विचोरी येथे करण्यात येणार आहे. त्यांच्या मागे एक मुलगा, सुना, नातवंड असा बराच मोठा परिवार आहे.



# सराईत गुन्हेगार शेख सुफियान एमपीडीएखाली स्थानबद्ध

## गंभीर स्वरूपाचे १० गुन्हे दाखल

**अमरावती/ प्रतिनिधीः-** शहरातील सराईत गुन्हेगार शेख सुफियान शेख इलियास (वय २५), रा. राहुलनगर, गजाननगर, अमरावती याच्याविरुद्ध एमपीडीए करवाई करण्यात आली आहे.

गंभीर स्वरूपाचे १० गुन्हे दाखल असल्याने महाराष्ट्र झोपडपट्टीदादा, हातभट्टीवाले, औषधद्रव्यांचे गुन्हेगार, धोकादायक व्यक्ती आणि समाजविघातक कृत्ये करणाऱ्या व्यक्तींच्या धोकादायक कारवायांना प्रतिबंध करण्याबाबतच्या अधिनियमांतर्गत (MPDA) स्थानबद्धतेची कारवाई करण्यात आली आहे.



पोलीस आयुक्त राकेश ओला यांनी १९ ऑगस्ट रोजी स्थानबद्धतेचे आदेश जारी केले. त्यानंतर पोलिसांनी त्याला ताब्यात घेऊन अमरावती मध्यवर्ती कारागृहात दाखल केले. पोलीस विभागाच्या माहितीनुसार, शेख सुफियान हा २०२३ पासून गुन्हेगारी कारवायांमध्ये सक्रिय आहे. त्याच्याविरुद्ध फ्रेजरपुरा आणि गाडगेनगर पोलीस ठाण्यांत दरोडा, जबरी चोरी, गंभीर दुखापत करण्याचा प्रयत्न, दुखापत करणे,☞(पान २ वर)

# पवननगरातील देहव्यापारावर पोलिसांचा छापा

**अमरावती/ प्रतिनिधीः-** राजापेठ पोलीस ठाण्याच्या हद्दीतील पवननगर क्रमांक १ परिसरात घरामध्ये सुरू असलेल्या कथित देहव्यापाराचा अनैतिक मानवी वाहतूक प्रतिबंधक कक्षाने पर्दाफाश केला. गुप्त माहितीच्या आधारे पोलिसांनी बुधवारी (१९ ऑगस्ट) संबंधित घरावर छापा टाकला. यावेळी दोन महिला आढळून आल्या. त्यांच्याकडून १ हजार २० रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला असून, एका महिला आरोपीविरुद्ध अनैतिक मानवी वाहतूक प्रतिबंधक कायद्यान्वये



कारवाई करण्यात आली. पोलीस आयुक्तालयाच्या भरोसा सेलअंतर्गत अनैतिक मानवी वाहतूक कक्षाला पवननगर परिसरात एका घरामध्ये महिलांना पैशांचे आमिष दाखवून देहव्यापारासाठी प्रवृत्त केले जात असल्याची माहिती मिळाली होती. या माहितीच्या आधारे पथकाने संबंधित ठिकाणी छापा टाकला. कारवाईदरम्यान घरामध्ये दोन महिला आढळून आल्या. प्राथमिक चौकशीनंतर पोलिसांनी संबंधित महिला आरोपीविरुद्ध कायदेशीर कारवाई केली.

ही कारवाई पोलीस आयुक्त राकेश ओला, पोलीस उपायुक्त परिमंडळ-१ यशवंत सोळंके, पोलीस उपायुक्त परिमंडळ-२ शाम घुगे आणि पोलीस उपायुक्त (मुख्यालय)☞(पान २ वर)